क०/१२६

आंतर भारती पुरस्कृत ग्रंथ

# कन्नड-प्रबोध

अविभक्तं विभक्तेषु।

शंकर विनायक जोशी

४०|१२६

आंतर भारती पुरस्कृत ग्रंथ

# कन्नड-प्रबोध

लेखक :

शंकर विनायक जोशी

धारवाड

प्रस्तावना : प्रा. वि मा. दी. पटवर्धन

धारवाड

अविभक्तं विभक्तेषु।

कि. ३-२-०

दि स्टूडंट्स ओन् बुक् डेपो, धारवाड

# लेखकाचें निवेदन

हें पुस्तक लिहितांना प्रा. वि. मा. दी. पटवर्धन यांचें मला अमोल्य सहकार्य लाभलें. या पुस्तकाचें स्वरूप, विवेचनपद्धति वगैरे संबंधानें अवश्य असलेला सर्व खुलासा त्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत मार्मिकपणें केलाच आहे.

सुप्रसिद्ध कन्नड साहित्यिक श्री. शं. बा. जोशी यांनीं या पुस्तकांतील विवेचनासंबधानें अुपयुक्त सूचना केल्या.

'आंतर भारती' च्या विद्यमानें या पुस्तकाचा पुरस्कार करून आचार्य स. ज. भागवत यांनीं मला प्रोत्साहन दिलें.

बिहारचे राज्यपाल मान्य श्री. दिवाकर यांनीं या पुस्तकाला शुभाशीर्वाद पाठविला.

सुप्रसिद्ध कन्नड साहित्यिक श्री. द. रा. बेंद्रे यांनीं 'गद्यांचा नमूनो' (प्रकरण ५१) या पुस्तकांत घालण्यास अनुमति दिली. कांहीं कन्नड शब्दां संबंधानें सुप्रसिद्ध कन्नड साहित्यिक श्री. कृष्णशर्मा बेटगेरी यांच्या सल्ल्याचा अुपयोग झाला.

श्री. भास्करराव गोखले यांनीं या पुस्तकाकडे 'आंतर भारती' चें लक्ष वेधलें. डॉ. गणपतराव जोशी हुबळी, यांनीं 'दवाखान्यांत' या व्यावहारिक प्रकरणांतील प्रश्नोत्तरें लिहून सुचविलीं. प्रा. सं. गो. टिकम यांनीं प्रूफें तपासण्याचें काम आपुलकीनें केलें. श्री. रा. ग. जोशी व श्रीयुत श्री. ज. बापट यांनीं मुद्रण–प्रकाशनाचें काम अुत्साहानें पत्करून पार पाडलें.

अुपरिनिर्दिष्ट सर्व मित्रमंडळींचा व थोर व्यक्तींचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

'जोशी फार्म' धारवाड. **शंकर विनायक जोशी**

२७–१२–५४

'आंतर भारती'चा

# पुरस्कार

श्री. शंकर विनायक जोशी यांच्या 'कन्नडप्रबोध' या नव्या पुस्तकाला आंतर भारती या संस्थेच्या वतीनें पुरस्कार लिहिण्याला मला जितका आनंद वाटतो तितकेंच मला वाअीटहि वाटत आहे. हा ग्रंथ आंतर भारतीचें अधिकृत प्रकाशन म्हणून मला महाराष्ट्राला सादर करतां येत नाहीं हें माझें दुःखाचें कारण आहे. केवळ आर्थिक अनुकूलता नसल्यामुळें अितक्या चांगल्या ग्रंथाचा संस्थेला लाभ होअूं नये, हें खरोखरच अेक दुर्दैव होय. पण आनंद अशासाठीं वाटतो, कीं या ग्रंथाचे लेखक आणि प्रकाशक या दोघांनाहि आंतर भारतीशीं आपल्या ग्रंथाचा संबंध असावा असें वाटलें आणि त्यामुळेंच 'आंतर भारती पुरस्कृत ग्रंथ' म्हणून याचें प्रकाशन आज होत आहे. आंतर भारतीला हा मान दिल्याबद्दल मी प्रथम या ग्रंथाचे लेखक श्री. शंकर विनायक जोशी आणि प्रकाशक श्री. रा. ग. जोशी यांचा आभारी आहे.

या ग्रंथाचे लेखक श्री. शंकर विनायक जोशी हे धारवाडचे रहिवासी असून अुत्तर कर्नाटकामध्यें अत्यंत प्रसिद्ध आहेत. त्यांचे वडील कै. श्री. विनायकरावजी जोशी यांनीं कन्नड भाषेची आणि कन्नडिगांची थोर सेवा केलेली आहे. मातृभाषा मराठी असून कै. विनायकरावजींनीं आपलें सर्व शिक्षण कन्नड मधून केलें आणि कन्नड भाषेला विद्यापीठांत परमोच्च पदवीच्या परीक्षेपर्यंत नेअून बसविलें. सरकारी नोकरींतून निवृत्त झाल्यावर कै. श्री. विनायकरावजींनीं देशाच्या स्वातंत्र्य लढ्यांतहि निस्पृहतेनें भाग घेतला आणि त्यासाठीं वृत्तिअुच्छेदासारखा फार मोठा स्वार्थत्याग विचारपूर्वक आचरिला. श्री. शंकरराव यांच्यांतहि आपल्या वडिलांचे ठिकाणीं असलेले कित्येक गुण दिसून येतात. वडिलांप्रमाणेंच त्यांनींहि कन्नड भाषेचा प्रेमानें व आस्थेनें चांगला अभ्यास केला आहे. 'कन्नडप्रबोध' वरून त्यांच्या अध्ययनाचें सर्वसामान्य स्वरूप कोणाहि वाचकाला दिसून येअीलच. तथापि त्यांनीं

मराठी आणि कन्नड या भाषांचा तुलनात्मक विचार बराच केलेला आहे. त्या विचाराचें सर्व फल त्यांना या ग्रंथांत समाविष्ट करणें शक्य झालें नाहीं. तथापि त्यांनीं येथेंच न थांबतां आपल्या तुलनात्मक अभ्यासाचें फलित आणखी अेक ग्रंथ लिहून विद्वानांना सादर करावें अशी माझी त्यांना आग्रहाची विनंती आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्या सांस्कृतिक देव-घेवींचा अुलगडा होण्यासाठीं त्यांच्या अशा ग्रंथाचा अधिक अुपयोग होअील, अशी माझी स्वतःची खात्री आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही ठिकाणच्या विद्यापीठांनीं आणि साहित्यसंस्थांनीं या कामीं श्री. शंकरराव जोशी यांना सहानुभूति आणि सहाय्य दिलें पाहिजे असें मला वाटतें.

श्री. शंकरराव जोशी हे आजपर्यंत महाराष्ट्राला अपरिचित होते असें नाहीं, पण तो परिचय वेगळ्या प्रकारचा होता. ते भारतीय संगीताचे चांगले जाणकार आहेत आणि अुत्तम कलावंतहि आहेत. यामुळें संगीतावरील आपल्या व्याख्यानांनीं आणि लेखांनीं ते गेलीं दहा वर्षें महाराष्ट्राला चांगले परिचित झालेले आहेत. कर्नाटकांत त्यांच्या संगीतकलेचा अनेकांना आस्वाद मिळालेला आहे. अशा सांस्कृतिक क्षेत्रांत आधीच बहुमान मिळविलेल्या गृहस्थांचा आज आणखी अेका निराळ्या दृष्टीनें परिचय व पुरस्कार करून देण्याची संधि येत असल्याबद्दल मला फार समाधान वाटतें. आपल्या भाषाविषयक पांडित्याचा नवा पैलू प्रगट करीत असतांना त्यांचें मनापासून अभिनंदन करावें हें अत्यंत अुचित आहे.

महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोनहि प्रदेशांतील विद्वानांना परस्पर परिचय करून घेण्याच्या दृष्टीनें 'कन्नडप्रबोध' सारख्या ग्रंथांचा विशेष अुपयोग होणार आहे. महाराष्ट्रांत तरी या ग्रंथाच्या सहायानें कन्नड साहित्य मुळांतून अभ्यासू अिच्छिणाऱ्या लोकांची चांगलीच सोय झाली आहे, असें मला वाटतें. 'आंतर भारती'च्या सर्व मित्रांना या ग्रंथामुळें समाधान वाटेल यांत मुळींच शंका नाहीं.

हुबळी
३०-१०-५४

स. ज. भागवत
संचालक, आंतर भारती, पुणें

# थोडेंसें प्रबोधन

कन्नड प्रबोधाचे लेखक शंकरराव जोशी हे माझे फारा दिवसांचे स्नेही. धारवाड शहरांत मराठी भाषा व संस्था यांची तळमळीनें सेवा करणारे अेक समंजस कार्यकर्ते या नात्यानं मी त्यांना प्रथम ओळखत होतो. पुढं कांहीं दिवसांनीं त्यांची संगीतकलेची आवड माझ्या निदर्शनास आली. अेक कला या दृष्टीनं संगीताची साधना त्यांनीं आज बरींच वर्षं चालवली आहे हें तर खरंच. पण त्याहीपेक्षां विशेष गोष्ट अशी कीं अेक विद्या या दृष्टीनं त्यांनीं संगीताचा सांगोपांग अभ्यास केला आहे. संगीतविषयक अनेक प्रश्नांवर ते अधिकारवाणीनं बोलूं शकतात. पुण्यामुंबअीकडे त्यांचीं या विषयावर गेल्या कांहीं वर्षांत झालेलीं व्याख्यानं चांगलीं गाजलीं आहेत. भारताच्या प्राचीन संगीत परंपरेचा रास्त अभिमान बाळगून त्याची वकिली करणारा त्यांच्या अितका दुसरा प्रभावी वक्ता माझ्या पहाण्यांत नाहीं.

असे हे सांगीतिक श्री. जोशी साहित्यिकही असतील याची मात्र मला बरेच दिवस कल्पना नव्हती. पण त्यांच्या अेकदोन लघुकथा आणि संगीतावरचे कांहीं लेख मराठी नियतकालिकांत प्रसिद्ध झाल्यावर माझ्या वाचनांत आले आणि मी समजलों कीं त्यांच्यांत हांही जंतु प्रखर आहे! तथापि ललित वाङ्मयाचा लेखक सहसा भाषेचं व्याकरण आणि स्वरूप असल्या रूक्ष विषयांत लक्ष घालतांना दिसत नाहीं. पण शंकररावांनीं याही बाबतींत आपला निराळेपणा दाखविला. कन्नड, मराठी आणि हिंदी या तिन्ही भाषांचा तुलनात्मक अभ्यास हा लवकरच त्यांच्या आवडीचा विषय बनला आणि त्यांत ते अितके रंगून गेले कीं अलीकडे मला ते रस्त्यांत केव्हांही भेटले तरी "अहो पटवर्धन, तो अमका शब्दप्रयोग मराठींत अमक्या अर्थानं वापरतात कां हो?" अशा सारख्या प्रश्नानंच आमच्या संभाषणाला सुरवात व्हायची! मोल्सवर्थ, किटेल, व्हांड्रियास, जेस्पर्सन् यांसारख्या बड्या बड्या भाषा पंडितांचीं नांवं जोश्यांच्या संभाषणांत हल्लीं वारंवार यायला लागलीं आहेत.

त्यांचा हा छंद पाहिल्यावर आम्हीं कांहीं मित्रमंडळी त्यांना आग्रह

करूं लागलों, "शंकरराव, तुम्हीं आमच्याकरतां कानडीचे वर्ग काढा आणि आम्हांला कानडी अुत्तम तऱ्हेनं बोलायला शिकवा."

"वर्गाचं पुढं पाहूं." ते म्हणाले, "पण आधीं मी तुमच्या कानडीच्या पद्धतशीर अभ्यासाकरतां अेक पुस्तक लिहिणार आहे." म्हटल्याप्रमाणं त्यांनीं लगेच आपला अुद्योग सुरू केला आणि आमच्याकरतां हें पुस्तक लिहून तयार केलं.

आमच्याकरतां म्हणजे कर्नाटकांत या ना त्या कारणानं वास्तव्य करणाऱ्या सुशिक्षित मराठी लोकांकरितां. आज कर्नाटकाच्या चारी जिल्ह्यांत मिळून असे लक्षावधि मराठी लोक येथें वास्तव्य करीत आहेत. प्रांतपुनर्रचनेच्या धोरणाप्रमाणें लवकरच कर्नाटकाचं अेक निराळं घटकराज्य तयार होणार. त्याची सीमारेषा कोठेंही पडली तरी त्यांत बऱ्याच मराठीभाषकांचा समावेश होणार हें अटळ आहे. तेव्हां ज्या राज्याचे आपण रहिवासी त्याची भाषा आपल्याला सुलभतेनें बोलतां वाचतां आली पाहिजे हें क्रमप्राप्तच ठरेल व या दृष्टीन येथील मराठी भाषकांकरतां कानडीच्या अभ्यासाची सोय करणें हें कर्नाटकांतील मराठी संस्थांचें अेक प्रमुख कार्य होअून बसणार आहे.

अर्थात् कन्नडप्रबोध हें पुस्तक, शिकलेल्या प्रौढ मराठी स्त्रीपुरुषांना सहज कानडी बोलतां वाचतां यावं हा मुख्य हेतु डोळ्यांसमोर ठेवूनच लिहिलेलं आहे. कर्नाटकाबाहेरील जिज्ञासू कन्नडप्रेमी मराठी लोकांनाही त्याचा फायदा घेतां येअील. आंतर भारतीच्या तत्त्वास अनुसरून अन्य प्रांतिक भाषा शिकणे, तिच्यांतील अुत्तमोत्तम वाङ्मयाचं रसग्रहण करणं आणि स्वभाषेंतील सुवाङ्मयाची अन्यभाषकांना ओळख करून देणं हें सारं कार्य प्रगतिमान भारतवर्षाला हितावह असंच आहे. म्हणून प्रथम निकटवर्ति भिन्नप्रांतीयांमध्यें भाषिक दळणवळण चालू करण्यास अुपयुक्त ठरेल असं पुस्तक प्रकाशित करावयाचं व मागाहून यापेक्षां अधिक तात्विक स्वरूपाचं, भाषाशास्त्राच्या बैठकीवरून लिहीलेलं कन्नड व मराठी भाषांच्या तुलनात्मक अभ्यासाचं पुस्तक वाचकांना सादर करावयाचं ही शंकररावांची कल्पना मला स्वागतार्ह वाटते. तसा तात्त्विक विवेचनाचा ग्रंथ अभ्यासू वाचकांसाठीं तयार करण्याचा आपला संकल्प त्यांनी मला सांगूनही टाकला आहे!

निव्वळ तात्त्विक स्वरूपाचं पुस्तक प्रसिद्ध करण्यांत व्यावहारिक अडचण होती, आणि निव्वळ व्यावहारिक स्वरूपाचं पुस्तक लिहून बाजारांत आणणं शंकररावासारख्या व्यासंगी लेखकास तत्त्वतः मान्य होण्यासारखं नव्हतं. तेव्हां प्रस्तुत ग्रंथ या दोन टोकांमधील तडजोड आहे अशा दृष्टीनं चिकित्सक वाचकांनीं त्याकडे पहावं. मात्र ही तडजोड मूळ अुद्देशास हरताळ फासणारी नाहीं याची हमी मी शंकररावांच्या वतीनं वाचकांना आधींच देअून ठेवतों.

या पुस्तकांतील मजकुराची मांडणी वरवर पाहिली तरी माझ्या म्हणण्याची यथार्थता पटेल. कर्नाटकांत राहायला गेलेल्या महाराष्ट्रीयाला प्रथम जरूर भासते ती कानडी अुत्तम बोलतां येण्याची. मग पुढं तो वर्तमानपत्रं वगैरे चाळूं लागला (किंवा रस्त्यावरील पाट्या पाहूं लागला–) म्हणजे त्याला वाचनाची आवश्यकता वाटते. या दोन्ही गोष्टी साध्य झाल्यानंतर तो लेखनाकडे वळतो. हा क्रम ध्यानांत घेअून या पुस्तकांत अितर क्रमिक पुस्तकां-प्रमाणं अेकदम मूळाक्षरं व लिपि यांपासून प्रारंभ न करतां आधीं कानडी बोलावं कसं यावरच भर दिला आहे.

कानडी बोलावं कसं हें सांगतांना प्रथमच त्या भाषेचं अेक वैशिष्ट्य श्री. जोशी यांनीं आपल्या निदर्शनास आणलं आहे. हें वैशिष्ट्य, मराठी मनुष्य कानडी बोलायला लागला कीं प्रथम त्याला गैरसोयीचं वाटतं. सुशिक्षित पांढरपेशा वर्गांतील कानडी माणूसदेखील लिहिल्याप्रमाणं बोलत नाहीं हें तें वैशिष्ट्य. अेकच आशय व्यक्त करतांना तो माणूस बोलतो अेक प्रकारचं आणि लिहितो निराळ्याच प्रकारचं. या दोन भाषा निराळ्या दाखविण्याकरतां अेकीला लेखभाषा आणि दुसरीला मुखभाषा म्हटलें आहे. हे दोन शब्द यथार्थ वाटतात. कारण "तो येतो" हें सांगण्याकरतां "अवनु बरुत्ताने" असं लिहितात आणि बोलतांना त्याचं "अवा बरतानं" असं रूप करतात. दक्षिण कर्नाटकांत म्हणजे म्हैसूरकडे बोलतांना आणखी निराळीं रूपं करतात. पण विस्तारभयास्तव तीं या पुस्तकांत दिलीं नाहींत. अुत्तरकर्नाटकांतील मुखभाषेचीं रूपं मात्र प्रत्येक वाक्यागणिक कंसांत दिलीं आहेत. कानडी चांगल्या तऱ्हेनं बोलतां येणं हा अुद्देश साध्य करण्यास त्यांचा फार अुपयोग होअील. या मुखभाषिक रूपांना "बोली" म्हणतां

येणार नाहीं. कारण बोली या शब्दाचा मराठींतला रूढ अर्थ वेगळा आहे.

कानडींत ऱ्हस्व अे आणि ऱ्हस्व ओ हे दोन जादा स्वर आहेत. मराठींत ते नाहींत. कानडी बोलतांना या स्वरांचा योग्य तऱ्हेनं अुच्चार करणं अवश्य असतं. तसं न केल्यास अर्थाचा अनर्थ होण्याचा संभव असतो. श्री. जोशी यांनीं सहाव्या पानावर याचीं अुदाहरणं दिलीं आहेत. तेव्हां शब्द लिहितांना किंवा छापतांना हे ऱ्हस्व स्वर निराळ्या चिन्हांनीं दाखविणं ओघानंच येतं. या पूर्वी कांहीं पुस्तकांत ते अुलट्या मात्रेनं ( म्हणजे— **ॴ** व **ॵ** ) दाखविण्याचा प्रघात पडला आहे. परंतु लिहितांना आपण मात्रेकरतां बहुतेक रेघच वापरतो. त्यामुळें अुलटी मात्रा आणि सुलटी मात्रा लेखनांत सारखीच दिसणार. छपाअीच्या वेळीं सुद्धां मात्रेची गाठ खालीं आल्यामुळें तिची अक्षराच्या डोक्यावर नक्की कुठं योजना करायची हा खिळे जुळणाऱ्याला प्रश्नच पडणार ! ह्या अडचणी टाळण्यासाठीं ऱ्हस्व स्वरांचं संगीतांत आज सर्वमान्य झालेलं चंद्रकोरीचं चिन्ह अक्षराच्या तळाशीं दाखविण्याची पद्धत जोशी यांनीं स्वीकारली आहे, आणि ती मला अधिक सोपी नि सुबक वाटते.

"**अ**" या स्वराचा शब्दाच्या शेवटीं अुच्चार करायचा झाल्यास कानडींत कधीं कधी विस्तृत करतात. पण त्याचा पुरता "**आ**" ही होत नाहीं तेव्हां हा विस्तृत "**अ**" (किंवा ऱ्हस्व "**आ**" म्हणा पाहिजे तर ) दाखविण्यासाठीं जोशी यांनीं शब्दाचे शेवटच्या अक्षरापुढं < असं चिन्ह योजलं आहे, तेही बरोबर वाटतं.

मराठी बोलणारे लोक याअर्थीं मराठीभाषक असा नवीन शब्दप्रयोग शंकररावांनीं या पुस्तकांत केलेला आढळून येअील. पूर्वींचा भाषिक हा रूढ शब्द अर्थ किंवा व्याकरण या दोन्हीं दृष्टींनीं तितकासा बरोबर नाहीं असं त्यांचं म्हणणं आहे. "भाषेसंबंधाने अुभ्दवणारे प्रश्न," "भाषे संबंधाची अडचण" असं म्हणायचं असेल तेव्हां भाषिक प्रश्न, भाषिक अडचण असे शब्दप्रयोग वापरणं अुचित. पण वाजविणारा वादक, गाणारा तो गायक, शिकवणारा तो शिक्षक हें जर बरोबर तर मग बोलणारा तो भाषक कां नाहीं? अुलट काये संबंधानं तें कायिक, वाचे संबंधानं तें वाचिक यांप्रमाणंच भाषे संबधानं तें भाषिक असं म्हणणं जास्त अर्थपूर्ण वाटतं. तेव्हां भाषक

हा शब्द नवीन असला तरी तो "बोलणारा" या अर्थानं भाषिकपेक्षां समर्पक आहे यांत शंका नाहीं. Negative रूपें या अर्थी त्यांनीं योजलेला 'नकार रूपें' हा शब्दही 'अकरणरूपें' 'निषेधरूपें' वगैरे रूढ शब्दांपेक्षां बरा वाटतो.

प्रस्तुत ग्रंथांतील विवेचनाच्या ओघांत शंकररावांनीं दोन्ही भाषांचीं समान अंगें दाखविलीं आहेत आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्येंहि सांगितलीं आहेत. विषयाची मांडणी तुलनात्मक पद्धतीनं केली असली तरी प्रत्यक्ष तुलनेच्या अभिनिवेशांत ते कुठंही सांपडले नाहींत. अमुक चांगलं तमुक वाईट असेही निष्कर्ष त्यांनीं काढलेले नाहींत. दोन्ही भाषांचा समतोल वृत्तीनं अभ्यास करणाऱ्या त्रयस्थाची भूमिका ठेवण्याचा त्यांनीं कसोशीनं प्रयत्न केला आहे आणि तो बऱ्याच प्रमाणांत यशस्वी झाला आहे. याचा अभिप्राय वाचक देतीलच. दोन्ही भाषांतल्या सोयी गैरसोयी वाचकांनीं मनोमन ओळखून घ्याव्या. दोहींतलं चांगलं काय असेल तें घेऊन आपली भाषा समृद्ध करावी, तिचं सौकर्य आणि सौंदर्य वाढवावं आणि भाषेच्या प्रगतीला हातभार लावावा. वरवर पाहतां देखील कानडीचीं पुढील वैशिष्ट्यं मराठीनें स्वीकृत करण्यासारखीं आहेत— (१) मर्यादित लिंगभेद, (२) स्वाभाविक संख्या विशेषणें, (३) क्रियापद वैपुल्य, (४) वेगवेगळीं दर्शक सर्वनामें, (५) स्वतंत्र नकारार्थी रूपें आणि (६) अेकसूत्री वाक्यरचना.

नव्यानंच कानडी शिकूं लागलेल्या जाणत्या मराठी माणसाला कोण कोणत्या अडचणी येतात, आणि त्याच्या दृष्टीनं त्यांचं सोपं निराकरण कसं करावं या गोष्टीचा खल हें पुस्तक लिहीत असतांना शंकररावांनीं माझ्याशीं वारंवार केलेला आहे. यामुळें अशा अडचणींचा अंदाज आधीच बांधून त्या धोरणानं पुस्तकांतील मजकुराची योजना केली आहे. स्वतः शंकरराव चांगले शिक्षकही आहेत. तेव्हां मराठी विद्यार्थ्याला कानडी शिकविणें कोणकोणत्या टप्प्यांनीं अधिक सोपें जाअील आणि थोड्या वेळांत त्याची चांगली प्रगति होअील याचाही त्यांनीं आपली योजना ठरवितांना सम्यक् विचार केलेला दिसतो. आपला विषय समजाअून सांगतांना मराठीभाषकाच्या नेहमींच्या अनुभवांतलीं विपुल अुदाहरणं त्यांनीं जागजागीं दिलीं आहेत, आणि स्पष्टीकरणार्थ आवश्यक तेथें टीपाही दिलेल्या दिसतात. यामुळें पुस्तकाची

अुपयुक्तता निस्संशय वाढली आहे. कानडी शिकण्याकरतां पाठ्य पुस्तकाच्या धर्तीवर लिहिलेलीं अितर पुस्तकं बाजारांत आढळतात. त्यांत आणि या पुस्तकांत महत्त्वाचा फरक दिसतो तो हाच.

बरें, अेकदां कानडी बोलतां वाचतां येअूं लागल्यावर वाचकाला जर कानडी भाषेचा आणखी अभ्यास करण्याची अिच्छा झाली तर त्याची पार्श्वभूमि चांगल्या तऱ्हेनं तयार व्हावी अेवढी सामग्री या पुस्तकांत खास आहे. नव्हे, तसा अभ्यास करायला स्फुरण यावं अशा धोरणानेंच ही सामग्री येथें विखुरलेली दिसते. त्यामुळें कन्नड भाषेच्या सखोल अभ्यासाची पहिली यत्ता म्हणूनही हें पुस्तक अत्यंत अुपयुक्त ठरेल.

कर्नाटकांत आलेल्या मराठी भाषकाला प्रथम कानडी बोलतां यावं ही जशी अिच्छा असते तशीच तें चटकन् आणि बिनचूक बोलतां यावं अशीही अुत्कंठा असते. वाक्यरचना, शब्दप्रयोग यांचं प्राथमिक ज्ञान झाल्यावर त्याला मोठी अडचण येते ती शब्दसंग्रहाची.. मराठीखेरीज अितर ज्या भाषा संस्कृतोद्भव आहेत त्यांतल्या शब्दांचा अर्थ थोड्या फार संदर्भानं लावतां येतो. पण कन्नड ही द्राविड भाषा असल्यामुळें संस्कृतशीं अजिबात संबंध नसलेल्या शब्दांचा तींत फार मोठा भरणा आहे. त्यामुळें शब्दार्थ पाठ केल्याशिवाय आपला शब्दसंग्रह वाढविणं मराठी माणसाला फार कठिण जातं. त्याचा बहुतेक वेळ रोजच्या व्यवसायांत खर्च होत असल्यामुळें कानडी भाषेच्या पद्धतशीर अभ्यासाला जितकी हवी तितकी सवडच त्याला मिळत नाहीं. ही अडचण लक्षांत घेअून शंकररावांनीं रोजच्या व्यवहारांत आपल्याला जेवढं बोलावं लागतं त्याचे नमुने पुस्तकाच्या शेवटीं कांहीं प्रकरणांतून मुद्दाम दिले आहेत आणि नंतर अेक व्यावहारिक शब्दकोशही जोडला आहे. आपण रोज चहा घेतों, जेवतों, बाजारांत जाअून खरेदी करतों, पोस्टांत जातों आणि कधीं कधीं प्रवासालाही निघतों. या सर्व दैनंदिन व्यवहारांत कानडी बोलायचं झालं तर तें कसं बोलावं हें प्रत्यक्ष दाखविण्याकरितां सुमारें चोदा धडे श्री. जोशी यांनीं आपल्या पुस्तकांत समाविष्ट केले आहेत. अेकावन्नाव्या धड्यांत कन्नडमध्यें गप्पा गोष्टींचा नमुना देखील वाचकांपुढं ठेवला आहे. हें सर्व आत्मसात् केल्यावर रोजच्या व्यवहारांत कानडीचा वापर करायला मराठी वाचकाला कांहीं

अडचण राहणार नाहीं. अशी प्रत्यक्ष मदत अितर पुस्तकांतून मिळण्याची सोय निदान माझ्या तरी पहाण्यांत नाहीं.

पुस्तकाचीं हीं विशेष अंगें पाहिलीं म्हणजे हा कन्नड-प्रबोध आपल्याला हंसत खेळत कन्नड शिकविणारा आपला जिवलग मित्रच होय असें मराठी वाचकाला वाटल्यावांचून राहणार नाहीं. कानडी लोक हेल काढून बोलतात असा अेक मराठी भाषकांचा पूर्वग्रह असतो. परंतु ते हेल नसून अुच्चाराचीं अर्थपूर्ण वैशिष्टयें आहेत हें त्यांना माहीत नसतं. शब्दांचे अंत्यस्वर ऱ्हस्व, दीर्घ किंवा प्रदीर्घ अुच्चारल्यानं अर्थांत कसा व किती फरक पडतो याची त्यांना हें पुस्तक वाचल्यावर नीट कल्पना येअील. कानडी भाषेसंबंधानं असेच अितर कांहीं चमत्कारिक पूर्वग्रह असतील तर ते दूर सारून त्या भाषेचं साहित्य आणि सौंदर्य यांचा रसास्वाद घेतां यावा, त्या भाषेचा मोठेपणा नि थोर परंपरा आपणास कळावी याकरतां तरी मराठी भाषकांनीं हें पुस्तक अवश्य वाचावं. भाषेवरून होणारं भांडण टाळण्याचा मुख्य मार्ग हाच कीं दुसऱ्याची भाषा आपण मन लावून शिकणं आणि तिच्यांतील वाङ्मयाचं आपणाला योग्य मूल्यं मापन करतां येणं. अेवढं झाल्यावर दोन्ही भाषांचे परस्पर ऋणानुबंध आणि त्यांच्या द्वारें प्रगट होणारी आपली सांस्कृतिक अेकता यांचं आपल्याला बरोबर आकलन होअूं शकेल. कानडीच्या बाबतींत वरील गोष्टी करण्यास आपल्यापाशीं साधन नाहीं ही तक्रार आतां चालणार नाहीं. कारण या पुस्तकाच्या रूपानं तें आतां मराठी वाचकांच्या हातीं आलेलं आहे. खरोखर हल्लींचा समय विविध प्रांतभाषांच्या अभ्यासाला फार अनकूल आहे, नव्हे चालू समयाचं भाषाप्रेमी मंडळींना तें आवाहनच आहे. हें ओळखून श्री. जोशी यांनीं आपल्या हौसेला परिश्रमांची जोड दिली आणि त्या परिश्रमांचं हें फळ मराठीभाषकांना योग्य वेळीं सादर केलं याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत.

श्रीदत्तजयंती
मार्गशीर्ष शु. १४ शके १८७६

वि. मा. दी. पटवर्धन

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पा. नं. |
|---|---|---|
| १ | तुलनात्मक अभ्यासाचें महत्त्व | १ |
| २ | कानडी 'मुखभाषा' व 'लेखभाषा' | ३ |
| ३ | कानडी लिपि व अुच्चार | ५ |
| ४ | नामविचार | १० |
| ५ | क्रियापदविचार | १८ |
| ६ | नित्योपयोगी शब्द | २३ |
| ७ | वर्तमानकाळाचीं नकाररूपें | २५ |
| ८ | 'त' कृदंत व अपूर्ण वर्तमानकाळाचीं रूपें | २७ |
| ९ | आज्ञार्थ वाक्यें | २८ |
| १० | प्रश्नार्थक वाक्यें | ३१ |
| ११ | भूतकृदन्त विशेषणें | ३५ |
| १२ | सामान्य भूतकाळाचीं रूपें | ३९ |
| १३ | भूतकृदंत अव्ययें | ४५ |
| १४ | पूर्णवर्तमानकाळाचीं रूपें | ४७ |
| १५ | पूर्णवर्तमानकालिक नकाररूपें | ४९ |
| १६ | विभक्तिविषयक माहिती | ५१ |
| १७ | कानडी क्रियापदांविषयीं स्फुट विचार | ५८ |
| १८ | संख्यावाचक विशेषणें व नामें | ६३ |
| १९ | 'भावरूपें' | ६८ |
| २० | भूतकालिक नकाररूपें | ७१ |
| २१ | शब्दयोगी अव्ययें | ७३ |
| २२ | 'अव्ययक्रियापदें' | ७७ |
| २३ | वर्तमान–भविष्य कृदंतविशेषणें | ८० |
| २४ | वर्तमान–भविष्य कृदंतविशेषणाचीं नकाररूपें | ८२ |

प्रकरण | पा. नं.

| प्रकरण | | पा. नं. |
|---|---|---|
| २५ | भूतकृदंताव्ययांचीं 'प्रत्ययसिद्ध' नकाररूपें .... | ८४ |
| २६ | आज्ञार्थ वाक्यांचीं नकाररूपें .... | ८७ |
| २७ | विध्यर्थ वाक्यें .... | ८८ |
| २८ | विध्यर्थाचीं नकाररूपें .... | ९१ |
| २९ | क्रियापदाचीं प्रत्यसिद्ध लघु नकाररूपें .... | ९२ |
| ३० | 'शक्यतार्थक' वाक्यें .... | ९५ |
| ३१ | शक्यतार्थी' नकाररूपें .... | ९८ |
| ३२ | पूर्णभूतकाळाचीं रूपें .... | ९९ |
| ३३ | पूर्णभूतकालिक नकाररूपें .... | १०१ |
| ३४ | अपूर्ण भूतकाळाचीं रूपें .... | १०२ |
| ३५ | भविष्यकाळाचीं रूपें .... | १०४ |
| ३६ | पक्षार्थक कृदन्ताव्ययें (संकेतार्थी) .... | १०६ |
| ३७ | विशेषणें 'विधेय विशेषणें' व कृदन्तनामें .... | १०८ |
| ३८ | 'अुदु' 'हु' च्या अुपयोगाविषयीं विशेष माहिती .... | ११२ |
| ३९ | क्रियाविशेषण अव्ययें .... | ११६ |
| ४० | अुभयान्वयी अव्ययें व संयोजक प्रत्यय .... | ११९ |
| ४१ | कानडींतील 'कर्मणि' प्रयोग .... | १२३ |
| ४२ | कानडीची संधिप्रचुरता व संधिपरिचय .... | १२८ |
| ४३ | वर्तमान भविष्य काळ व भूतभविष्य काळ, भविष्यभविष्य काळ | १३३ |
| ४४ | वृत्तपत्रीय वाक्यसंग्रह .... | १३५ |
| ४५ | वाक्प्रचार (Idiom) .... | १३७ |
| ४६ | वाक्प्रचार (Idiom) (पुढें चालू) .... | १४४ |
| ४७ | कांही शब्दविशेष .... | १५३ |
| ४८ | कानडींतील स्वाभाविक यमकानुप्रास प्रचुरता .... | १५६ |
| ४९ | मराठींतील 'नाम' समृद्धि .... | १५८ |
| ५० | म्हणी (Proverbs) .... | १६० |
| ५१ | गप्पांचा अेक नमुना .... | १६५ |

| प्रकरण | | पा. नं |
|---|---|---|
| ५२ | ‘बाजारांत’ | १६९ |
| ५३ | ‘चहा घेतांना’ | १७१ |
| ५४ | अंघोळ | १७२ |
| ५५ | जेवण | १७३ |
| ५६ | झोप | १७४ |
| ५७ | परीट | १७५ |
| ५८ | बाग | १७७ |
| ५९ | देवपूजा | १७८ |
| ६० | पोस्टांत | १८० |
| ६१ | बँकेंत | १८१ |
| ६२ | ऑफिसांत | १८२ |
| ६३ | दवाखान्यांत | १८३ |
| ६४ | स्टेशनांत | १८५ |
| ६५ | घरीं | १७७ |
| | परिशिष्ट ‘अ’ (लिपिपरिचय) | १८९ |
| | परिशिष्ट ‘ब’ (शब्द संग्रह) | १९३–२१७ |


## चिन्हांचा खुलासा

ऱ्हस्व ॲ ॅ अुदा ‘गॅॅरू’

ऱ्हस्व ऑ ॅ अुदा. ऑंदु (अेक)

विस्तृत ‘अ’ ज्ञान< (ज्ञाना) ‘ऱ्हस्व आ’

दीर्घ ‘अ’ ऽ अुदा. बरतानऽ, मराठी त्यातं मधील
‘नं’ सारखा अुच्चार.

# अर्पणपत्रिका

हें पुस्तक

माझे परमपूज्य वडील

कै. ती. विनायक बाबजी जोशी

**यांस**

त्यांचें थोर चारित्र्य, कन्नड आणि कर्नाटक यांची

त्यांनीं केलेली थोर सेवा, आणि त्यांचें त्यागपूर्ण जीवन

**यांचें स्मरणार्थ**

अर्पण केलें आहे

**शंकर**

## बिहारचे राज्यपाल मान्य श्री. दिवाकर यांचा

# शुभाशीर्वाद

मराठी व कानडी या भाषा शेजारच्या आहेत. शतकानुशतकें त्यांचा परस्पर संबंध आहे. त्यामुळें एकमेकींवर परिणामही झाला आहे. पण भाषाशास्त्राच्या दृष्टीनें दोहोंमध्ये फरकही पुष्कळ आहे.

शेजारीं असल्यामुळें एकमेकांची भाषा शिकण्याची इच्छा होणें स्वाभाविक आहे. कानडी शिकण्यास सोपें जावें या उद्देशानें हें पुस्तक लिहिलें गेलें आहे. त्या बरोबरच कांहीं तुलनात्मक विचारहि या पुस्तकांत केला गेला आहे. हें या पुस्तकाचें वैशिष्ट्य आहे.

शेजाऱ्या शेजाऱ्यांमध्यें जास्त सलोखा व मैत्री वाढण्यास परस्परांचें भाषाज्ञान वाढत जाणें हा एक उपाय आहे. त्या कामीं या पुस्तकाचा उपयोग होईल यांत शंका नाहीं. ज्यास्तींत ज्यास्त लोकांनीं या प्रयत्नाचा फायदा घ्यावा व हा प्रयत्न यशस्वी करावा अशी माझी प्रार्थना आहे.

रंगनाथ दिवाकर

# कन्नड-प्रबोध

## प्रकरण १ लें

## तुलनात्मक अभ्यासाचें महत्त्व

कर्नाटकस्थ मराठीभाषकांमध्यें कानडी शिकूं अिच्छिणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचें दिसून येत आहे, ही सांस्कृतिक दृष्ट्या खरोखरच समाधानाची गोष्ट आहे. कानडी भाषा व संस्कृति यांविषयीं खुद्द महाराष्ट्रांतहि अलीकडे जिज्ञासा दिसून येते. या प्रवृत्तीचें कोणीहि सुसंकृत मनुष्य सकौतुक स्वागतच करील यांत शंका नाहीं.

कानडी भाषेची वाङ्मयीन परंपरा नवव्या शतकाहून जुनी आणि थोर आहे. कोणत्याहि जनतेच्या संस्कृतीप्रमाणें कानडी जनतेची संस्कृतीहि मुख्यत्वेंकरून कानडी भाषेच्या द्वारांच प्रगट झालेली आहे.

कानडी व मराठी या भाषांचा अन्योन्य संबंधहि फार जुना आहे. या दोन भाषकांमध्यें जितकी परस्पर भाषिक व सांस्कृतिक देवघेव झाली आहे, ह्या दोन भाषांचे अेकमेकींवर जितके संस्कार झाले आहेत, तितके अितर कोणत्याहि दोन ‘भिन्नवंशज’ भाषांचे झालेले नाहींत. ह्या भाषा ‘भिन्नवंशज’ असूनहि प्राचीन काळापासून अनेक कारणांमुळें ह्या दोन भाषा-भगिनींचा अेकमेकींशीं फार संबंध आला. नक्की भौगोलिक सीमेच्या तपशी-लांत न शिरतां असें म्हणतां येअील कीं, प्राचीनकाळीं आजच्या महाराष्ट्राच्या अनेक भागांवर कानडी राज्य होतें व अलीकडच्या अितिहासांत हल्लीच्या कर्नाटकाच्या अनेक भागांवर मराठी राज्य होतें; या व अितर कांहीं कारणांमुळें या दोन संस्कृतींचा अेकमेकींवर फार परिणाम झाला व पृथ्वीवरील कांहीं भागांवर, आज जमीन असलेल्या ठिकाणीं प्राचीनकाळीं समुद्र असल्याचे जसे अवशेष आढळतात, त्याप्रमाणें कानडी व मराठी या भाषांच्या बाबतींत झालें

आहे. 'लीळाचरित्र' व 'ज्ञानेश्वरी' यांसारख्या अत्यंत प्राचीन मराठी ग्रंथांतहि कानडी (किंवा कानडींतून आलेले) शब्द आढळतात. अुदा : सांत (बाजार), मांदि (समुदाय), मेचु (आवड), बेंबल (जोर, पाठिंबा), बाग (रीत), बिडार (बिऱ्हाड), अुगालु (थुंकणें) व प्रचलित मराठींत—तूप, कडबोळें, कायरस, अडकित्या, कोयता, मोळ्या, हंगविणें, मुरडणें, कोरणें, सोलणें, हुंडकणें, यांसारखे कानडी शब्द आहेत. या अुलट, म्हैसूरपर्यंतच्या कानडींतहि बरेच मराठी शब्द आढळतात. अुदा —

कंटळिसु (कंटाळणें), लगायिसु (लावणें, चिकटविणें), अुटायिसु (अुठविणें), पाया, हतोटि (हातोटी), साखरभातु (साखरभात), अुट्‌बैसु (अुठाबशा), मोरि (मोरी), लावणि (लावणी). तसेंच अुत्तर कर्नाटकी व्यावहारिक कानडींत 'अगदी', 'जर', 'खरें', वगेरे मराठी शब्द रूढ आहेत.

मराठी भाषकांनीं कानडीचा अभ्यास करण्यानें मराठी भाषेच्या अभ्यासाला सुद्धां अेक महत्त्वाचा फायदा होणार आहे. भाषेचा तौलनिक अभ्यास जितका मनोरंजक तितकाच अुपयुक्त असतो. तो करणारांची दृष्टि मात्र निर्विकार संशोधकाची, व चिकित्सक अभ्यासकाची असली पाहिजे; आपणांस अेरव्ही कल्पना देखील नसते, असे कितीतरी कानडी शब्द प्राचीन काळापासून मराठी भाषेंत आले आहेत. त्यांचें मर्म व रहस्य समजण्यास कानडी भाषेच्या अभ्यासानें नक्कीच मदत होअील; तसेंच, कानडी भाषकानीं अभ्यासू वृत्तीनें मराठीचा तौलनिक अभ्यास केल्यानें कानडी भाषेचें मार्मिक ज्ञान होण्यास सहाय होअील. अितका ह्या दोन भाषांचा व संस्कृतींचा संबंध व संपर्क जुना व घनिष्ठ आहे.

कानडी व मराठी भाषकांनीं अेकमेकांच्या भाषेचा अभ्यास करण्यानें परस्पर गैरसमज दूर होण्यासहि पुष्कळ मदत होणार आहे. भाषेच्या द्वारें प्रगट झालेली दुसऱ्यांची संस्कृति समजून घेणें, त्यांस आपली समजावून देणें, दुसऱ्यांत चांगलें असेल तें घेणें, या वृत्तीनें, 'आंतर भारती' सारख्या सांकृतिक कार्यास हातभार लावतां येण्यासारखा आहे. अेकमेकांच्या

वाङ्मयाच्या अभ्यासानें होणारी विचारांची देव-घेव 'अवघे धरूं सुपंथ' ह्या ध्येयास पूरक होओील यांत शंका नाहीं.

प्रत्येक मनुष्यास स्वभाषेचा अभिमान असणें स्वाभाविकच आहे. परंतु अभिमान झाला तरी सदभिमानाच्या सीमा ओलांडून दुरभिमान होण्याचा पुष्कळ संभव असतो. स्वभाषेचा अभिमान, तिच्यांतील दोषांची जाणीव ठेवूनहि डोळसपणें बाळगतां येतो. आपल्या भाषेंत दोष नाहींत, अुणीवा नाहींत, दुसऱ्या भाषेंतून आपण घेण्यासारखें वा शिकण्यासारखें कांहीं नाहीं (व असणें शक्य नाहीं), असें समजणें चुकीचें होओील. याचप्रमाणें दुसऱ्याच्या भाषेंतून शब्द किंवा 'रचना-वैशिष्ट्यें' घेण्यानें स्वभाषा बिघडते, 'अशुद्ध' होते, किंवा स्वभाषेवर 'आक्रमण' होतें, अशी भीति बाळगणेंहि प्रतिगामीपणाचें होओील.

कानडीभाषा शिकण्यासाठीं हें पुस्तक असलें, तरी कानडी भाषेचीं वैशिष्ट्यें दाखविणें हाहि या पुस्तकाचा अुद्देश असल्यानें, तुलनात्मक दृष्ट्या जेथें प्रस्तुत असेल तेथें मराठीचींहि वैशिष्ट्यें दाखविलीं आहेत; यामुळें अुभय भाषांच्या अभिवृद्धीस अुपयुक्त अशी तुलनात्मक अभ्यासाची प्रवृत्ति जिज्ञासू अभ्यासकांमध्यें निर्माण होओील, अशी अपेक्षा आहे.

## प्रकरण २ रें

# कानडी 'मुखभाषा' व 'लेखभाषा'

(१) कोणत्याहि भाषेच्या बाबतींत असें आढळून येतें कीं, ग्रंथांतील किंवा पत्रव्यवहारांतील 'लेखभाषा' प्रत्यक्ष व्यवहारांत बोलण्याच्या 'मुखभाषे' पेक्षां निराळी असते.

(२) 'मुखभाषें'त प्रांतपरत्वें फरक असतो. दर बारा कोसांवर भाषा बदलते असें भाषेसंबंधानें जें म्हणतात तें 'लेखभाषे' पेक्षां मुखभाषेसंबंधानें अधिक खरें आहे.

(३) केवळ सीमाप्रांतांत किंवा परप्रांतांत नव्हे तर स्वप्रांतांत देखील 'मुखभाषा' व 'लेखभाषा' यांमध्यें फरक आढळतो; तथापि, अेखादी भाषा बोलणारा पांढरपेशा सुशिक्षित समाज प्रत्यक्ष जी भाषा बोलतो त्या 'मुखभाषें'त व लेखभाषेंत कमी फरक असतो. मराठी भाषेंतील अेक सोय अशी कीं, हा फरक 'किमान' आहे. अुदा– 'त्यानें आपलें काम केलें' या वाक्यांत 'त्यानं आपलं काम केलं' ह्या खेरीज दुसरा फरक 'मुखभाषेंत' होत नाहीं. आणि हें वाक्यसुद्धां हल्लीं कांहीं लेखक 'लेखभाषेंत' हि तसेंच रूढ करूं लागले आहेत. अितर वाक्यरचनेसंबंधानें आपण पाहतों कीं, सुशिक्षित मराठी भाषकांच्या "मुखभाषेंत" व "लेखभाषेंत" 'तो जातो' 'ते करतात' हीं वाक्यें तर सारखींच असतात. पण कानडी भाषेच्या बाबतींत असें आढळतें कीं, लेखभाषा व "सुशिक्षितांची मुखभाषा" यांमध्येंहि फार फरक आहे. 'तो येतो' हें साधें वाक्यदेखील लेखभाषेंत 'अवनु बरुत्ताने' असें लिहितात. तर मुखभाषेंत 'अवां बरतानं' असें अुत्तर कर्नाटकांत आणि 'अवनु बरताने' असें दक्षिण कर्नाटकांत बोलतात.

कानडी 'मुख भाषा' व 'लेख भाषा' यांमधील फरकासंबंधानें असेंहि अेक वैशिष्ट्य दिसून येतें कीं, "सुशिक्षितांची मुख भाषा व लेख भाषा यांमध्येंहि फरक असतो" हा सिद्धान्त सर्वसामान्यपणें खरा असला तरी कर्नाटकांत कारवार जिल्ह्यांत 'नाडवरु' नांवाचा अेक समाज आहे, त्यामधील 'अशिक्षित' लोकांची "मुखभाषा" व "लेखभाषा" यांमध्यें मात्र किमान फरक आहे; तो समाज जवळजवळ 'लेख भाषाच' बोलतो.

कानडी "मुखभाषा" व "लेखभाषा" यांमध्यें विशेषच फरक असल्यामुळें, ती शिकणाऱ्या अन्यभाषकांस अडचण भासते. कानडी शिकूं अिच्छिणारांची अिच्छा, आपणांस नुसती 'लेख भाषा' समजावी अेवढीच नसून बोलतां यावें, अशीहि साहजिकच असते. कानडी भाषेचें व्याकरण मराठी व्याकरणाअितकें कठीण नाहीं; परंतु, 'लेख भाषा' व 'मुख भाषा' ह्यांमधील फरकामुळें असें बहुधा आढळतें कीं पुस्तकावरून मराठी शिकलेला कानडी मनुष्य अुच्चारापेक्षां व्याकरणाच्या चुका अधिक करतो; या अुलट, पुस्तकावरून कानडी शिकलेल्या मराठी मनुष्याच्या व्याकरणाच्या चुका

फारशा होत नाहींत. पण तो जवळ जवळ 'लेख भाषा' च बोलतो, त्यामुळें त्याची भाषा 'शुद्ध' असूनहि ऐकणारांस 'कृत्रिम' वाटते. ही 'कृत्रिमता' टळावी, व कानडी भाषा शिकणारांस 'अकृत्रिम' बोलतां यावें, म्हणून ह्या पुस्तकांत नागरी लिपींत कानडी शब्दांचा 'जशाचा तसा' म्हणजे 'लेख-भाषिक' अुच्चार व त्याच्याखालीं कंसामध्यें 'मुखभाषिक' म्हणजे रूढ अुच्चार दिलेला आहे, हें वाचकांनीं लक्षांत घ्यावें. कंसांत दिलेली 'मुखभाषा' अुत्तरकर्नाटकी सुशिक्षितांची आहे.

—:—

## प्रकरण ३ रें

# कानडी लिपि व उच्चार

ह्या पुस्तकांत शेवटीं कानडी लिपीचा (स्वर, व्यंजनें व 'चोदाखड्या' ह्यांचा) तक्ता जोडला आहे. त्याचा अभ्यास वाचकांनीं आतांपासूनच सुरू करावा; परंतु अद्यापि पूर्ण लिपिपरिचय झालेला नाहीं अेवढ्यामुळेंच भाषा शिकण्याचें काम थांबूं नये म्हणून अिथें लिपी संबंधानें अेक महत्त्वाचा खुलासा करणें अवश्य आहे तो न केल्यास अर्थाचा 'अनर्थ' होण्याअितका तो महत्त्वाचा आहे.

कानडी लिपींत बारा अैवजीं चोदा स्वर आहेत. ऱ्हस्व 'अे' व ऱ्हस्व 'ओ' हे दोन जादा स्वर कानडींत आहेत. "नागरी लिपि सुधारणा" कमिटीनेंहि ऱ्हस्व 'अे' व ऱ्हस्व 'ओ' स्वीकारल्याचें नुकतेंच जाहीर केलें आहे. ऱ्हस्व 'अे' व ऱ्हस्व 'ओ' ही काय चीज आहे हें समजून घेण्यासाठीं अिंग्रजी शब्दांचें अुदाहरण घेणें अधिक अुपयुक्त ठरतें. कारण, ऱ्हस्व 'अे' किंवा ऱ्हस्व 'ओ' युक्त शब्द मराठींत ओषधाला देखील नाहींत. माझ्या समजुतीप्रमाणें, संस्कृतजन्य कोणत्याहि भाषेंत तसा शब्द नाहीं. (जिज्ञासूंनीं शोधून पहावें). आपण ऱ्हस्व 'अे' समजून घेण्यास 'Test' (परीक्षा) व 'Taste' (रुचि) हे शब्द घेअूं.

Test ह्या शब्दांतील 'अे' ऱ्हस्व आहे व Taste ह्या शब्दांतील 'अे' दीर्घ आहे. अुदाहरणार्थ आणखी अेक शब्द पहा.. 'Bell' (घंटा) ह्यांतील 'अे' ऱ्हस्व आहे व 'Bale' (गठ्ठा) ह्यांतील 'अे' दीर्घ आहे. परंतु मराठींत 'Test' व 'Taste' हे दोन्ही शब्द 'टेस्ट' असेच लिहावे लागतात. मराठी मनुष्य 'Bell' व 'Bale' हे दोन्ही शब्द 'बेल्' असेच अुच्चारतांना आढळतो. कानडी मनुष्याच्या अुच्चारांत ऱ्हस्व 'अे' व दीर्घ 'अे' यांमधील फरक स्पष्टपणें दिसून येतो. याचें कारण 'ऱ्हस्व अे' युक्त शब्द कानडींत पुष्कळच आहेत. अितकेंच नव्हे तर कांहीं शब्दांतील 'अे' ऱ्हस्व न अुच्चारतां चुकून दीर्घ अुच्चारल्यास अर्थाचा घोटाळा होअील. आपण ऱ्हस्व अे 'अॆ' असा व ऱ्हस्व ओ 'ऒ' ह्याप्रमाणें लिहूं. कानडींतील ऱ्हस्व अे व दीर्घ अे युक्त खालील शब्द पहा.

| ऱ्हस्व अे | दीर्घ अे |
|---|---|
| बॆसिगॆ = डाक (Solder) | बेसिगॆ = अुन्हाळा |

ऱ्हस्व 'ओ' चा अुच्चार Produce ह्या शब्दावरून कळेल. ह्याचा अुच्चार 'प्रोड्यूस' असा आहे.

कानडींत ऱ्हस्व 'ओ' युक्त शब्द खूप आहेत, व दीर्घ 'ओ' युक्त शब्दापेक्षां ते निराळ्या तऱ्हेनें न अुच्चारल्यास कसा घोटाळा होण्याचा संभव आहे, हें खालील अुदाहरणावरून कळेल.

| | |
|---|---|
| ननगॆ कॊडु = मला दे | ननगॆ कोडु = मला शिंगें |

लिपिपरिचय पूर्ण होण्याच्या आधींदेखील ऱ्हस्व 'अे' व ऱ्हस्व 'ओ' लक्षांत घेतला म्हणजे अर्थ समजण्याच्या दृष्टीनें सोयीचें होअील.

ऱ्हस्व 'अे' व ऱ्हस्व 'ओ' युक्त शब्द मराठींत नसले तरी त्यांची थोडीशी कल्पना खालील शब्दांवरून येण्यासारखी आहे.

'अेक्का' ह्यांतील 'अे' ऱ्हस्व आहे. तो आपण स्वीकारलेल्या चिन्हाप्रमाणें 'अॆक्का असा लिहावा लागेल. "आला आहे मोठा सांगायला" यांतील 'मोठा' या शब्दांतील 'मो' जरासा ऱ्हस्व आहे.

जसे 'अि' 'अी' व 'अु' 'अू' हे ऱ्हस्व–दीर्घ प्रकार मराठींत आहेत तसेच ऱ्हस्व अे व ऱ्हस्व ओ असणें अुच्चारदृष्ट्या सयुक्तिक आहे.

शब्दाच्या "मुखभाषिक" अुच्चाराविषयीं आणखी कांहीं महत्त्वाचा खुलासा येथें अवश्य आहे.

(१) 'अ'कारान्त प्रथमा विभक्तीचीं रूपें अुच्चारतांना अंत्य 'अ'चा जरा 'विस्तृत' 'अ' म्हणजे 'आ' सारखा अुच्चार होतो. पूर्ण 'आ' हि नव्हे व नुसता 'अ' हि नव्हे तर ह्या दोन्हीमधील 'आ' होय. ह्यासंबंधानें कांहीं विद्वानांचें असें मत आहे कीं, जसें अि, अी, अें, अे, अों, ओ, असे ऱ्हस्व व दीर्घ स्वर आहेत, तसेंच 'ऱ्हस्व आ व दीर्घ आ' हे हि स्वर दोन मानले पाहिजेत. अितकेंच नव्हे तर ऱ्हस्व अ व दीर्घ अ हे हि दोन स्वर मानले पाहिजेत. अुदा:– 'अ'ज्ञ (ऱ्हस्व) 'अ'ट (दीर्घ). अर्थात् हा फरक दर्शवायला कानडींतहि निराळें चिन्ह नाहीं. ऱ्हस्व 'आ' व दीर्घ 'आ' हे लिपींत स्वीकारल्यास सोय होअील यांत शंका नाहीं.

'ज्ञान' 'धर्म' हे 'अ'कारान्त शब्द ज्ञाना, धर्मा असे ऱ्हस्व 'आ' युक्त अुच्चारतात. तो दर्शविण्यास 'मुखभाषिक' अुच्चारांत ज्ञान < हें चिन्ह योजलें आहे. म्हणजे लेखभाषेंत ज्ञान, धर्म असे लिहिलेले अकारान्त शब्द ज्ञान< धर्म< असे लिहिले आहेत. हा फरक लक्षांत न घेतां नम्म देश (आमचा देश), नम्म धर्म (आमचा धर्म) ह्यांतील 'देश' 'धर्म' हे शब्द आकारान्त अुच्चारल्यानें ते 'कृत्रिम' (म्हणजे रुढीस सोडून) वाटतील.

(२) आद्याक्षर 'अें' असलेले (ऱ्हस्व अे) अेंम्मे = म्हैस अेल्ल = सर्व, अेल्ले = कुठें सारखे शब्द मुखभाषेंत 'यम्मि; यल्ल; यल्ले'; ह्याप्रमाणें 'य' कार युक्त अुच्चारतात.

तसेंच ओंळगे = आंत; ओंदु सारखे प्रारंभी ओं असलेले शब्द वळगे, वंदु असे वकार युक्त अुच्चारतात.

(३) माडतानऽ ह्या मुखभाषेंत लिहिलेल्या 'नऽ' चा अुच्चार 'त्यानं' ह्या मराठी मुखभाषिक शब्दांतील 'न' प्रमाणें दीर्घ समजावा.

(४) 'स' युक्त कांहीं शब्द 'श' कारयुक्त अुच्चारतात. सिट्टु - शिट्टु (राग). कांहीं शब्दांचीं 'मुखभाषें'तील अुच्चारवैशिष्ट्यें :–

१ महाप्राण : कानडी भाषेंत 'भत्त' = भात, 'भंगार' = सोनें, धड्ड

= ढ, मंदबुद्धि. असलें ‘भ’ ‘ध’ वगैरे महाप्राणयुक्त शब्द आढळतात; परंतु मौज अशी कीं, शुद्ध कानडींत ‘महाप्राण’युक्त शब्द नाहींत. ‘भंगार’, ‘धड्डु’ ‘भत्त’ हे सर्व शब्द मुळांत ‘बंगार’, ‘दड्डु’, ‘बत्त’, असे आहेत. दक्षिण कर्नाटकांत ते शुद्ध स्वरूपांतच अुच्चारतात. अुत्तर कर्नाटकी कानडीपेक्षां दक्षिण कर्नाटकी कानडी कानांना मृदु लागतें याच्या अनेक कारणांपैकीं हें अेक आहे.

२ अिंग्रजी ‘Bat, Hat’ यांतील ‘अॅ’ हा अुच्चार अुत्तरकर्नाटकी कानडींत पुष्कळ शब्दांच्या अुच्चारांत रूढ आहे, पण लिपींत तो दर्शविण्यास चिन्ह नाहीं.

बेनें = दुखणें (रोग). हा शब्द बॅनि असा अुच्चारतात.

कोणें = खोली हा शब्द कॉणी असा अुच्चारतात. यांतल्या ‘कॉ’चा अुच्चार अिंग्रजी ‘Call’ मधल्या ‘कॉ’ सारखा आहे. मराठीप्रमाणेंच अक्षरावर चंद्रचिन्ह देअून हा दाखविण्याची रूढी आहे म्हणून मुखभाषेंत जे अुच्चार असे होतात ते अूर्ध्व चंद्रानें दर्शविले आहेत.

ऱ्हस्व ‘अे’ व ऱ्हस्व ‘ओ’ दर्शविण्यास अधोरेखित चंद्रचिन्ह वापरलें आहे हें आपल्या लक्षांत असेलच. अुदा:– मेलें = मॅलें (वर).

| | |
|---|---|
| पेरलहण्णु = पॅरलहण्णु (पेरू) | दोसे = दॉसे (धिरडें) ‘डोसाय’ |
| तेवु = तॅवु (ओलावा) | बेटें = बॅटि (शिकार) |
| पेटें = पॅटि (बाजार) | बेड = बॅड < (नको) |
| केदगे = कॅदगी (केवडा) | बोळ = बॉळ > बाळंतबॉळ (ओषध) |
| चेष्टें = चॅष्टी (थट्टा) | मेरें = मॅरि (सीमा, कांठ) |
| कोटें = कॉटि (किल्ला) | रेवें = रॅवे (रेती) |
| कोरि = कॉरि (वाकडें, तुकडा) | वेळें = वॅळें (वेळ) |
| गोडें = गॉडि (भिंत) | गोम = गॉम < (शेण) |
| गोडंबे = गॉडंबि (काजू) | हेव = हॅव < (ओर्षा) |
| तोट = तॉट < (बाग) | हेगे = हॅगे (कसें) |
| तोटें = तॉटि (साल) | होरें = व्हॉरे (काम) |

( वरील शब्दांपैकीं तॅवु व हॅव< हे शब्द अनुनासिक अुच्चारतात. तसेंच हॉरे हा शब्द व्हॉरे सारखा 'व'कारयुक्त अुच्चारतात. )

ह्यावरून असें दिसतें कीं शब्दाचें आद्याक्षर दीर्घ 'ए'कारयुक्त किंवा दीर्घ 'ओ'कारयुक्त असून तो शब्द अेकारांती असेल तर बहुधा 'ॲ' व 'ऑ' असा अुच्चार होतो ( अनुक्रमें ).

( ३ ) सिगु = मिळणें, सेगणि = शेण वगैरे कांहीं आद्याक्षर 'स'कार असलेले शब्द 'श'कारयुक्त अुच्चारण्याची रुढी आहे.

| | |
|---|---|
| सेगणि – शेगणि ( शेण ) | सीगेकाअि = शीगेकाअि ( शिकेकाई ) |
| सिगु – शिगु ( मिळणें ) | सीनु – शीनु ( शिंक ) |
| सिट्टु – शिट्टु ( राग ) | सीळु – शीळु ( पिंजणें - चिरणें ) |
| सिडि – शिडी ( अुडणें ) | सेट्टी – शेट्टी ( व्यापारी ) |
| सिडिलु – शिडिलु ( वीज ) | सेरे – शेरे ( दारु ) |
| सिडिकु – शिडिकु ( चिडखोर ) | सेदु – शेदु ( ओढणें ) |
| सिलकु – शिलकु ( शिल्लक ) | सेरु – शेरु ( आवडणें ) |
| सिवडु – शिवडु ( पेंडी ) | सेविगे – शाविगे ( शेवया ) |

सेडु = शेडु ( सूड )

( ४ ) 'आ'कारान्त संस्कृत शब्द कानडींत जे आले आहेत ते 'अे' कारान्ती होअून त्यांचीं विभक्तिरूपें होतात. विद्या = विद्ये – विद्येयु, विद्येगळु, प्रथमाविभक्ति; विद्येयन्नु – विद्येगळन्नु. द्वि. वि.; शिक्षा – शिक्षे, शिक्षेयु वगैरे. परंतु अुत्तरकर्नाटकी मुखभाषेंत हे शब्द 'विद्या', 'शिक्षा', 'आशा', असेच वापरतात व प्रत्ययहि याच शब्दांना लावतात. अुदाहरण:– 'विद्यादिंद, शिक्षाक्क'.

( ५ ) अेखाद्या शब्दापुढें 'ह' कारादि शब्द आल्यास मुखभाषेंत खालील-प्रमाणें संधि झाल्यासारखा अुच्चार करतात:— ननगे + हेळरी = ननघेळरी (मला सांगा), अदु + हयांग = अध्यांगऽ ( तें कसें ? ) 'अेनु' = काय, हा शब्द 'अेन्' प्रमाणें अुच्चारून अेनु माडतीरी = 'अेन्माडतीरी' असा अुच्चारतात.

# प्रकरण ४ थें

## नामविचार

नामांचें वर्गीकरण कानडींतहि मराठींतल्याप्रमाणेंच आहे. हें पुस्तक प्रौढ व सुशिक्षित मराठीभाषकांसाठीं असल्यामुळें त्यांना मराठी व्याकरणाची (निदान प्राथमिक) माहिती आहे असें गृहीत धरून, ज्या बाबतींत कानडी व्याकरण मराठीसारखेंच आहे, तेथें सविस्तर खुलासा केलेला नाहीं. अुदाहरणार्थ नाम म्हणजे काय, सर्वनाम म्हणजे काय, ह्याची व्याख्या किंवा चर्चा केलेली नाहीं.

**नामांचे प्रकार :**

१ सामान्यनामें :- कल्लु (दगड), मण्णु (माती), मने (घर), मनुष्य (मनुष्य)
२ भाववाचकनामें :- सिट्टु (राग), **हेम्मे** (अभिमान), अक्करते (प्रीति)
३ विशेषनामें :- राम, गोविंद, वगैरे.

लिंगविचार:- संस्कृत व त्यापासून अुत्पन्न झालेल्या सर्व भाषांतून ' लिंग ' ही अेक अत्यंत अप्रमाणित किंवा अनियमित अशी बाब आहे. ' अनियमित ' याचा अर्थ " वाटेल त्यानें वाटेल तें **लिंग** मानावें " असा नसून ' लिंगा 'चें सयुक्तिक कारण देतां येत नाहीं, हा होय. कानडीमध्यें लिंग-विचार अिंग्रजींतल्याप्रमाणें स्वाभाविक किंवा ' नैसर्गिक ' आहे, असें म्हणणें अधिक यथार्थ ठरेल. अर्थात् प्राणिवाचक नामांचें ' लिंग ' मराठींत ' अनैसर्गिक ' आहे असें म्हणतां येणार नाहीं. पण पुष्कळ प्राणिवाचक नामें मराठींत तिन्ही लिंगी आहेत. अुदा- घोडा-घोडी-घोडें, कुत्रा-कुत्री-कुत्रें, अशीं नामें वगळल्यास, वाघ-वाघीण, अुंट-अुंटीण, रेडा-म्हैस, ही विभागणी ' नैसर्गिक ' च आहे. मराठींतील निर्जीव वस्तुवाचक किंवा भाववाचक नामांचें ' **लिंग** ' ही मात्र अेक अप्रमाणित बाब आहे. असो.

**कानडी लिंगविचार**

१ पुल्लिंगी मनुष्यप्राणिवाचक नामें व पुल्लिंगी देववाचक नामें, हीं पुल्लिंगी आहेत. अुदा– मनुष्यनु, देवनु.

२ स्त्रीलिंगी मनुष्यप्राणिवाचक नामें व देवतावाचक नामें स्त्रीलिंगी आहेत. अुदा– तंगि (धाकटी बहीण), तायि (आअी), देवतॆ (देवता),

३ सर्व निर्जीव पदार्थवाचकनामें, भाववाचक नामें, प्राणिवाचकनामें, हीं नपुंसकलिंगी आहेत. अुदाहरण—

मण्णु (माती), गोडॆ (भिंत), मनॆ (घर), सिट्टु (राग), प्रीति, अभिमान वगैरे, एम्मॆ (म्हैस), कुदरॆ (घोडा-घोडी-घोडें). कांहीं प्राण्यांचें लिंग दर्शविण्यासाठीं 'गंडु' हा पुल्लिंगवाचक व 'हॆण्णु' हा स्त्रीलिंगवाचक शब्द प्राणिवाचक शब्दाच्या मागें जोडतात. हॆण्णु-कुदरॆ (घोडी)

'लहान मूल' हेंहि मराठीप्रमाणेंच कानडींतहि नपुंसकलिंगीच आहे. 'हॆण्णुकूसु' 'गंडुकूसु' ह्या शब्दांनीं लिंगभेद दर्शवितात.

## नामांचीं विभक्तिरूपें

मराठींत प्रथमेखेरीज अितर सर्व विभक्तींचे प्रत्यय लागण्यापूर्वी मूळ शब्दाचें 'सामान्यरूप' होतें. घोडा-घोड्या+स, घोड्या+ला; सून–सुने+ला वगैरे. कानडींत 'सामान्यरूप' होत नाहीं, परंतु कानडींत 'आगम' नांवाची जराशी अवघड बाब आहे. नामास विभक्तिप्रत्यय लावण्याच्या आधीं नाम व विभक्तिप्रत्यय ह्यांमध्यें अेक अक्षर 'येतें' म्हणून त्यास 'आगम' म्हणतात.

कानडींत विभक्तिप्रत्यय खालील प्रमाणें आहेत. येथें हुडुग (मुलगा) हा शब्द अुदाहरणार्थ घेअून त्याचीं विभक्तिरूपें दिलीं आहेत. तीं पाहून आपण 'आगम' कोणता तें पाहूं. (अेकवचनी व बहुवचनी प्रत्यय मात्र सारखेच आहेत) 'हुडुग' (मुलगा) शब्दाचीं विभक्तिरूपें :–

| विभक्तिप्रत्यय | अेकवचन | बहुवचन |
|---|---|---|
| प्रथमा - अु | हुडुगनु | हुडुगरु |
| द्वितीया - अन्नु | हुडुगनन्नु | हुडुगरन्नु |
| तृतीया - अिंद | हुडुगनिंद | हुडुगरिंद |
| चतुर्थी - अिगॆ, अक्कॆ | हुडुगनिगॆ | हुडुगरिगॆ |
| पंचमी - अिंद | हुडुगनिंद | हुडुगरिंद |
| षष्ठि - अ | हुडुगन | हुडुगर |

तृ: गिडदिंद, गिडगळिंद    ष: गिडद, गिडगळ
च: गिडक्के, गिडगळिगे    स: गिडदल्लि, गिडदोळगे, गिडगळल्लि
पं: गिडदिंद, गिडगळिंद    संबोधन: गिडवे, गिडगळे

'कोण' (रेडा), मंग (माकड), अशा कांहीं शब्दांचीं मात्र अेक वचनाचीं रूपें 'न' आगम येअून होतात.

प्र: कोणन्, द्वि: कोणनन्न्,

कांहीं 'अ' कारान्त शब्द.

| | | |
|---|---|---|
| अरस = राजा | अगस = परीट | हुडुग = मुलगा (Boy) |
| केलस = काम | पुस्तक = पुस्तक | अक्क = थोरली बहीण |
| कर्तव्य = कर्तव्य | कक्क = चुलता | मग = मुलगा (Son) |

**अभ्यास**

१ राजाचा मुलगा
अरसन मग (मग<)

२ मुलाचें पुस्तक
हुडुगन पुस्तक (पुस्तक<)

३ परटाचा मुलगा
अगसन मग (मग<)

४ मुलांचीं पुस्तकें
हुडुगर पुस्तकगळु

५ मनुष्याचें कर्तव्य
मनुष्यन कर्तव्य (कर्तव्य<)

६ (थोरल्या) बहिणीचा मुलगा
अक्कन मग (मग<)

७ काकाचा मुलगा
कक्कन मग (मग<)

८ परटाचें काम
अगसन केलस (केलस<)

'अि' कारान्त पुल्लिंगी शब्द सुखि, गुणि,
अि कारान्त स्त्रीलिंगी शब्द गेणति (मैत्रीण), हेंडति (बायको)
अि कारान्त नपुंसकलिंगी शब्द नरि (कोल्हा), नायि (कुत्रा)
'अे' कारान्त पुल्लिंगी शब्द तंदे (बाप)
अे कारान्त स्त्रीलिंगी शब्द सोसे (सून)
अे कारान्त नपुंसकलिंगी शब्द मने (घर)
'अै' कारान्त नपुंसकलिंगी शब्द कै (हात)

ह्या सर्व शब्दांचीं बहुतेक रूपें सारखींच होतात. सुखि, गुणि, या शब्दांत अेकवचनीं 'य' आगम आणि बहुवचनीं 'गळ्' आगम येतो. सुखियु, सुखिगळु.

नरि (कोल्हा), होळे (ओढा), मने (घर), ह्या शब्दांत अेकवचनीं 'य' व बहुवचनीं गळ् 'आगम' येतो.

सोसे (सून) शब्दास अेकवचनीं 'य' व बहुवचनीं अंदिर् आगम येतो. अुदा :– नरियु, नरिगळु; होळेयु, होळेगळु; मनेयु, मनेगळु; सोसेयंदिरु.

अुकारान्त पुल्लिंगी शब्द गुरु (शिक्षक)
,, स्त्रीलिंगी ,, वधु (वधु)
अुकारांत नपुंसकलिंगी शब्द करु (वासरूं)
ऋकारान्त पुल्लिंगी ,, पितृ (पितृ)
,, स्त्रीलिंगी ,, मातृ (मातृ)

ह्या शब्दांमध्यें अेकवचनीं 'व' आगम आणि बहुवचनीं 'गळ्' आगम येतो.

गुरु = गुरुवु, गुरुगळु. वधु = वधुवु, वधुगळु. करु = करुवु, करुगळु. पितृ = पितृवु, पितृगळु. मातृ = मातृवु, मातृगळु.

अपवाद : अूरु (गांव), कोलु (काठी), कालु (पाय) वगैरे कांहीं शब्दांमध्यें 'व' आगम नाहीं.

## सर्वनामांचीं विभक्तिरूपें

ना – नानु – (मी);

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्र. | नानु (ना), | नावु, | पं. | नन्निंद | नम्मिंद, |
| द्वि. | नन्नन्नु (नन्नऽ), | नम्मन्नु (नम्मन्न) | ष. | नन्न | नम्म |
| तृ. | नन्निंद, | नम्मिंद, | स. | नन्नल्लि | नम्मल्लि |
| च. | ननगे, | नमगे, | | नन्नोळगे (नन्नोळग) | नम्मोळगे (नम्मोळग) |

सर्वनामास संबोधनरूप नसतें.

नी – नीनु – (तूं)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्र. | नीनु (नी), | नीवु | पं. | निन्निंद | निम्मिंद |
| द्वि. | निन्नन्नु (निन्नऽ) | निम्मन्नु (निम्मन्नऽ) | ष. | निन्न | निम्म |
| | | | स. | निन्नल्लि | निम्मल्लि |
| तृ. | निन्निंद | निम्मिंद | | निन्नोळगे | निम्मोळगे |
| च. | निनगे (निनग) | निमगे (निमगऽ) | | (निन्नोळग) | (निम्मोळग) |

| | | | |
|---|---|---|---|
| पं. तन्निंद | तम्मिंद | स. तन्नल्लि | तम्मल्लि |
| ष. तन्न | तम्म | तन्नोळ्गे | तम्मोळ्गे |
| | | (तन्नोळग) | (तम्मोळ्ग) |

मराठीप्रमाणेंच 'तानु' (आपण) याचे 'स्वतः' या अर्थीं सर्व पुरुषीं, व बहुमानार्थीं द्वितीयपुरुषीं, असे दोन अुपयोग आहेत. पण दुसऱ्या अर्थीं बहुवचनी रूपें वापरतात. अुदा– अवनु तन्न मनेगे होदनु = तो 'आपल्या' घरीं गेला. तावु यारु? = आपण कोण? पण "आपण सगळे जाअूं" यांतल्याप्रमाणें 'आपण' याचा 'आम्ही' असा जो तिसरा अर्थ होतो तो मात्र कानडींत 'तावु' चा होत नाही.

## प्रकरण ५ वें

# क्रियापदविचार

**सामान्य वर्तमानकाळाचीं रूपें :–**

मराठींत वर्तमानकाळाचीं रूपें धातूस आख्यात प्रत्यय लावून होतात. जसें, मी कर+तों, आम्हीं कर+तों. कानडींतहि धातूस आख्यातप्रत्यय लावतात पण ते लावण्यापूर्वीं 'आगम' येतो.

अुदा– बरु = येणें, मी येतों = नानु बरुत्तेने

बरुत्तेने = बरु + अुत्त + अेने यांत 'बरु' हा धातु, 'अुत्त' हा आगम आणि 'एने' हा आख्यातप्रत्यय. परंतु 'आगम' वगैरे लक्षांत ठेवण्यापेक्षां दुसऱ्या अेका सोयिस्कर नियमानें आपण वर्तमानकाळाचीं रूपें बनविण्यास शिकूं. तो नियम असा :- वर्तमानकाळाचीं रूपें धातूस खालील प्रत्यय जोडून करावींत :–

| | अेकवचन | बहुवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष : | त्तेने | त्तेवे |
| द्वितीय पुरुष : | त्ती | त्तीरि |

तृतीय पु. पु.: ता नु ता रु
स्त्री.: ता ळु ता रु
न.: त दु त वु

होगु = जाणें – वर्तमानकाळ

प्र. पु. नानु होगुत्तेनु (मी जातों-तें), नावु होगुत्तेवु (आम्हीं जातों)
द्वि. पु. नीनु होगुत्ती (तूं जातोस-तेस), नीवु होगुत्तीरि (तुम्ही जातां)

तृ. पु. { अवनु होगुत्तानु (तो जातो) अवरु होगुत्तारु (ते जातात)
अवळु होगुत्ताळु (ती जाते) ,, (त्या जातात)
अदु होगुत्तदु (तें जातें) अवु होगुत्तवु (तीं जातात)

वरील आख्यातरूपांमध्यें आपण पाहातों कीं:–

मराठींत सर्व बहुवचनी रूपें आख्येयाच्या लिंगाप्रमाणें न बदलणारीं व सर्व अेकवचनी रूपें बदलणारीं आहेत आणि कानडींत फक्त तृतीय पुरुषी अेकवचनी व नपुंसकलिंगी बहुवचनी रूपें आख्येयाच्या लिंगाप्रमाणें बदलणारीं आहेत.

इरु – असणें, राहणें (कंसांतील शब्द मुखभाषिक)

प्र. पु. नानु इरुत्तेनु (इरतेनी) नावु इरुत्तेवु (इरतेवि)
द्वि. पु. नीनु इरुत्ती (इरती) नीवु इरुत्तीरि (इरतीरि)

तृ. पु. { अवनु इरुत्तानु (इरतानऽ) } अवरु इरुत्तारु (इरतारऽ)
अवळु इरुत्ताळु (इरताळऽ) }
अदु इरुत्तदु (इरतदऽ) अवु इरुत्तवु (इरताव)

'इरु' या धातूचीं खालील आख्यातरूपेंहि आहेत. (यांना कानडी व्याकरणांत 'विकृतरूपें' म्हटलें आहे) हीं दुसऱ्या प्रकारचीं 'विकृतरूपें' सामान्यतः 'असणें' या अर्थीं, व वर दिलेलीं पहिल्या प्रकारचीं रूपें 'राहणें' या अर्थीं वापरतात:– (हा फरक वाक्यसंग्रहांतील ११ ते १९ या वाक्यांवरून कळेल)

प्र. पु. नानु इद्देनु (इद्देनी) नावु इद्देवु (इद्दीवी)
द्वि. पु. नीनु इद्दी नीवु इद्दीरि

तृ. पु. { अवनु इद्दानु (इद्दानऽ) अवरु इद्दारु (इद्दारऽ)
अवळु इद्दाळु (इद्दाळऽ) अवरु इद्दारु (इद्दारऽ)
अदु इदु, अदे (अदऽ) अवु इवु, अवे (अवऽ)

अवरु पुणेयल्लि अिरुत्तारे.
( अवरु पुणेक्क अिरतारऽ')
अुत्तर कर्नाटकांत मुखभाषेंत मराठीप्रमाणेंच 'पुण्यास' 'पुणेक्क' ही चतुर्थी विभक्ति योजतात.

१२ आमची आअी घरीं आहे.
ನಮ್ಮ ತಾಯಿಯು ಮನೆಯೊಳಗೆ-
ಇದ್ದಾಳೆ.
नम्म तायियु मनेयोळगे अिद्दाळे
(नम्म तायि मनियोळग अिद्दाळऽ)

१३ ते शुक्रवार पेठेंत राहतात.
ಅವರು ಶುಕ್ರವಾರ ಪೇಟೆಯಲ್ಲಿ
ಇರುತ್ತಾರೆ.
अवरु शुक्रवार पेटेयल्लि अिरुत्तारे.
(अवरु शुक्रवार पॅटीओळग
अिरतारऽ)

१४ आमचा भाअू (थोरला) घरांत
आहे.
ನಮ್ಮ ಅಣ್ಣನು ಮನೆಯೊಳಗೆ
ಇದ್ದಾನೆ.
नम्म अण्णनु मनेयोळगे अिद्दाने.
(नम्म अण्ण< मनीओळग
अिद्दानऽ).

१५ तो आमच्या घरीं राहातो.
ಅವನು ನಮ್ಮ ಮನೆಯೊಳಗೆ
ಇರುತ್ತಾನೆ.
अवनु नम्म मनेयोळगे अिरुत्ताने,
(अव< नम्म मनिओळग
अिरतानऽ)

१६ तो सप्लाय ऑफीसांत आहे.
ಅವನು ಸಪ್ಲಾಯ ಅಫೀಸಿನೊಳಗೆ
ಇದ್ದಾನೆ.
अवनु सप्लाय आफीसिनोळगे
अिद्दाने,
( अव< सप्लाय आफीशिनोळग
अिद्दानऽ )

१७ व्यायामानें शरीर बळकट होतें.
ವ್ಯಾಯಾಮದಿಂದ ಮೈ ಗಟ್ಟಿ
ಯಾಗುತ್ತದೆ.
व्यायामदिंद मै गट्टियागुत्तदे,
(व्यायामदिंद मै घट्टि आगतदऽ).

१८ अुद्योगानें लोक श्रीमंत होतात.
ಉದ್ಯೋಗದಿಂದ ಜನರು
ಶ್ರೀಮಂತರಾಗುತ್ತಾರೆ.
अुद्योगदिंद जनरु श्रीमंतरागुत्तारे
( श्रीमंतरु + आगुत्तारे )
(अुद्योगद्दिंद जनरु श्रीमंत आगतारऽ)

## प्रकरण ६ वें

# नित्योपयोगी शब्द

गेल्या प्रकरणांत आपण सामान्य वर्तमानकाळाचीं आख्यातरूपें शिकलों. आतां कांहीं नित्योपयोगी निवडक शब्द शिकूं. वर्तमानकाळाचीं रूपें आपणांस माहीत झालीं आहेत. खालीं दिलेल्या शब्दांचा अुपयोग करून वाक्यें करून पहा.

खालीं गटवार शब्द दिले आहेत. त्यांच्या अुपयोगाविषयीं अवश्य तेवढा खुलासाहि केला आहे

### १ धातू

आगु = होणें; हाकु = घालणें; आडु = बोलणें, खेळणें;
अन्नु = म्हणणें; करेयु = बोलावणें; ओय्यु = नेणें; तरु = आणणें;
बरेयु = लिहिणें; अभिनंदिसु = अभिनंदन करणें
बीळु = पडणें; अुण्णु = जेवणें नमस्करिसु = नमस्कार करणें
कॊळ्ळु = घेणें, खरीदणें; सहकरिसु = सहकार्य करणें
कॊडु = देणें; अिडु = ठेवणें; मांडणें; स्पष्टीकरिसु = स्पष्टीकरण करणें
वर्गीकरिसु = वर्गीकरण करणें

### २ क्रियाविशेषणें.

अिल्लि = येथें; अल्लि = तेथें; मेले = वर; केळगे = खालीं
ओळगे = आंत; होरगे = बाहेर; मुंदे = पुढें; हिंदे = मागें
दूर = दूर; समीप = जवळ

### ३ विशेषणें

चलो = चांगला-ली-लें (टीप पहा) सण्ण = लहान; अेत्तर = अुंच (यत्तर)
केट्ट = वाअीट गिड्ड = ठेंगणा – णी – णें
दोड्ड = मोटा – ठी – ठें अुद्द = लांब अगल = रुंद

टीप— मराठींत ‘आ’कारान्त विशेषणें (चांगला, मोटा, यांसारखीं) विशेष्याच्या लिंगवचना प्रमाणें बदलतात. अुदा- ‘चांगला मुलगा’, ‘चांगली-

मुलगी', 'चांगलें पुस्तक'. पण कानडींत कोणतेंहि विशेषण तसें बदलत नाहीं. अुदा-

चलो हुडुग = चांगला मुलगा चलो पुस्तक = चांगलें पुस्तक

चलो हुडुगि = चांगली मुलगी

**दर्शक विशेषणें (Demonstrative adjectives)**

आ = तो – ती – तें (That) ई = हा – ही – हें (This)

विशेषणाप्रमाणेंच 'आ' व ई हीं दर्शकविशेषणेंहि विशेष्याच्या लिंग-वचनानुसार बदलत नाहींत.

तो मुलगा = आ हुडुग ती मुलगी = आ हुडुगी

तें पुस्तक = आ पुस्तक

मराठींत 'तो' हें दर्शकविशेषणहि आहे व सर्वनामहि आहे.

तो मुलगा माझा आहे (That). तो माझा मुलगा आहे (He)

कानडींत 'That' या अर्थीं 'आ' व 'This' या अर्थीं 'ई' अशीं निराळीं 'दर्शकविशेषणें' आहेत.

मराठींत तो – ती – तें किंवा हा – ही – हें, हीं दर्शक विशेषणें म्हणून वापरतांना, विशेष्य प्रथमेखेरिज अितर विभक्तींत असलें म्हणजे 'त्या' मुलास, 'त्या' मुलांनीं, 'ह्या' मुलांनीं, 'ह्या' मुलांना, यांतल्याप्रमाणें 'त्या' व 'ह्या' अशीं त्यांचीं रूपें होतात. पण कानडींत 'आ' व 'ई' हीं "दर्शक-विशेषणें" तशींच राहतात;

'आ मनुष्यन' त्या मनुष्याचा, ची, चें. 'ई मनुष्यनिगे' ह्या मनुष्यास.

## ४ नामें

(१) आप्तवाचक:- अव्व = आअी (हांक मारतांना किंवा घरगुती अुल्लेख करतांना)

अप्प = बाप (बाबा) तायि = आअी तंदे = बाप

अण्ण = थोरला भाअू

तम्म = धाकटा भाअू ('भाअू' या सामान्यार्थीं शब्द नाहीं)

अक्क = थोरली बहीण

तंगि = धाकटी बहीण } 'बहीण' या सामान्यार्थीं शब्द नाहीं

हेंडति = बायको

मगळु = मुलगी (कन्या) हुडुगि = मुलगी (Girl)

| | | | |
|---|---|---|---|
| २ ऊरु = गांव; | रस्ते = रस्ता | दिवस = दिवस; | अंगडि = दुकान; |
| हादि = वाट; | हवे = हवा | संति = बाजार (भरणारा); | |
| बिसिलु = ऊन; | नीरु = पाणी | पेट्टे = मंडअी; | रोक्क = पैसे; |
| वेळे = वेळ; | रात्रि = रात्र | ५ अक्कि = तांदूळ; | |
| ३ हालु = दूध; | मसरु = दहीं | जोळ = जोंधळा; | गोदि = गहुं; |
| मज्जिगे = ताक; | तुप्प = तूप | ६ अन्न = भात (शिजलेला); | |
| ४ कै = हात; | कालु = पाय | भक्करि = भाकरी; | पल्ले = भाजी; |
| बायि = तोंड; | होट्टे = पोट | चपाति = चपाती; | |
| कण्णु = डोळे; | किवि = कान | सारु = सार; | हुळि = आमटी; |
| तले = डोकें; | मूगु = नाक | ताट = ताट; | बट्टल = वाटी; |

प्रकरण ७ वें

## वर्तमानकाळाचीं नकार रूपें

मराठींतील खालील वर्तमानकालिक नकार रूपें पहा :—

१ तो जात नाहीं. २ तो करीत नाहीं.

हीं करण्यास 'जात' 'करीत' या शब्दांचा अुपयोग करावा लागतो. अशा शब्दांना मराठींत 'त' कृदन्तें म्हणतात.

परंतु, कानडींत वर्तमानकालाचीं नकाररूपें करण्यास 'करणें' 'जाणें' अशा अर्थाचीं 'माडुवदु', 'होगुवदु', हीं कृदन्तें घेअून त्यांस 'नाहीं' या अर्थाचें 'अिल्ल' हें 'अव्ययक्रियापद' लावावें लागतें. हें क्रियापद 'पुरुष–लिंग–वचन–निरपेक्ष' आहे. कोणत्याहि पुरुषीं, लिंगीं व वचनीं नकाररूपांत 'अिल्ल' हें क्रियापद योजतात; धातूस 'अदु' लावल्यानें त्या धातूचें कृदन्त बनतें; या कृदन्तास 'अिल्ल' लावून वर्तमान कालिक नकाररूपें होतात. (अव्ययक्रियापदांची चर्चा पुढें येअील). तो करीत नाहीं = अवनु माडुव

दिल्ल (माडुवदु + अिल्ल) ह्याचा शब्दशः अर्थः– तो ‘करणें नाहीं’ असा होतो. माडुवदु + अिल्ल हें स्वरलोप संधिप्रमाणें ‘माडुवदिल्ल’ असें होतें. अिल्ल याचा मुखभाषिक अुच्चार अिल्ल< असा होतो.

होगु – जाणें

नानु, नावु, नीनु, नीवु,
अवनु, अवळु, अदु, अवरु, } ‘होगुवदिल्ल’

## शब्दसंग्रह.

ओप्पु (धा) १ कबूल करणें २ शोभणें

मातु केळु (धा) = बोलगें अैकणें, (आज्ञा पाळणें या अर्थी)

माताडु (धा) = बोलणें (मातु + आडु)

नोडु (धा) = पाहाणें, काळजी घेणें, पोसणें,

संगड, कूड, (श. अव्यय) = बरोबर, सवें (शब्दाच्या षष्टिविभक्तिरूपास जोडतात). अुदाः- नन्न कूड, नन्न संगड = माझ्या बरोबर, माझ्याशीं.

## वाक्यसंग्रह

१ तो माझ्या बरोबर बोलत नाहीं.
ಅವನು ನನ್ನ ಕೂಡ ಮಾತಾಡುವದಿಲ್ಲ
अवनु नन्नकूड माताडुवदिल्ल
(अव< .... माताडुदुल्ल<)

२ आमचे घरीं(घरास)तुम्ही येत नाहीं.
ನಮ್ಮ ಮನೆಗೆ ನೀವು ಬರುವದಿಲ್ಲ
नम्म मनेगे नीवु बरुवदिल्ल
(.... मनीगे .... बरूदुल्ल <)

३ आम्ही बाहेर जात नाहीं.
ನಾವು ಹೊರಗೆ ಹೋಗುವದಿಲ್ಲ
नावु होरगे होगुवदिल्ल
(नावु होरग होग्दुल्ल <)

४ तो काम करीत नाहीं.
ಅವನು ಕೆಲಸವನ್ನು ಮಾಡುವದಿಲ್ಲ.
अवनु केलसवन्नु माडुवदिल्ल
(अव < केलस < माड्दुल्ल <)

५ तो आमचें (बोलणें) अैकत नाहीं.
ಅವನು ನಮ್ಮ ಮಾತು ಕೇಳುವದಿಲ್ಲ
अवनु नम्म मातु केळुवदिल्ल

६ तो हिंदी बोलत नाहीं.
ಅವನು ಹಿಂದೀ ಮಾತಾಡುವದಿಲ್ಲ
अवनु हिंदी माताडुवदिल्ल

७ तो दूध (दुधास) आणीत नाहीं.
ಅವನು ಹಾಲನ್ನು ತರುವದಿಲ್ಲ
अवनु हालन्नु तरुवदिल्ल
(अव < हालु तरुवदिल्ल <)

८ तो मला बोलावीत नाहीं.
ಅವನು ನನ್ನನ್ನು ಕರೆಯುವದಿಲ್ಲ
अवनु नन्नन्नु करेयुवदिल्ल
( अव < नन्न करेयुवदिल्ल < )

९ ते गहूं खात नाहींत.
ಅವರು ಗೋದಿಯನ್ನು ತಿನ್ನುವದಿಲ್ಲ
अवरु गोदियन्नु तिन्नुवदिल्ल
( अवरु गोदी तिन्नूदुल्ल < )

१० माझ्यानें हें काम होत नाहीं.
ನನ್ನಿಂದ ಈ ಕೆಲಸ ಆಗುವದಿಲ್ಲ
नन्निंद ई केलस आगुवदिल्ल
( नन्निंद ई केलस < आगूद्दुल्ल < )

११ माझी सूचना तो कबूल करीत नाहीं.
ನನ್ನ ಸೂಚನೆಗೆ ಅವನು ಒಪ್ಪುವದಿಲ್ಲ
नन्न सूचनेगे अवनु ओप्पुवदिल्ल
सूचनेगे ( चतुर्थि वि. )

१२ माझा बाप मला पैसे देत नाहीं.
ನನ್ನ ತಂದೆಯು ನನಗೆ ರೊಕ್ಕವನ್ನು-
ಕೊಡುವದಿಲ್ಲ
नन्न तंदेयु ननगे रोक्कवन्नु —
कोडुवदिल्ल
(नन्न तंदि ननग रोक्क < कोड्डुल्ल <)

१३ आम्हाला चांगला तांदूळ मिळत नाही.
ನಮಗೆ ಚಲೋ ಅಕ್ಕಿ ಸಿಗುವದಿಲ್ಲ
नमगे चलो अक्कि सिगुवदिल्ल
( नमग छलो .... शिगूद्दुल्ल <)

१४ पाऊस पडत नाहीं
ಮಳೆ ಬೀಳುವದಿಲ್ಲ
मळे बीळुवदिल्ल
( मळी बीळूद्दुल्ल < )

१५ तो आईस 'पाहात' नाहीं.
(तीस पोशीत नाहीं, तिची— काळजी घेत नाहीं)
ಅವನು ತಾಯಿಯನ್ನು ನೋಡುವದಿಲ್ಲ
अवनु तायियन्नु नोडुवदिल्ल
(अव < तायिन्न नोड्डुल्ल <)

१६ हें तुम्हास शोभत नाहीं.
ಇದು ನಿಮಗೆ ಒಪ್ಪುವದಿಲ್ಲ
इदु निमगे ओप्पुवदिल्ल
(.... निमग ओप्पुदुल्ल <)

## प्रकरण ८ वें

## 'त' कृदंत व अपूर्ण वर्तमानकाळाचीं रूपें

खालील मराठी वाक्यें पहा :— तो जात आहे. तो हंसत बोलतो. 'जात' 'हंसत' या धातुसाधित शब्दांस आपण मराठींत 'त' कृदन्तें म्हणतों.

कुळ्ळितु कोळ्ळु (धा) = बसणें. अुत्तरकर्नाटकांत मुखभाषेंत 'कूड्रु' म्हणतात. लेखभाषेंत व दक्षिणकर्नाटकांत मुखभाषेंतहि 'कुळ्ळितुकोळ्ळु' म्हणतात.

तॆगॆदुकॊळ्ळु = घेणें – मुखभाषेंत तॆगॆदुकॊ, तगो, हीं अेकवचनी व तॆगॆदुकॊळ्ळिरि, तक्कोळरि, हीं बहुवचनी आज्ञार्थी आख्यात रूपें आहेत.

श्रद्धे = श्रद्धा; देवरु = देव; 'देवरु' हें 'देव' या शब्दाचें बहुवचनी रूप आहे. आख्येय पदीं बहुवचनी रूप व क्रियापद अेकवचनी वापरण्याची रूढी आहे. अुदा:– देवरु अिद्दाने – देव आहे.

## वाक्यसंग्रह

१ ನೀನು ಮನೆಗೆ ಹೋಗು
नीनु मनॆगॆ होगु
तूं घरीं (घरास) जा.

२ ಚಲೋ ಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಓದಿರಿ
चलो पुस्तकगळन्नु ओदिरि
चांगलीं पुस्तकें वाचा.

३ ನಾನು ಹೊರಗೆ ಹೋಗುತ್ತೇನೆ; ನೀನು ಮನೆಯಲ್ಲಿ ಇರು
नानु होरगॆ होगुत्तेनॆ; नीनु मनॆयल्लि अिरु
मी बाहेर जातों; तूं घरीं रहा.

४ ತನ್ನ ಕರ್ತವ್ಯವನ್ನು ಮಾಡು
तन्न कर्तव्यवन्नु माडु
आपलें कर्तव्य कर.

५ ದೇವರಲ್ಲಿ ಶ್ರದ್ಧೆ ಇಡು
देवरल्लि श्रद्धे अिडु (स. वि.)
'देवांमध्यें (देवावर) श्रद्धा ठेव.

६ ನಮ್ಮ ಮನೆಗೆ ಊಟಕ್ಕೆ ಬರ್ರಿ
नम्म मनॆगॆ अूटक्के बर्रि
आमचे 'घरास' जेवावयास या.

७ ದೇವರು ನಿಮಗೆ ಧೈರ್ಯವನ್ನು ಕೊಡಲಿ
देवरु निमगॆ धैर्यवन्नु कॊडलि
परमेश्वर तुम्हांस धैर्य देवो.

८ ನಾವು ನಮ್ಮ ಕೆಲಸವನ್ನು ಮಾಡೋಣ
नावु नम्म कॆलसवन्नु माडोण
आम्हीं आमचें काम करूं या.

१ सज्जनांच्या सहवासांत अेस.
ಸಜ್ಜನರ ಸಂಗತಿಯಲ್ಲಿ ಇರು
सज्जनर संगतियल्लि अिरु.

२ आईबापांचें बोलणें अेक.
ತಾಯಿ ತಂದೆಗಳ ಮಾತು ಕೇಳು
तायि तंदॆगळ मातु केळु

३ आमच्या गांवाला ये.
ನಮ್ಮ ಊರಿಗೆ ಬಾ
नम्म अूरिगॆ बा

४ भावाला पत्र लिही.
ಅಣ್ಣನಿಗೆ ಪತ್ರ (ವನ್ನು) ಬರೆ
अण्णनिगॆ पत्र (वन्नु) बरॆ

५ मला दोन पुस्तकें दे.
ನನಗೆ ಎರಡು ಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕೊಡು
ननगु अेरडु पुस्तकगळन्नु कोडु
(अेरडु पुस्तक < कोडु)

६ येथें बैस.
ಇಲ್ಲಿ ಕುಳಿತು ಕೊ (ಕೂಡ್ರು)
अिल्लि कुळितुको (कूड्रु)

७ दूध घे, दूध घ्या.
ಹಾಲು ತಗೊ, ಹಾಲು ತೆಗೆದುಕೊಳ್ಳಿರಿ
हालु तगो, हालु तेगेदुकोळ्ळिरि
(तक्कोळ्ळिरि) (तगोळ्ळिरि)

८ तुम्ही अिथें बसा.
ನೀವು ಇಲ್ಲಿ ಕುಳಿತುಕೊಳ್ಳಿರಿ, ಕೂಡ್ರಿ.
नीवु अिल्लि कुळितुकोळ्ळिरि
(कूड्रि)

९ बाजारांत (स) जा.
ಪೇಟೆಗೆ ಹೋಗು
पेटेगे होगु, पॅटिगे होगु

१० परत लौकर ये.
ತಿರುಗಿ ಲಗೂನೆ ಬಾ
तिरुगि लगूने बा

## प्रकरण १० वें

# प्रश्नार्थक वाक्यें

प्रश्नार्थक वाक्यांचे कानडींत दोन प्रकार आहेत. त्यांपैकीं पहिला प्रकार मराठींतल्या प्रश्नार्थक वाक्यासारखाच आहे. दुसरा मात्र बराच निराळा व कन्नडविशिष्ट आहे. पहिला प्रकार आधीं पाहूं. खालील मराठी वाक्यें पहाः—

| | |
|---|---|
| १ तो जातो. | तो जातो **काय ?** |
| २ तुम्ही काम करतां. | तुम्ही काम करतां **काय ?** |
| ३ तुम्ही करतां | तुम्ही **काय** करतां? तुम्ही करतां **काय ?** |
| ४ तुम्ही आहांत | तुम्ही **कोण** आहांत ? |
| ५ तुम्ही जातां | तुम्ही जातां **काय** ? तुम्ही केव्हां जातां ? |
| ६ तूं जातोस | तूं **कुठें** जातोस ? |

वरील साधीं वाक्यें (विधान वाक्यें) प्रश्नार्थक वाक्यें करतांना 'कोण' '**काय**' हीं प्रश्नार्थक सर्वनामें किंवा कुठें, केव्हां, कधीं, वगैरे प्रश्नार्थक

७ तुम्ही कोठें जातां ?
ನೀವು ಎಲ್ಲಿ ಹೋಗುತ್ತೀರಿ ?
नीवु एल्लि होगुत्तीरि ?
(नीवु यल्ले होगतीरि)

८ तुमचें घर कुठें आहे ?
ನಿಮ್ಮ ಮನೆ ಎಲ್ಲಿ ಇದೆ ?
निम्म मने ऎल्लि अिदे ?
(निम्मनी यल्ल्यदऽ)

९ तुम्ही काय करतां ?
ನೀವು ಏನು ಮಾಡುತ್ತೀರಿ ?
नीवु अेन् माडुत्तीरि ?
(नीवेन्माडतीरि)

१० तें किती दूर आहें ?
ಅದು ಎಷ್ಟು ದೂರ ಅದೆ ?
अदु ऎष्टु दूर अदे ? (अदंऽ)

११ तुम्ही कां येत नाहीं ?
ನೀವು ಯಾಕೆ ಬರುವದಿಲ್ಲ ?
नीवु याके बरुवदिल्ल ?
(नीवु याक बरुदुल्ल <)

१२ तुम्ही कधीं येतां ?
ನೀವು ಎಂದು ಬರುತ್ತೀರಿ ?
नीवु ऎंदु बरुत्तीरि ?
(नीवुंद बरतीरि ?)

१३ तुम्ही कधीं जातां ?
ನೀವು ಎಂದು ಹೋಗುತ್ತೀರಿ ?
नीवु ऎंदु होगुत्तीरि ?
(नीव् यंद होगतीरि)

१४ तुम्ही कां हंसतां ?
ನೀವು ಯಾಕೆ ನಗುತ್ತೀರಿ ?
नीवु याके नगुत्तीरि ?
(नीवु याक नगतीरि)

२ रा प्रकार. 'ओ' किंवा 'आ' लावून

१ तूं जातोस काय
ನೀನು ಹೋಗುತ್ತೀಯಾ ?
नीनु होगुत्तिया ?
(नी होगतिया)

२ ते जातोत काय ?
ಅವರು ಹೋಗುತ್ತಾರೋ ?
अवरु होगुत्तारो ?
(अवरु होगतारो ?

३ ते येतात काय ?
ಅವರು ಬರುತ್ತಾರೋ ?
अवरु बरुत्तारोऽ (बरतारो ?)

४ तो 'शाळेस' जातो काय ?
ಅವನು ಸಾಲೆಗೆ ಹೋಗುತ್ತಾನೋ ?
अवनु सालेगे होगुत्तानो
(अव< सालिगे होगतानो)

५ तो करतो काय ?
ಅವನು ಮಾಡುತ್ತಾನೋ ?
अवनु माडुत्तानो ?
अव< माडतानो ?

६ तुम्ही येतां काय ?
ನೀವು ಬರುತ್ತೀರಾ?
नीवु बरुत्तीरा ?

७ तुम्ही घरी जातां काय ?

ನೀವು ಮನೆಗೆ ಹೋಗುತ್ತೀರೋ ?

(ಹೋಗುತ್ತೀರಾ ?)

नीवु म**नेगे** होगुत्तीरो ?

(होगतीरो) (होगुत्तीरा)

किंवा

ನೀವು ಮನೆಗೆ ಹೋಗುತ್ತೀರಾ ?

नीवु म**नेगे** होगुत्तीरा ?

टीपः– या पुढील कांहीं प्रकरणांतून वाक्यसंग्रहांत 'ओ' किंवा 'आ' लावून होणाऱ्या साध्या प्रश्नांचीं किंवा 'अे' लावून, होणाऱ्या 'परिणाम–प्रश्नां'चीं अुदाहरणेंहि दिलीं आहेत तीं नीट लक्षांत घ्यावीत.

---

## प्रकरण ११ वें

## ' भूत कृदन्त विशेषणें '

खालील मराठी रूपें पहा :-

तेथें **गेलेला** असम. तुम्ही **पाहिलेलें** पुस्तक. आम्हीं **केलेलें** काम.

यांत 'गेलेला, पाहिलेलें, केलेलें' हीं धातुसाधित विशेषणें आहेत. यांना कानडींत 'भूतकृदंतविशेषणें' म्हणतात. हीं भूतकालिक अर्थ सुचवितात. हीं विशेषणें असल्यामुळें मराठींत विशेष्यनामाच्या लिंगवचनाप्रमाणें ला, ली, लें व (बहुवचनी) ले, ल्या, लीं लावून होतात, विशेष्याच्या (प्रथमेखेरीज अितर) विभक्तींमध्यें ह्यांचें 'गेलेल्या' असें सामान्य रूप होतें; अुदा. :- 'गेलेल्या मुलांना,' 'तुम्ही पाहिलेल्या पुस्तकांची किंमत.' पण मागें आपण पाहिलेंच आहे कीं, कानडी विशेषणाचें रूप विशेष्याप्रामाणें बदलत नाहीं.

कानडींत हीं भूतकृदन्त विशेषणें 'द, अिद' हे प्रत्यय लावून होतात. परंतु हे प्रत्यय लागण्यापूर्वीं धातूचें रूप बदलतें, पण सर्व धातूंचें रूप अेकाच तऱ्हेनें बदलत नसल्यामुळें, आपण धातूंचे गट पाडून ते समजून घेंअूं :-

१. फक्त आद्याक्षर व 'द' प्रत्यय यांमध्यें (अुच्चारित) अनुस्वार येअून भूतकृदंतविशेषण होणारे धातू :-

बरु - येणें - बंद, तरु - आणणें - तंद, अन्नु - म्हणणे - अंद, तिन्नु - खाणें - तिंद.

२. अंत्य 'डु'च्या जागीं 'ट्ट' येऊन होणारा :–

बिडु - सोडणें - बिट्ट, केडु - बिघडणें - केट्ट, अिडु - ठेवणें - अिट्ट' कोडु - देणें - कोट्ट.

३. धातूस 'अिद' लागून ('अिद' लागतांना स्वरलोपसंधीप्रमाणें अंत्य 'अु'चा लोप होतो)

नोडु - पाहणें - नोडिद, माडु - करणें - माडिद, हेळु - सांगणें - हेळिद, बेडु - मागणें - बेडिद, केळु - विचारणें—अैकणें - केळिद, मलगु - झोंपणें - मलगिद, मुच्चु - झांकणें—लपविणें - मुच्चिद, बारिसु - वाजविणें - बारसिद, ओदु - वाचणें – ओदिद, हारिसु - अुडविणें - हारिसिद.

४. अंत्याक्षराच्या जागीं 'द्द' येऊन आणि आद्याक्षर दीर्घ असल्यास तें ऱ्हस्व होअून :–

अिरु - असणें - अिद्द, बीळु - पडणें - बिद्द, अेळु - अुठणें - अेद्द.

५. 'द' लागून

करे - बोलावणें - करेद, बरे - लिहिणें - बरेद, तेगे - काढणें - तेगेद.

६, आद्याक्षराला 'त' लावून होणारा गट – (द्वितायाक्षर लोप होतें)

कुड्रु - बसणें - कूत; कुळित, सोलु - हरणें - सोत, बायु - सुजणें - बात.

७. आद्याक्षरास 'क्क' लागून :–

नगु - हंसणें - नक्क, सिगु - सांपडणें - सिक्क, मिकु - अधिक होणें - मिक्क.

८. आद्याक्षरास 'त्त' लागून होणारा गट –

हेरु - प्रसवणें - हेत्त, होरु - वाहणें (भार) - होत्त.

९. आद्याक्षरास अनुस्वार येऊन व 'त' लागून होणारा गट –

निल्लु - थांबणें - नित.

१०. स्वतंत्र तऱ्हेनें बनणारा गट –

सायु - मरणें - सत्त, होरडु - निघणें - होरट, अुण्णु - जेवणें . अुंड, कोळ्ळु - विकत घेणें - कोंड.

## शब्दसंग्रह.

जगळागु=भांडणें; आडु=खेळणें किंवा बोलणें हा धातु सहायकधातु म्हणून घेऊन कानडींत पुष्कळ धातु झालेले आहेत. 'जगळाडु'चा वाच्यार्थ 'भांडण खेळणें' असा होतो.

सेरु=आवडणें,शिरणें; अुत्तर कर्नाटकी मुखभाषिक अुच्चार 'शेरु'. हेळु=सांगणें

सालु=पुरणें "भरपूर होणें" या अर्थी, सामानु=सामान

मातागु=बोलणें; मातु+आडु 'शब्द बोलणें' जनरु=लोक

बैय्यु=शिग्या देणें; रागेभरणें असाहि अर्थ होतो प्रीति=प्रीति, आवड

कथॆ=गोष्ट, मुखभाषेंत 'कथी' अगदी=अगदी ऎल्लरु=सर्व(जण)

ऎल्ल=सर्व, याचीं विभक्तिरूपें होतात. अुदा :- ऎल्लरन्नु, ऎल्लरिगॆ वगैरे

ऎल्लकडे=सगळीकडें, सर्व ठिकाणीं. दिनालु=रोज, मुखभाषेंत 'दिना'

हत्तर=जवळ (शब्दयोगी अव्यय). हें शब्दाच्या षष्ठीविभक्तीस जोडतात.
अुदाहरण: घराजवळ=मनॆय हत्तर.

## वाक्यसंग्रह

१ आमच्या घरीं आलेला मनुष्य रोज भांडतो.
ನಮ್ಮ ಮನೆಗೆ ಬಂದ ಮನುಷ್ಯನು ದಿನಾಲು ಜಗಳಾಡುತ್ತಾನೆ
नम्म मनॆगॆ बंद मनुष्यनु दिनालु जगळाडुत्तानॆ.
(मनीगॆ बंद मनश< दिना जगळाडतानऽ)

२ तुम्ही दिलेलें पुस्तक मुलें आवडीनें वाचतात.
ನೀವು ಕೊಟ್ಟ ಪುಸ್ತಕವನ್ನು ಹುಡುಗರು ಪ್ರೀತಿಯಿಂದ ಓದುತ್ತಾರೆ
नीवु कॊट्ट पुस्तकवन्नु हुडुगरु प्रीतियिंद ओदुत्तारॆ.
(.... .... पुस्तक< .... .... ओदतारऽ)

३ तुम्ही केलेलें काम चांगलें आहे.
ನೀವು ಮಾಡಿದ ಕೆಲಸ ಚಲೋ ಇರುತ್ತದೆ
नीवु माडिद कॆलस< चलो अिरुत्तदॆ. (अदऽ)

४ आम्हीं पाहिलेलें घर ऑफीस(च्या)जवळ आहे.
ನಾವು ನೋಡಿದ ಮನೆಯು ಆಫೀಸಿನ ಹತ್ತರ ಇದೆ

नावु नोडिद मने आफीसिन हत्तर अिदे.
(... .... मनी आफीशिन हत्तर अदऽ)

५ डोकें बिघडलेला मनुष्य सर्वांना शिव्या देतो.
ತಲೆ ಕೆಟ್ಟ ಮನುಷ್ಯನು ಎಲ್ಲರಿಗೆ ಬೈಯ್ಯುತ್ತಾನೆ (ಎಲ್ಲರನ್ನು)
तले कॆट्ट मनुष्यनु अेल्लरिगे बैय्युत्ताने.
(तली क्यट्ट मनशा यल्लरिग्य् बैतानऽ)

६ मी गांधीनीं लिहिलेलें पुस्तक वाचतों. (गांधी+अवरु=गांधीयवरु)
ನಾನು ಗಾಂಧೀಯವರು ಬರೆದ ಪುಸ್ತಕವನ್ನು ಓದುತ್ತೇನೆ
नानु गांधीयवरु बरॆद पुस्तकवन्नु ओदुत्तेने. (पुस्तक< ओदतेनी)

७ तुम्हीं म्हटलेलें गाणें आम्हाला आवडतें.
ನೀವು ಅಂದ ಹಾಡು ನಮಗೆ ಸೇರುತ್ತದೆ
नीवु अंद हाडु नमगे सेरुत्तदे. (नमग शेरतदऽ)

८ तेथें गेलेला गडी दुकानांत बसतो.
ಅಲ್ಲಿ ಹೋದ ಆಳು ಅಂಗಡಿಯಲ್ಲಿ ಕೂಡ್ರುತ್ತಾನೆ
अल्लि होद आळु अंगडियल्लि कूड्रुत्ताने (अंगडियोळग कूडतानऽ)

९ तुम्ही सांगितलेली गोष्ट (कथा) सर्वांना सांगा.
ನೀವು ಹೇಳಿದ ಕಥೆ ಎಲ್ಲರಿಗೆ ಹೇಳಿರಿ
नीवु हेळिद कथे यल्लरिगे हेळिरि. (कथी यल्लारिगे हेळरी)

१० 'तोंड मेलेला' माणूस (मुखदुर्बळ माणूस) स्वस्थ असतो.
ಬಾಯಿಸತ್ತ ಮನುಷ್ಯನು ಸುಮ್ಮನೆ ಇರುತ್ತಾನೆ
बायि सत्त मनुष्यनु सुम्मने अिरुत्ताने.
(.... .... मनशा सुम्मन अिरतानऽ)

११ तुम्ही पाठविलेलें तांदुळ आम्हीं खात आहोंत.
ನೀವು ಕಳಿಸಿದ ಅಕ್ಕಿಯನ್ನು ನಾವು ತಿನ್ನುತ್ತಿದ್ದೇವೆ
नीवु कळिसिद अक्कियन्नु नावु तिन्नुतिद्देवे.

१२ तुम्ही दिलेलें सामान आम्हांस पुरतें.
ನೀವು ಕೊಟ್ಟ ಸಾಮಾನು ನಮಗೆ ಸಾಲುತ್ತದೆ
नीवु कॊट्ट सामानु नमगे सालुत्तदे. (नमग सालतदऽ)

१३ तेथें आलेले लोक फार बोलतात.
ಅಲ್ಲಿ ಬಂದ ಜನರು ಬಹಳ ಮಾತಾಡುತ್ತಾರೆ
अल्लि बंद जनरु बहळ मातडुत्तारे.
( अल्ले .... .... बहळ माताडतारऽ )

१४ रस्त्यांत पडलेला मुलगा सगळीकडे पाहतो.
ರಸ್ತೇದಲ್ಲಿ (ರಸ್ತೆದೊಳಗೆ) ಬಿದ್ದ ಹುಡುಗ ಎಲ್ಲಕಡೆಗೆ ನೋಡುತ್ತಾನೆ
रस्तेदल्लि बिद्द हुडुग अेल्लकडेगे नोडुत्ताने.
( रस्तेदाग बिद्द हुडुग < यल्लाकडे नोडतानऽ )

१५ मुलें मी दिलेलें पुस्तक वाचतात काय ?
ಹುಡುಗರು ನಾನು ಕೊಟ್ಟ ಪುಸ್ತಕವನ್ನು ಓದುತ್ತಾರೋ ?
हुडुगरु नानु कोट्ट पुस्तकवन्नु ओदुतारो ? (ओदतारो)

१६ तुमचे वडील घरांत आहेत काय ?
ನಿಮ್ಮ ತಂದೆಯವರು ಮನೆಯಲ್ಲಿ ಇದ್ದಾರೋ ?
निम्म तंदेयवरु मनेयल्लि अिद्दारो ?

---

## प्रकरण १२ वें

# सामान्य भूतकाळाचीं रूपें

आपण गेल्या प्रकरणां धातूंचीं 'होद' (गेलेला), 'बंद' (आलेला) वगैरे 'भूत कृदन्त विशेषणें' कशीं होतात, तें पाहिलें.

धातूंचीं सामान्यभूतकालिक आख्यातरूपें करण्यास या भूतकृदन्त-विशेषणांचा अुपयोग होतो. धातूच्या भूतकृदन्तविशेषणास खालील आख्यात प्रत्यय लाविल्यानें सामान्यभूतकालिक रूपें हातात. (कांहीं धातूंचीं तृतीय पुरुषी नपुंसकलिंगी अेकवचनी रूपें मात्र अनियमित होतात. त्यांविषयीं पुढें खुलासा केला आहे.)

आख्यात प्रत्यय

| | अेकवचन | बहुवचन |
|---|---|---|
| प्र. पु. | ऎनु, | ऎवु. |
| द्वि. पु. | अि, ऎ, | अिरि. |
| तृ. पु. | अनु, अ(पु) | अरु (पु.) |
| | अळु (स्त्री) | अरु (स्त्री.) |
| | अिदु (न) | अवु (न.) |

हे प्रत्यय लावतांना अर्थातच स्वरलोप संधि लक्षांत घेणें जरूर आहे.

१. बरु - येणें – बंद. भू. कृ. विशेषण

प्र. पु. बंदॆनु; बंदॆवु, बंदिवि. द्वि. पु. बंदि, बंदॆ; बंदिरि
तृ. पु. बंदनु, बंद<(पु) बंदळु (स्त्री) बंदितु (न); बंदरु (पु.स्त्री), बंदवु (न)

यांपैकीं 'बंदितु'च्या अैवजीं 'बंतु' असेंहि संक्षिप्त रूढ आहे. द्वि.पु. अेक वचनी 'बंदॆ' हें पर्यायरूप रूढ नाहीं. कारण 'बंदॆनु' हें 'नु'रहित 'बंदॆ' असें अुच्चारण्याची रूढी असल्यानें त्या दोहोंमध्यें गोंधळ होतो. तृ.पु. अेक-वचनी 'बंद' हें पर्यायरूप लेखभाषेंत रूढ नाहीं. कारण तें व भूतकृदन्त-विशेषण 'बंद' यांमध्यें गोंधळ होतो. म्हणून लेखभाषेंत तें टाळतात व मुखभाषेंत 'बंद<' असें विस्तृत अकारांत अुच्चारतात.

हें स्पष्टीकरण खालील रूपांपैकीं तृ. पुरुषी अेक वचनी व द्वि. पुरुषी अेक वचनी पर्यायरूपांविषयींहि लक्षांत घ्यावें.

२. अन्नु - म्हणणें. अंद भू. कृ. विशेषण.

प्र. पु. अंदॆनु; अंदॆवु, अंदवि. द्वि. पु. अंदि, अंदॆ; अंदिरि.
तृ. पु. अंदन, अंद<(पु), अंदळु (स्त्री), अंदितु (न); अंदरु (पु, स्त्री) अंदवु (न)

'अंदितु'च्या अैवजीं अंतु, अंत्यु अशीं साक्षेप रूपेंहि रूढ आहेत.

३. तरु - आणणें. तंद भू. कृ. विशेषण.

प्र. पु. तंदॆनु; तंदॆवु, तंदिवि. द्वि. पु. तंदि, तंदॆ; तंदिरि.
तृ. पु. तंदनु, तंद<(पु), तंदळु (स्त्री), तंदितु (न); तंदरु (पु.स्त्री), तंदवु (न)

४. कोळ्ळु - खरीदणें, घेणें. कोंड - भू. कृ. विशेषण.

प्र. पु. कोंडेनु; कोंडेवु. द्वि. पु. कोंडि, कोंडे; कोंडिरि.

तृ. पु. कोंडनु, कोंड<(पु), कोंडळु (स्त्री), कोंडितु (न); कोंडरु (पु.स्त्री) कोंडवु (न)

कानडींत 'कोळ्ळु' याचा सहाय्य धातू म्हणून विशेषच अुपयोग होत असल्यानें वरील रूपें नीट लक्षांत घ्यावींत.

५. कॊडु - देणें. कॊट्ट - भू. कृ. विशेषण.

प्र. पु. कॊट्टेनु; कॊट्टेवु, कॊट्टिवि. द्वि. पु. कॊट्टि, कॊट्टे; कॊट्टिरि.

तृ. पु. कॊट्टनु, कॊट्ट<(पु) कॊट्टळु (स्त्री) कॊट्टितु (न) कॊट्टरु (पु.स्त्री) कॊट्टवु (न)

६. अुण्णु - जेवणें. अुंड - भू. कृ. विशेषण

प्र. पु. अुंडेनु; अुंडेवु, अुंडिवि. द्वि. पु. अुंडि, अुंडे; अुंडिरि.

तृ. पु. अुंडनु, अुंड<(पु), अुंडळु (स्त्री), अुंडितु (न); अुंडरु (पु.स्त्री), अुंडवु (न)

७. सायु - मरणें. सत्त - भू. कृ. विशेषण.

प्र. पु. सत्तेनु; सत्तेवु, सत्तिवि. द्वि. पु. सत्ति, सत्ते; सत्तिरि.

तृ. पु. सत्तनु, सत्त<(पु), सत्तळु (स्त्री), सत्तितु (न); सत्तरु (पु.स्त्री), सत्तवु (न)

याचप्रमाणें कॆडु, अेळु वगैरे धातूंचीं अनुक्रमें कॆट्ट, अेद्द वगैरे भू. कृ. विशेषणें घेअून त्यांस प्रत्यय लावून आख्यात रूपें करावींत.

खालीं दिलेल्या कांहीं धातूंचीं तृतीय पुरुषी अेकवचनी नपुंसकलिंगी रूपें मात्र 'अितु' हा प्रत्यय भूतकृदन्तविशेषणास न लागतां अितर प्रकारांनीं लागून होतात.

धातूस 'अितु' लावून

नोडु+अितु = नोडितु. (स्वरलोपसंधि)

नोडु – नोडितु. माडु – माडितु. मलगु – मलगितु.

नुडि(यु) – बोलणें, हिडि(यु) – धरणें, अुळि(यु) – राहणें, यांचीं नुडियितु, हिडियितु, अुळियितु अशीं रूपें होतात.

नडे(यु) – चालणें, करे(यु) – बोलावणें, बरे(यु) – लिहिणें यांचीं नडेयितु, करेयितु, बरेयितु अशीं रूपें होतात.

वास्तविक पाहतां नुडियु, हिडियु, अुळियु हे धातू नुडि, हिडि, अुळि

असे 'अि'कारांत आहेत व नडेयु, करेयु, बरेयु हे नडे, करे, बरे असे 'अे'कारांत आहेत,

वरील धातूंचीं तृतीय पुरुषी अेकवचनी नपुंसकलिंगी रूपांखेरीज अितर आख्यात रूपें भू. कृ. विशेषणास प्रत्यय लावून होतात. तीं सर्व लक्षांत नीटपणें येण्यासाठीं येथें त्यांपैकीं कांहीं धातूंचीं सर्व रूपें दिलीं आहेत.

१. नोडु – पाहणें, नोडिद - भू. कृ. वि.

प्र. पु. नोडिदेनु; नोडिदेवु. द्वि. पु. नोडिदि, नोडिदे; नोडिदिरि.
तृ. पु. नोडिदनु, नोडिद<(पु) नोडिदळु(स्त्री); नोडिदरु(पु. स्त्री)
**नोडितु** (न) **नोडिदवु** (न)

२. नुडि(यु) – बोलणें. नुडिद - भू. कृ. वि.

प्र. पु. नुडिदेनु; नुडिदेवु. द्वि. पु. नुडिदि, नुडिदे; नुडिदिरि
तृ. पु. नुडिदनु, नुडिद<(पु); नुडिदळु(स्त्री); नुडिदरु(पु. स्त्री)
**नुडियितु** (न) **नुडिदवु** (न)

३. नडे(यु)–चालणें. नडेद - भू. कृ. वि.

प्र. पु. नडेदेनु; नडेदेवु, नडेदिवि. द्वि. पु. नडेदि, नडेदे; नडेदिरि.
तृ. पु. नडेदनु, नडेद<(पु); नडेदळु(स्त्री); नडेदरु (पु. स्त्री)
**नडेयितु** (न) **नडेदवु** (न)

याचप्रमाणें बरे(यु), करे(यु)चीं रूपें होतात.

४. होगु – जाणें. होद - भू. कृ. वि.

प्र. पु. होदेनु; होदेवु, होदिवि. द्वि. पु. होदि, होदे; होदिरि.
तृ. पु. होदनु, होद<(पु), होदळु(स्त्री); होदरु (पु. स्त्री).
**होयितु** (न) **होदवु** (न)

५. आगु – होणें. आद – भू. कृ. वि.

प्र. पु. आदेनु; आदेवु, आदिवि. द्वि. पु. आदि, आदे; आदिरि.
तृ. पु. आदनु, आद<(पु); आदळु (स्त्री); आदरु (पु. स्त्री).
**आयितु**(न), **आदवु**(न).

६. अिरु – असणें. अिद्द - भू. कृ. वि.

प्र. पु. अिद्देनु; अिद्देवु, अिद्दि. द्वि. पु. अिद्दि, अिद्दे; अिद्दिरि.
तृ. पु. अिद्दनु, अिद्द<(पु); अिद्दळु(स्त्री); अिद्दरु (पु. स्त्री)
**अित्तु** (न); **अिद्दवु** (न).

'अित्तु'प्रमाणेंच 'अिद्दितु' असेंहि रूप रूढ आहे.

## शब्दसंग्रह.

ಗಂಟೆಗೆ गंट्टेगे - वाजतां. गंट्टे = घंटा. गंट्टेगे हें 'गंटे'चें च. विभक्तिरूप आहे. शब्दशः 'घंटेस'. अुत्तर कर्नाटकी मुखभाषेंत 'घंटेक्क' असें अुच्चारतात.

ಅತಿಥಿ अतिथि = पाहुणा. ಹೊಸ हॊस = नवीन.

ಸುದ್ದಿ सुद्दि = बातमी. ತಾಸು तासु = तास.

ತಿರುಗಾಡು तिरुगाडु = फिरणें. ತೀರಿಕೊಳ್ಳು तीरिकॊळ्ळु = मरणें.

ಗೊತ್ತಾಗು गॊत्तागु ( गॊत्तु = ज्ञान + आगु = होणें ) = माहीत होणें. आगु लागून होणाऱ्या धातूचीं आख्यातरूपें 'आगु'च्या प्रमाणें होतात. अुदा. गॊत्तायितु – माहीत झालें. ಹಂಚು हंचु = वांटणें ( Distribute )

## वाक्यसंग्रह

१ मी चहा केला. ನಾನು ಚಹವನ್ನು ಮಾಡಿದೆನು. नानु चहवन्नु माडिदेनु. ( ना चह< माडिदे )

२ बाजारांत गेलो.(बाजारास) ಪೇಟೆಗೆ ಹೋದೆನು. पेट्टेगे होदेनु. ( प्याटिगे होदे )

३ घरीं (घरास) नअू वाजतां आलों. ಮನೆಗೆ ಒಂಬತ್ತು ಗಂಟೆಗೆ ಬಂದೆನು. मनॆगे ओंबत्तु गंट्टेगे बंदेनु. ( मनीगे वंबत्त घंटेक्क बंदे )

४ बाजारांतून तांदुळ आणले. ಪೇಟೆಯಿಂದ (ಪೇಟೆಯೊಳಗಿಂದ) ಅಕ್ಕಿಯನ್ನು ತಂದೆನು. पेट्टेयिंद (पेट्टेयॊळगिंद) अक्कियन्नु तंदेनु. (प्याटी वळगिंद अक्कि तंदे)

५ दहा वाजतां जेवलों. ಹತ್ತು ಗಂಟೆಗೆ ಉಂಡೆನು. हत्तु गंट्टेगे अुंडेनु. ( हत्त घंटेक्क अुंडे )

६ नंतर वर्तमानपत्र वाचलें. ನಂತರ ವರ್ತಮಾನಪತ್ರವನ್ನು ಓದಿದೆನು. नंतर वर्तमानपत्रवन्नु ओदिद्देनु. (नंतर< वर्तमानपत्र< ओदिद्दे)

७ घरीं अेक पाहुणे आले. ಮನೆಗೆ ಒಬ್ಬ ಅತಿಥಿ ಬಂದರು. मनेगे ओब्ब अतिथिगळु बंदरु. ( मनीगे वब्ब अतिथि बंदरु )

८ त्यानें मला अेक नवीन बातमी सांगितली. ನನಗೆ ಅವನು ಒಂದು ಹೊಸ ಸುದ್ದಿಯನ್ನು ಹೇಳಿದನು. ननगे अवनु ओंदु होस सुद्दियन्नु हेळिदनु. (ननग अव< वंदु होस< सुद्दि हेळ्दि<)

९ त्याचा थोरला भाअू वारला. ಅವನ ಅಣ್ಣನು ತೀರಿಕೊಂಡನು. अवन अण्णनु तीरिकोंडनु. (अवनण्णा तीरकोंडा<)

१० आम्हीं अेक तास खेळलों. ನಾವು ಒಂದು ತಾಸು ಆಡಿದೆವು. नावु ओंदु तासु आडिदेवु. ( नावु वंद तास आडिदिवी.)

११ त्यानंतर फिरावयास गेलों. ಆಮೇಲೆ ತಿರುಗಾಡಲಿಕ್ಕೆ ಹೋದೆವು. आमेले तिरुगाडलिक्के होदेवु. (आम्याले तिरुगाडलिक्के होदिवी)

१२ पोस्टमननें मला अेक पत्र दिलें. ಪೋಸ್ಟಮನನು ನನಗೆ ಒಂದು ಪತ್ರವನ್ನು ಕೊಟ್ಟನು. पोस्टमननु ननगे ओंदु पत्रवन्नु कोट्टनु ( पोस्टमन ननग वंद पत्र< कोट्ट<)

१३ मी पत्र वाचलें, मला आनंद झाला. ನಾನು ಪತ್ರವನ್ನು ಓದಿದೆ, ನನಗೆ ಆನಂದವಾಯಿತು. नानु पत्रवन्नु ओदिद्दे, ननगे आनंद वायितु. ( ना पत्र< ओदिद्दे; ननग आनंद आय्तु )

१४ माझा मुलगा परीक्षेंत पास झाला. ನನ್ನ ಮಗನು ಪರೀಕ್ಷೆಯಲ್ಲಿ ಪಾಸ ಆದನು. नन्न मगनु परीक्षेयल्लि पास आदनु. ( नन्न मग< परीक्षेयोळग पास आद< )

१५ मी पेढे वाटले. ನಾನು ಪೇಢೇ ಹಂಚಿದೆ. नानु पेढे हंचिदे. ( ना पेढे हंचिदे )

**कानडी – मराठी**

१६ ನಿಮ್ಮ ಅಣ್ಣನು ಊರಿಂದ ಬಂದನೋ? निम्म अण्णनु अूरिंद बंदनो ? तुमचा भाअू गांवाहून आला का ?

१७ ನಿಮ್ಮ ಮಗನು ಪಾಸ ಆದನೋ? निम्म मगनु पास आदनो ? तुमचा मुलगा पास झाला का ?

१८ ಗಾಡಿಯು ಹೋಯಿತೋ ? गाडियु होयितो ? गाडी गेली का ?

१९ ನೀವು ದಿಲ್ಲಿಯನ್ನು ನೋಡಿದಿರಾ ? नीवु दिल्लियन्नु नोडिदिरा ? तुम्ही दिल्ली पाहिलीत ?

---

## प्रकरण १३ वें

# ' भूत कृदन्त अव्ययें '

### ( मराठी 'ऊन' कृदन्तांसारखीं )

खालील वाक्यें पहा :—

काम **करून** तो गांवाला गेला.

तेथें **बसून** त्यानें वाट पाहिली.

मी **जाऊन** आलों.

ह्या वाक्यांत 'करून', 'बसून', 'जाऊन' या शब्दांना मराठींत आपण 'ऊन 'कृदंतें म्हणतों. अशा अर्थाच्या शब्दांना कानडींत 'भूतकृदन्त अव्ययें' म्हणतात. धातूस 'इ' अथवा 'दु' किंवा भूतकृदन्तविशेषणास 'उ' लागून हीं अव्ययें होतात. उदाहरण :

होगु + इ = होगि – जाऊन; माडु + इ = माडि – करून;
करॆ + दु = करॆदु – बोलावून; तॆगॆ + दु = तॆगॆदु – काढून.
आपण तीं ' गट 'वार पाहूं.

१ धातूस 'इ' लागून :– होगु+इ=होगि, स्वरलोप संधि नियमाप्रमाणें. माडि, हाकि, आगि, आडि.

२ 'अे' व 'अि' कारांत धातूंच्या मूळरूपांस 'दु' लागून :– करॆदु (बोलावून), बरॆदु (लिहून), नडॆदु (चालून), नुडिदु (बोलून), हिडिदु (धरून), कुडिदु (पिऊन), वगैरे. मागें आपण पाहिलेंच आहे कीं बरॆयु, करॆयु, नडॆयु व नुडियु, हिडियु कुडियु अशा 'रूपांतरित' धातूंचीं मूळरूपें बरॆ, करॆ, नडॆ, व नुडि, हिडि, कुडि अशीं आहेत.

३ भूतकृदन्तविशेषणास 'अु' लावून :– कॆडु - कॆट्ट - कॆट्टु (बिघडून) कॊडु - कॊट्ट - कॊट्टु (देऊन), बरु - बंद - बंदु (येऊन), तिन्नु - तिंद - तिंदु (खाऊन), अुण्णु - अुंड - अुंडु (जेऊन), कॊळ्ळु - कॊंड - कॊंडु (घेऊन), निल्लु - निंत - नितु (थांबून), सायु - सत्त - सत्तु (मरून).

वि. सूचना : परिशिष्ट 'ब' मधील शब्दसंग्रहांत धातूंचीं भूतकृदंतविशेषणें व भूतकृदंताव्ययें दिलीं आहेत.

## शब्दसंग्रह.

ಚುನಾವಣಿ चुनावणि = निवडणुक. ಆರಿಸು आरिसु = निवडणें.

ಆರಿಸಿ ಬರು आरिसि बरु = निवडून येणें.

## वाक्यसंग्रह

१ तो जेवून अुठला. ಅವನು ಉಂಡು ಎದ್ದನು. अवनु अुंडु अॆद्दनु. (अव< अुंडॆद्द<)

२ तो अुठून बसला. ಅವನು ಎದ್ದು ಕೂತನು. अवनु अॆद्दु कूतनु. (अव< यद्द कूत<)

३ तो बसून गेला. ಅವನು ಕೂತು ಹೋದನು. अवनु कूतु होदनु. (अव< कूत होद<)

४ तो जाऊन आला. ಅವನು ಹೋಗಿ ಬಂದನು. अवनु होगि बंदनु. (अव< होगि बंद<)

५ तो येऊन गेला. ಅವನು ಬಂದು ಹೋದನು. अवनु बंदु होदनु. (अव< बंदु होद<)

६ तो झोपून अुठला. ಅವನು ಮಲಗಿ ಎದ್ದನು. अवनु मलगि अॆद्दनु. (अव< मलिगि अॆद्द<)

७ मी आमंत्रण देऊन आलों. ನಾನು ಆಮಂತ್ರಣ ಕೊಟ್ಟು ಬಂದೆನು. नानु आमंत्रण कोट्टु बंदेनु. ( ना आमंत्रण< कोट्ट बंदे )

८ मी बोलावून आलों. ನಾನು ಕರೆದು ಬಂದೆನು. नानु करेदु बंदेनु. ( ना करद बंदे )

९ तें देऊन टाक. ಅದನ್ನು ಕೊಟ್ಟು ಬಿಡು. अदन्नु कोट्टु बिडु. ( अदन्न कोट्ट बिडु )

१० तें करून टाक. ಅದನ್ನು ಮಾಡಿ ಬಿಡು. अदन्नु माडि बिडु. ( अदन्न माडि बिडु )

११ तें पाटवून टाक. ಅದನ್ನು ಕಳಿಸಿ ಬಿಡು. अदन्नु कळिसि बिडु. (अदन्न कळिसि बिडु)

१२ पाहून टाक-सोड. ನೋಡಿ ಬಿಡು. नोडि बिडु.

१३ सोडून पहा. ಬಿಟ್ಟು ನೋಡು. बिट्टु नोडु.

१४ ऐकून सोड किंवा विचारून टाक. ಕೇಳಿ ಬಿಡು. केळि बिडु.

१५ तो निवडणुकींत निवडून आला. ಅವನು ಚುನಾವಣೆಯಲ್ಲಿ ಆರಿಸಿ ಬಂದನು. अवनु चुनावणियल्लि आरिसि बंदनु ( अव< ....... आरिसिबंद<)

## प्रकरण १४ वें

# पूर्णवर्तमानकाळाचीं रूपें

खालील वाक्यें पहा :—

मीं तें केलें आहे. = I have done it.

तो आला आहे = He has come.

यांस आपण ‘पूर्णवर्तमानकाळ’ म्हणतों. भूतकाळीं सुरू झालेली क्रिया आतांपर्यंत जणूं येऊन ठेपली आहे असा याचा अर्थ असतो. मराठींत

हीं रूपें मुख्य धातूच्या सामान्यभूतकालिक रूपास ‘ असणें ’ या धातूचीं वर्तमानकालिक आख्यात रूपें जोडून होतात. हीं रूपें कानडींत मुख्य धातूच्या भूतकृदन्ताव्ययास ‘ अिरु ’ म्हणजे ‘ असणें ’ ह्या धातूचीं वर्तमानकालिक रूपें जोडून करतात. अुदा. होगु - होगि (जाअून) भूतकृदंताव्यय

अिरु - अिरुत्ताने = (तो) आहे

होगु + अिरुत्ताने = होगिरुत्ताने, (तो) गेला आहे.

‘अिरु’चीं ‘अिद्देने’ वगैरे रूपेंहि वापरून हीं आख्यातरूपें करतात.

अुदा. माडु - माडि

माडिद्देने (मी केलें आहे) माडिद्देवे (आम्हीं केलें आहे)

माडिरुत्ती (टीप पहा) माडिद्दीरि (तुम्ही केलें आहे)

माडिद्दाने (त्यानें केलें आहे) माडिद्दारे (त्यांनीं केलें आहे)

माडिद्दाळे (तिनें केलें आहे)

माडिदे (न) माडिवे (न)

टीप - द्वि. पुरुषीं अेकवचनीं ‘नीनु **माडिद्दी**’ म्हटल्यानें नीनु **माडिद्दि** (तूं केलें होतेस) असें वाटून गोंधळ होण्यासारखा असल्यामुळें ‘अिरु’ चें ‘अिरुत्ती’ हें रूप जोडूनच द्वि. पु. अेकवचनीं रूप ‘ नीनु **माडिरुत्ती** ’ असें करतात.

द्वि. पु. बहुवचनीं मात्र **माडिद्दीरि** व **माडिरुत्तीरि** अशीं दोन्हीं वापरतात. कारण ‘ अि**द्दि**रि ’ लावून होणारे ‘ माडि**द्दि**रि ’ हें रूप व ‘ माडि**द्दी**रि ’ हीं निरनिराळीं ओळखण्यासारखीं आहेत आणि बोलतांना तर माडि**द्दि**रि हें ‘ माडिद्रि ’ व माडीद्दीरि हें ‘ माडीरी’ असें अुच्चारतात.

## वाक्य संग्रह

१ आमच्या घरीं ( घरास ) पाहुणे आले आहेत. ನಮ್ಮ ಮನೆಗೆ ಅತಿಥಿಗಳು ಬಂದಿದ್ದಾರೆ. नम्म मनेगे अतिथिगळु बंदिद्दारे. (.... अतिथि बंदारs ) .

२ त्यानें पुष्कळ पुस्तकें लिहिलीं आहेत. ಅವನು ಬಹಳ ಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಬರೆದಿದ್ದಾನೆ. अवनु बहळ पुस्तकगळन्नु बरेदिद्दाने (अव< बहळ पुस्तक< बरदान )

३ मी कागद आणले आहेत. ನಾನು ಕಾಗದಗಳನ್ನು ತಂದಿದ್ದೇನೆ. नान्नु कागदगळन्नु तंदिद्देने. ( ना कागद< तंदेनि )

४ आम्हीं तुम्हांस हें सांगितलें आहे. ನಾವು ನಿಮಗೆ ಇದನ್ನು ಹೇಳಿದ್ದೇವೆ. नावु निमगे अिदन्नु हेळिद्देवे. ( नावु निमग अिदन्न हेळेवी )

५ ह्या ओषधास फार किंमत पडली आहे. ಈ ಔಷಧಕ್ಕೆ ಬಹಳ ಕಿಮ್ಮತ್ತು ಬಿದ್ದಿದೆ. अी ओषधक्के बहळ किम्मत्तु बिद्दिदे. ( अी ओष-धक्क बहाळ किमत्तु बिद्दद )

६ मी अभ्यास केला आहे. ನಾನು ಅಭ್ಯಾಸವನ್ನು ಮಾಡಿದ್ದೇನೆ. नानु अभ्यासवन्नु माडिद्देने. ( ना अभ्यास< माडेनी )

७ त्यांनीं लोकांना असें सांगितलें आहे. ಅವರು ಜನರಿಗೆ ಹೀಗೆ ಹೇಳಿರುತ್ತಾರೆ. अवरु जनरिगे हीगे हेळिरुत्तारे. (हींग हेळ्यार )

८ त्यानें चांगलें चित्र काढलें आहे. ಅವನು ಚಲೋ ಚಿತ್ರವನ್ನು ತೆಗೆದಿದ್ದಾನೆ. अवनु चलो चित्रवन्नु तेगेदिद्दाने. ( अव< छलो चित्र< तगदान< )

---

## प्रकरण १५ वें

# पूर्णवर्तमानकालिक नकार रूपें

'त्यानें केलें आहे' याचें 'त्यानें केलेलें नाहीं', (He has not done) ह्या अर्थाचें नकार रूप धातूच्या भूतकृदंताव्ययास 'अिल्ल' म्हणजे 'नाहीं' किंवा 'अिरुवदिल्ल' म्हणजे असणें नाहीं, हें अव्ययक्रियापद जोडून करतात.

अुदा. :– होगु - होगि ( भू. कृ. अव्यय ) + अिल्ल = होगिल्ल किंवा होगि + अिरुवदिल्ल = होगिरुवदिल्ल; माडु - माडिल्ल, माडिरुवदिल्ल.

He did not do व He has not done या दोन्हींचेंहि भाषांतर मराठींत करतांना 'त्यानें केलें नाहीं' असेंच बहुधा करतात; परंतु पूर्णवर्तमान-

कालिक नकाररूपें नीट ध्यानीं येण्यासाठीं 'त्यानें केलेलें नाहीं' अशींच वाक्यें मराठींत केलीं आहेत.

### वाक्य संग्रह

१ त्यांनीं तें काम केलेलें नाहीं. ಅವರು ಆ ಕೆಲಸವನ್ನು ಮಾಡಿಲ್ಲ-ಮಾಡಿರುವದಿಲ್ಲ. अवरु आ कॆलसवन्नु माडिल्ल-माडिरुवदिल्ल. (अवरु आ वॆलस माडिल्ल< )

२ गाडी आलेली नाहीं. ಗಾಡಿ ಬಂದಿಲ್ಲ-ಬಂದಿರುವದಿಲ್ಲ. गाडी बंदिल्ल-बंदिरुवदिल्ल. ( गाडी बंदिल्ल< )

३ मी पत्र लिहिलेलें नाहीं. ನಾನು ಪತ್ರವನ್ನು ಬರೆದಿಲ್ಲ-ಬರೆದಿರುವದಿಲ್ಲ. नानु पत्रवन्नु बरेदिल्ल-बरॆदिरुवदिल्ल. (ना पत्र <बरदिल्ल<)

४ मी तें पाहिलेलें नाहीं. ನಾನು ಅದನ್ನು ನೋಡಿಲ್ಲ-ನೋಡಿರುವದಿಲ್ಲ. नानु अदन्नु नोडिल्ल-नोडिरुवदिल्ल. (ना अदन्न नोडिल्ल<)

५ त्यानें तें पुस्तक वाचलेलें नाहीं. ಅವನು ಆ ಪುಸ್ತಕವನ್ನು ಓದಿಲ್ಲ-ಓದಿರುವದಿಲ್ಲ. अवनु आ पुस्तकवन्नु ओदिल्ल-ओदिरुवदिल्ल. ( अव< आ पुस्तक< ओदिल्ल< )

**कानडी-मराठी**

१ ರಾಯರು ಇನ್ನೂ ಊರಿಂದ ಬಂದಿಲ್ಲ. रायरु अिन्नू अूरिंद बंदिल्ल. रावसाहेब अजून गांवाहून आलेले नाहींत.

२ ಅವನು ನನಗೆ ರೊಕ್ಕ ಕೊಟ್ಟಿಲ್ಲ. अवनु नन्गॆ रॊक्क कॊट्टिल्ल. त्यानें मला पैसे दिलेले नाहींत.

३ ನಾನು ಹೀಗೆ ಅಂದಿಲ್ಲ. नानु हीगॆ अंदिल्ल. मी असें म्हटलेलें नाहीं.

४ ನಮ್ಮ ಕೆಲಸ ಆಗಿಲ್ಲ. नम्म वॆलस आगिल्ल. आमचें काम झालेलें नाहीं.

५ ನಾನು ಅವನನ್ನು ನೋಡಿಲ್ಲ. नानु अवनन्नु नोडिल्ल. मीं त्यास पाहिलेलें नाहीं.

६ ನೀವು ತಮ್ಮ ಕರ್ತವ್ಯವನ್ನು ಮಾಡಿಲ್ಲ. नीवु तम्म कर्तव्यवन्नु माडिल्ल. तुम्ही आपलें कर्तव्य केलेलें नाहीं.

# प्रकरण १६ वें

## विभक्तिविषयक माहिती

**प्रथमा विभक्ति :** कानडी वाक्यांत 'कर्तृपद' केव्हांहि प्रथमा विभक्तींत असतें. ज्यांत कर्ता तृतीयान्त असतो, असा मराठींतील 'रामानें काम केलें', हा 'कर्मणी प्रयोग' कानडींत नाहीं. मराठी बोलतांना नवशिक्या कन्नड भाषकांच्या ज्या ठराविक चुका होतात, त्यांत मराठींतील 'कर्मणी' प्रयोगाच्या संबंधानें अधिक होतात. विभक्तीची नेमकी अुलटापालट होअून 'त्यानें गेला' व 'तो काम केला' असें होण्याचा नेहमीं संभव असतो. कानडींतहि 'कर्माप्रमाणें क्रियापद बदलणारा' असा अेक 'कर्मणी' प्रयोग आहे पण तो म्हणजे 'रामाकडून पुस्तक वाचलें गेलें' अशा तऱ्हेचा मराठींतील 'कर्मकर्तरी' (Passive) प्रयोग होय. त्यांत मात्र 'रामाकडून' हें 'रामनिंद' असें अर्थातच तृतीया विभक्तींत असतें. खालील वाक्यें पहा.

१ त्यानें काम केलें – **अवनु** कॆलस माडिदनु.

२ तो गेला – **अवनु** होदनु.

ह्या दोन्हीं वाक्यांत कानडींत कर्ता 'अवनु' हा प्रथमा विभक्तींत आहे. Passive voice या अर्थीं कानडींत असलेल्या 'कर्मणी प्रयोगा'चें पुढें निराळ्या प्रकरणीं विवेचन केलें आहे.

विभक्तिप्रत्यय व रूढी : आपण मागें पाहिलेंच आहे कीं 'अु' हा प्रथमा विभक्तीचा प्रत्यय आहे व 'न' आगम येअून 'हुडुगनु' असें अेकवचनी रूप होतें. परंतु मुखभाषेंत व कधींकधीं लेखभाषेंतहि पुल्लिंगी व स्त्रीलिंगी नामाचें प्रथमेचें अेकवचनीं रूप करतांना 'प्रत्यय' वगळतात व 'प्रत्यय' लागतांना 'आगम' यायचा असल्यानें प्रत्ययाच्या आगमाचा प्रश्न येत नाहीं व आपोआपच आगमाचा 'लोप' होतो असें म्हणतां येअील.

अुदा. मुलगा येतो = 'मगनु बरुत्तानॆ' हें 'मग बरुत्तानॆ' असेंहि करतात. 'अक्कनु बरुत्ताळॆ' हें 'अक्क बरताळॆ' असेंहि म्हणतात.

नपुंसकलिंगी नामांचें अुभयवचनीं प्रत्यय मुखभाषेंत व कधींकधीं लेख-भाषेंतहि लुप्त होतात.

१ हें पुस्तक चांगलें आहे. अी पुस्तक( वु ) चलो अिदु. अी पुस्तक< चलो अिदु (अदऽ)

२ हीं पुस्तकें चांगलीं आहेत. अी पुस्तक( गळु ) चलो अिवु. अी **पुस्तक**< चलो अिवु (अवऽ)

मुखभाषेंत 'पुस्तक' हें अेकवचनी कीं बहुवचनी, हें 'अिदु' व 'अिवु' या क्रियापदांमधील फरकावरून ओळखावें लागतें.

कानडींत प्रथमेचा अुपयोग आणखी अेका निराळ्याच प्रकारानें केलेला आढळतो. खालील मराठी वाक्यें पहा :–

१ माझे हात चिखलानें माखले आहेत. २ माझे हात शाअीनें बरबटले आहेत. ३ माझे हातास डांबर लागलें आहे.

आपण मराठींत हीं वाक्यें; १ माझे हात 'चिखल' झाले आहेत. २ माझे हात 'शाअी' झाले आहेत. ३ माझे हात डांबर झाले आहेत. अशीं करीत नाहीं.

पण कानडींत नामें विशेषणाप्रमाणें वापरून अशीं वाक्यें करतात.

अुदा. १ नन्न कै राडि आगिवे (राडि = चिखल). २ नन्न कै मशि आगिवु (मशि = शाअी) ३ नन्न कै डांबर आगिवु.

'स्पष्टीकरणार्थ' व 'बहुमानार्थ' वापरलेलीं दर्शकसर्वनामें :–

खालील मराठी वाक्यें पहा.

" पंतप्रधान पंडित नेहरू हे दिल्लीस जातात ".

ह्यांत 'हे' हें सर्वनाम स्पष्टीकरणार्थ वापरलें आहे. कानडींतहि अशा ठिकाणीं 'पंडित नेहरू अिवरु' असें म्हणतात. परंतु सन्मानार्थ बहुवचनी अुल्लेख करतांना मराठींत 'पंडित नेहरू जातात' ह्यांतील जातात ह्या बहुवचनी आख्यातरूपावरूनच सन्मानार्थ बहुवचन दर्शविलें जातें. पण कानडींत आख्यात प्रत्यय बहुवचनी वापरून शिवाय 'अवरु' (ते) हें सर्वनाम नामापुढें वापरतात.

अुदा. पंडित नेहरु अवरु दिल्लिगे होगुत्तारे = (शब्दशः) 'पंडित नेहरु ते' दिल्लीस जातात.

नामापुढें सन्मानार्थी सर्वनाम वापरून केलेले खालील प्रकार आढळतात:

१ देशमुखरु – देशमुख + रु (आगमसह प्रथमेचा विभक्तिप्रत्यय)
२ देशमुखरु – देशमुखरु + अवरु (संधि) ३ देशमुख अवरु (संधि न करतां)

तसेंच 'आमचे अण्णा आले आहेत' हें 'नम्म अण्णा अवरु बंदार' असें करतात. याचा शब्दशः अर्थ आमचे 'अण्णा ते' आले आहेत. दक्षिण कर्नाटकांत नुसता नांवाचा अुलेख करतांना "लेखकः श्री जोशी अवरु. (जोशी ते) असा करतात. कानडी वळणावरील मराठींत (कर्नाटकांत) "डॉ. जोशी ते आले आहेत" असें म्हटलेलें कधीं कधीं अैकू येतें किंवा कर्मणीप्रयोग वगैरे न कळल्यानें 'डॉ. जोशी त्यानी आले आहेत' असें म्हटलेलें आढळतें.

मराठींत "पुढील वर्षीं"; "गुरुवारीं" ह्यांत **वर्षीं**, **गुरुवारीं** हे शब्द सप्तमीविभक्तींत आहेत पण कानडींत 'अवरु मुंदिन वर्ष बरतार' (मुंदिन=पुढील) =ते पुढील वर्षीं येतात (येतील). आणि अवरु गुरुवार बरतार, यांतील प्रमाणें 'वर्ष' व 'गुरुवार' हे शब्द प्रथमा विभक्तींतच वापरतात. 'अशा प्रमाणें' 'या प्रकारें', 'अशा रीतीनें' यांमधील 'प्रमाणें, प्रकारें, रीतीनें, या तृतीयान्त शब्दा-अैवजीं 'अी रीति, अी प्रकार', यांतल्याप्रमाणें 'रीती, प्रकार' हे शब्द प्रथमान्त योजतात व कधीं कधीं 'रीतियल्लि' ही सप्तमीहि वापरतात.

मराठींत कानांनीं अैकूं येत नाहीं, डोळ्यांनीं दिसत नाहीं, असें आपण म्हणतों. पण कानडींत 'कान अैकत नाहींत' 'डोळे दिसत नाहींत' अशा अर्थाचीं 'किवि केळिसु दिल्ल' 'कण्णु काणिसु दिल्ल' अशीं वाक्यें कान व डोळे प्रथमाविभक्तींतच ठेवून करतात.

स्पष्टीकरणार्थ प्रथमेंत वापरलेल्या शब्दास 'आद' (झालेला) हें 'आगु' (होणें) चें कृदन्तविशेषण जोडूनहि वाक्य करण्याची अेक तऱ्हा विशेष रूढ आहे.

अुदा० हिंदुस्थानचे **मुख्यमंत्रि श्री नेहरु** = हिंदुस्थानद **मुख्यमंत्रिगळाद** श्री नेहरु = हिंदुस्थानचे **मुख्यमंत्रि 'झालेले'** नेहरु — असें म्हणतात. (मंत्रिगळु + आद) (२) माझा भाअू राम तेथें गेला = नन्न तम्मनाद-रामनु अल्लि होदनु. (तम्मनु+आद) (३) राणासंगाची बायको महाराणी कर्णावती तेथें आली=राणासंगन हेंडतियाद' महाराणी कर्णावति अल्लि बंदळु. ('हेंडतियाद= बायको 'झालेली').

**द्वितीया विभक्ति :** कानडी वाक्यांतील 'कर्मपद' केव्हांही द्वितीयाविभक्तींत असतें. अवनु गिडवन्नु कडियुत्तानॆ ह्यांत 'गिडवन्नु' (झाडास) हा शब्द द्वितीयेंत आहे.

मराठींत, रामा गाअीस बांधितो (द्वितीया) रामा गाय बांधितो (प्रथमा) रामानें गाअीस बांधिलें (द्वितीया) या प्रमाणें प्रयोगानुसार 'कर्म' प्रथमान्त किंवा द्वितीयान्त असतें. परंतु कानडींत 'कर्म' पद केव्हांहि व्दितीयेंतच असतें. तथापि, कानडी मुखभाषेंत नपुंसकलिंगी नामांचा **व्दितीया विभक्तीचा प्रत्यय वगळण्याची सर्रास रूढी आहे.** तो पुस्तक वाचतो—अवनु पुस्तक (वन्नु) ओदुत्तानॆ. पुंल्लिगी किंवा स्त्रीलिंगी शब्दाचे व्दितीयाविभक्ति प्रत्यय न वगळतां, हुडुगनन्नु (हुडुगन्न), हुडुगरन्नु (हुडुगर्न), अक्कनन्नु (अक्कन्न), असें मुखभाषेंत जरा निराळें रूप करतात.

**तृतीया विभक्तिः (करण)** मराठी प्रमाणेंच कानडींतहि तृतीयाविभक्ति क्रिया करण्यास लागणारें करण (साधन) दर्शविण्यासाटीं वापरतात.

तो कुऱ्हाडीनें झाड तोडतो – अवनु कॊडलियिंद गिडवन्नु कडियुत्तानॆ.

अुत्तरकर्नाटकांत मुखभाषेंत कोडलियिंद या अैवजीं "कॊडलीले" असेंहि म्हणतात.

मराठींत "तो रामाशीं बोलतो" ह्यांत 'रामाशी' हा शब्द तृतीयेंत आहे. कानडींत तृतीयाविभक्ति न वापरतां "रामाच्या बरोबर" अशा अर्थाचे "रामन कूड" "रामन संगड" असे शब्द वापरतात. संगड, कूड = बरोबर.

**चतुर्थि विभक्तिः** बहुतेक अुपयोग मराठीप्रमाणेंच आहेत. १ संप्रदानः देणें, सांगणें, अशीं क्रियापदें वापरतांना ज्याला अेखादी गोष्ट (वस्तु) दिली जाते तो 'प्राणि' व 'दिली' किंवा 'सांगितली' जाणारी वस्तु अशीं दोन 'कर्मे' असतात; 'वस्तु' हें प्रत्यक्ष कर्म व व्यक्ति हें 'अप्रत्यक्ष कर्म' होय. मराठींत 'अप्रत्यक्ष कर्म' म्हणजे 'व्यक्ति' चतुर्थ्यंत, व प्रत्यक्ष कर्म म्हणजे 'वस्तु' प्रथमान्त किंवा द्वितीयान्त असतें; कानडींतहि 'अप्रत्यक्ष कर्म' चतुर्थ्यंत असलें तरी नपुंसकलिंगी 'प्रत्यक्ष कर्म' मात्र लेखभाषेंत द्वितीयान्त, व पुष्कळदां प्रत्यय रहित वापरतात हें मागें पाहिलेंच आहे.

तो रामास पुस्तक देतो. अवनु रामनिगॆ पुस्तकवन्नु कोडुत्तानॆ. पुस्तकवन्नु (चतुर्थ्यंत). (अव< रामगऽ पुस्तक< कोडतानऽ)

२ अधिकरण म्हणजे स्थल व काल दर्शविण्यास मराठीप्रमाणें कानडींतहि चतुर्थी व सप्तमी ह्या दोन्ही विभक्ति वापरतात.

'**स्थल**' निदर्शक अुपयोग पाहूं:– 'जाणें' ह्या क्रियापदाच्या अुपयोगांत 'जाण्याचें ठिकाण' चतुर्थ्यंत योजतात.

तो मुंबअीस जातो. अवनु मुंबअीगॆ होगुत्तानॆ.

मराठींत खालील सारख्या वाक्यांत जाण्याचें ठिकाणहि चतुर्थीअैवजीं सप्तमींत वापरलेलें आढळतें.

तो 'शाळेंत' -शाळेस- जातो. तो पोस्टांत जातो_ तो घरीं जातो.

कानडींत 'जाण्याचें ठिकाण' नेहमीं चतुर्थींत व आंत जाणें हा अर्थभेद दर्शविण्थासाठीं मात्र सप्तमींत असतें. अवनु सालॆगॆ होगुत्तानॆ =तो 'शाळेस' जातो. अवनु मनेगॆ होगुत्तानॆ. तो 'घरास' जातो. अवनु अूरॊळगॆ होगुत्तानॆ. तो गांवांत जातो. अवनु अूरिगॆ होगुत्तानॆ. तो गांवाला जातो.

'असण्याचें किंवा 'राहाण्याचें' ठिकाण ह्या अर्थींहि मराठींत सप्तमी व चतुर्थी वापरतातः

| | | |
|---|---|---|
| १ | तें **शुक्रवार पेठेंत** राहातात | सप्तमी |
| २ | तें **घरींच** असतात | |
| १ | तें मुंबअीस असतात | चतुर्थी |
| २ | तें बेळगांवला राहतात | |

यावरून मराठींत राहण्याचें किंवा असण्याचें 'विशिष्ट ठिकाण पेट, घर- सप्तमींत तर 'गांव' म्हणजे व्यापक ठिकाण चतुर्थींत वापरतात असें दिसतें.

कानडींत 'असण्या' राहण्याचें ठिकाण, ह्याअर्थीं सप्तमी वापरतात. परंतु अलीकडे, नावु दादरक्कॆ अिरुत्तेवॆ (नावु दादरक्क अिरतेवि) आम्ही दादरला राहतों. अवरु हुब्बळ्ळिगॆ अिरुत्तारॆ (अवरु हुब्बळ्ळिगे अिरतारऽ) तें हुबळ्ळिला राहतात, असे प्रयोग कानडींत केलेले आढळतात.

राहण्या असण्याच्या ठिकाणास चतुर्थी वापरणें, हा मराठीचा परिणाम आहे, असें कांहीं जणांचें मत आहे.

कालनिदर्शक चतुर्थी विभक्ति मराठी प्रमाणें कानडींतही आहे.

मी अेकादशीस अुपास करतों. नानु अेकादशिगे अुपास (माडतेनि)

परंतु 'आम्ही' दोन वर्षांनीं अेकदां धारवाडास येतों'. ह्यांत मात्र मराठींत तृतीया आली आहे. कानडींत अशा ठिकाणीं चतुर्थीच वापरतात "नावु अेरडु **वर्षक्के** ओम्मे धारवाडक्के बरुत्तेवे'' अेरडु=दोन ओम्मे=अेकदां.

**पंचमी विभक्तिः** पंचमी विभक्तीचे सर्व अुपयोग मराठी प्रमाणेंच आहेत. तुलनादर्शक अुपयोग करतांना मात्र पंचमी वापरीत नाहींत. 'धारवाड-हून आमचें गांव चांगलें आहे' ह्यांत धारवाडहून हा शब्द पंचमी विभक्तींत आहे. हें वाक्य करतांना कानडींत नामाच्या चतुर्थी विभक्तीस अिन्त हें शब्द-योगी अव्यय जोडतात,

सक्करेगिंत सवियिल्ल – साखरेहून गोड नाहीं. (म्हण)

तायिगिंत हितवंतरिल्ल – आअीहून हितचिंतक नाहीं. (म्हण)

**षष्ठी विभक्तिः** मराठींतल्या प्रमाणें कानडींतहि ही विभक्ति महत्त्वाची मानतात. ती अेक स्वतंत्र विभक्ति आहे. कांहीं मराठी व्याकरणकार हिला अेक प्रकारचें विशेषण मानतात परंतु हें मत विवाद्य आहे. हिला 'विशेषण' मानणें बरोबर असो वा नसो, अेवढें मात्र खरें कीं तिचा अुपयोग विशेषणा-सारखाहि होतो.

'रामाचा मुलगा' ह्यांत 'रामाचा' हें विशेषण मानतां येणार नाहीं. पण 'सोन्याचें नाणें' यांत मात्र 'सोन्याचें' हा शब्द विशेषणासारखा आहे. कानडींतहि षष्टीविभक्तीचा अशा तऱ्हेचा 'विशेषणप्राय' अुपयोग करतात. 'बंगारद नाण्य' सोन्याचें नाणें '(बंगार = सोनें) विशेषणासारखा किंवा नेहमीचा म्हणजे 'संबंध' दर्शक अुपयोग करतांना विशेष्याप्रमाणें विशेषणाचें रूप बदलत नाहीं.

रामाचा मुलगा = रामन मग (मग <)

रामाची मुलगी = रामन मगळु

रामाचें घर = रामन मने सोन्याचें नाणें = बंगारद नाण्य

२ 'स्वभावानें' सरळ यांतल्या प्रमाणें कानडींतहि "स्वभावदिंद सरळ" असा तृतीयेचा अुपयोग होतो पण 'तो मनाचा प्रेमळ' 'हाडाचा गरीब' ह्या प्रमाणें मात्र षष्ठीचा अुपयोग कानडींत नाहीं.

३ '**संबंध**' दर्शक सर्व अुपयोग मराठी प्रमाणेंच आहेत. (१) अवन मग=त्याचा मुलगा (२) दगडाची मूर्ति=कल्लिन मूर्ति (३) घराचा मालक= मनेय मालक (४) विहिरीचें पाणी=भाविय नीरु (५) मनुष्याचें तोंड=मनुष्यन बायि (६) मनुष्याचें डोकें=मनुष्यन तले, पण 'डोक्याचा मनुष्य' (शहाणा मनुष्य) ह्या अर्थीं मात्र षष्ठीविभक्ति न योजतां 'तले अिद्द' 'डोकें असलेला' (किंवा 'अुळ्ळ' म्हणजे 'असलेला' या अर्थाचा शब्द लावून 'तलेवुळ्ळ') असें म्हणावें लागेल.

शेवटीं 'अे' किंवा 'अि' असलेल्या नामांच्या षष्ठीविभक्तीचीं रूपें मने (घर) – मनेय; भावि (विहीर) – भाविय; अशीं होत असलीं तरी मुख-भाषेंत नामाचा अंत्य स्वर लांबविल्यानें षष्ठीविभक्तीचा अर्थ येतो.

'मनेय बागिल' (घराचा दरवाजा) हें मनेबागिल असें किंवा अुत्तर कर्नाटकांत 'मनीबागिल' (घर-दरवाजा) असेंहि वापरतात.

भाविय नीरु (विहिरीचें पाणी) – भावी नीरु, शब्दशः विहीर-पाणी.
म्हशीचें दूध (अेम्मिय हालु) – अेम्मी हालु, ,, म्हैस-दूध.
मनेय मंदि (घरचे लोक) – मनी मंदि.
मंदिय मने (लोकांचें घर) – मंदी मनी.

**सप्तमी विभक्ति :** अुत्तरकर्नाटकांत 'अल्लि' ह्या विभक्तीप्रत्यया-प्रमाणेंच 'ओळगे' हें शब्दयोगी अव्यय जोडूनहि सप्तमीसारखें रूप करतात. मने + ओळगे = मनेयोळगे (संधिनियमानुसार) अुत्तरकर्नाटकांत मुखभाषेंत मनेयोळग चें मनेयाग-मन्याग असें रूपहि रूढ आहे.

विनंति, प्रार्थना वगैरे करतांना 'अवरल्लि बिन्नह' (बिन्नह=विनंति) 'त्यांच्यांत विनंति' असें म्हणतात.

परंतु 'विनविणें, प्रार्थिणें' अशीं क्रियापदें वापरलीं म्हणजे त्या क्रिया-पदांची 'कर्मभूत व्यक्ति' द्वितीयान्त येते. अुदाहरण, 'अवरन्नु प्रार्थिसुत्तेवे' = त्यांना प्रार्थितो किंवा चतुर्थ्यंत येते, अुदा. 'अवरिगे प्रार्थिसुत्तेवे':

त्यानें 'विहीरींत जीव दिला' या अर्थीं अवनु भावियल्लि बिद्द < च्या ऐवजीं भावीबिद्द < असें 'भावि'ची अन्त्य 'अि' दीर्घ करून म्हणतात.

**टीप :** विभक्तीचे जे अुपयोग मराठींतल्यापेक्षां निराळे आहेत तेवढेच येथें दिले आहेत. बाकीचे सर्व मराठीप्रमाणें आहेत असें समजावें.

---

## प्रकरण १७ वें

# कानडी क्रियापदांविषयीं स्फुट विचार

कानडी भाषा 'अेकेरी' धातूंच्या बाबतींत समृद्ध आहे. या अुलट, मराठी भाषा 'अेकेरी' नामांच्या बाबतींत समृद्ध आहे. याचें विवेचन पुढें केलें आहे. मराठींत 'अेकेरी' धातूंच्या बाबतींत असलेली अुणीव दूर करण्यासाठीं कांहीं वर्षांपासून सावरकर वगैरे मंडळींनीं 'क्रियापदी चळवळ' वेळोवेळीं केलेली आहे. मराठींतील मुख्य अडचण अशी कीं कितीतरी महत्त्वाच्या 'क्रिया' दर्शवायला सुटसुटीत 'अेकरी' धातू नाहींत; सहायक-धातू घेअून त्या दर्शवाव्या लागतात. 'पूर्ण क्रिया' दर्शविणाऱ्या धातु-साधित नामाला पुन्हां 'करणें' हें सहाय-क्रियापद म्हणून घ्यावें लागतें. अुदा. नमस्कृ – नमस्कार – 'नमस्कार करणें'. त्याचप्रमाणें 'विचार करणें', 'सहकार्य करणें', 'वर्गीकरण करणें.' अिंग्रजींतहि स्वतंत्र अेकेरी धातूंची सोय आहे. To think, To salute, To cooperate, To classify. अलीकडे दहापंधरा वर्षांत 'सहाय क्रियापद' न वापरतां 'अभि-नंदणें, संपादिणें, प्रकाशिणें, आभारणें' वगैरे क्रियापदें कांहीं लेखक वापरूं लागले आहेत. परंतु मुखभाषेंत तीं गैरसोयीचीं वाटल्यामुळें अजून सर्रास रूढ होअूं लागलीं नाहींत.

प्राचीन मराठी वाङ्मयांत अेकेरी क्रियापदें वापरलेलीं पुष्कळच आढळतात :–

.... जें तुवां येथ **आदरिलें** । माझारीचि ॥ ज्ञानेश्वरी –

.... न **प्रगटावी** खेळतां । आदिकरुनी ॥ ,,

.... तुवां कां **शोचावें** । सांगे मज ॥ ज्ञानेश्वरी–
.... ऐसें बोलोनि वीरें । चरण **नमस्कारिलें** शिरें ॥ ,,

ज्ञानेश्वरींत जितकीं अेकेरी क्रियापदें आढळतात तितकीं दुसऱ्या कोणत्याहि मराठी ग्रंथांत आढळत नाहींत. आधुनिक वाङ्मयांत हरिभाअू आपट्यांनीं अेकेरी क्रियापदें वापरण्याची प्रथा पाडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कादंबऱ्यांतून 'तो समाधानला, तो येरझारला, तो आनंदला' अशीं अेकेरी क्रियापदें आढळतात.

अलीकडे सावरकर वगैरे लेखकांनीं अशीं क्रियापदें सुरू केलीं. पण 'अभिनंदिलें', त्यानें मला 'आभारिले', 'नमस्कारिलें', असें अेक वेळ लिहिलें तरी मुखभाषेंत तीं रूपें कृत्रिम वाटतात व 'त्यानें अभिनंदन केलें', 'आभार मानले', 'नमस्कार केला' असेंच आपण म्हणतों आणि यामुळें क्रियापदांचीं ( धातूंचीं म्हणणें यथार्थ होअील ) अुणीव अद्याप यशस्वीपणें दूर होअूं लागलेली नाहीं.

कानडी भाषेंतील धातूंची समृद्धि ही अेक ठळक सोय आहे. ही सोय खालीलप्रमाणें आहे.

१ ज्या धातूंना मराठींत अेकेरी धातू नाहींत असे बरेच कानडी धातू आहेत :– होलु = सारखे असणें ( To resemble )

मराठींत 'मुख चंद्रासारखें आहे' असें म्हणावें लागतें. पण कानडींत 'मुखवु चंद्रनन्नु होलुत्तदे' The face resembles the moon असें अिंग्रजीप्रमाणें म्हणतां येतें.

मेच्चु = प्रसन्न होणें. तो प्रसन्न झाला, 'अवनु मेच्चिदनु'. प्राचीन मराठी कवितेंत 'प्रसन्नला' असें रूप आढळतें. तिद्दु = दुरुस्त 'करणें', (वाटल्यास 'दुरुस्तिणें' असें म्हणावें). तोरे = त्याग करणें 'त्यागिणें' कोळ्ळु = विकत घेणें. 'खरीदणें' असें मराठींत अलीकडे म्हणतात. नंबु = विश्वास ठेवणें. मेट्टु = पायांत घालणें (पादत्राण) ओदे=लाथ मारणें. नेग्गु = पोंचा येणें. ओप्पु = कबूल करणें. गुद्दु=गुद्दा मारणें.

२ 'अिसु' हा प्रत्यय लावून नवीन धातु बनवितां येतात.

(अ) मूळ धातूंना ' इसु ' लावल्यानें प्रयोजक धातू करतां येतात. होलु To resemble, होलिसु To compare . माडु = करणें, माडिसु= करविणें.

(ब) धातू नव्हे अशा कोणत्याहि शब्दाला ' इसु ' जोडून धातू करतात; ' धडपडिसु ' ' धडपडणें; बडबडिसु ' बडबडणें; ' तयारिसु ' तयार करणें.

' इसु ' हा प्रत्यय प्रारंभाक्षर स्वर असलेला असल्यानें कानडींतील स्वर-लोप संधीमुळें ' इसु ' जोडून होणारा साधित धातूहि मूळ शब्दासारखाच सुटसुटीत होतो. उदा. अभिनंदिसु, सहकरिसु, कन्नडिसु ( कानडींत भाषांतर करणें), भाषांतरिसु (भाषांतर करणें).

' इसु ' प्रमाणेंच ' पडु ' हा प्रत्यय जोडून धातू करतात. ह्याचा ' करणें ' असा अर्थ होतो. ' कष्टपडु ' – कष्ट करणें. सुख, दुःख, अशा शब्दांना ' पडु ' लाविल्यानें ' भोगणें ' असा अर्थ येतो. ' सुखपडु, दुःख पडु ', सुख भोगणें, दुःख भोगणें.

३ ' आडु ' हा प्रत्यय अेखाद्या धातूच्या भूतकृदंताव्ययापुढें ( अून कृदंताप्रमाणें असलेल्या) लाविल्यानें मूळ धातूनें व्यक्त होणारी क्रिया ' अिकडे तिकडे फिरून करणें ' असा अर्थ सुचवितात. ओडु-पळणें – ओडाडु, पळा-पळ करणें; केळु-विचारणें – केळाडु (केळि + आडु) चार ठिकाणीं विचारणें.

होडे = मारणें, होडेदु (मारून) होडेदाडु = मारामारी करणें.

भूतकृदंताव्ययास 'इडु' प्रत्यय लावल्यानें '— अून ठेवणें' असा अर्थ होतो. ' माडिडु ' ' करून ठेवणें ', ' बरेदिडु ' ; ' लिहून ठेवणें '.

' इरु ' लावल्यानें अेखादी गोष्ट ' करून असणें ', ' केलेली असणें ' असा अर्थ येतो. ' माडिरु ' ' केलेलें असणें '.

४ कोळ्ळु :– ' कोळ्ळु ' ह्या धातूचा अर्थ ' घेणें ' असा आहे. ह्याचें सहाय्य घेअून संयुक्तक्रियापद केल्यानें मूळ धातूनें व्यक्त झालेल्या क्रियेचे — (१) स्वतः संबंधानें करणें, (२) स्वतः साठीं करणें, (३) धारण करणें, असे विशेष अर्थ होतात. कोळ्ळु हा धातू मुख्य धातूच्या भूतकृदन्तास जोडतात.

मराठींतहि 'करून घेणें', 'आटोपून घेणें', 'दार लावून घेणें', 'डोकें फोडून घेणें' असे उपयोग 'घेणें' धातूचें सहाय्य घेऊन करतात; पण कानडींत 'कोळ्ळु' हा सहाय्यक धातू म्हणून वापरण्याचें प्रमाण विशेषच आहे. त्यापैकीं कांहींचा शब्दशः अर्थ मराठी भाषकांना विचित्र वाटेल.

उदा. अडिकी हाककोळ्ळरि 'सुपारी घालून घ्या' = सुपारी खा.

अवरु कै तोळकोळ्ळुत्तारे 'ते हात धुऊन घेतात' = ते हात धुतात.

अवरु मलकोळ्ळुत्तारे 'ते झोपून घेतात' = ते झोपतात.

कैयल्लि पुस्तक हिडिदु कोंडु 'हातांत पुस्तक धरून घेऊन' = हातांत पुस्तक धरून.

५ 'बिडु'; मुख्य धातूच्या भूतकृदन्ताव्ययास बिडु - सोडणें, टाकणें हा धातु जोडल्यानें अेखादी गोष्ट 'पुरती करणें' असा अर्थ सुचविणारा संयुक्त धातू बनतो. उदा. कोट्टु बिडु = देऊन टाकणें; केळि बिडु = विचारून टाकणें; तिंदु बिडु = खाऊन टाकणें:

मराठींत हा अर्थ 'सोड' किंवा 'टाक' या सहाय्यक धातूनें व्यक्त होतो. करून सोड - करून टाक.

## शब्दसंग्रह.

कूड (शब्दयोगी अव्यय) = सवें - शीं - बरोबर, षष्ठिविभक्तीस जोडतात. अवरकूड = त्यांच्याशीं, त्यांच्याबरोबर. ಆಶ್ಚರ್ಯಪಡು आश्चर्य पडु = आश्चर्य पावणें, आश्चर्य वाटणें. ಉಳಿಯು उळियु = उरणें, वांचणें, राहणें. ಉಳಿಸು उळिसु = (प्रयोजक) उरविणें, वांचविणें. ಉಳಿಸಿಕೊಳ್ಳು उळिसिकोळ्ळु = वांचवून घेणें. ಸಂಚರಿಸು संचरिसु = संचार करणें. ಹೇಳಿಕೊಳ್ಳು हेळिकोळ्ळु = विनंती करणें, 'सांगून घेणें'. ಮಾಡಿಕೊಳ್ಳು माडिकोळ्ळु = करून घेणें. ತೊಳಕೊಳ್ಳು तोळकोळ्ळु = धुवून घेणें (तोळे = धुणें). ವಾದಿಸು वादिसु = वाद घालणें. ಕರುಣಿಸು करुणिसु = करुणा करणें, कृपेनें देणें. ಬಗೆಹರಿಸು बगेहरिसु = तोड निघणें, अेखादी गोष्ट करतां येणें, जमणें.

**वाक्यसंग्रह**

१ ಅವನು ಶಕ್ತಿಯನ್ನು ಉಪಯೋಗಿಸಿದನು. अवनु शक्तियन्नु अुपयोगिसिदनु. त्यानें शक्ति ' अुपयोगिली '.

२ ನನ್ನ ಕೂಡ ಅವನು ವಾದಿಸಿದನು. नन्नकूड अवनु वादिसिदनु. माझ्याबरोबर त्यानें वाद घातला.

३ ಜನರ ಅಜ್ಞಾನವನ್ನು ನೋಡಿ ಅವನು ಆಶ್ಚರ್ಯಪಟ್ಟನು. जनर अज्ञानवन्नु नोडि अवनु आश्चर्यपट्टनु. लोकांचें अज्ञान पाहून तो ' आश्चर्य पावला '.

४ ರೊಕ್ಕ ಕೊಟ್ಟು ಅವನು ಜೀವವನ್ನು ಉಳಿಸಿಕೊಂಡನು. रोक्क कोट्टु अवनु जीववन्नु अुळिसिकोंडनु. पैसा देअून त्यानें जीव 'वांचवून घेतला' ( वांचविला ).

५ ಅವರು ಎಲ್ಲ ದೇಶಗಳನ್ನು ಸಂಚರಿಸಿ ಬಂದರು. अवरु अेल्ल देशगळन्नु संचरिसि बंदरु. ते सर्व देश 'संचरून' (हिंडून) आले.

६ ಅವನು ಹುಡುಗರನ್ನು ಪ್ರೀತಿಸುತ್ತಾನೆ. अवनु हुडुगरन्नु प्रीतिसुत्तानें. तो मुलांना ' प्रीतितो ' (मुलांवर प्रीती करतो).

७ ನಾವು ಸರಕಾರಕ್ಕೆ ವಿನಂತಿಯನ್ನು ಮಾಡಿಕೊಳ್ಳುತ್ತೇವೆ. नावु सरकारक्के विनंतियन्नु माडिकोळ्ळुत्तेवे. आम्ही सरकारला विनंति ' करून घेतों ' (करतों).

८ ಅವರು ನಮ್ಮನ್ನು ನಂಬಿದರು. अवरु नम्मन्नु नंबिदरु. त्यांनीं आम्हांस ' विश्वासिलें ' (आमच्यावर विश्वास ठेवला).

९ ಅವರು ವಿಚಾರಗಳನ್ನು ವ್ಯಕ್ತಪಡಿಸಿದ್ದಾರೆ. अवरु विचारगळन्नु व्यक्तपडिसिद्दारे. त्यांनीं विचार व्यक्त केले आहेत.

१० ಅವನು ಕ್ಷಮಿಸಲಿಕ್ಕೆ ಹೇಳಿಕೊಂಡನು. अवनु क्षमिसलिक्के हेळिकोंडनु. त्यानें क्षमा करण्यास 'क्षमविण्यास' सांगून घेतलें ( विनंती केली ).

११ ನೀವು ನುಕಸಾನ ಮಾಡಿಕೊಂಡಿರಿ. नीवु नुकसान माडिकोंडिरि. तुम्ही नुकसान करून घेतलेत.

१२ ದೇವರು ಅವಳಿಗೆ ರೂಪವನ್ನು ಕರುಣಿಸಿದ್ದಾನೆ. देवरु अवळिगॆ रूपवन्नु करुणिसिद्दानॆ. देवानें तिला रूप ‘ कृपेनें दिलें ’ आहे.

१३ ನನಗೆ ಈ ಕೆಲಸ ಬಗೆಹರಿಯುವದಿಲ್ಲ. ननगॆ अी कॆलस बगॆहरियुवदिल्ल. मला हें काम ( करणें ) जमत नाहीं.

## प्रकरण १८ वें

# संख्यावाचक विशेषणें व नामें

ज्या बाबतींत कानडी भाषा सयुक्तिक ( Reasonable ) व स्वाभाविक असून अन्यभाषिकांस शिकण्यास सोपी आहे, त्यांत ‘ संख्यावाचक विशेषणें ’ ही अेक बाब आहे. ह्या बाबतींत असलेली सोय, मराठींतच नव्हे तर हिंदी, संस्कृत किंवा संस्कृतोद्भव कोणत्याहि भारतीय भाषेंत नाहीं. ( ११ पासून १९ पर्यंतचे अंक वगळल्यास अिंग्रजी संख्याविशेषणेंहि ‘ स्वाभाविक ’ आहेत, असें म्हणतां येअील. )

कानडींत १ ते १० पर्यंतचीं संख्याविशेषणें आणि २०, ३०, ४०, वगैरे दशक संख्यावाचक - विशेषणें आलीं कीं बाकी सर्व लोकर येतात; पण मराठींत तसें होत नाहीं. अन्यभाषिकांना मराठी संख्यावाचक विशेषणें शिकतांना अडचण पडते, यांत आश्चर्य नाहीं; पण खुद्द महाराष्ट्रांतदेखील मुलामुलींना ते शिकविण्यास अडचण पडते, असा मराठी प्राथमिक शिक्षकांचा अनुभव आहे. कांहीं वर्षांमागें महाराष्ट्रांतहि कांहीं विचारवंतांनीं यासंबंधानें चर्चा केली आहे.

मराठी अंकांच्या बाबतींतल्या अडचणी कोणत्या आहेत त्या पाहूं म्हणजे कानडींतली सोय आपल्या लोकर ध्यानांत येअील. मराठींत अेक, दोन, तीन, वगैरे दहापर्यंतचीं संख्याविशेषणें शिकण्यास अडचण पडत नाहीं. पण पुढें अडचण भासूं लागते. दहा + अेक = अकरा; ही ‘ दहांत अेक मिळविल्यानें होणारी संख्या ’, अशी वस्तुस्थिति असतांना ‘ अकरा, बारा ’ असें कां म्हणावें ?

वीस + अेक = २१ असें असतांना आधीं ‘ अेक ’ मग ‘ वीस ’ असा अुच्चार करून ‘ अेकवीस ’ म्हणावें लागतें. कानडींतले अेकवीस वाचक ‘ अिप्पत्तु + ओंदु ’ हें वीस + अेक ह्या क्रमानुसार आहे व संधिनियमानुसार ‘ अिप्पत्तोंदु ’ असें त्याचें रूप होतें. वीस + अेक ( twenty one ), वीस + दोन (twenty two ), अशी वस्तुस्थिति असतांना अेकवीस, बावीस, तेवीस, हीं विशेषणें अन्य भाषिकांना तर फारच अडचणीचीं वाटतात. मराठी प्राथमिक मुलांमुलींनादेखील मुद्दाम ‘ विसावर अेक ’ अेकवीस, ‘ पांचावर अेक ’ अेकावन, ह्याप्रमाणें ‘ कशावर काय म्हणजे काय ’ हें पाठ करावें लागतें. कानडी प्राथमिक मुलांमुलींना संख्याविशेषणाची ‘ रचना ’ पाठ करून लक्षांत ठेवावी लागत नाहीं. अुदा. पन्नास वाचक शब्द ‘ अैवत्तु ’ व अेक वाचक शब्द ‘ ओंदु ’ माहीत झाला कीं ‘ अैवत्तोंदु ’ हें निराळें पाठ करून लक्षांत ठेवावें लागत नाहीं. अिंग्रजींतहि ही बाब कानडीप्रमाणेंच सोअिस्कर आहे.

50 + 1 = Fifty one, 20 + 1 = Twenty one अर्थात् ११ ते १९ पर्यंत अिंग्रजींतहि ही अडचण आहेच. Thirteen, Fourteen वगैरे.

आतां कानडी संख्यावाचक विशेषणें किती सोपी आहेत तें पाहूं :–

प्रथम दहापर्यंत व २०, ३०, ४० वगैरे दशकवाचक संख्याविशेषणें आलीं कीं बाकीचीं सर्व येतात.

| | | |
|---|---|---|
| ೧ अेक = ओंदु (वंदु) | ೨ दोन = अेरडु (यरडु) | ೩ तीन = मूरु |
| ೪ चार = नाल्कु | ೫ पांच = अैदु | ೬ सहा = आरु |
| ೭ सात = अेळु (येळु) | ೮ आठ = अेंटु (यंटु) | ೯ नअ = ओंबत्तु |
| | ೧೦ दहा = हत्तु | |

**दशकवाचक संख्या :-** दहा = हत्तु वीस = अिप्पत्तु

| | | |
|---|---|---|
| तीस = मूवत्तु | चाळीस = नाल्वत्तु | पन्नास = अैवत्तु |
| साठ = अरवत्तु | सत्तर = अेप्पत्तु | अैंशी = अेंभत्तु |
| नव्वद = तोंबत्तु | शंभर = नूरु | |

ह्यापुढील संख्याविशेषणें स्वाभाविक क्रमानुसार बनतात.

११ हत्तु + ओंदु = हन्नोंदु (संधि) १२ हत्तु + अेरडु = हन्नेरडु (संधि). दोन्हीं ठिकाणीं ‘ न ’ आगम.

१३ हत्तु + मूरु = हदिमूरु   १४ हत्तु + नाल्कु = हदिनाल्कु
१५ हत्तु + अैदु = हदिनैदु. हत्तुचें 'हदि' असें रूप होतें, पण तें क्रम-दृष्ट्या आधींच येतें. ह्याचप्रमाणें पुढील संख्याविशेषणें बनतात.

१६ हदिनारु, १७ हदिनेळु, १८ हदिनेंटु, १९ हत्तोंबत्तु, ( हत्तु+ओंबत्तु ), २० अिप्पत्तु.

ह्यापुढील संख्याविशेषणें :–

२१ अिप्पत्तु+ओंदु = अिप्पत्तोंदु   २२ अिप्पत्तु+अेरडु = अिप्पत्तेरडु वगैरे
३० मूवत्तु   ३१ मूवत्तु+ओंदु = मूवत्तोंदु वगैरे.
४० नाल्वत्तु   ४१ नाल्वत्तु+ओंदु = नाल्वत्तोंदु वगैरे.
५० अैवत्तु   ५१ अैवत्तु+ओंदु = अैवत्तोंदु वगैरे.
६० अरवत्तु   ६१ अरवत्तोंदु.   ७० अेप्पत्तु   ७१ अेप्पत्तोंदु.
८० अेंभत्तु   ८१ अेंभत्तोंदु.   ९० तोंबत्तु   ९१ तोंबत्तोंदु.   १०० नूरु.

ह्यापुढें 'नूरु' ओंदु न म्हणतां 'नूरा' ओंदु असें म्हणतात.
१०१ नूरा ओंदु,   १०२ नूरा अेरडु वगैरे.

येथपर्यंतच्या विवेचनानंतर लक्षांत आलेंच असेल कीं, वरील संख्या-विशेषणांमध्यें शब्दांचा 'क्रम' स्वाभाविक असून, संधि झाल्यावरहि दोन शब्द चटकन अुच्चारल्यानें जें रूप होतें तसेंच आहे.

मराठींत किंवा संस्कृतमध्येंहि आणखी अेक अडचण आहे. आपण असें समजूं कीं मुलांना अंक व ते दर्शविणारीं संख्याविशेषणें शिकवीत आहोंत. अेक, दोन, तीन असे अंक शिकविले आहेत. सोळांत अेक मिळविल्यानें सतरा, सतरांत अेक मिळविल्यानें अठरा; येथपर्यंत आल्यावेळीं मुलांना 'वीस' ह्या संख्येचें ज्ञान त्या 'स्टेज'मध्यें मानसशास्त्रदृष्ट्या नसतांना वीसाच्या अनुरोधानें अेक अुणे वीस=१९ असें शिकवावें लागतें. याचप्रमाणें अेकुणतीस, अेकुण चाळीस वगैरे संख्या शिकवाव्या लागतात. कानडींत ह्या संख्या अिप्पत्तोंबत्तु, मूवत्तोंबत्तु, अशा स्वाभाविक असल्याचें मघाशीं आपण पाहिलें.

१०० पासून १९९ पर्यंत 'अेक शंभर' म्हणायची जरूरी नसल्यानें नुसती शंभर अेक, शंभर दोन ह्या अर्थाचीं संख्याविशेषणें होतात. नूरा ओंदु

( नूरावंदु ), नूरा ॲरडु वगैरे. ह्यापुढील सर्व संख्याविशेषणें आपणांस आतां बनवितां येतील.

### अभ्यास

खालील संख्याविशेषणांवरून संख्या ओळखतां येतात का पहा :–

नूराअिप्पत्तोंदु = नूरा + अिप्पत्तु + ओंदु = ?

ॲरडुनूराअरवत्तोंबत्तु = ॲरडु + नूरा + अरवत्तु + ओंबत्तु = ?

ॲवत्तारु = ॲवत्तु + आरु = ?

तोंबत्तॅंडु = तोंबत्तु + ॲंडु = ?

तोंबत्तारु = तोंबत्तु + आरु = ?

कानडी संख्यावाचक विशेषणें कशीं बनतात, तें आपण पाहिलें. ह्या शिवाय अेक ते पांचपर्यंत मनुष्य प्राण्यासंबंधानें अुपयोगिण्याचीं ओब्ब, अिब्ब, मूव, नाल्व, ॲव अशीं संख्याविशेषणें आहेत. मराठींतहि दोघे, तिघे, चौघे अशीं चारपर्यंत 'मनुष्य' संख्यावाचक विशेषणें आहेतच.

ओब्ब, अिब्ब, वगैरे विशेषणांना पुलिंगी 'नु' व स्त्रीलिंगी 'ळु' या प्रमाणें विभक्तिप्रत्यय (आगमासह) लावून त्यांचीं नामें करतात.

अुदा. ओब्बनु = अेक मनुष्य ( वब्ब )

ओब्बळु = अेक स्त्री (वब्ब)

हीं विशेषणें मनुष्यवाचक असल्यानें निर्जीव वस्तु दर्शविण्यास 'अेक' झाड, 'दोन' झाडें ह्यांतल्याप्रमाणें 'ओंदु' गिड, 'ॲरडु' गिडगळु अशीं 'ओंदु, ॲरडु' हींच विशेषणें वापरतात.

'ओब्ब' ( वब्ब ), 'अिब्ब' ह्या मनुष्यसंख्यावाचक विशेषणांची विभक्तिरूपें ओब्बरु, अिब्बरु, मूवरु, अशीं होतात. वरील 'ओब्ब' म्हणजे अेक (मनुष्य) तर त्याच्या बहुवचनाचा म्हणजे 'ओब्बरु' चा अर्थ काय, अशी येथें शंका येणें साहजिक आहे. तर त्यासंबंधानें लक्षांत ठेवावें कीं 'ओब्बरु' हा शब्द सन्मानार्थी बहुवचनी आहे ('ओब्बरू' चा मुखभाषिक अुच्चार 'वब्बरु' असा होतो) वब्बरु अन्नुत्तारॆ. अेक (गृहस्थ) म्हणतात. 'अेखादा मनुष्य हसतो अेखादा रडतो' अशा अर्थी हि वब्बरु नगुत्तारॆ वब्बरु अळुत्तारॆ (वब्बरु नगतारऽ वब्बरु अळतारऽ) असें म्हणतात.

### शब्दसंग्रह

ನಂತರ नंतर = मग. षष्ठीविभक्तीस जोडतात. 'अदर' नंतर='त्याच्या' नंतर – त्या नंतर. ತಕ್ಕೊಳ್ಳು तक्कोव्ळु = घेणें. ಬಿಸಿ बिसि = गरम (बिशि) ಗಾಯನ गायन = गायन ಭಾಷೆ भाषे = भाषा ('आ' कारान्त संस्कृत शब्द कानडींत भाषे, विद्ये, असे करतात) ಮುಂಜಾನೆ मुंजाने = सकाळीं (मुंझाने) ಜಳಕ जळक = स्नान (झळक)

### वाक्यसंग्रह

१ मी सकाळीं सहाला उठतों. ನಾನು ಮುಂಜಾನೆ ಆರಕ್ಕೆ ಏಳುತ್ತೇನೆ. नानु मुंजाने आरक्के अेळुत्तेने (येळदेनी).

२ जेवणा (च्या) नंतर वर्तमानपत्र वाचतों. ಊಟದ ನಂತರ ವರ್ತಮಾನಪತ್ರವನ್ನು ಓದುತ್ತೇನೆ. अूटद नंतर वर्तमानपत्र (वन्नु) ओदुत्तेने (ओदतेनी).

३ अकरा वाजतां कचेरीस जातों. ಹನ್ನೊಂದು ಗಂಟೆಗೆ ಕಚೇರಿಗೆ ಹೋಗುತ್ತೇನೆ. हन्नोंदु गंटेगे कचेरिगे होगुत्तेने (होगतेनी).

४ कचेरींत दुपारीं तीन वाजतां चहा घेतों. ಕಚೇರಿಯಲ್ಲಿ ಮಧ್ಯಾಹ್ನ ಮೂರು ಗಂಟೆಗೆ ಚಹವನ್ನು ತಕ್ಕೊಳ್ಳುತ್ತೇನೆ. कचेरिओळगे (कचेरियल्लि) मध्यान्ह मूरुगंटेगे चह (वन्नु) तक्कोव्ळुत्तेने (चहा तगोतेनी).

५ आमची कचेरी संध्याकाळीं सहाला सुटते. ನಮ್ಮ ಕಚೇರಿಯು ಸಂಜೆ ಆರಕ್ಕೆ ಬಿಡುತ್ತದೆ. नम्म कचेरियु संजे आरक्के बिडुत्तदे (.... कचेरि संजी आरक्क बिडतदऽ).

६ सकाळीं सात वाजतां गरम पाण्यानें स्नान करतों. ಮುಂಜಾನೆ ಏಳು ಗಂಟೆಗೆ ಬಿಸಿನೀರಿನಿಂದ ಜಳಕವನ್ನು ಮಾಡುತ್ತೇನೆ. मुंजाने अेळु गंटेगे बिसि नीरिनिंद जळक (वन्नु) माडुत्तेने. (मुंजाने येळु गंटेक्क बिशी नीरले जळक < माडतेनी).

७ आमच्या घरीं (घरास) अेक शिक्षक येतात. ನಮ್ಮ ಮನೆಗೆ ಒಬ್ಬ ಶಿಕ್ಷಕರು ಬರುತ್ತಾರೆ. नम्म मनेगे ओब्ब शिक्षकरु बरुत्तारे. (नम्म मनीगे वब्ब शिक्षकरु बरतारऽ).

८ ते मला गायन शिकवितात. ಅವರು ನನಗೆ ಗಾಯನ (ವನ್ನು) ಕಲಿಸುತ್ತಾರೆ. अवरु ननगे गायन (वन्नु) कलिसुत्तारे. (गायन< कलसतार ऽ)

९ मी चार भाषा बोलतों. ನಾನು ನಾಲ್ಕು ಭಾಷೆಗಳನ್ನು ಮಾತಾಡುತ್ತೇನೆ. नानु नाल्कु भाषेगळन्नु मातादुत्तेने. (भाषा माताडतेनी).

---

## प्रकरण १९ वें

## ‘भावरूपें’

**खालील वाक्यें पहा:–**

मी रेशन आणण्यास जातों (आणावयास); गड्यास ते आणायला सांग; तो आणूं लागला; ह्या वाक्यांतील ‘आणूं’ – ‘आणायला’ – ‘आणण्यास’ ह्यांस आपण मराठींत कृदन्तें म्हणतों. अिंग्रजींत ह्यांना The Infinitive म्हणतात ‘To bring’

कानडींत अशा कृदन्तांना ‘भावरूपें’ म्हणतात. हीं तीन प्रकारचीं आहेत. अुदा:– होगु–जाणें, ह्याचीं भावरूपें (१) होग (२) होगलु (३) होगलिक्के.

**प्रकार पहिला:–** धातूचें अंत्य ‘अु’ वगळून किंवा अेकारान्त व अिकारान्त मूळरूपास ‘य’ लावून होगु – होग, माडु – माड, करे – करेय, बरे – बरेय, हिडि – हिडिय, कुडि – कुडिय.

**प्रकार दुसरा:–** पहिल्या प्रकारास ‘लु’ जोडून होगलु, माडलु, तरलु करेयलु, बरेयलु, हिडियलु, कुडियलु.

**प्रकार तिसरा:–** दुसऱ्या प्रकारास ‘अिक्के’ जोडून. अुदा:– होगलिक्के होगलु + अिक्के = होगलिक्के; माडलु + अिक्के = माडलिक्के; करेयलिक्के; बरेयलिक्के; हिडियलिक्के; कुडियलिक्के; कांहीं धातूंचीं तिन्हीं प्रकारचीं ‘भावरूपें’ पाहूं:– होगु = होग, होगलु, होगलिक्के = जाअूं – जायला–जावयास; बरु=बर, बरलु, बरलिक्के=येअूं, यायला – यावयास; माडु=माड, माडलु,

माडलिक्के=करूं – करायला – करावयास, तरु = तर, तरलु, तरलिक्के = आणूं आणायला – आणावयास; बरे = बरेय, बरेयलु, बरेयलिक्के = लिहूं – लिहिण्यास – लिहावयास; कुडि = कुडिय, कुडियलु, कुडियलिक्के = पिऊं – पिण्यास प्यावयास.

**भावरूपांचा उपयोगः–**

**प्रकार पहिला**:– 'होग' 'माड' हीं मराठींतील जाऊं, करूं, ह्या 'ऊं कृदन्ता 'सारखीं आहेत.

'पाहूं जाणें' 'करूं जाणें' 'देऊं करणें', करूं अिच्छिणें अशा अर्थाच्या संयुक्त क्रियापदांमध्येंहि ह्या भावरूपांचा अुपयोग होतो.

अुदा:- कोडु = देणें. कोड (भावरूप)+माडु(करणें) कोडमाडु = देऊं करणें (to offer); माडु = करणें; बयसु = अिच्छिणें, माड बयसु = करूं अिच्छिणें

**प्रकार दुसरा** - माडलु, होगलु, वगैरे हीं भावरूपें मुखभाषेंत येत नाहींत. फक्त लेखभाषेंत यांचा अुपयोग करतात. तथापि तिसऱ्या प्रकारच्या भावरूपांच्या ('होगलिक्के' च्या) मानानें हीं कमींच वापरतात.

'जाण्यास' प्रमाणें हीं अुद्देशार्थ सुचवितात, अवरु नमगे बरलु हेळिदरु = त्यानीं आम्हास येण्यास सांगितलें. 'अवनु होगलु सिध्दनादनु' = तो जाण्यास तयार झाला. ह्याचा 'तांना' कृदन्तासारखाहि अुपयोग होतो. 'नीवु अल्लि अिरलु = तुम्ही तेथें असतांना.

**प्रकार तिसरा**:– 'होगलिक्के' 'माडलिक्के' वगैरे; अुद्देशदर्शक म्हणून दुसऱ्या पेक्षां हेंच भावरूप अधिक वापरतात. अवनिगे माडलिक्के हेळु = त्याला करण्यास सांग.

टीपः- भूतकालिक नकाररूपें करतांना दुसऱ्या प्रकारच्या व भविष्यकालिक नकाररूपें करतांना तिसऱ्या प्रकारच्या भावरूपांचा अुपयोग होतो.

## शब्द संग्रह

ಬಗೆಹರಿಸು बगेहरिसु – सोडविणें, तोड काढणें वगैरे. (बगेहरियु चें प्रयोजक). ಸಲ್ಲಿಸು सल्लिसु – देणें, अर्पण करणें. ಕರತಾಡನ (ವು) करताडन (वु) – टाळ्या, ಪಡೆ (ಯು) पडे (यु) – मिळणें, पावणें. 'पडेयलु' भावरूप. ಆದೇಶಿಸು आदेशिसु – आदेशिणें. ತಡೆ (ಯು) तडे (यु) – थांब-

विणें, प्रतिबंधिणें. ಅರಿ ( ಯು ) अरि ( यु ) – समजणें, जाणणें. ಬಿಡಿಸು बिडिसु – सोडविणें. ( 'बिडु' चें प्रयोजक ) ನೆರವು नॆरवु – अवकाश, आश्रय, वाव.

## वाक्य संग्रह

१ ಈ ವಿಷಯಗಳನ್ನು ಬಗೆಹರಿಸಲು ಸಂಘದ ಸಾಧಾರಣ ಸಭೆಯಲ್ಲಿ ಅವರು ಪ್ರಯತ್ನಿಸಿದರು. ई विषयगळन्नु बगॆहरिसलु संघद साधारण सभॆयल्लि अवरु प्रयत्निसिदरु. हे विषय 'सोडवायला' (सोडविण्याचा) संघाच्या साधारण सभेंत त्यांनीं प्रयत्न केला.

२ ಅವರಿಗೆ ಧನ್ಯವಾದಗಳನ್ನು ಸಲ್ಲಿಸಲು ಸಭೆಯಲ್ಲಿ ಕರತಾಡನವಾಯಿತು. अवरिगॆ धन्यवादगळन्नु सल्लिसलु सभॆयल्लि करताडनवायितु. त्यांना धन्यवाद देण्यासाठीं सभेंत 'करताडन' झालें (टाळ्या पडल्या).

३ ಸರಕಾರದಿಂದ ಸಹಾಯ ಪಡೆಯಲು ಆಂಗ್ಲೋ ಇಂಡಿಯನ್ ಸಂಸ್ಥೆಗಳು ಅರ್ಹವಾಗಿವೆ. सरकारदिंद सहाय पडॆयलु आँग्लो इंडियन् संस्थॆगळु अर्हवागिवॆ. सरकारकडून सहाय मिळण्यास आँग्लोइंडियन संस्था पात्र आहेत.

४ ಇದನ್ನು ಆದೇಶಿಸಲು ಸರಕಾರಕ್ಕೆ ಅಧಿಕಾರವಿಲ್ಲ. इदन्नु आदेशिसलु सरकारक्कॆ अधिकारविल्ल. हें 'आदेशिण्यास' सरकारला अधिकार नाहीं.

५ ಮೆರವಣಿಗೆಯನ್ನು ತಡೆಯಲು ಕಟ್ಟಡದ ಸುತ್ತಲೂ ಪೋಲೀಸರು ಬಂದು ನಿಂತರು. मॆरवणिगॆयन्नु तडॆयलु कट्टडद सुत्तलू पोलीसरु बंदु निंतरु. मिरवणूक थांबविण्यास अिमारतीच्या सभोंवतीं पोलीस येऊन उभे राहिले.

६ ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನದಿಂದ ಸಮಾಜವನ್ನು ಅರಿಯಲು ನೆರವು ದೊರೆಯುವದು. समाजविज्ञानदिंद समाजवन्नु अरियलु नॆरवु दॊरॆयुवदु – समाज विज्ञानानें समाज 'समजण्यास' वाव मिळतो.

१ त्यास घरीं जाण्यास सांग. ಅವನಿಗೆ ಮನೆಗೆ ಹೋಗಲಿಕ್ಕೆ ಹೇಳು. अवनिगॆ मनॆगॆ होगलिक्कॆ हेळु.

२ हे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करा. ಈ ಪ್ರಶ್ನೆಗಳನ್ನು ಬಿಡಿಸಲು

ಯಾತ್ರಿಸಿರಿ. अी प्रश्नेगळन्नु बिडिसल् यत्निसिरि (अी प्रश्नी बिडिसलिक्के).

३ तो जेवण्यास येत नाहीं. ಅವನು ಊಟಕ್ಕೆ ಬರುವದಿಲ್ಲ. अवनु अूटक्के बरुवदिल्ल (अव<अूटक्क....)

४ आम्हीं सिनेमा पाहण्यास जातों. ನಾವು ಸಿನೇಮಾ ನೋಡಲಿಕ್ಕೆ ಹೋಗುತ್ತೇವೆ. नावु सिनेमा नोडलिक्के होगुत्तेवे (........... होगतेवी)

५ त्यांना येण्यास सांग– ಅವರಿಗೆ ಬರಲಿಕ್ಕೆ ಹೇಳು. अवरिगे बरलिक्के हेळु.

---

## प्रकरण २० वें

# भूतकालिक नकार रूपें

**खालील मराठी नकार रूपें पहा :–**

१ तो गेला नाहीं. २ त्यानें केलें नाहीं. हीं भूतकालिक नकार रूपें 'गेला' या भूतकालिक रूपापुढें 'नाहीं' किंवा बहुवचनी 'नाहींत' हें नकारार्थी क्रियापद जोडून आपण करतों.

कानडींत धातूच्या **दुसऱ्या** प्रकारच्या भावरूपास 'अिल्ल'=नाहीं हें अव्यय-क्रियापद जोडून नकाररूपें करतात 'अवनु माडलिल्ल' (माडल्+अिल्ल = माडलिल्ल) त्यानें केलें नाहीं. 'अवनु होगलिल्ल' (होगल् + अिल्ल=होगलिल्ल) तो गेला नाहीं. होगल् + अिल्ल. 'होगलिल्ल' ह्याचा शब्दशः अर्थ 'जायला नाहीं' असा होतो पण रूढार्थ 'गेला नाहीं' असा होतो.

अुत्तर कर्नाटकांत कांहीं ठिकाणीं अशिक्षितांच्या मुखभाषेंत कानडीच्या परिणामानें 'मी जेवायला नाहीं' असें 'मी जेवलों नाहीं' ह्या अर्थी म्हटलेलें कानीं पडतें.

अुदा:– मी गेलों नाहीं, मी गेलें नाहीं – नानु होगलिल्ल, आम्ही गेलों नाहीं – नावु होगलिल्ल, तूं गेला नाहींस – नीनु होगलिल्ल, तुम्ही गेला नाहींत

नीवु होगलिल्ल; ती गेली नाहीं – अवळु होगलिल्ल; ते गेले नाहींत – त्या गेल्या नाहींत – तीं गेलीं नाहींत – अवरु होगलिल्ल.

### शब्द संग्रह

ಇವತ್ತು अिवत्तु = आज; ನಿನ್ನೆ निन्ने = काल; ಮೊನ್ನೆ मोन्ने = परवां (भूतकालिक); ನಾಡದು नाडदु = परवां (भविष्य कालिक); मराठींत 'परवां' ह्याचें भूतकालिक 'परवां' व भविष्य कालिक 'परवां' असे दोन अर्थ होतात. पण कानडींत मोन्ने व नाडदु असे निरनिराळे शब्द आहेत.

मराठींत 'परवां' चा अर्थ संदर्भावरून सूचित होतो, 'अुद्यां नाहीं परवां' असे कांहीं शब्द जोडूनहि स्पष्ट केला जातो.

ಎಂದೂ (ಯಂದೂ) = कधींहि, ವೇಳೆಗೆ = वेळेवर ('वेळे' = वेळेगे ह्याची चतुर्थिविभक्ति 'वेळेला'), ನಾಕಷ್ಟು = पुरेसा - शी - सें.

### वाक्य संग्रह

१ मी त्यास बोलावलें, तो आला नाहीं. ನಾನು ಅವನನ್ನು ಕರೆದೆನು, ಅವನು ಬರಲಿಲ್ಲ. नानु अवनन्नु करदेनु, अवनु बरलिल्ल. (ना अवन्न करदे, अव< बरलिल्ल<).

२ मी आज कचेरीस गेलों नाहीं. ನಾನು ಇಂದು ಕಚೇರಿಗೆ ಹೋಗಲಿಲ್ಲ. नानु अिंदु कचेरिगे होगलिल्ल. (ना अिंद कचेरिगे होगलिल्ल<).

३ त्यानें बाजारांतून भाजी आणली नाहीं. ಅವನು ಪೇಟೆಯಿಂದ ಪಲ್ಲೆ ತರಲಿಲ್ಲ. अवनु पेट्टेअिंद पल्ले तरलिल्ल. (अव< प्याटीअिंद पल्ले तरलिल्ल<)

४ मला वेळेवर यायला झालें नाहीं. ನನಗೆ ವೇಳೆಗೆ ಬರಲಿಕ್ಕೆ ಆಗಲಿಲ್ಲ. ननगे वेळेगे बरलिक्के आगलिल्ल. (ननग व्याळ्याक्क बरलिक्के आगलिल्ल)

५ तुमचा मुलगा आमचे घरीं (घरास) काल आला नाहीं. ನಿಮ್ಮ ಮಗನು ನಮ್ಮ ಮನೆಗೆ ನಿನ್ನೆ ಬರಲಿಲ್ಲ. निम्म मगनु नम्म मनेगे निन्ने बरलिल्ल. (.... मग< ........... मनीगे .... बरलिल्ल<)

६ आमचें काम कधींहि बिघडलें नाहीं. ನಮ್ಮ ಕೆಲಸ ಎಂದೂ ಕೆಡಲಿಲ್ಲ. नम्म केलस अंदू केडलिल्ल. (केलस< यंदू केडलिल्ल<)

७ मी तें पुस्तक वाचलें नाहीं. ನಾನು ಆ ಪುಸ್ತಕವನ್ನು ಓದಲಿಲ್ಲ. नानु आ पुस्तकवन्नु ओदलिल्ल. (ना आ पुस्तक< ओदलिल्ल).

८ आम्हीं आमचें कर्तव्य केलें नाहीं. ನಾವು ನಮ್ಮ ಕರ್ತವ್ಯವನ್ನು ಮಾಡಲಿಲ್ಲ. नावु नम्म कर्तव्य (वन्नु) माडलिल्ल. (नावु नम्म कर्तव्यवन्न माडलिल्ल<).

९ त्यानें पुरेसे तांदूळ आणले नाहींत. ಅವನು ಸಾಕಷ್ಟು ಅಕ್ಕಿಯನ್ನು ತರಲಿಲ್ಲ. अवनु साकष्टु अक्कियन्नु तरलिल्ल. (अव< साकष्टु अक्की तरलिल्ल <).

## प्रकरण २१ वें

## शब्दयोगी अव्ययें ('Post' - positions)

**खालील वाक्यें पहाः-**

१ तो माडीवर झोपला आहे. २ जेवणानंतर ते बाहेर जातील.
३ जेवणापूर्वीं स्नान करावें. ४ दिव्याखालीं अंधार.

वरील वाक्यांतील 'वर' 'नंतर' 'पूर्वीं' 'खालीं' ह्या शब्दांमुळें त्या त्या वाक्यांतील माडी, जेवण, दिवा ह्या शब्दांचा अितर शब्दांशीं कोणता संबंध आहे हें कळतें. ह्यांना आपण शब्दयोगी अव्ययें म्हणतों. अिंग्रजींत अशा अव्ययांना Prepositions म्हणतात. अिंग्रजींत हीं शब्दांच्या मागें (Pre) जोडतात म्हणून त्यांना Prepositions हें नांव यथार्थ आहे. परंतु मराठींत किंवा कानडींतहि तीं शब्दांच्या पुढें जोडतात म्हणून त्यांना आपण Post-positions म्हणूं.

मराठींत 'शब्दयोगी अव्ययें' अेखाद्या शब्दास जोडतांना त्या शब्दाचें कांहीं वेळां सामान्यरूप होतें. अुदाः- दिव्या+खालीं, जेवणा+नंतर. कांहीं वेळां मागील शब्दामध्यें फरक न करतां तीं जोडतात. अुदाः- 'माडीवर' (दुसऱ्या प्रकारास मराठींत शुध्द शब्दयोगी अव्ययें म्हणतात).

कानडी शब्दयोगी अव्ययें शब्दाच्या षष्टि विभक्तिरूपांना जोडतात. कांहीं शब्दयोगी अव्ययें शब्दांच्या चतुर्थिरूपासहि जोडतात.

**षष्ठि विभक्तिरूपास जोडण्याचीं:–**

मुंदे - पुढें - अवन मुंदे (त्याच्या पुढें). हिंदे - मागें - मनेय हिंदे (घरामागें) मेले - वर - कागदद मेले (कागदावर). केळगे - खालीं - गिडद केळगे (झाडाखालीं) ओळगे - आंत - मनेय ओळगे (घरामध्यें). कूड - बरोबर - संगें - अवनकूड (त्याच्या बरोबर). होरतु - शिवाय - नन्न होरतु - (माझ्याशिवाय). वरेगे - पर्यंत - मनेयवरेगे (घरापर्यंत). संगड - संगें, बरोबर - अवन संगड (त्याच्याबरोबर)

कूड - ओडने - संगड = सवें, बरोबर. अवरकूड, अवरसंगड, अवरोडने – (त्याचेबरोबर). कडेगे - कडे - अदर कडेगे - (त्याच्याकडे). मुंचे - आधीं केलसदमुंचे (कामाच्या आधीं). हत्तर - जवळ - मनेय हत्तर (घराजवळ). तनक - पर्यंत - आरु गंटेय तनक (सहा वाजे पर्यंत). अष्टु - तितकें - अदरष्टु (त्याच्या अितकें). अिष्टु - अितकें - अिदरष्टु - (ह्याच्या अितकें). साकु - पुरें - साकष्टु - पुरेसें.

**चतुर्थि विभक्तीस जोडण्याचीं:–**

अित - पेक्षां अदक्किंत (अदक्के + अित) त्यापेक्षां. आगि - करितां निमगागि (निमगे + आगि) तुमच्या साठीं. (आगि हें आगु म्हणजे 'होणें' धातूचें 'होअून' ह्या अर्थाचें भू. कृ. अव्यय; पण 'करितां' ह्या अर्थीं श. यो. अव्यय म्हणूनहि वापरतात) अंत - 'म्हणून' अवरिगंत 'त्यांना म्हणून' - त्यांच्यासाठीं म्हणून. अेंदु - 'म्हणून' (१) अवरिगेंदु 'त्यांना म्हणून' - त्यांच्या साठीं. (२) 'अिंजिनीयररेंदु' (अिंजिनीयररु + अेंदु) अिंजिनीयर म्हणून, अिंजिनीयररेंदु अवरन्नु नेमिसिद्दारे - अिंजिनीयर म्हणून त्यांना नेमलें आहे.

ह्यांपैकीं कांहीं शब्दयोगी अव्ययें धातूंच्या 'वर्तमान-भविष्य-कृदन्त अव्ययास' जोडतात व त्याचा अर्थ खालील प्रमाणें होतो:–

मुंदे - बरुवमुंदे - येतांना. तनक - होगुव तनक - जाअी पर्यंत.

वरेगे - आगुव वरेगे - होअी पर्यंत. अष्टु - माडुवष्टु - करण्या अितकें.

टीप:– बरुव - येणारा, होगुव - जाणारा या रूपांना कानडींत वर्तमान - भविष्य - कृदन्ताव्ययें म्हणतात. त्याचें विवेचन पुढें केलें आहे.

कांहीं शब्दयोगी अव्ययें 'भूतकृदन्त विशेषणा' सहि जोडतात. मेले-वर बंदमेले - आल्यावर. माडिद्मेले - केल्यावर. अष्टु - तितकें, होदष्टु - जाअील तितकें, माडिदष्टु - 'केल्याअितकें', आदष्टु - होअील तितकें. नंतर - अव बंदनंतर नावु होदेवु - ते आल्यावर आम्ही गेलों.

कुरितु - 'विषयीं' 'संबंधानें' द्वितीया किंवा षष्टिविभक्तीस जोडतात.

द्वि. वि. :– अी विषयवन्नु कुरितु अवरु मातासिदरू. ह्या विषयासंबंधानें ते बोलले.

ष. वि. :– अनेक विषयगळ कुरितु विचार विनिमयवायितु. अनेक विषयासंबंधानें विचारविनिमय झाला.

बग्गे - 'विषयीं', 'बद्दल'. वरील 'कुरितु' सारखाच ह्याचा अर्थ आहे. पण शब्दांच्या षष्ठि विभक्ति रूपास मात्र हें जोडतात. अुदा:- अदर बग्गे अवरु अेनु हेळिदरु? त्या (च्या) बद्दल त्यानीं काय सांगितलें?

ओंदिगे - सवें, संगें, बरोबर, षष्ठीविभक्तिरूपास जोडतात. अुदा:- चीनी प्रजाराज्यद सरकारदोंदिगे नम्म प्रतिनिधिगळु चर्चे नडिसिरुवरु (सरकार-द + ओंदिगे) चिनी प्रजाराज्याच्या सरकाराशीं आमच्या प्रतिनिधीनीं चर्चा चालविली आहे.

जोतेगे - सह, बरोबर, षष्टीविभक्तिरूपास जोडतात. अुदा:- 'मुंबअी शिक्षण समाजद' जोतेगे बेरे जनरू हायकोर्टिगे अर्जियन्नु माडिद्दरू. 'मुंबअी शिक्षण समाजा' बरोबर अितर लोकानींहि हायकोर्टला अर्ज केला होता.

कूडले - 'क्षणीं' ह्या अर्थी कृदन्तविशेषणास जोडतात. अुदा:- बंद कूडले - येतां क्षणीं, होद कूडले - जातां क्षणींच, जातांच, नानु होद कूडले अवरु बंदरु - मी जातांच ते आले. (हें क्रियाविशेषणहि आहे)

अल्लदे - 'आणि शिवाय' ह्या अर्थी. अुदा:- (अिदु + अल्लदे) अिदल्लदे - ह्या शिवाय.

## वाक्यसंग्रह

१ ನಮ್ಮ ಮನೆಯ ಹತ್ತರ ಒಂದು ಕೆರೆ ಇದೆ. नम्म मनेय हत्तर ओंदु केरे अिदे. आमच्या घराजवळ अेक तलाव आहे.

२ ಮನೆಯ ಮೇಲೆ ಕಾಗೆಯು ಕುಳಿತಿರುವದು. मनेय मेले कागेयु कुळितिरुवदु. घरावर कावळा बसला आहे.

३ ಮೇಜಿನ ಕೆಳಗೆ ಕಸದ ಬುಟ್ಟಿ ಇದೆ. मेजिन केळगे कसद बुट्टि अिदे. मेजाखालीं केराची टोपली आहे. (बुट्टि = टोपली)

४ ನೀನು ಕರೆಯುವ ವರೆಗೆ ನಾನು ಬರುವದಿಲ್ಲ. नीनु करेयुव वरेगे नानु बरुवदिल्ल. तूं बोलावे पर्यंत मी येत नाहीं.

५ ಗುರುವಿನ ಗುಲಾಮನಾಗುವ ತನಕ ವಿದ್ಯೆ ಬರುವದಿಲ್ಲ. गुरुविन गुलामनागुव तनक विद्ये बरुवदिल्ल. गुरूचा गुलाम होओीपर्यंत विद्या येत नाहीं.

६ ನಾನು ಬಂದಮೇಲೆ ನೀನು ಹೋಗು. नानु बंदमेले नीनु होगु मी आल्यावर तूं जा.

१ तो घराबाहेर जात नाहीं. ಅವನು ಮನೆಯಹೊರಗೆ ಹೋಗುವ ದಿಲ್ಲ. अवनु मनेयहोरगे होगुवदिल्ल. (अव < मनीहोरग होग्‌दुल्ला).

२ झाडाखालीं सावली आहे. ಗಿಡದ ಕೆಳಗೆ ನೆರಳು ಇದೆ. गिडद केळगे नेरळु अिदे. (नेरळु = सावली) (गिडद केळग नेळ्ळु अदऽ).

३ शाळे (च्या) बाहेर बाग आहे. ಸಾಲೆಯ ಹೊರಗೆ ತೋಟವು ಇದೆ. सालेय होरगे तोटवु अिदे. (साली होरग तॉट अद <).

४ देवळाजवळ अेक दुकान आहे. ಗುಡಿಯ ಹತ್ತರ ಒಂದು ಅಂಗಡಿ ಇದೆ. गुडिय हत्तर ओंदु अंगडि अिदे. (गुडी हत्तर वंद अंगडि अदऽ).

५ त्याच्याहून मी आधीं आलों. ಅವರಿಗಿಂತ ನಾನು ಮುಂಚೆ ಬಂದೆನು. अवरिगिंत नानु मुंचे बंदेनु. (अवरकिंत ना मुंचे बंदे).

६ हें समजण्या अितका तो शाहणा आहे. ಇದು ತಿಳಿಯುವಷ್ಟು ಅವನು ಜಾಣನಿದ್ದಾನೆ. अिदु तिळियुवष्टु अवनु जाणनिद्दाने. (जाणनु + अिद्दाने) (अिदु तिळियुवष्टु अवऽ जाण अिद्दानऽ; 'शाण्या अिद्दानऽ').

## प्रकरण २२ वें

## ' अव्ययक्रियापदें '

या प्रकरणाचा मथळा वाचकांना जरासा विचित्र वाटेल. कारण मराठी व्याकरणांत ' अव्ययक्रियापदें ' असा प्रकार नाहीं. ' अव्यय ' म्हणजे ' अविकारी ', न बदलणारीं, या अर्थी ' अव्ययक्रियापदें ' नांवाचा कानडींत क्रियापदांचा अेक प्रकार आहे. तो कन्नडविशिष्ट आहे.

सामान्यपणें काळ, अर्थ, पुरुष, लिंग व वचन यांच्या अनुरोधानें निरनिराळे आख्यातप्रत्यय लागून धातूस ' विकार ' ( बदल ) होअून वेगवेगळीं आख्यातरूपें होतात. परंतु अव्ययक्रियापदें नांवाचीं क्रियापदें ' बदलत ' नाहींत. या अव्ययक्रियापदांच्या अर्थाचीं मराठींत ' पाहिजे ' ' नको ' वगैरे कांहीं क्रियापदें आहेत, पण तीं पूर्णपणें अविकारी नाहींत. कारण पाहिजेस, पाहिजेत, नकोस, नकोत, अशीं त्यांचीं पुरुषवचनानुसार निरनिराळीं रूपें होतात.

कानडींतील ' अव्ययक्रियापदें ' झालीं तरी, मुळांत विशिष्ट लिंगी, वचनी, पुरुषी, आख्यातरूपें होतीं. परंतु शेंकडों वर्षांच्या रूढीनें अितर सर्व आख्यातरूपें मागें पडून हीं ' विशिष्ट ' आख्यातरूपेंच अितर आख्यातरूपांच्या अेवजीं ' न बदलतां ' वापरण्या अितकीं ' अव्यय ' झालीं व मुळांतल्या विशिष्ट लिंगी - वचनी - पुरुषी अुपयोगाखेरीज अितर आख्यातरूपांसाठींहि वापरण्यांत येअून ' व्यापक ' झालीं. ' अव्ययक्रियापदें ' हा जिज्ञासूनीं अधिक शोध करण्या सारखा विषय आहे.

**हीं अव्ययक्रियापदें खालील प्रमाणें आहेत.**

१ अिल्ल = नाहीं - नाहींस - नाहींत. २ अल्ल = नव्हे - नव्हेस - नव्हेत.
३ बेकु = पाहिजे - पाहिजेस - पाहिजेत. ४ बेड = नको - नकोस - नकोत.
५ साकु = पुरे - पुरेस - पुरेत. ६ अुंटु = आहे - आहेस - आहेत. (तृ. पु.
७ होदु = होय - होत ).

या अव्ययक्रियापदांचा आतां सविस्तर विचार करूं:—

१ अिल्ल - ' नाहीं ' नुसतें ' नाहीं ' म्हणण्यासहि याचा अुपयोग होतो.

वर्तमानकालिक नकार रूपें व भूतकालिक नकार रूपें करण्यास 'अिल्ल' चा अुपयोग होतो हें आपण मागें पाहिलेंच आहे. अितर कांहीं नकार रूपें करण्यासहि 'अिल्ल' चा अुपयोग कसा होतो हें त्या विषयींच्या प्रकरणांतून येअीलच.

'अिल्ल' हें 'अिल्' म्हणजे 'असणें' या धातूपासून झालें आहे. न कारार्थी निराळा शब्द न जोडतां नुसता प्रत्यय जोडल्यानें होणारा 'प्रत्ययसिद्ध नकार रूपां' चा कन्नडविशिष्ट असा अेक प्रकार आहे. या नकार रूपांचें विवेचन पुढें अेका प्रकरणीं केलें आहे. येथें अेवढें लक्षांत ठेवावें कीं 'अिल्' म्हणजे **'असणें'** या अर्थाच्या धातूचें 'अिल्ल' हें 'तें नाहीं' या अर्थाचें तृ. पु. अेकवचनी रूप आहे. परंतु रुढीनें सर्व पुरुषी, सर्व लिंगी व सर्व वचनी 'न बदलतां' वापरण्याचें अव्ययक्रियापद झालें आहे.

तो नाहीं = अवनु अिल्ल. तें नाहीं = अदु अिल्ल.

तूं नाहींस = नीनु अिल्ल. ते नाहींत = अवरु अिल्ल.

'अिल्ल' पासून झालेले कांहीं शब्दः- 'अिल्लवे'? 'अिल्ल**वो**' यांचा 'नाहीं काय' असा अर्थ होतो. ('अे' किंवा 'ओ' जोडतांना 'व' आगम येतो) 'अे' जोडून 'अिल्लवे'? हा 'परिणाम प्रश्न' होतो (प्रकरण १० पहा)

अुदा:- ओंदु हू बाडिदरे भ्रमरक्के हू अिल्लवे? अेक फूल कोमेजलें तर भ्रमरास फूल नाहीं काय? अिल्लद - नसलेला भू. कृ. विशेषण.

अिल्लद + अवनु = अिल्लदवनु - नसलेला तो (मनुष्य).

अिल्लद + अवरु = अिल्लदवरु – नसलेले ते (लोक).

'अिल्लदवरु' = 'नसलेले ते' – निर्धन (Have-nots).

(अिद्दवरु = असलेले ते – सधन) (Haves)

नाचिके अिल्लदवनु = लाज 'नसलेला तो' (मनुष्य).

नाचिके अिल्लद मनुष्यनु = लाज नसलेला मनुष्य.

२ 'अल्ल' = नव्हे. (कधींकधीं 'नाहीं' या अर्थींहि वापरतात) 'अल्' म्हणजे योग्य असणें, समर्थ असणें, या अर्थाच्या धातूचें 'प्रत्ययसिद्ध' नकार रूप 'अल्ल' = 'योग्य नाहीं' रूढीनें 'नव्हे' असा अर्थ आला आहे.

होदल्ल< = होय ना? अल्लवे - अल्लवो = 'नव्हे' काय?

'अल्लद' = 'योग्य नसलेला' अल्लद कृत्य = अपकृत्य

अिदु चलो अल्ल = हें चांगलें नव्हे. अवरु दुर्जनरल्ल ( दुर्जनरु + अल्ल ) = ते दुर्जन नव्हेत.

३ बेकु = पाहिजे, हवें. व्युत्पत्ति: 'बेडु' म्हणजे मागणें या धातूचें तृ. पु. अेकवचनी आख्यातरूप. पण रूढीनें 'अव्यय क्रियापद'. बेकु = पाहिजे – पाहिजेस – पाहिजेत. ननगे हालु बेकु = मला दूध पाहिजे. विध्यर्थरूपें करतांनाहि 'बेकु'चा अुपयोग होतो. हें पुढें अेका प्रकरणीं दिलें आहे.

बेकागु = हवें होणें, (बेकु + आगु) बेके ? – बेको ? = पाहिजे काय? निनगे अिदन्नु हेळ्ब बेके ? = तुला हें सांगायला पाहिजे का ?.

बेकु + आद (बेकाद) पाहिजे असलेले, वाटेल तें.

'बेकादवरु' = 'पाहिजे असलेले ते', पाहिजे असलेले लोक.

'बेकादष्टु' = 'वाटेलते', पाहिजे तेवढे, हवें तेवढें, वाटेल तितकें.

'बेकन्त' (बेकु + अन्त) = 'पाहिजे म्हणून', मुद्दाम, बुद्ध्या; अवनु बेकन्त हीगे माडिदनु = त्यानें मुद्दाम असें केलें. निनगे हालु बेको ? = तुला दूध पाहिजे काय ?

४ बेड = नको. अुत्तरकर्नाटकी मुखभाषिक अुच्चार 'बॅड <'. 'बेडु' अिच्छिणें या धातूचें 'प्रत्ययसिद्ध' तृ. पु. अेकवचनी नकार रूप. 'बेडदु' = तें अिच्छीत नाहीं. बेडदुचें संक्षिप्त रूप 'बेड'. याचा रूढार्थ नको – नकोस – नकोत वगैरे.

आज्ञार्थाचीं नकाररूपें करण्यास 'बेड' चा अुपयोग कसा होतो हें पुढें येअीलच.

ननगे अदु बेड = मला तें **नको**. ननगे अवरु बेड = आम्हास ते **नकोत.**
बेड + आगु = नकोसें होणें. 'बेडाद' = नको झालेला – असलेला
'नमगे बेडादवरु' = आम्हास नको झालेले (असलेले) ते (लोक)
जनरिगे बेडादवनु = लोकांना 'नको झालेला' तो.

५ साकु – 'साकु' = पुरें होणें या धातूचें तृ. पु. अेकवचनी जुनें रूप. मूळअर्थ 'तें पुरें' रूढीनें सर्व पुरुषी - वचनी - वापरतात. पुरे - पुरेत.

नमगे अिष्टु साकु – आम्हास अेवढें पुरे. अिष्टु जनरु साकु – अितके लोक पुरेत. साको ? = पुरे काय ? पुरेत काय ? साकु + आगु (साकागु)

पुरें होणें. ननगे साकायितु = 'मला पुरें झालें' ( मला कंटाळा आला ) साको बेको ? – पुरें की हवें ? साकु + अष्टु = पुरें + तितकें = पुरेंसें.

६ हेोदु = होय - होत. मूळरूप 'अहुदु' हें 'तें होतें' It becomes या अर्थाचें तृ. पु. नपुसकलिंगी अेकवचनीं जुनें रूप आहे. परंतु रूढीनें 'होय – होत या अर्थाचें सर्व लिंगी, वचनी, पुरुषीं 'अव्यय क्रियापद' झालें आहे. हेोदो ? होय का ? हेोदो अल्लो = होय कीं नाहीं ? 'हेोदरि' = होय ( हो )

७ अुण्टु = आहे – आहेत. मुळांत 'अुळ्' असणें या धातूचें नपुसकलिंगी तृ. पु. अेकवचनी रूप. 'तें आहे'. परंतु रूढीनें सर्वलिंगीं तृ. पु. बहुवचनीहि अुपयोग होतो. अुण्टु हें क्रियापद दक्षिणकर्नाटकांत विशेषेंकरून मंगळूरकडे वापरतात. अल्लि जनरु अुण्टु = तेथें लोक आहेत. नाळे नम्म परीक्षे अुण्टु = अुद्यां आमची परीक्षा आहे.

## प्रकरण २३ वें

## वर्तमान–भविष्यकृदन्तविशेषणें

**खालील वाक्यें पहा :—**

१ तेथें जाणारा मनुष्य    २ अुद्यां येणारा गृहस्थ

ह्यांतील 'जाणारा' व 'येणारा' हीं धातुसाधित विशेषणें आहेत. ( 'जाणारा' म्हणजे वर्तमानकाळीं किंवा भविष्यकाळीं )

कानडींत ह्या विशेषणांना 'वर्तमान - भविष्य कृदन्त विशेषणें' म्हणतात. हीं विशेषणें कानडींत धातूस 'अुव' हा प्रत्यय जोडून करतात.

होगु + अुव = होगुव ( स्व. लो. संधि ) – जाणारा - री - रें, माडुव = करणारा - री - रें, आगुव = होणारा - री - रें, हीं विशेषणेंहि ( मराठी विशेषणासारखीं ) विशेष्याप्रमाणें बदलत नाहींत.

ह्या वर्तमान भविष्य कृदन्तविशेषणांना पुढें पुल्लिंगी व स्त्रीलिंगी सर्वनामें जोडल्यानें धातुसाधित नामें होतात.

होगुव + अवनु = होगुववनु = 'जाणारा तो' = जाणारा मनुष्य.

होगुव + अवळु = होगुववळु = 'जाणारी ती' = जाणारी स्त्री.

**वाक्य संग्रह**

१ कर्नाटकांत येणारे मराठी लोक. ಕರ್ನಾಟಕದಲ್ಲಿ ಬರುವ ಮರಾಠಿ ಜನರು (ಮರಾಠಿಗರು). कर्नाटकदल्लि बरुव मराठी जनरु (मराठिगरु). (कर्नाटकदोळ्ग बरुव मराठिगरू).

२ महाराष्ट्रांत राहणारे कानडी लोक. ಮಹಾರಾಷ್ಟ್ರದಲ್ಲಿ ಇರುವ ಕನ್ನಡಿಗರು. महाराष्ट्रदल्लि इरुव कन्नडिगरु.

३ कर्नाटकांत राहणारे (लोक). 'राहणारे-ते' ಕರ್ನಾಟಕದಲ್ಲಿ ಇರುವವರು. कर्नाटकदल्लि इरुववरु. (इरुव+अवरु).

४ घर करुन (घेऊन) राहणारे (लोक). ಮನೆ ಮಾಡಿಕೊಂಡು ಇರುವವರು. मने माडिकोंडु इरुववरु.

५ कर्नाटकांतून महाराष्ट्रास जाणारे (लोक) 'जाणारे ते'. ಕರ್ನಾಟಕದಿಂದ ಮಹಾರಾಷ್ಟ್ರಕ್ಕೆ ಹೋಗುವವರು. कर्नाटकदिंद महाराष्ट्रक्के होगुववरु.

६ आमच्या घरीं येणारा मनुष्य. ನಮ್ಮ ಮನೆಗೆ ಬರುವ ಮನುಷ್ಯ. नम्म मनेगे बरुव मनुष्य. (मनीगे बरोऽ मनशा)

७ गांवांत असलेलीं दुकानें. ಊರೊಳಗೆ ಇರುವ ಅಂಗಡಿಗಳು. ऊरोळगे इरुव अंगडिगळु. (ऊरोळग इरो अंगडि).

८ नोकरी करणारे लोक. ನೌಕರಿ ಮಾಡುವ ಜನರು. नोकरी माडुव जनरु.

९ हसणारे प्रेक्षक. ನಗುವ ಪ್ರೇಕ್ಷಕರು. नगुव प्रेक्षकरु.

१ ಧಾರವಾಡಕ್ಕೆ ಒಂಬತ್ತು ಗಂಟೆಗೆ ಬರುವ ಗಾಡಿಯು. धारवाडक्के ओंबत्तु गंटेगे बरुव गाडियु. धारवाडला नऊ वाजतां येणारी गाडी.

२ ಕಾಲೇಜಕ್ಕೆ ಹೋಗುವ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು. कॉलेजक्के होगुव विद्यार्थिगळु, कॉलेजला जाणारे विद्यार्थि.

३ ಮರಾಠೀ ಮಾತಾಡುವ ಜನರು. मराठी माताडुव जनरु· मराठी बोलणारे लोक.

४ ನಮಗೆ ಪತ್ರ ಬರೆಯುವ ಜನರು. नमगे पत्र बरेयुव जनरु. आम्हांस पत्र लिहिणारे लोक.

५ ಸಮಾಜದ ಜೀವನವನ್ನು ಚಿತ್ರಿಸುವ ಲೇಖಕರು. समाजद जीवनवन्नु चित्रिसुव लेखकरु. समाजाचें जीवन 'चित्रिणारे' लेखक. ( चित्रिसु = चित्रिणें ).

६ ರೇಡಿಯೋದಲ್ಲಿ ಹಾಡುವ ಗಾಯಕರು. रेडियोदल्लि हाडुव गायकरु. रेडिओंत गाणारे गायक.

## प्रकरण २४ वें

# वर्तमान भविष्य कृदन्त विशेषणाचीं नकार रूपें

मागें आपण मराठींतील 'जाणारा' 'करणारा' ह्या धातुसाधित विशेषणासारख्या अर्थाचीं कानडी वर्तमान भविष्य कृदन्तविशेषणें 'होगुव' 'माडुव' हीं पाहिलीं. आतां या विशेषणांचीं नकाररूपें कशीं होतात पाहूं. ह्या बाबतींत कानडींत अेक सोय आहे. मराठींत हीं नकाररूपें 'न' व 'जाणारा' हे दोन निराळे शब्द वापरून करावीं लागतात. कानडींत हीं रूपें धातूस 'अद' प्रत्यय लावून करतां येतात.

होगु = जाणें - होगु + अद - होगद = न जाणारा ( स्वरलोपसंधि ).

माडु = करणें - माडु + अद - माडद = न करणारा.

**'न' किंवा 'नाहीं' या अर्थाचा निराळा शब्द न जोडतां क्रियापदास फक्त प्रत्यय जोडून त्याचा नकार करतां येणें हें कानडीचें एक वैशिष्ट्य आहे.** या प्रकरणांतील न जाणारा = 'होगद' या नकाररूपाप्रमाणें अितर आणखी कांहीं प्रकारचीं 'न जातां' तो जात नाहीं, तो जाअूं शकत नाहीं वगैरे अर्थाचीं

'नकाराचीं लघुरूपें' कशीं करतां येतात याचें पुढें निराळ्या प्रकरणांतून विवेचन केलें आहे. 'न' किंवा 'नाहीं' अशा अर्थाचा निराळा शब्द न जोडतां नुसता 'प्रत्यय' लाविल्यानें तीं होतात म्हणून अशा नकार रूपांना '**प्रत्यय सिध्द**' म्हटलें आहे.

'न जाणारा' 'न करणारा' हीं विशेषणें आहेत व आपण मागें पाहिलेंच आहे कीं मराठींतील (आकारान्त) विशेषणें विशेष्याच्या लिंगवचनाप्रमाणें बदलतात तशीं कानडींत बदलत नाहींत.

होगद हुडुग – न जाणारा मुलगा. होगद हुडुगि – न जाणारी मुलगी. होगद नीरु – न जाणारें पाणी. (सर्व ठिकाणीं 'होगद' हेंच रूप येतें).

नोडु + अद = नोडद = न पाहणारा - री - रें. अुदा:- बिद्दिरलु नोडद ताअि शुद्ध वैरि = (मूल) पडलें असतां न पाहणारी आअी शुद्ध वैरि – **सर्वज्ञ.** 'बरु'चीं बरद व बारद अशीं दोन रूपें होतात.

**शब्दसंग्रह**

अंजु = भिणें; नाचु = लाजणें; हुट्टु = पैदा होणें; सेरु = आवडणें; सोलु = हरणें; संगति = घटना; कीलि = कुलुप (पण कधींकधीं किल्ली ह्या अर्थीं) कीलीकै = किल्ली ('कुलुपाचा हात') गंड = नवरा; मातु = बोलणें.

**वाक्य संग्रह**

१ ದಾನಕೊಡದವನ ಒಡವೆ ಕಳ್ಳರಿಗೆ. दान कोडदवन ओडवे कळ्ळरिगे. (कोडद+अवन). दान (न देणाऱ्या-त्याची) न देणाऱ्याची वस्तू चोरांना.

२ ಸೋಲದ ಬುದ್ಧಿ ಭಾಗ್ಯದ ಕೀಲಿ. सोलद बुद्धि भाग्यद कीलि. न हरणारी बुद्धि भाग्याची किल्ली. – **सर्वज्ञ**

३ ಆಡಿ ಮಾಡದವನು ಅಧಮ. आडि माडदवनु अधम (माडद + अवनु) बोलून न करणारा अधम.

४ ದೇವರಿಗೆ ಅಂಜದ ಮನುಷ್ಯ. देवरिगे अंजद मनुष्य. देवाला न भिणारा मनुष्य.

५ ಗಂಡನ ಮಾತು ಕೇಳದ ಹೆಂಡತಿ. गंडन मातु केळद हेंडति. नवऱ्याचें बोलणें न ऐकणारी बायको.

६ ಜನರ ಹಿತವನ್ನು ನೋಡದ ಸರಕಾರ. जनर हितवन्नु नोडद सरकार. लोकांचें हित न पाहाणारें सरकार.

१ आपलें कर्तव्य न करणारे लोक. ತಮ್ಮ ಕರ್ತವ್ಯವನ್ನು ಮಾಡದ ಜನರು. तम्म कर्तव्यवन्नु माडद जनरु ( कर्तव्यवन्न ).

२ सभेंत न लाजणारीं (माणसें). ಸಭೆಯಲ್ಲಿ ನಾಚದವರು (ಜನರು). सभेयल्लि नाचदवरु. (नाचद+अवरु).

३ कांहीं न पिकणारी जमीन. ಏನೂ ಹುಟ್ಟದ ಭೂಮಿ. एनू हुट्टद भूमि. (एनू = कांहींहि)

४ बाजारांत न मिळणारी वस्तु. ಪೇಟೆಯಲ್ಲಿ ಸಿಗದ ವಸ್ತು. पेट्टे यल्लि सिगद वस्तु. ( प्याट्याग शिगद वस्तु ).

५ ही आम्हाला न येणारी गोष्ट. ಇದು ನಮಗೆ ಬರದ ಮಾತು. अिदु नमगे बरद मातु. ( .... नमग .... .... )

६ आम्हाला न आवडणारी घटना. ನಮಗೆ ಸೇರದ ಸಂಗತಿ. नमगे सेरद संगति. ( नमग शेरद संगति ).

## प्रकरण २५ वें

# भूतकृदन्त अव्ययांचीं ‘ प्रत्ययसिद्ध ’ नकाररूपें

मागें आपण मराठींतील ‘ जाअून ’ ‘ करून ’ या ‘ अून ’ कृदन्ताच्या अर्थाचीं कानडींतील ‘ होगि ’ (जाअून) ‘ माडि ’ (करून) हीं भूतकृदन्ताव्ययें पाहिलीं. आतां ‘ न जातां ’ ‘ न करतां ’ ह्या अर्थाचीं नकाररूपें कानडींत कशीं करतात तें पाहूं.

मराठींत ‘ न जातां ’ ह्यामध्यें ‘ न ’ व ‘ जातां ’ असे दोन शब्द योजावे लागतात; कानडींत धातूस फक्त ‘ अदे ’ हा प्रत्यय लावून हीं रूपें करतात.

अुदा:– होगु+अदे – होगदे = न जातां ( संधि ). माडदे = न करतां. अंजदे = न भितां. ‘ बरु ’ चीं मात्र बारदे व बरदे अशीं दोन रूपें होतात.

### शब्दचर्चा

थोडा - डी - डें — कडिमे. यत्न — यत्न. फल — फल — फलवु. आडु = बोलणें - खेळणें. परंतु बोलणें या अर्थीं व्यवहारिक भाषेंत 'माताडु' हा संयुक्त धातू वापरतात. ते बोलतात = अवरु माताडुत्तारे. ते खेळतात = अवरु आडुत्तारे. परंतु 'आडदे माडुववनु अुत्तम' = न बोलतां करणारा अुत्तम (मनुष्य). ह्या प्रमाणें कधींकधीं बोलणें ह्या अर्थीं सहायधातु न घेतांहि वापरतात.

'बोलणें' ह्या अर्थीं 'आडु' हा शब्द जास्त व्यापक आहे. माताडु = 'शब्द बोलणें' असा विशिष्टार्थक आहे. अुच्चारणें व बोलणें यांमधील फरकासारखा कांहींसा हा फरक आहे.

'आडु' हा धातु सहाय्यार्थ घेअून भूतकृदन्ताव्ययास जोडून संयुक्त क्रियापद करतात. (अुदा:– केळाडु = चार ठिकाणीं विचारणें). हें मागें आपण पाहिलेंच आहे. सरळ = नेट्टगे ह्या वरून 'नेटका' हा शब्द झाला असावा असें दिसतें. सुम्मने = १ स्वस्थ – २ अुगीचच – ३ विनाकारण. 'मला तो अुगीचच बोलतो' = ननगे अवनु सुम्मने माताडुत्ताने असें म्हणतात. पण रूढभाषेंत सुळ्ळऽ माताडतानऽ = 'खोटेंच' बोलतो असेंहि म्हणतात.

बेळगांव = बेळगांवि. कांहीं गांवांचीं नांवें कानडींत जराशीं निराळीं होतात. मराठींत विभक्ति प्रत्यय लागतांना गांवांच्या नांवांचेंहि सामान्यरूप होतें तें पुष्कळदां अन्यभाषिकांस लोकर कळत नाहीं. 'अकोल्यास' 'पुण्यास' ह्यांतील अकोल्या, पुण्या हें त्यांच्या चटकन् लक्षांत येत नाहीं.

मराठींत विशेषनामांचे देखील विभक्तिप्रत्यय (प्रथमेखेरीजचे) लावतांना सामान्यरूप होतें हेंहि अन्यभाषिकांच्या लोकर लक्षांत येत नाहीं. 'गोखले' हें नांव 'गोखल्यांकडे' ह्यांत 'गोखल्या' होतें ह्याची त्यांना मौज वाटते.

### वाक्य संग्रह

१ ಆಡದೆ ಮಾಡುವವರು ಉತ್ತಮರು. आडदे माडुववरु अुत्तम. न बोलतां करणारे (लोक) अुत्तम.

२ ಹೇಳದೆ ಕೇಳದೆ ಅವನು ಹೋದನು. हेळदे केळदे अवनु होदनु. न सांगतां न विचारतां तो गेला.

३ ನೋಡದೆ ಆಡಬೇಡ. नोडदे आडबेड. न पाहतां बोलूं नकोस.

४ ಯತ್ನ ಮಾಡದೆ ಫಲ ಸಿಗುವದಿಲ್ಲ. यत्न माडदे फल सिगुवदिल्ल. यत्न केल्याशिवाय फळ मिळत नाहीं.

५ ನಮ್ಮ ಮಗನು ಉಣ್ಣದೆ ಸಾಲೆಗೆ ಹೋದನು. नम्म मगनु अुण्णदे सालेगे होदनु. आमचा मुलगा न जेवतां ‘शाळेस’ गेला.

१ न बोलतां देणारा अुत्तम (मनुष्य). ಆಡದೆ ಕೊಡುವವನು ಉತ್ತಮನು. आडदे कोडुववनु अुत्तमनु. (आडदऽ कोडुवव< अुत्तम<)

२ न देतां बोलणारा अधम (मनुष्य). ಕೊಡದೆ ಆಡುವವನು ಅಧಮನು. कोडदे आडुववनु अधमनु.

३ धैर्य न सोडतां कर्तव्य करा. ಧೈರ್ಯವನ್ನು ಬಿಡದೆ ಕರ್ತವ್ಯವನ್ನು ಮಾಡಿರಿ. धैर्यवन्नु बिडदे कर्तव्यवन्नु माडिरि. (धैर्य< बिडदऽ कर्तव्यवन्नऽ माडरी)

४ मध्यें न थांबतां सरळ जा. ನಡುವೆ ನಿಲ್ಲದೆ ನೆಟ್ಟಗೆ ಹೋಗು. नडुवे निल्लदे नेट्टगे होगु. (नडुव निल्लदऽ नेट्टग होगु).

५ तो हुबळीस न राहतां येथें राहतो. ಅವನು ಹುಬ್ಬಳ್ಳಿಗೆ ಇರದೆ ಇಲ್ಲಿ ಇರುತ್ತಾನೆ. अवनु हुब्बळ्ळिगे अिरदे अिल्लि अिरुत्ताने. (अव< हुब्बळ्ळिगे अिरद अिल्ले अिरतानऽ).

६ न बोलावतां जाणाराचा अपमान होतो. ಕರೆಯದೆ ಹೋಗುವವನ ಅಪಮಾನ ಆಗುತ್ತದೆ. करेयदे होगुववन अपमान आगुत्तदे. (करीदऽ होगवनऽ अपमान आगतद).

७ मनांत तें न आणतां तुम्हीं या. ಮನಸ್ಸಿನಲ್ಲಿ ಅದನ್ನು ತರದೆ ನೀವು ಬರ್ರಿ. मनस्सिनल्लि अदन्नु तरदे नीवु बर्रि. (मनशिन्याग अदन्न तरद< नीवु बर्रि. (मनस्सिनोळग)

८ तुम्ही आमचें घरीं (घरास) न येतां गेलांत. ನೀವು ನಮ್ಮ ಮನೆಗೆ ಬರದೆ ಹೋದಿರಿ. नीवु नम्म मनेगे बरदे होदिरि. (नीवु नम्म- मनीगे बरदे होदरी).

९ तो न खातां न जेवतां न पीतां राहातो. ಅವನು ತಿನ್ನದೆ ಉಣ್ಣದೆ ಕುಡಿಯದೆ ಇರುತ್ತಾನೆ. अवनु तिन्नदे उण्णदे कुडियदे इरुत्तानॆ. (अव< तिन्नदऽ उण्णदऽ कुडियदऽ इरतानऽ).

१० तो कांहींहि न म्हणतां गप्प राहिला. ಅವನು ಏನೂ ಅನ್ನದೆ ಸುಮ್ಮನೆ ಇದ್ದನು. अवनु एनू अन्नदे सुम्मनॆ इद्दनु. (अव< एनू अन्नद सुम्मन इद्द< ).

---

## प्रकरण २६ वें

# आज्ञार्थ वाक्यांचीं नकार रूपें

'तूं कर' 'तुम्ही करा' ह्या अर्थाचीं 'नीनु माडु' 'नीवु माडिरि' हीं आज्ञार्थ वाक्यें आपण मागें शिकलों. आतां ह्यांचीं नकाररूपें 'करूं नकोस' 'करूं नका' ह्या अर्थाचीं कशीं करतात तें पाहूं.

**खालील वाक्यें पहाः---**

तूं करूं नकोस; तुम्ही करूं नका; 'करूं' हें 'उं कृदन्त' व 'नको' हें क्रियापद आहे. कानडींत हीं रूपें धातूच्या पहिल्या प्रकारच्या भावरूपास 'बेड' म्हणजे 'नको' हें क्रियापद लावून करतात. बेड चें 'बेडिरि' (नका) हें बहुवचनीं रूप होय. ('बेड' हें स्वतंत्रपणें अव्यय क्रियापद आहें).

**वाक्य संग्रह**

१ ದುಷ್ಟರ ಸಂಗತಿಯಲ್ಲಿ ಇರಬೇಡ. दुष्टर संगतियल्लि इरबेड. (बॅड<) दुष्टांच्या संगतींत राहूं नकोस.

२ ಸುಳ್ಳು ಹೇಳಬೇಡ. सुळ्ळु हेळबेड. (बॅड) खोटें सांगूं नकोस.

३ ಸಿಟ್ಟಿನ ಕೈಯಲ್ಲಿ ಬುದ್ಧಿಯನ್ನು ಕೊಡಬೇಡ. सिट्टिन कैयल्लि बुद्धियन्नु कॊडबेड. (बॅड<) रागाच्या हातीं बुद्धि देऊं नकोस.

४ ಶತ್ರುಗಳನ್ನು ನಂಬಬೇಡ. शत्रुगळन्नु नंबबेड. (बॅड<). शत्रूनां 'विश्वासूं' नकोस. (शत्रूंवर विश्वास ठेवूं नकोस).

५ ಕೇಳದೆ ಹೇಳಬೇಡಿರಿ. केळदु हेळबेडिरि (बॅडरि). न-विचारतां सांगू नका.

६ ಕರ್ತವ್ಯವನ್ನು ತಪ್ಪಿಸಬೇಡಿರಿ. कर्तव्यवन्नु तप्पिसबेडिरि. (बॅडरि). कर्तव्य चुकवूं नका.

१ मला न सांगतां जाऊं नकोस. ನನಗೆ ಹೇಳದೆ ಹೋಗಬೇಡ. ननगु हेळदु होगबेड. (ननग हेळदऽ होगबॅड<).

२ आत्मस्तुति करूं नकोस. ಆತ್ಮಸ್ತುತಿಯನ್ನು ಮಾಡಬೇಡ. आत्मस्तुतियन्नु माडबेड. (आत्मस्तुति माड बॅड<).

३ लोकांची निंदा करूं नकोस. ಜನರನ್ನು ನಿಂದಿಸಬೇಡ. जनरन्नु निंदिसबेड (बॅड<).

४ आम्हांस दोष देऊं नका. ನಮಗೆ ದೋಷವನ್ನು ಕೊಡಬೇಡಿರಿ. नमगु दोषवन्नु कोडबेडिरि. (नमग दोष कोडबॅडरि).

५ विस्तवाजवळ जाऊं नका. ಬೆಂಕಿಯ ಹತ್ತರ ಹೋಗಬೇಡಿರಿ. बेंकिय हत्तर होगबेडरि. (बेंकी हत्तर होगबॅडरि).

६ गरीबांचा तिरस्कार करूं नका. ಬಡವರನ್ನು ತಿರಸ್ಕರಿಸಬೇಡಿರಿ. बडवरन्नु तिरस्करिस बेडिरि. (बडवरन्न तिरस्करिस ब्याडरी).

---

## प्रकरण २७ वें

## विध्यर्थवाक्यें

**खालील वाक्यें पहा :--**

१ मी करावें; आम्ही करावें. २ तूं करावें; तुम्ही करावें.

३ त्यानें करावें; त्यानीं करावें.

वरील वाक्यें 'कर्तव्य' सूचक किंवा विनंतिसूचक 'विध्यर्थ वाक्यें' आहेत.

(मराठींतील 'आज्ञार्थ' वाक्येंहि कानडींत विध्यर्थाखालींच समाविष्ट केलेलीं आढळतात. 'विधि' म्हणजे 'आज्ञा' असाहि अर्थ आहे, हें त्याचें कारण असेल; परंतु आपण मागील प्रकरणांतून तीं स्वतंत्रपणेंच पाहिलीं आहेत).

'कर्तव्य' सूचक विध्यर्थवाक्यें कानडींत धातूच्या पहिल्याप्रकारच्या भावरूपास 'बेकु' (पाहिजे) हें अव्ययक्रियापद जोडून करतात.

होगु – होग (भावरूप) नानु होगबेकु; नावु होगबेकु. नीनु होगबेकु; नीवु होगबेकु. अवनु होगबेकु; अवरु होगबेकु. 'बेकु' हें 'अव्यक्रियापद' जोडल्यामुळें सर्व लिंगीं, सर्व पुरुषीं, व दोन्ही वचनीं 'होगबेकु' हेंच रूप येतें.

भावरूपास 'तक्कद्दु' हा शब्द लावून दुसऱ्या अेका तऱ्हेनेंहि हीं वाक्यें करतात. 'होगतक्कद्दु' = जाणें योग्य आहे.

नानु – नावु होगतक्कद्दु = मी – आम्ही जाणें योग्य आहे.

नीनु – नीवु होगतक्कद्दु = तूं – तुम्ही जाणें योग्य आहे.

अवनु - अवळु - अवरु होगतक्कद्दु = त्यानें तिनें त्यांनीं जाणें योग्य आहे.

**विध्यर्थाचा आणखी एक प्रकार:–**

धातूच्या तिसऱ्या प्रकारच्या भावरूपास 'बेकु' लावल्यानें अमुक गोष्ट 'करायला पाहिजे' असा अर्थ होतो. होगु – होगलिक्के (तिसरें भावरूप) नीनु होगलिक्के बेकु = तुम्ही जायला पाहिजे. धातूंच्या पहिल्या भावरूपास (होग, माड,) ह्या 'बहुदु' हा शब्द लावल्यानें 'संभव' किंवा 'परवानगी' सुचविली जाते. (मराठींतहि संभवार्थ विध्यर्थामध्यें च येतो. अुदा:– तो जात असावा).

संभवार्थक:– होगु - होग (भावरूप) नानु – नावु होगबहुदु = मी – आम्ही जाण्याचा संभव आहे. नीनु – नीवु होगबहुदु = तूं - तुम्ही जाण्याचा संभव आहे. अवनु – अवरु – अवळु – अदु होगबहुदु = तो – ते – ती – तें जाण्याचा संभव आहे.

**परवानगी :–** नीनु होगबहुदु = तूं जाण्यास हरकत नाहीं. (you may go)

नीवु बरबहुदु = तुम्ही येण्यास हरकत नाहीं. (you may come).

आणखी अेका प्रकारचीं कानडी संभवार्थक रूपें खालील प्रत्यय लावून होतात.

| | अेकवचन | बहुवचन |
|---|---|---|
| प्र. पु. | अेनु | अेवु |
| द्वि. पु. | अी | अीरि |
| तृ. पु. पु. | आनु | आरू |
| ,, स्त्री. | आळु | आरू |
| ,, न. | अीतु | आवु |

हें प्रत्यय लावतांना 'अि' आगम येतो. अुदा:– होगु + अि + आनु = होगियानु. कांहीं धातूंना 'द' आगम येतो. नुडि (बोलणें) नुडि+द+आनु = नुडिदानु: 'त्याला जाअूं दे' 'परमेश्वर तुमचें कल्याण करो' ह्या अर्थाचीं वाक्यें आपण नवव्या प्रकरणांत पाहिलीं आहेत.

## वाक्यसंग्रह

१ ನೀವು ನಮ್ಮ ಮನೆಗೆ ಬರಬೇಕು. नीवु नम्म मनेगॆ बरबेकु. तुम्ही आमचें घरीं (घरास) यावें.

२ ನೀವು ಕೆಲಸವನ್ನು ಮಾಡಬೇಕು. नीवु कॆलसवन्नु माडबेकु तुम्ही काम करावें.

३ ನಾವು ತಾಯಿತಂದೆಗಳ ಮಾತನ್ನು ಕೇಳತಕ್ಕದ್ದು. नावु तायितंदॆगळ मातन्नु केळतक्कद्दु. आम्ही आअी बापांचें बोलणें अेकणें योग्य आहे.

४ ನೀನು ಶಾಲೆಗೆ ಹೋಗತಕ್ಕದ್ದು. नीनु सालॆगॆ होगतक्कद्दु. तूं शाळेस जाणें योग्य आहे.

५ ನೀವು ಈ ಕೆಲಸವನ್ನು ಮಾಡಲಿಕ್ಕೆ ಬೇಕು. नीवु अी कॆलसवन्नु माडलिक्कॆ बेकु. तुम्ही हें काम करायला पाहिजे.

६ ನೀವು ನಮ್ಮ ಊರಿಗೆ ಬರಲಿಕ್ಕೆ ಬೇಕು. नीवु नम्म अूरिगॆ बरलिक्कॆ बेकु. तुम्ही आमच्या गांवास यायला पाहिजे.

७ ನೀನು ಒಳಗೆ ಬರಬಹುದು. नीनु ऒळगॆ बरबहुदु. तूं आंत येण्यास हरकत नाहीं. (किंवा) तूं आंत येण्याचा संभव आहे.

८ ನೀವು ಅರ್ಜಿ ಮಾಡಬಹುದು. नीवु अर्जि माडबहुदु. तुम्ही अर्ज करण्यास हरकत नाहीं.

## प्रकरण २८ वें

# विध्यर्थाचीं नकाररूपें

**खालील वाक्यें पहा:-**

तूं जाऊं नयेस - तुम्ही करूं नये. आम्ही करूं नये आम्ही करतां कामा नये. ह्या अर्थाचीं कानडी रूपें शिकूं. हीं तीन प्रकारांनीं करतात:—

(१) धातूच्या पहिल्या भावरूपास 'बारदु' हा शब्द लावून:— नीनु होगबारदु — तूं जाऊं नयेस. 'बारदु' हें क्रियापद 'बरू' चें लघु नकार रूप असून सर्वपुरुषी - सर्वलिंगी व उभय वचनी' चालतें (परंतु होग - माड वगैरे भावरूपास जोडून तें येतें म्हणून स्वतंत्रपणें 'अव्ययक्रियापद' या वर्गांत येत नाहीं)

(२) गेल्या प्रकरणांत आलेल्या 'होगतक्कदु' ह्या रूपास 'अल्ल' - (नव्हे) हें अव्ययक्रियापद जोडून:-- नीवु होगतक्कदल्ल = तुम्ही जातां कामा नये.

(३) धातूच्या पहिल्या भावरूपास 'कूडदु' हा शब्द लावून — नीवु होग-कूडदु = तुम्ही जातां कामा नये.

### वाक्यसंग्रह

१ दुष्टाची संगत धरूं नये. ದುಷ್ಟರ ಸಂಗತಿಯನ್ನು ಹಿಡಿಯ-ಬಾರದು. दुष्टर संगतियन्नु हिडिय बारदु. (संगती हिडी बारदु). (संगति = संगत).

२ शत्रूंच्यावर विश्वास ठेवूं नये. (विश्वासूं नये). ಶತ್ರುಗಳನ್ನು ನಂಬಬಾರದು. शत्रुगळन्नु नंबबारदु.

३ येथें धूम्रपान करतां कामा नये. ಇಲ್ಲಿ ಧೂಮ್ರಪಾನವನ್ನು ಮಾಡಕೂಡದು. अल्लि धूम्रपानवन्नु माडकूडदु. (अिल्ले)

४ तुम्ही असें करणें योग्य नाहीं. ನೀವು ಹೀಗೆ ಮಾಡತಕ್ಕದ್ದಲ್ಲ. नीवु हीगे माडतक्कद्दल्ल. (हींग्ऽ)

## प्रकरण २९ वें

# क्रियापदाचीं प्रत्ययसिद्ध लघु नकाररूपें.

आपण मागें अवनु होगुवदिल्ल (तो जात नाहीं), माडुवदिल्ल (करीत-नाहीं) वगैरे नकाररूपें पाहिलीं. याच अर्थाचीं प्रत्ययसिद्ध नकाररूपेंहि आहेत. परंतु हीं रूपें विशेषेंकरून जुन्या वाङ्मयीन भाषेंत व म्हणींतून आढळतात. खालील लघु नकाररूपें मात्र प्रचलित भाषेंत रूढ आहेत :–

(१) ओल् (अिच्छिणें) या धातूचीं लघु नकार रूपें (पुढें पहा)

(२) 'अिल्ल' 'अल्ल', बेड हीं (लघु नकाररूपेंच असलेलीं) अव्यय क्रियापदें (प्रकरण २२ पहा).

(३) 'होगलारनु' (तो जाअूं शकत नाहीं) या मधील भावरूपास जोडण्याचें 'आरु' धातूचें 'आरनु' हें लघु नकाररूप (प्रकरण ३१ पहा)

हीं लघु नकाररूपें धातूस खालील प्रत्यय लाविल्यानें होतात.

| | अेकवचन | बहुवचन |
|---|---|---|
| प्र. पु. | अेनु | अेवु |
| द्वि. पु. | अे | अरि |
| तृ. पु. (पु.) | अनु | अरु |
| तृ. पु. (स्त्री) | अळु | अरु |
| तृ. पु. (न) | अदु | अवु |

अुदा:- होगु होगेनु होगेवु, होगे होगरि, होगनु, होगळु, होगदु, होगरु.

**माडु** – माडेनु (मी करीत नाहीं) माडेवु (आम्ही करीत नाहीं). माडे (तूं करीत नाहींस) माडरि (तुम्ही करीत नाहीं). माडनु (तो करीत नाहीं), माडळु (ती करीत नाहीं), माडदु (तें करीत नाहीं), माडरु-(ते, त्या, तीं करीत नाहींत).

**कुडि (यु) = पिणें.** कुडियेनु, कुडियेवु. कुडिये, कुडियरि. कुडियनु, कुडियळु, कुडियदु, कुडियरु. **करे (यु) = बोलावणें** करेयेनु, करेयेवु. करेये, करेयरि. करेयनु, करेयळु, करेयदु करेयरु.

वरील नकार रूपांसंबंधानें विशेष सूचनाः

हें रूप 'आख्येय व्यक्ती'चा अुल्लेख न करतां 'होगनु' म्हणजे 'तो जात नाहीं' अितका अर्थ होण्याअितकें सुटसुटीत आहे खरें, पण,

द्वितीय पुरुषीं आज्ञार्थी प्रत्यय 'अिरि' व नकारार्थी प्रत्यय 'अरि' ह्या दोन्हींमध्यें घोटाळा होण्याचा संभव आहे तरी माड+अिरि='माडिरि' आणि माड+अरि='माडरि' ह्या मधील फरक लक्षांत घ्यावा.

द्वि. पु. बहुवचनी आज्ञार्थ रूप मुखभाषेंत 'माडिरि' असें न अुच्चारतां 'माडरि' असें अुच्चारतात तरी 'करा' ह्या अर्थाचें 'माडरि' हें मुखभाषिक रूप व करूं नका ह्या अर्थाचें 'माडरी' हें रूप हीं दोन्ही सारखींच असल्यामुळें विद्यार्थ्यांनीं ध्यानांत घ्यावें कीं ह्या धड्यांतलीं नकार रूपें विशेषेंकरून लेखभाषिक आहेत.

ओल् = अिच्छिणें, मनांत असणें, या धातूचीं नकार रूपें. प्र. ओल्ले-(नु) (मी अिच्छीत नाहीं), ओल्लेवु (आम्ही अिच्छीत नाहीं). द्वि. ओल्ले (तूं अिच्छीत नाहींस), ओल्लरि (तुम्ही अिच्छीत नाहीं). तृ. ओल्ल (नु) (तो अिच्छीत नाहीं), ओल्लळु (ती अिच्छी नाहीं), ओल्लदु (तें अिच्छीत नाहीं), ओल्लरु (ते, त्या, ती अिच्छीत नाहींत).

ओल्‌चीं नकार रूपें व्यवहारांतहि वरचेवर येतातः– नानु ओल्ले – मी अिच्छीत नाहीं, मला नको; ना ओल्ले होगु – 'मी नाहीं जा' (रुसून किंवा रागावून म्हटल्या सारखें). 'ओल्' चीं हीं नकार रूपें कोणत्याहि धातूच्या भावरूपास लागून खालील प्रमाणें रूपें होतात अुदाः– 'होगु'

(१) पहिल्या प्रकारच्या भावरूपास लागून – होग+ओल्लनु = होगवल्लनु (तो जाअीना) याचें होगवल्ल (नु) असेंहि रूप मुखभाषेंत रूढ आहे. मराठींतील 'तो जाअीना' प्रमाणेंच 'होगवल्ल' चे दोन अर्थ आहेत. १ होगवल्ल – तो जाअीना (He would not go). २ होगवल्ल< – 'तो जाअीना का' (गेला तर गेला).

(२) दुसऱ्या प्रकारच्या भावरूपास लागून – होगलु+ओल्लनु = होगलोल्लनु – तो जाअूं अिच्छीत नाहीं, तो जाअीना. बायिंद मातु होरडलोल्लवु = त्याच्या तोंडून शब्द निघेनात.

(३) तिसऱ्या प्रकारच्या भावरूपास लागून – होगलिक्कु + ओल्लनु = होगलिक्कोल्लनु किंवा संधि न करतांहि होगलिक्कु ओल्ल(नु) – त्यांला जायला नको. अवनु (अव<) अभ्यास माडलिक्कु ओल्ल (वल्ल<) 'त्याला अभ्यास करायला नको'.

**आगु = होणें.** अवनिंद अदु आगवोल्लदु = त्याच्यानें तें होईना. 'याकागवोल्लदु' – (शब्दशः) = 'कां तें होईना' – बरें आहे; 'कां नाही होणार' 'why not' या अर्थी संभाषणांत वापरतात.

**बरु = येणें** या धातूचीं लघु नकार रूपें 'ब'चा 'बा' होऊन होतात बारनु, बारळु, बारदु, वगैरे (कधीकधीं बरनु, बरळु, बरदु, अशींहि होतात). 'होगबारदु' या विध्यर्थाच्या नकाररूपामधील 'बारदु'चा उल्लेख गेल्या प्रकरणीं आला आहे.

टीपः– या प्रकरणांतील प्रत्ययसिद्ध लघुनकार रूपें 'सर्वकालिक' असल्यासारखीं आहेत. उदाः– अवनु होगनु = १ तो जाईना, (He would not go) २ तो जात नाहीं, ३ तो जाणार नाहीं. म्हणून यांचा 'काळ' संदर्भावरून जाणावा लागतो.

## वाक्यसंग्रह

१ ಈ ಮಾತು ನಿಮಗೆ ಶೋಭಿಸದು. अी मातु निमगे शोभिसदु. हें बोलणें तुम्हांस शोभत नाहीं – शोभणार नाहीं.

२ ಜನರು ಹೀನಗುಣವನ್ನು ಬಿಡರು. जनरु हीन गुणवन्नु बिडरु. लोक हीन गुण 'सोडीत' नाहींत (टाकीत नाहींत).

३ ತಾನು ಕುಡಿಯನು ಕುಡಿಯುವವರಿಗೆ ಬಿಡನು. तानु कुडियनु कुडियुववरिगे बिडनु. आपण पीत नाहीं पिणारांस 'सोडीत' नाहीं (पिऊं देत नाहीं).

४ ದೇವರು ಕೊಟ್ಟರೂ ಪೂಜಾರಿ ಕೊಡನು. देवरु कोट्टरू पूजारि कोडनु. देवानें दिलें तरी पुजारि देईना. कोट्टरू = 'दिलें तरी'.

५ ಇದನ್ನು ಸೂಚಿಸದೆ ನಾನು ಇರೆನು. अिदन्नु सूचिसदे नानु अिरेनु. हें सुचविल्याशिवाय मी रहात नाहीं.

६ ಅವನು ಕಠೋರ ಮಾತುಗಳನ್ನು ಆಡನು. अवनु कठोर मातुगळन्नु आडनु. तो कठोर शब्द अुच्चारीना.

७ ವಿಧಿಲಿಖಿತವು ತಪ್ಪದು. विधिलिखितवु तप्पदु. 'विधिलिखित' टळत नाहीं. तप्पु = चुकणें, टळणें.

८ ಮತಿಗೆಟ್ಟು ಕೆಡಬೇಡ ಮುಂದೆ ಮರಣವು ತಪ್ಪದು. मतिगेट्टु केडबेड मुंदे मरणवु तप्पदु. 'बुद्धिनाश होअून बिघडूं नकोस पुढें मरण टळत नाहीं. (पुरंदरदास)

९ ತುಂಬಿದ ಕೊಡವು ತುಳುಕದು. तुंबिद कोडवु तुळुकदु. भरलेली घागर डचमळत नाहीं. तुळुकु = डचमळणें, खळखळणें, 'तुंबु-भरणें'.

१० ಸಂಕಟವು ಬಾರದೆ ಇರದು. संकटवु बारदे अिरदु. संकट आल्याशिवाय राहणार नाहीं.

---

## प्रकरण ३० वें

# शक्यतार्थक वाक्यें.

**खालील वाक्यें पहा:**

मी तें काम करूं शकतों (I can do it) मी जाअूं शकतों (I can go)

मी तें करूं शकतों ह्याचा अर्थ, मला तें करायला येतें, तें करण्यास मी **समर्थ** आहे, तें करायचें मी जाणतों, असा होतो.

मराठींत हीं वाक्यें धातूच्या 'अु कृदंतास' 'शकणें' धातूचें आख्यात रूप लावून करतात. हीं वाक्यें कानडींत धातूच्या पहिल्या भावरूपास 'बल्' म्हणजे 'समर्थ असणें', ह्या अर्थाच्या धातूचीं आख्यात रूपें जोडून करतात.

'बल्' धातू प्राचीन कानडींतला असून त्याचीं खालील आख्यात रूपें (प्राचीन कानडी तऱ्हेनें झालेलीं) मात्र आज प्रचारांत आहेत.

प्र. पु. बल्लेनु, बल्लेवु. द्वि. पु. बल्ले, बल्लिरि. तृ. पु. -

(पु) बल्लनु, बल्लरु. (स्त्री) बल्लळु, बल्लरु. (न) बल्लदु, (किंवा 'बल्लुदु') बल्लरु.

हीं वर्तमान कालिक आख्यात रूपें आहेत. होगु - होग (भावरूप) होगबल्लेनु, होगबल्लेवु, वगैरे. माडु – माड (भावरूप) माडबल्लेनु, माडबल्लेवु, वगैरे. 'बल्' चीं अितर आख्यात रूपें नाहींत; वर दिलेलीं रूपें फक्त वर्तमान व क्वचित् भविष्य काळासंबंधानें वापरतां येतात. 'बल्' चीं भूतकालिक वगैरे रूपें नसल्यामुळें 'बल्' चा अुपयोग करून 'तो करूं शकला नाहीं' ह्या अर्थीं वाक्य करतां येणार नाहीं.

'बल्' चीं वरील रूपें भावरूपास न जोडतां स्वतंत्रपणें 'जाणणें' या अर्थीं वापरतात. अवनु बल्लनु = तो जाणतो. बल्लव = जाणणारा.

**वाक्यसंग्रह**

१ तो गाअूं शकतो. ಅವನು ಹಾಡ ಬಲ್ಲನು. अवनु हाड बल्लनु. (अव< हाड बल्ल<).

२ ती बोलूं शकते. ಅವಳು ಮಾತಾಡಬಲ್ಲಳು. अवळु माताडबल्लळु.

३ आम्ही जाअूं शकतों. ನಾವು ಹೋಗಬಲ್ಲೆವು. नावु होगबल्लेवु.

४ तुम्ही तें काम करूं शकतां. ನೀವು ಆ ಕೆಲಸವನ್ನು ಮಾಡಬಲ್ಲಿರಿ. नीवु आ कॆलसवन्नु माडबल्लिरि. (कॆलस< .... ....).

५ तो चालूं शकतो. ಅವನು ನಡೆಯಬಲ್ಲನು. अवनु नडॆयबल्लनु. (अव< नडॆयबल्ल<).

६ ते मराठी लिहूं शकतात. ಅವರು ಮರಾಠೀ ಬರೆಯಬಲ್ಲರು. अवरु मराठी बरॆयबल्लरु.

७ मी कानडी समजूं शकतों. ನಾನು ಕನ್ನಡ ತಿಳಿಯಬಲ್ಲೆನು. नानु कन्नड तिळियबल्लेनु. (ना कन्नड तिळीबल्ले).

८ मी कानडी वाचूं शकतों. ನಾನು ಕನ್ನಡ ಓದಬಲ್ಲೆನು. नानु कन्नड ओदबल्लेनु. (ना कन्नड ओदबल्ले).

'भावरूपास' न जोडतां स्वतंत्रपणें ('जाणणें' या अर्थीं) 'बल्' च्या आख्यातरूपांचा अुपयोग:—

१ ಅವನು ರತ್ನದ ಪರೀಕ್ಷೆಯನ್ನು ಬಲ್ಲನು. अवनु रत्नद परीक्षेयन्नु बल्लनु. तो रत्नाची परीक्षा जाणतो.

२ ಕಳ್ಳನ ಹೆಜ್ಜೆಯನ್ನು ಕಳ್ಳ ಬಲ್ಲ(ನು). कळ्ळन हेज्जेयन्नु कळ्ळ बल्ल(नु). चोराचीं पाउलें चोर जाणतो. हेज्जे = पाउलें, कळ्ळ = चोर.

३ ಕೋಪಿ ಬಲ್ಲನೆ ದಾನಧರ್ಮದ ಗುಣವನ್ನು? कोपि बल्लने दानधर्मद गुणवन्नु? कोपी मनुष्य जाणेल काय दानधर्माचा गुण? बल्लनु+ए = बल्लने?

४ ಸೂಳೆ ಬಲ್ಲಳೆ ವಿಟನ ಬಡತನ? सूळे बल्लळे विटन बडतन? वेश्या जाणेल का विटाची गरीबी? बल्लळु+ए = बल्लळे?

५ ಎಲ್ಲವನ್ನು ಬಲ್ಲೆನು ಅನ್ನುವವರು ಮೂರ್ಖರು. अेल्लवन्नु बल्लेनु अन्नुववरु मूर्खरु. मी सर्व जाणतों म्हणणारे - ते मूर्ख. अन्नुववरु = 'म्हणणारे - ते'. बल्लव(नु) = जाणणारा, बल्लवळु = जाणणारी ती.

६ ಊಟ ಬಲ್ಲವನಿಗೆ ರೋಗವಿಲ್ಲ ಮಾತು ಬಲ್ಲವನಿಗೆ ಜಗಳವಿಲ್ಲ. अूट बल्लवनिगे रोगविल्ल मातु बल्लवनिगे जगळविल्ल. जेवण जाणणारास रोग नाहीं, बोलणें जाणणारास भांडण नाहीं—म्हण.

७ ಎಲ್ಲವನ್ನು ಬಲ್ಲವರಿಲ್ಲ ಬಲ್ಲವರು ಬಹಳಿಲ್ಲ – ಸರ್ವಜ್ಞ. अेल्लवन्नु बल्लवरिल्ल बल्लवरु बहळिल्ल-**सर्वज्ञ**. 'सर्व जाणणारे' नाहींत, जाणणारे' फार नाहींत.

८ ಪರಪ್ರಾಂತಿಕ ಭಾಷೆಯನ್ನು ಬಲ್ಲವರು ಆ ಭಾಷೆಯಲ್ಲಿಯ ಉತ್ತಮ ಸಾಹಿತ್ಯವನ್ನು ಭಾಷಾಂತರಿಸಿ ನಮಗೆ ಅದರ ಪರಿಚಯವನ್ನು ಮಾಡಿ ಕೊಡಬೇಕು. पर प्रांतिक भाषेयन्नु बल्लवरु आ भाषेयल्लिय अुत्तम साहित्यवन्नु भाषांतरिसि नमगे अदर परिचयवन्नु माडिकोडबेकु. परप्रांतीय भाषा जाणणारांनीं त्या भाषेंतील अुत्तम साहित्य 'भाषांतरून' आम्हांस त्याचा परिचय 'करून द्यावा'.

९ ಅನೇಕ ಭಾಷೆಗಳನ್ನು ಬಲ್ಲವರು ಭಾಷೆಗಳ ತುಲನಾತ್ಮಕ ಅಭ್ಯಾಸ ಮಾಡಬೇಕು. अनेक भाषेगळन्नु बल्लवरु भाषेगळ तुलनात्मक अभ्यास माडबेकु. अनेक भाषा जाणणारांनीं भाषांचा तुलनात्मक अभ्यास करावा.

## प्रकरण ३१ वें

# शक्यतार्थी नकाररूपें

मागील धड्यांत 'मी जाऊं शकतों' ह्या अर्थाचीं (नाउ) होगबल्लेनु सारखीं रूपें पाहिलीं. आतां 'मी करूं शकत नाहीं' ह्या अर्थाचीं नकाररूपें पाहू :—

मराठींत हीं नकार रूपें मी + करूं ('ऊं' कृदन्त) + शकत ('त'-कृदन्त) नाहीं, ह्याप्रमाणें करतात.

कानडींत 'आरु' म्हणजे 'समर्थ असणें' असा अेक धातू आहे; ह्या धातूचीं 'प्रत्ययसिद्ध' लघु नकाररूपें खालीलप्रमाणें होतात:—

आरेनु, आरेवु. मी समर्थ नाहीं, आम्ही समर्थ नाहीं. आरे, आररि- तूं समर्थ नाहींस, तुम्ही समर्थ नाहीं. आरनु, आरळु, आरदु, आररु, आरवु- तो, ती, तें, समर्थ नाहीं, ते, त्या, तीं, समर्थ नाहींत.

'आरु' चीं हीं लघु नकाररूपें अेखाद्या धातूच्या दुसऱ्या भावरूपास लाविलीं म्हणजे शक्यतार्थी नकाररूपें होतात. अुदा:— माडु (करणें), माडलु = करण्यास (दुसरें भावरूप) माडलु + आरेनु = माडलारेनु. ह्याप्रमाणें माडु चीं सर्व रूपें:— माडलारेनु (मी करूं शकत नाहीं), माडलारेवु (आम्ही करूं शकत नाहीं). माडलारे (तूं करूं शकत नाहींस), माडलाररि (तुम्ही करूं शकत नाहीं). माडलारनु (तो करूं शकत नाहीं), माडलारळु (ती करूं शकत नाहीं), माडलारदु (तें करूं शकत नाहीं), माडलाररु (ते, त्या, तीं, करूं शकत नाहींत).

टीप:- (१) आरेनु आरेवु वगैरे 'आरु' चीं लघु नकार रूपें मुख्य धातूचें 'सहायक्रियापद' म्हणून मात्र वापरतात:— अुदा: अवनु माडलारनु (तो करूं शकत नाहीं). परंतु 'आरनु' म्हणजे 'तो समर्थ नाहीं' ह्या अर्थी स्वतंत्र-पणें क्रियापद म्हणून मात्र वापरीत नाहींत.

(२) तृतीय पुरुषी बहुवचनी आख्यातरूपें मात्र सर्व लिंगी सारखींच आहेत. पण अितरपुरुषी रूपें आख्येय व्यक्तीच्या लिंगवचना प्रमाणें निर-

निराळीं असल्यामुळें आख्येयनाम किंवा सर्वनाम अुल्लेखिलें नाहीं तरी चालतें.

अुदाः— माडलारनु = तो करूं शकत नाहीं.

### वाक्य संग्रह

१ ನಾವು ಬರಲಾರೆವು. नावु बरलारेवु. आम्ही येअुं शकत नाहीं.

२ ನಾನು ಹೋಗಲಾರೆನು. नानु होगलारेनु. मी जाअुं शकत नाहीं.

३ ನಾನು ಆ ಕೆಲಸವನ್ನು ಮಾಡಲಾರೆನು. नानु आ केलसवन्नु माडलारेनु (माडलारे). मी तें काम करूं शकत नाहीं.

४ ನಾವು ಕೊಡಲಾರೆವು. नावु कोडलारेवु. आम्ही देअुं शकत नाहीं

५ ಅವರು ಮಾತಾಡಲಾರರು. अवरु माताडलाररु. ते बोलूं शकत नाहींत.

१ मी गाअुं शकत नाहीं. ನಾನು ಹಾಡಲಾರೆ. नानु हाडलारे.

२ मी हें स्वीकारूं शकत नाहीं. ನಾನು ಇದನ್ನು ಸ್ವೀಕರಿಸಲಾರೆ. नानु अिदन्नु स्वीकरिसलारे.

३ आम्ही तें 'प्रकाशूं' शकत नाहीं. ನಾವು ಅದನ್ನು ಪ್ರಕಾಶಿಸಲಾರೆವು. नावु अदन्नु प्रकाशिसलारेवु.

४ तुम्ही जाअुं शकत नाहीं. ನೀವು ಹೋಗಲಾರರಿ. नीवु होगलाररि.

५ आम्ही गांवाला येअुं शकत नाहीं. ನಾವು ಊರಿಗೆ ಬರಲಾರೆವು. नावु अूरिगे बरलारेवु.

---

## प्रकरण ३२ वें

# पूर्ण भूतकाळाचीं रूपें

'तो गेला होता' अशा अर्थाचीं पूर्ण भूतकाळाचीं रूपें पाहूं. हीं रूपें मराठींत मुख्य धातूच्या भूतकाळाच्या रूपापुढें 'असणें' चें भूतकाळाचें रूप वापरून करतात. अुदाः— तो गेला + होता. कानडींत हें रूप मुख्य धातूचें भूतकृदन्तास (मराठींतील अून कृदन्ताच्या अर्थाचें 'होगि' = जाअून, माडि = करून,

वगैरेस), 'अिरु' म्हणजे 'असणें' ह्या धातूचीं भूतकालिक आख्यातरूपें जोडून करतात. हीं रूपें आपण पाहिलींच आहेत.

**होगुः**– होगिद्देनु = मी गेलों होतों, होगिद्देवु = आम्ही गेलों होतों. होगिद्दि = तूं गेला होतास, होगिद्दिरि = तुम्ही गेलां होतां. होगिद्दनु = तो गेला होता, होगिद्दरु = ते गेले होते. होगिद्दळु = ती गेली होती, होगिद्दरु = त्या गेल्या होत्या. होगित्तु = तें गेलें होतें, होगिद्दवु = तीं गेलीं होतीं.

तृ. पु. बहुवचनाखेरीज अितर सर्व रूपें आख्येयाप्रमाणें निरनिराळीं असल्यानें आख्येयनाम किंवा सर्वनाम वगळून हि पुरुष लिंग व वचन सुचविलीं जातात.

## वाक्य संग्रह

१ मी तुमच्या घरीं (घरास) गेलों होतों. ನಾನು ನಿಮ್ಮ ಮನೆಗೆ ಹೋಗಿದ್ದೆನು. नानु निम्म मनॆगॆ होगिद्देनु. (ना निम्म मनीगॆ होगिद्दे).

२ तुम्ही बाहेर गेलां होतां. ನೀವು ಹೊರಗೆ ಹೋಗಿದ್ದಿರಿ. नीवु हॊरगॆ होगिद्दिरि. (नीवु हॊरग होगिद्रि).

३ आम्ही तुम्हास सांगितलें होतें. ನಾವು ನಿಮಗೆ ಹೇಳಿದ್ದೆವು. नावु निमगॆ हेळिद्देवु. (नावु निमग हेळिद्दिवि).

४ त्यांनीं आम्हास पत्र लिहिलें होतें. ಅವರು ನಮಗೆ ಪತ್ರವನ್ನು ಬರೆದಿದ್ದರು. अवरु नमगॆ पत्रवन्नु बरॆदिद्दरु. (अवरु नमग पत्र < बरदिद्दरु).

५ त्यास मी अुत्तर 'घातलें' होतें. ನಾನು ಅದಕ್ಕೆ ಉತ್ತರವನ್ನು ಹಾಕಿದ್ದೆನು. नानु अदक्कॆ अुत्तरवन्नु हाकिद्देनु. (ना अदक्क अुत्रा हाकिद्दे)

६ बाजारांत चांगली भाजी आली होती. ಪೇಟೆಯಲ್ಲಿ ಚಲೋ ಪಲ್ಲೆ ಬಂದಿತ್ತು. पेटॆयल्लि चलो पल्ले बंदित्तु. (पॅट्याग छलो पल्लेऽ बंदित्तु).

७ त्यांनीं आम्हास जेवावयास बोलावलें होतें. ಅವರು ನಮಗೆ ಊಟಕ್ಕೆ ಕರೆದಿದ್ದರು. अवरु नमगॆ अूटक्कॆ करॆदिद्दरु. (अवरु नमग अूटक्क करदिद्दरु).

८ तेथें पुष्कळ लोक आले होते. ಅಲ್ಲಿ ಬಹಳ ಮಂದಿ ಬಂದಿದ್ದರು. अल्लि बहळ मंदि बंदिद्दरु. (अल्ले बहाळ मंदि बंदिद्दरु).

## प्रकरण ३३ वें

# पूर्ण भूतकालिक नकाररूपें

तो गेला होता, त्यानें केलें होतें, अशा अर्थाचीं रूपें मागील धड्यांत आपण पाहिलीं; आतां 'तो गेला नव्हता', 'त्यानें केलें नव्हतें', अशा अर्थाचीं पूर्ण भूतकालिक नकार रूपें पाहूं:– हीं रूपें मुख्य धातूच्या भूतकृदन्ताव्ययास 'अिद्दिल्ल' हें क्रियापद जोडून करतात. 'अिद्दिल्ल' म्हणजे नव्हता - ते - ती - त्या अशा अर्थाचें 'अव्यय क्रियापद' आहे.

होगु, होगि = जाअून भू. कृ. अव्यय होगि + अिद्दिल्ल = होगिद्दिल्ल सर्व पुरुषी, सर्व लिंगी, व अुभय वचनीं 'होगिद्दिल्ल' हेंच क्रियापद येत असल्यामुळें आख्येय व्यक्तीचा अुल्लेख करावा लागतो. अुदा:– अवनु होगिद्दिल्ल = तो गेला नव्हता. अवळु होगिद्दिल्ल = ती गेली नव्हती.

**शब्दसंग्रह**

अडिगॆ = स्वयंपाक. मुगि = संपणें. मुगिदु – (भू. कृ. अ.).

**वाक्य संग्रह**

१ मी शाळेस गेलों नव्हतो. ನಾನು ಸಾಲೆಗೆ ಹೋಗಿದ್ದಿಲ್ಲ. नानु सालॆगॆ होगिद्दिल्ल. (ना सालिगे होगिद्दिल्ल<).

२ मुलें आलीं नव्हतीं. ಹುಡುಗರು ಬಂದಿದ್ದಿಲ್ಲ. हुडुगरु बंदिद्दिल्ल.

३ तुम्ही आम्हास बोलावलें नव्हतें. ನೀವು ನಮ್ಮನ್ನು ಕರೆದಿದ್ದಿಲ್ಲ. नीवु नम्मन्नु करॆदिद्दिल्ल. (.... नम्मन्न ....).

४ आमचें काम संपलें नव्हतें. ನಮ್ಮ ಕೆಲಸವು ಮುಗಿದಿದ್ದಿಲ್ಲ. नम्म कॆलसवु मुगिदिद्दिल्ल. (नम्म कॆलस< मुगिदिद्दिल्ल).

५ स्वयंपाक झाला नव्हता. ಅಡಿಗೆ ಆಗಿದ್ದಿಲ್ಲ. अडिगॆ आगिद्दिल्ल. (अडिगि आगिद्दिल्ल).

६ आम्ही हा मनुष्य पाहिला नव्हता. ನಾವು ಈ ಮನುಷ್ಯನನ್ನು ನೋಡಿದ್ದಿಲ್ಲ. नावु ई मनुष्यनन्नु नोडिद्दिल्ल.

## प्रकरण ३४ वें

# अपूर्ण भूतकाळाचीं रूपें

तुम्ही जात होता, आम्ही काम करीत होतों, अशा अर्थाचीं अपूर्ण भूतकालिक रूपें कानडींत मराठींतल्या प्रमाणेंच होतात. मराठींतील 'त' कृदन्ताप्रमाणें असलेल्या 'होगुत्त' या रूपास 'अिरु' (असणें) चीं भूतकालिक रूपें जोडून हीं करतात.

अुदाः– तुम्ही जात होतां = नीवु होगुत्त अिद्दिरि. जात = होगुत्त. होतां = अिद्दिरि 'अिरु' चें द्वि. पु. ब. वचनी भूतकालिक रूप.

**होगु**:– नानु होगुत्त अिद्दे = मी जात होतों.. नावु होगुत्त अिद्देवु = आम्ही जात होतों. नीनु होगुत्त अिद्दि = तूं जात होतास. नीवु होगुत्त अिद्दिरि = तुम्ही जात होतां. अवनु होगुत्त अिद्दनु = तो जात होता. अवरु होगुत्त अिद्दरु = ते जात होते, (किंवा) त्या जात होत्या. अवळु होगुत्त अिद्दळु = ती जात होती. अदु होगुत्त अित्तु = तें जात होतें. अवु होगुत्त अिद्दवु = तीं जात होतीं. संधि नियमा प्रमाणें हीं रूपें 'होगुत्तिद्द', होगुत्तिद्दरु', अशीं होतात.

१ आमचे घरीं (घरास) अेक चांगला शिंपी येत होता (असे). ನಮ್ಮ ಮನೆಗೆ ಒಬ್ಬ ಚಲೋ ಶಿಂಪಿಗನು ಬರುತ್ತಿದ್ದನು. नम्म मनेगे ओब्ब चलो शिंपिगनु बरुत्तिद्दनु. (नम्म मनीगे वब्ब छलो शिंपिग्या बरतिद्द<).

२ अेक मुलगा सायकलवर बसण्यास शिकत होता. ಒಬ್ಬ ಹುಡುಗನು ಸಾಯಕಲ್ ಮೇಲೆ ಕೂಡಲಿಕ್ಕೆ ಕಲಿಯುತ್ತಿದ್ದನು. ओब्ब हुडुगनु सायकल मेले कूडलिक्के कलियुत्तिद्दनु. (वब्ब हुडुग< सायकलम्याले कूडलिक्के कलीतिद्द<).

३ आम्ही रोज वाचनालयास जात होतों. ನಾವು ದಿನಾಲು ವಾಚನಾಲಯಕ್ಕೆ ಹೋಗುತ್ತಿದ್ದೆವು. नावु दिनालु वाचनालयक्के होगुत्तिद्देवु. (नावु दिना वाचनालयक्क होगतिद्दिवि).

४ मी सकाळीं व्यायाम करीत होतों. ನಾನು ಮುಂಜಾನೆ-ವ್ಯಾಯಾಮ ಮಾಡುತ್ತಿದ್ದೆನು. नानु मुंजाने व्यायाम माडुत्तिद्देनु. (ना-मुंझाने व्यायाम माडतिद्दे).

५ तुम्ही आमचे बरोबर फिरायला येत होतां. ನೀವು ನಮ್ಮ ಕೂಡ ಅಡ್ಡಾಡಲಿಕ್ಕೆ ಬರುತ್ತಿದ್ದಿರಿ. नीवु नम्म कूड अड्डाडलिक्के बरुत्तिद्दिरि. (बरतिद्दिरि).

६ आम्ही तेव्हां कॉलेजांत शिकत होतों. ನಾವು ಆಗ ಕಾಲೇಜಿನಲ್ಲಿ ಕಲಿಯುತ್ತಿದ್ದೆವು. नावु आग कालेजिनल्लि कलियुत्तिद्देवु. (नावु आग कालेजिनोळग कलीतिद्दवि).

७ आमचे घरीं (घरास) रोज डॉक्टर येत होते (असत). ನಮ್ಮ-ಮನೆಗೆ ದಿನಾಲು ಡಾಕ್ಟರರು ಬರುತ್ತಿದ್ದರು. नम्म मनेगे दिनालु डॉक्टररु बरुत्तिद्दरु. (नम्म मनीगे दिना डॉक्टररु बरतिद्दरु).

८ तेव्हां बाजारांत तांदुळ मिळत होते. ಆಗ ಪೇಟೆಯಲ್ಲಿ ಅಕ್ಕಿ ಸಿಗುತ್ತಿದ್ದವು. आग पेटेयल्लि अक्कि सिगुत्तिद्दवु. (आग प्याटयाग अक्कि शिगतिद्दवु).

या प्रयोगाचीं नकाररूपें करण्यास सोपीं आहेत. 'होगुत्त' ह्या रूपास 'अिद्दिल्ल' हें नकारार्थी क्रियापद जोडून हीं रूपें होतात. होगुत्त + अिद्दिल्ल = होगुत्तिद्दिल्ल.

मी, आम्ही जात नव्हतों = नानु, नावु होगुत्तिद्दिल्ल. तूं जात नव्हतास, तुम्ही जात नव्हतां = नीनु, नीवु होगुत्तिद्दिल्ल. तो जात नव्हता = अवनु होगुत्तिद्दिल्ल. ती जात नव्हती = अवळु होगुत्तिद्दिल्ल. ते जात नव्हते = अवरु होगुत्तिद्दिल्ल. त्या जात नव्हत्या = अवरु होगुत्तिद्दिल्ल. तें जात नव्हतें = अदु होगुत्तिद्दिल्ल. तीं जात नव्हतीं = अवु होगुत्तिद्दिल्ल.

अिद्दिल्लच्या अेवजीं 'अिरलिल्ल' हें रूप जोडल्यास नसे – नसत असा अर्थ होतो. अवनु होगुत्त अिरलिल्ल = तो जात नसे.

## प्रकरण ३५ वें

# भविष्यकाळाचीं रूपें

या संबंधानें असें आढळतें कीं कानडींत भविष्यकालिक रूपें वर्तमानकालिक रूपांहून स्वतंत्र व निराळीं असून देखील मुखभाषेंत भविष्यकालिक रूपाऐवजीं पुष्कळदां वर्तमानकालिक रूपेंच वापरतात.

'तो पुढील वर्षीं येईल' हें वास्तविक 'अवनु मुंदिन वर्ष बरुवनु' असें पाहिजे. पण आपणांस परिचित असलेलें वर्तमानकालिक 'बरुत्तानु' चें मुखभाषिक रूप 'बरतानऽ' हेंच वापरून 'अव< मुंदिन वर्ष बरतानऽ' म्हणतात. लेखभाषेंत मात्र भविष्यकालिक रूपेंच बहुधा वापरतात.

भविष्यकालिक रूपें खालील प्रत्यय लावून करतात व ते प्रत्यय लावतांना 'उव' हा आगम येतो.

| | | ऐकवचन | अनेक वचन |
|---|---|---|---|
| प्र. पु. | तिन्ही लिंगी | ऎनु | ऎवु |
| द्वि. पु. | ,, ,, | ऎ | अिरि |
| तृ. पु. | पुल्लिंगी | अनु | अरु |
| | स्त्रीलिंगी | अळु | अरु |
| | न. लिंगी | अदु | अवु |

**होगु:–** ('उव' आगम लक्षांत घेणें) प्र. पु. होगुवेनु (मी जाईन) होगुवेवु (आम्ही जावू). द्वि. पु. होगुवे (तूं जाशील), होगुविरि (तुम्ही जाल). तृ. पु. (पु.) होगुवनु (तो जाईल), होगुवरु (ते जातील). (स्त्री.) होगुवळु (ती जाईल), होगुवरु (त्या जातील). (न.) होगुवदु (तें जाईल), होगुववु (तीं जातील).

तृतीत पुरुषी अनेक वचनाखेरीज बाकी सर्व रूपें पुरुष लिंग वचनाप्रमाणें निरनिराळीं असल्यानें आख्येय व्यक्ति न उल्लेखितां देखील 'कोण' जाईल तें कळतें.

भविष्यकालिक रूपें सामान्यसिद्धांतसूचक विधान करतांना किंवा अेखाद्या गोष्टीचे गुणधर्म सांगतांनाहि वापरतात. अुदा:– शास्त्रद नियमवन्नु मुरियुवदु पापवागुवदु = शास्त्राचा नियम मोडणें पाप 'होअील' - होतें. आगुवदु - होअील भ. काळ, मुरियु – मोडणें 'मुरियुवदु' – मोडणें तें, आगुत्तदे - होतें व. काळ.

मनुष्यनन्नु स्वभाववु सेळॆदुकॊंडु होगुवदु = मनुष्यास त्याचा स्वभाव ओढून 'घेअून' जाअील – जातो. सेळॆदुकॊंडु = ओढून घेअून. सेळॆ = ओढणें.

### वाक्यसंग्रह

टीप– मुखभाषेंत भविष्यकालिक रूपें न वापरतां वर्तमानकालिक रूपेंच वापरतात. म्हणून मुखभाषिक अुच्चार खालील वाक्यांतून वर्तमानकालिक रूपांचाच दिला आहे.

१ ते अुद्यां मुंबअीस जातील. ಅವರು ನಾಳೆ ಮುಂಬಯಿಗೆ ಹೋಗುವರು. अवरु नाळॆ मुंबयिगॆ होगुवरु. (होगतार ऽ). (नाळॆ = अुद्या).

२ तो परवां गांवाहून येअील. ಅವನು ನಾಡದು ಊರಿಂದ ಬರುವನು. अवनु नाडदु अूरिंद बरुवनु. (अव< नाडद ऽ अूरिंद बरतान ऽ).

३ पुढील वर्षी मी परीक्षेस बसेन. ಮುಂದಿನ ವರ್ಷ ನಾನು ಪರೀಕ್ಷೆಗೆ ಕೂಡುವೆನು. मुंदिन वर्ष नानु परीक्षॆगॆ कूडुवॆनु. (कूडतेनी).

४ आम्हास पाहून लोक हंसतील. ನಮ್ಮನ್ನು ನೋಡಿ ಜನರು ನಗುವರು, - ನಕ್ಕಾರು. नम्मन्नु नोडि जनरु नगुवरु, (किंवा 'नक्कारु' पान ९० पहा).

५ तो बाजारांतून भाजी आणील. ಅವನು ಪೇಟೆಯಿಂದ ಪಲ್ಲೆ ತರುವನು. अवनु पेटॆयिंद पल्लॆ तरुवनु. (तरतान ऽ).

'सर्वसामान्यसिद्धांत' सांगण्यासाठीं वर्तमानकाळाअेवजीं भविष्यकाळ वापरल्याचीं अुदाहरणें :–

६ ಇದಕ್ಕೆ ಬಹಳ ಬೆಲೆ ಬೀಳುವದು. अिदक्कॆ बहळ बॆलॆ बीळुवदु ह्यास फार किंमत पडेल. (पडते).

७ ದೇವರಮೇಲೆ ಭಕ್ತಿಯಿಲ್ಲದವರು ಭಜನೀಕೂಟವನ್ನು ತಿರಸ್ಕರಿಸುವರು. देवरमेलॆ भक्तियिल्लदवरु भजनीकूटवन्नु तिरस्करिसुवरु. देवावर

## प्रकरण ३५ वें

# भविष्यकाळाचीं रूपें

या संबंधानें असें आढळतें कीं कानडींत भविष्यकालिक रूपें वर्तमानकालिक रूपांहून स्वतंत्र व निराळीं असून देखील मुखभाषेंत भविष्यकालिक रूपाअेवजीं पुष्कळदां वर्तमानकालिक रूपेंच वापरतात.

'तो पुढील वर्षीं येअील' हें वास्तविक 'अवनु मुंदिन वर्ष बरुवनु' असें पाहिजे. पण आपणांस परिचित असलेलें वर्तमानकालिक 'बरुत्ताने' चें मुखभाषिक रूप 'बरतानऽ' हेंच वापरून 'अव< मुंदिन वर्ष बरतानऽ' म्हणतात. लेखभाषेंत मात्र भविष्यकालिक रूपेंच बहुधा वापरतात.

भविष्यकालिक रूपें खालील प्रत्यय लावून करतात व ते प्रत्यय लावतांना 'अुव' हा आगम येतो.

| | | अेकवचन | अनेक वचन |
|---|---|---|---|
| प्र. पु. | तिन्ही लिंगी | अेनु | अेवु |
| द्वि. पु. | ,, ,, | अे | अिरि |
| तृ. पु. | पुल्लिंगी | अनु | अरु |
| | स्त्रीलिंगी | अळु | अरु |
| | न. लिंगी | अदु | अवु |

**होगु**:– ('अुव' आगम लक्षांत घेणें) प्र. पु. होगुवेनु (मी जाअीन) होगुवेवु (आम्ही जावू). द्वि. पु. होगुवे (तूं जाशील), होगुविरि (तुम्ही जाल). तृ. पु. (पु.) होगुवनु (तो जाअील), होगुवरु (ते जातील). (स्त्री.) होगुवळु (ती जाअील), होगुवरु (त्या जातील). (न.) होगुवदु (तें जाअील), होगुववु (तीं जातील).

तृतीत पुरुषी अनेक वचनाखेरीज बाकी सर्व रूपें पुरुष लिंग वचनाप्रमाणें निरनिराळीं असल्यानें आख्येय व्यक्ति न अुल्लेखितां देखील 'कोण' जाअील तें कळतें.

भविष्यकालिक रूपें सामान्यसिद्धांतसूचक विधान करतांना किंवा अेखाद्या गोष्टीचे गुणधर्म सांगतांनाहि वापरतात. अुदाः— शास्त्रद नियमवन्नु मुरियुवदु पापवागुवदु = शास्त्राचा नियम मोडणें पाप 'होअील' - होतें. आगु-वदु - होअील भ. काळ, मुरियु — मोडणें 'मुरियुवदु' — मोडणें तें, आगुत्तदे - होतें व. काळ.

मनुष्यनन्नु स्वभाववु सेळेदुकोंडु होगुवदु = मनुष्यास त्याचा स्वभाव ओढून 'घेअून' जाअील — जातो. सेळेदुकोंडु = ओढून घेअून. सेळे = ओढणें.

**वाक्यसंग्रह**

टीप — मुखभाषेंत भविष्यकालिक रूपें न वापरतां वर्तमानकालिक रूपेंच वापरतात. म्हणून मुखभाषिक अुच्चार खालील वाक्यांतून वर्तमानकालिक रूपांचाच दिला आहे.

१ ते अुद्यां मुंबअीस जातील. ಅವರು ನಾಳೆ ಮುಂಬಯಿಗೆ ಹೋಗುವರು. अवरु नाळे मुंबअिगे होगुवरु. (होगतारऽ). (नाळे = अुद्या).

२ तो परवां गांवाहून येअील. ಅವನು ನಾಡದು ಊರಿಂದ ಬರುವನು. अवनु नाडदु अूरिंद बरुवनु. (अव< नाडदऽ अूरिंद बरतानऽ).

३ पुढील वर्षीं मी परीक्षेस बसेन. ಮುಂದಿನ ವರ್ಷ ನಾನು ಪರೀಕ್ಷೆಗೆ ಕೂಡುವೆನು. मुंदिन वर्ष नानु परीक्षेगे कूडुवेनु. (कूडतेनी).

४ आम्हास पाहून लोक हंसतील. ನಮ್ಮನ್ನು ನೋಡಿ ಜನರು ನಗುವರು, - ನಕ್ಕಾರು. नम्मन्नु नोडि जनरु नगुवरु, (किंवा 'नक्कारु' पान ९० पहा).

५ तो बाजारांतून भाजी आणील. ಅವನು ಪೇಟೆಯಿಂದ ಪಲ್ಲೆ ತರುವನು. अवनु पेट्टेयिंद पल्ले तरुवनु. (तरतानऽ).

'सर्वसामान्यसिद्धांत' सांगण्यासाठीं वर्तमानकाळाअेवजीं भविष्यकाळ वापरल्याचीं अुदाहरणें :—

६ ಇದಕ್ಕೆ ಬಹಳ ಬೆಲೆ ಬೀಳುವದು. अिदक्के बहळ बेले बीळुवदु ह्यास फार किंमत पडेल. (पडते).

७ ದೇವರಮೇಲೆ ಭಕ್ತಿಯಿಲ್ಲದವರು ಭಜನೀಕೂಟವನ್ನು ತಿರಸ್ಕರಿಸುವರು. देवरमेले भक्तियिल्लदवरु भजनीकूटवन्नु तिरस्करिसुवरु. देवावर

भक्ति नसलेले लोक भजनी मेळ्याचा तिरस्कार करतात. तिरस्कारतील – तिरस्कारतात.

८ ಪ್ರಾಪಂಚಿಕರಿಗೆ ಮಾಡಿದ ಧರ್ಮಬೋಧೆಯು ಒಂದು ಕಿವಿಯಲ್ಲಿ ಹೊಕ್ಕು ಇನ್ನೊಂದು ಕಿವಿಯಿಂದ ಹೊರಟು ಹೋಗುವದು. प्रापंचिकरिगु माडिद धर्मबोधेयु ओंदु किवियल्लि होक्कु अिन्नोंदु किवियिंद होरटु होगुवदु. प्रापंचिकांना केलेला धर्मोपदेश अेका कानांत शिरुन ‘ दुसऱ्या (अेका) ’ कानानें बाहेर निघून जाअील – जातो. ( होक्कु = शिरुन ).

---

## प्रकरण ३६ वें

# ‘ पक्षार्थक ’ कृदन्ताव्ययें (संकेतार्थी)

**खालील वाक्यें पहाः**

तो **आला तर** मी जातों. पाअूस **पडला तर** पिकें येतील. तो **गेल्यास** मला सांग.

ह्यांमध्यें ‘आला तर’, ‘पडला तर’, ‘गेल्यास’, अशा अर्थाच्या अव्ययांना कानडींत ‘पक्षार्थक कृदन्त अव्ययें’ म्हणतात. कानडींत हें अव्यय धातूस ‘रे’ प्रत्यय लावून होतें. ‘रे’ लावतांना ‘अिद’ आगम येतो. परंतु ‘रे’ प्रत्यय लागतांना कांहीं धातु विकृत होतात व ‘रे’ लावून झालेलें रूप, मध्यें आगम यायचा असल्यामुळें, ओळखण्यास अडचण पडते. म्हणून ह्यासंबंधानें व्यावहारिक नियम असा कीं – धातूच्या भूतकृदन्तविशेषणास ‘रे’ प्रत्यय लावला म्हणजे पक्षार्थक कृदन्त अव्यय होतें.

अुदाः– माडु, माडिद, (भू. कृ. विशेषण) केलेला - ली - लें, माडिदरे = केल्यास. होगु, होद (भू. कृ. विशेषण) गेलेला - ली - लें होदरे = गेल्यास – गेला तर.

### शब्दसंग्रह

पास = पासु. बोलणें = मातु. (‘मातु’ ह्याचा अर्थ ‘गोष्ट’ thing असाहि आहे). गाणें = हाडु. शिकविणें = कलिसु. ‘गाणें शिकविणें’

ह्याला ' हाडु कलिसु ' असें म्हणतात. शिवाय ' हाडु हेळु ' म्हणजे ' गाणें सांगणें ' असेंहि म्हणण्याची रुढी आहे. शिकणें = कलि - कलियु. सगळे = अेल्लरु मुखभाषेंत ' यल्लारु ' म्हणतात. अुठणें = अेळु (येळु). कळविणें = तिळिसु. समजावून सांगणें = तिळिसि हेळु. भेटणें = भेट्टियागु. लोकर = लगूने. पाठविणें = कळिसु. बिद्दरे = पडल्यास ( बीळु (पडणें ) चें पक्षार्थक कृदन्ताव्यय ). थंडिबिडु = थंडी पडणें ( वाच्यार्थ ' थंडी सुटणें ' ).

### वाक्यसंग्रह

१ तुम्ही मुंबअीस गेलांत तर आमच्या भावाला भेटा. ನೀವು ಮುಂಬಯಿಗೆ ಹೋದರೆ ನಮ್ಮ ತಮ್ಮನನ್ನು ಭೆಟ್ಟಿಯಾಗಿರಿ. नीवु मुंबअिगे होदरे नम्म तम्मनन्नु भेट्टियागिरि. (नीवु मुंबअिगे होदरऽ नम्म तम्मग भेट्टियागरि).

२ तुम्ही अभ्यास केलांत तर पास व्हाल. ನೀವು ಅಭ್ಯಾಸ ಮಾಡಿದರೆ ಪಾಸು ಆಗುವಿರಿ. नीवु अभ्यास माडिदरे पासु आगुविरि. (नीवु अभ्यास माडिदरऽ पास आगतीरि ).

३ पाअुस पडला - आला - तर पिकें चांगलीं येतील. ಮಳೆ ಬಿದ್ದರೆ – ಆದರೆ ಬೆಳೆಗಳು ಚಲೋ ಬರುವವು. मळे बिद्दरे - आदरे - बेळेगळु चलो बरुववु. (मळी बिद्दरऽ - आदरऽ - बेळी छलो बरतावऽ ).

४ अुद्यां तुम्ही आलांत तर तुम्हाला पुस्तक देअीन. ನಾಳೆ ನೀವು ಬಂದರೆ ನಿಮಗೆ ಪುಸ್ತಕವನ್ನು ಕೊಡುವೆನು. नाळे नीवु बंदरे निमगे पुस्तकवन्नु कोडुवेनु. (नाळे नीवु बंदरऽ निमग पुस्तक< कोडतेनी ).

५ मुलांनीं आअीबापांचें ( बोलणें ) अेकलें तर त्यांचें कल्याण होअील ಹುಡುಗರು ತಾಯಿತಂದೆಗಳ ಮಾತನ್ನು ಕೇಳಿದರೆ ಅವರ ಕಲ್ಯಾಣವಾಗುವದು. हुडुगरु तायितंदेगळ मातन्नु केळिदरे अवर कल्याणवागुवदु (संधि)

६ तुम्ही शास्त्रीय संगीत गाल तर सगळे अुठून जातील. ನೀವು ಶಾಸ್ತ್ರೀಯ ಸಂಗೀತವನ್ನು ಹಾಡಿದರೆ ಎಲ್ಲರೂ ಎದ್ದು ಹೋದಾರು. नीवु शास्त्रीय संगीतवन्नु हाडिदरे अेल्लरू अेद्दु होदारु.

७ तुम्ही मला कळवाल तर आभारी होअीन. ನೀವು ನನಗೆ ತಿಳಿಸಿದರೆ ಆಭಾರಿಯಾಗುವೆನು. नीवु ननगे तिळिसिदरे आभारियागुवेनु (संधि).

८ सकाळीं लोकर अुठलांत तर अभ्यास होतो. ಮುಂಜಾನೆ ಲಗೂನೆ

ಎದ್ದರೆ ಅಭ್ಯಾಸ ಆಗುವದು. मुंजाने लगूने अेद्दरे अभ्यास आगुवदु. (मुंझाने लगून यद्दरऽ अभ्यास आगतदऽ).

टीपः– 'जर' या मराठींतील संकेतबोधक अव्ययाचा समानार्थक शब्द कानडींत नाहीं. पण अुत्तरकर्नाटकी मुखभाषेंत 'जर' हा शब्द 'जर' नीवु हींग माडिदरऽ ( जर तुम्ही असें केलेंत तर ) यांतल्याप्रमाणें वापरलेला आढळतो.

---

## प्रकरण ३७ वें

# विशेषणें, 'विधेयविशेषणें' व 'कृदन्तनामें'.

कांहीं बाबतींत कानडी विशेषणें व मराठी विशेषणें यांमध्यें महत्त्वाचा फरक आहे. खालील वाक्प्रयोग (phrases) पहा :–

(१) मोटा मुलगा – दोड्ड हुडुग. मोटी मुलगी – दोड्ड हुडुगि. मोठें घर – दोड्ड मनॆ. मराठींत 'मोठा' 'चांगला' यांसारख्या 'आ'कारान्त विशेषणांचीं विशेष्याच्या लिंगवचनानुसार मोठा - मोठी - मोठें अशीं निरनिराळीं रूपें होतात. पण कानडींत विशेषणाचें रूप असें बदलत नाहीं.

(२) मराठींत 'विशेष्य' जेव्हां प्रथमेखेरीज अितर विभक्तींत असतें, तेव्हां 'आ'कारान्त विशेषणांचें 'मोठ्या – चांगल्या' असें रूप होतें.

अुदाः– मोठ्या मनुष्यास - मनुष्याकडून वगैरे 'चांगल्या' मनुष्यास वगैरे. कानडींत कोणतींहि विशेषणें अशा प्रकारें बदलत नाहींत. दोड्ड मनुष्यनिगॆ, सण्ण हुडुगनिगॆ – वगैरे.

(३) 'दोड्ड मनुष्य' 'सण्ण हुडुग' यांमध्ये 'दोड्ड' 'सण्ण' हीं विशेषणें विशेष्याच्या मागें आलीं आहेत. परंतु, 'तो मुलगा मोटा (आहे)', असें विशेष्या संबंधानें विधान करण्यासाठीं जेव्हां विशेष्याच्या पुढें विशेषण वापरतात, तेव्हां त्या विशेषणांना कानडींत 'विधेय विशेषणें' म्हणतात. या 'विधेय विशेषणांना' विशेष्याच्या लिंगवचनानुसार विभक्तिप्रत्यय व कधींकधीं

सर्वनामें जोडतात. तो मनुष्य मोठा (आहे); अवनु दोड्डवनु (दोड्ड+अवनु) हें पुस्तक लहान (आहे); भी पुस्तकवु सण्णदु; अदु (तें) हें सर्वनाम जोडण्याच्या अैवजीं कधींकधीं फक्त 'दु' 'अदु' हीं अक्षरेंहि प्रत्ययासारखीं जोडतात. पुस्तकवु चलोदु; मनेयु सण्णदु; भूतकृदन्तविशेषणास 'दु' जोडतांना त्याचें 'डु' होतें. अुदाः— बंद-बंदुदु किंवा बंदडु 'असलेलें-तें' अितर सर्व प्रकारच्या विशेषणांचींहि 'विधेय विशेषणें' होअूं शकतातः—

१ भूतकृदन्त विशेषणें: अुदाः— होद—गेलेला, माडिद—केलेला. भी जनरु अदन्नु माडिदवरु - हे लोक तें केलेले; नीवु अदन्नु नोडिदवरु - तुम्ही तें पाहिलेले; नीवु काशिगे होगि बंदवरु - तुम्ही काशीस जाअून आलेले, अिदु नावु नोडिडु - हें आम्ही पाहिलेलें; अिदु अवरु बरेदडु - हें त्यांनीं लिहिलेलें;

२ वर्तमानभविष्यकृदन्तविशेषणें: अुदाः— होगुव — जाणारा, मातोडुव — बोलणारा, भी हुडुगरु सालेगे होगुववरु; हे मुलगे शाळेस जाणारे; अिवरु बहळ मातोडुववरु; हे फार बोलणारे;

३ वर्तमानभविष्यकृदन्तविशेषणाचीं नकाररूपें. अुदाः— आगद-न होणारा अिवरु कैले आगदवरु; हे हातून न होणारे; अिवरु दान कोडदवरु; हे दान न देणारे; भी केलसवु आगदु; हें काम न होणारें;

४ षष्ठ्यंत रूपें (विशेषणांसारखीं असलेलीं) अुदा— अूरिन-गांवचा भी मनुष्यनु नम्म अूरिनवनु; हा मनुष्य आमच्या गांवचा; भी मने नम्मदु; हें घर आमचें; सिट्टिन—रागाचा. अवनु सिट्टिनवनु - तो रागाचा; अवनु सोक्किनवनु - तो मस्तीचा; (सोक्कु=मस्ती) अवरु हुब्बळ्ळियवरु - ते हुबळीचे; अिवरु पुणेदवरु - हे पुण्याचे; वर पाहिलेलीं सर्व प्रकारचीं विधेयविशेषणें स्वतंत्र नामाप्रमाणेंहि वापरतात. (अशा नामांना 'कृदन्तनामें' म्हणतात).

१ विशेषणें:— दोड्डवरु हीगे माडबारदु; मोठ्यांनीं असें करूं नये; अिदु सण्णवर केलसवल्ल; हें लहानांचें काम नव्हे;

२ भूतकृदन्त विशेषणें:— माडिद—केलेला माडिदवर पाप आडिदवर बायोळगे; (म्हण) केलेल्यांचें पाप 'बोललेल्यांच्या' तोंडांत; नाचिके बिट्टवरिगे अेनु हेळबेकु? लाज सोडलेल्यांना काय सांगावें? नीनु हेळिदु अेनु? तूं

सांगितलेलें काय? (सांगितलेंस तें काय?) नीनु बंदद्दन्नु (बंदुदन्नु) नानु नोडिदे; तूं आलेलें ('आलेलें – तें') मी पाहिलें. अिद्दद्दु अिद्दहागे हेळि-दरे अवनिगे सिट्टु बंतु. असलेलें आहे तसें सांगितलें तर त्याला राग आला.

३ वर्तमानभविष्यकृदन्त विशेषणें:– अूरिगे होगुववरु; गांवाला जाणारे; केळुववर मुंदे हेळुववरु धड्डरु; (म्हण) विचारणारांपुढें सांगणारा मूर्ख;

४ वर्तमानभविष्यकृदन्तविशेषणांचीं नकार रूपें:– कैलि आगदवरु मातााड बारदु; हातून न होणारांनीं बोलूं नये; तावु माडदवरु मंदिगे हेळबारदु; आपण न करणारांनीं लोकांना सांगू नये;

५ षष्ठ्यंत रूपें:– नम्म अूरिनवरु बंदिरुत्तारे (बंदारऽ); आमच्या गांवचे आले आहेत; 'अूरवरु' असेंहि म्हणतात. चिन्न नम्मदादरू चिनवाल नम्मवने? (नम्मवनु+अे) सोनें आमचें 'झालें तरी' सोनार आमचा काय? अिप्पत्तु वर्षदवरिगे हिरेतन बरबारदु, अेप्पत्तु वर्षदवरिगे हेलाट हत्तबारदु (म्हण) वीस 'वर्षांच्याना' वडीलपणा येअूं नये, सत्तर 'वर्षांच्याना' हगवण लागूं नये. (हिरेतन – वडीलपण. हेलाट – हगवण).

विशेषणें किंवा विशेषणनामें वापरण्याचीं आणखी अेक तऱ्हा:– विशेषणें किंवा त्यांस अवनु, अवरु, अदु वगैरे सर्वनामें लागून झालेलीं 'विशेषण नामें' ह्यांस 'आद' हें 'आगु' (होणें) ह्या धातूचें कृदन्तविशेषण जोडण्याचीं रुढी आहे. ('आद' = झालेला – ली – लें). अुदाहरणें:–

१ कलित = शिकलेला – ली – लें; कलितवळु = 'शिकलेली – ती' कलितवळु+आद=कलितवळाद (शिकलेली स्त्री) 'शिकलेली - ती - झालेली' =शिकलेली; कलितवळाद मगळु देश सेवे माडुवळु. . शिकलेली मुलगी (कन्या) देश सेवा करते.

२ जाण=शाहणा - णी - णें. जाणरु=शाहणे लोक, जाणराद शिक्षकरु = शाहणे शिक्षक ('शाहणे झालेले'). जाणचा अुच्चार ज्याण असा करावा.

टीप:– आपण मागें १६ व्या प्रकरणांत पाहिलेंच आहे कीं, 'स्पष्टी – करणार्थ' प्रथमाविभक्तीमध्यें वापरलेलीं नामें देखील 'आद' (झालेला - ली - लें) हें कृदन्तविशेषण जोडून वापरतात. अवन तम्मनाद लक्ष्मण – त्याचा भाअू 'झालेला' लक्ष्मण = त्याचा भाअू लक्ष्मण.

विशेषणें वापरण्याच्या वरील पद्धतीचीं आणखी कांहीं अुदाहरणें :—

मनोहरवाद ग्रंथ; धीरनाद मनुष्यनु; चंदवाद तोट; अुत्तरवाद स्थळ; किवडियाद तायि; अवश्यकवाद मातु; सुंदरवाद पक्षि; विशेषणास 'आद'च्या अेवजीं 'आगिरुव' (होअून राहिलेलें) हा शब्द वापरून:— आभरणवागिरुव बंगार; दागिना 'होअून राहिलेलें' सोनें. 'अुळ्ळ' हा 'असलेला' या अर्थाचा शब्द जोडून खालील प्रमाणें विशेषणासारखा वापरतात:— धैर्यवुळ्ळ मनुष्य = धैर्यवान (धैर्यअसलेला) मनुष्य.

## वाक्यसंग्रह

१ हे लोक आमच्या गांवचे ('गांवचे ते'). ಈ ಜನರು ನಮ್ಮ ಊರಿನವರು. अी जनरु नम्म अूरिनवरु. (अूरिन + अवरु) अी जनरु नम्म अूरवरु.

२ हे शिक्षक ट्रेनिंग कॉलेजचे ('ट्रेनिंग कॉलेजचे - ते'). ಈ ಶಿಕ್ಷಕರು ಟ್ರೇನಿಂಗ ಕಾಲೇಜದವರು. अी शिक्षकरु ट्रेनिंग कॉलेजदवरु.

३ हा मनुष्य हुबळीचा ('हुबळीचा तो'). ಇವನು ಹುಬ್ಬಳ್ಳಿಯವನು. अिवनु हुब्बळ्ळियवनु.

४ हा मनुष्य रागाचा (रागीट) 'रागाचा तो'. ಇವನು ಸಿಟ್ಟಿನವನು. अिवनु सिट्टिनवनु. (सिट्टिन+अवनु) (अिव∠ शिट्टिनव∠).

५ हे तेथें गेलेले (लोक) ('गेलेले ते'). ಇವರು ಅಲ್ಲಿ ಹೋದವರು. अिवरु अल्लि होदवरु. (होद+अवरु कृ. विशेषण).

६ हा मोठा; ('मोठा तो'). ಇವನು ದೊಡ್ಡವನು. अिवनु दोड्डवनु; दोड्ड+अवनु;

७ तुम्ही हें केलेले (लोक) 'केलेले ते'. ನೀವು ಇದನ್ನು ಮಾಡಿದವರು. नीवु अिदन्नु माडिदवरु. (माडिद+अवरु कृ. विशेषण).

८ आपलें कर्तव्य न करणारे (लोक). ತಮ್ಮ ಕರ್ತವ್ಯವನ್ನು ಮಾಡದವರು. तम्म कर्तव्यवन्नु माडदवरु. (माडद+अवरु).

९ हे लोकांचें बोलणें अेकणारे लोक. ಇವರು ಮಂದಿಯ ಮಾತನ್ನು ಕೇಳುವವರು; अिवरु मंदिय मातन्नु केळुववरु.

१० लोकांना अुपदेशिणाऱ्या लोकांनीं आपलें कर्तव्य करावें. ಜನರನ್ನು ಉಪದೇಶಿಸುವವರು ತಮ್ಮ ಕರ್ತವ್ಯವನ್ನು ಮಾಡಬೇಕು. जनरन्नु अुपदेशिसुववरु तम्म कर्तव्यवन्नु माडबेकु.

## प्रकरण ३८ वें

# 'अुदु' 'द्दु' च्या उपयोगाविषयीं विशेष माहिती.

'अुदु' हा प्रत्यय लागून होणाऱ्या कांहीं शब्दांची मागील प्रकरणीं आपणांस माहिती झाली आहे. 'अुदु' किंवा 'द्दु' असलेली शब्दरचना वरचेवर येते; व खालीलसारखीं वाक्यें आलीं कीं अडखळल्यासारखें होतें व अर्थ चटकन् लक्षांत येत नाहीं, म्हणून त्यांचा सविस्तर विचार करूं.

'गाडियु **बिद्दद्दरिंद** आरु जनरु सत्तरु' गाडी पडल्यानें सहा लोक मेले.

'नीवु **बंदद्दन्नु** नावु नोडिदेवु' तुम्ही आलेलें (तें) आम्हीं पाहिलें.

अलीकडे वरील शब्द 'बिद्दुदरिंद', 'बंदुदन्नु', अशी लिहिण्याची प्रथा पडूं लागली आहे. त्यामुळें द्वित्त 'द' थोडे कमी येतात.

या 'अुदु' आणि 'द्दु' असलेल्या शब्दांचे विविध प्रकार व त्यांचे अुपयोग पाहूं:—

१ कोणत्याहि धातूस 'अुदु' प्रत्यय लाविल्यानें मराठींतील 'णें' कृदन्तासारखे शब्द होतात. 'माडुवुदु' (करणें), 'होगुवुदु' (जाणें), यांस कानडींत 'कृदन्तभावनामें' म्हणतात, 'अदु' (तें) या नपुंसकलिंगी शब्दाप्रमाणें याचीं विभक्तिरूपें होतात. त्याचा अुपयोग मराठी 'णें' कृदन्तासारखा होतो. अुदा:– हीगे माडुवुदु निम्म कर्तव्यवु = असें करणें तुमचें कर्तव्य; अभ्यास माडुवुदन्नु नोडि = अभ्यास करणें पाहून; अभ्यास माडुवुदरिंद = अभ्यास करण्यानें, अभ्यास माडुवुदक्के = अभ्यास करण्यास, अुपवास माडुवुदर अुपयोग = अुपवास करण्याचा अुपयोग, माडुवुदरल्लि = करण्यांत, बरेयुवुदरल्लि = लिहिण्यांत. ('माडुवुदु' च्या अेवजीं 'माडुवदु' असेंहि पुष्कळदां म्हणतात. परंतु तें रूप शुद्ध नाहीं).

'अुदु' लागून होणाऱ्या 'णें' कृदन्ताच्या अर्थाचा शब्द 'ओण' हा प्रत्यय लावूनहि करतातः– बरेयोण, होगोण=लिहिणें, जाणें. बरेयोण, होगोण, हीं 'लिहूंया', 'जाअूंया', अशा अर्थाचीं आख्यातरूपेंहि आहेत.

कांहीं धातू मूळ स्वरूपांतच ठेवूनहि 'णें' कृदन्ताचा अर्थ देतात. 'ओदु' = वाचणें, 'बदुकु' = जगणें. 'णें कृदन्ता'चीं जशीं करण्यास, करण्यापासून, वगैरे फक्त अेकवचनी रूपेंच होतात, तद्वतच 'अुदु' लावून झालेल्या कृदन्तभावनामाचींहि फक्त अेकवचनीं रूपें होतात.

२ भूतकृदन्त विशेषणांना 'अुदु' लागून :– माडिद=केलेला, माडिदुदु = 'केलेलें-तें'. 'अुदु' न लावतां नुसतें 'दु' लावून 'माडिद्दु' असेंहि रूप करतात; व नपुंसकलिंगी शब्दाप्रमाणें या दोन्हीं रूपांचीं फक्त अेकवचनी विभक्तिरूपें होतात व खालीलप्रमाणें त्यांचा अुपयोग करतात.

अलीकडे 'दु' लावून हीं रूपें न करतां 'अुदु' लावून तीं करण्याचीं प्रवृत्ति असल्यानें दोन्हीं रूपें अुल्लेखिलीं आहेत.

बंद – आलेला 'कैगे बंदुदु (बंदद्दु) बायिगे बरलिल्ल' = हाताला आलेलें 'तोंडाला' आलें नाहीं. सुंदरवादद्दु=सुंदर असलेलें-झालेलें; सत्यवादद्दु = खरें असलेलें-झालेलें; "नीवु बंदुदन्नु (बंदद्दन्नु) नोडि संतोषवायितु" = तुम्ही आलांत हें पाहून संतोष झाला.

बिद्द – पडलेला – गाडियु बिद्दुदरिंद (बिद्दद्दरिंद) आरु जनरु सत्तरु. गाडि पडल्यामुळें सहा लोक मेले.

आद – झालेला. हीगे आदुदरिंद (आदद्दरिंद)=असें झाल्यामुळें. 'आदुदरिंद'='त्यामुळें', 'दोरेत'='मिळालेला'; 'संस्कृत शब्दगळिगे अिष्टु महत्त्ववु दोरेतुदक्के (दोरेतद्दक्के) कारणवेनु'=संस्कृत शब्दांना अितकें महत्त्व 'मिळलेल्यास' (मिळालें यास) कारण काय ?

होद – गेलेला, अिदु नीवु अल्लि होदुदर (होदद्दर) परिणाम – हा तुम्ही तेथें गेल्याचा परिणाम; अवरु हेळिदुदरल्लि (हेळिद्दरल्लि) प्रतियोंदु मातु निजविदे = त्यांनीं 'सांगितलेल्या' मध्यें (सांगितलेल्यांतला) प्रत्येक शब्द खरा आहे.

वर्तमानभविष्यकृदन्तविशेषणांच्या नकाररूपांना 'अुदु' किंवा 'दु'

लागून :– होगद - न जाणारा; होगदुदु - होगद्दु. नीवु होगदुदन्नु ( होगद्दन्नु ) केळि विषाद वेनिसितु = तुम्ही गेलां नाहींत हें अकून वाअीट वाटलें.

आगद – न होणारें; कैलें आगदुदु, (आगद्दु ) = हातून न होणारें; कैलें आगदुदन्नु ( आगद्दन्नु ) माडलिक्के होगबेड = हातून न होणारें (तें ) करायला जाअूं नकोस.

खालील शब्दप्रयोग नवशिक्यास अेकासारखे अेक दिसतात; तरी त्यांतील फरक नीट लक्षांत घ्यावा.

होदद्दरिंद – (**गेल्यानें**), होगद्दरिंद – (**न गेल्यानें**), माडिद्दरिंद – (**केल्यानें**), माडद्दरिंद – (**न केल्यानें**).

'दु' टाळून वरील शब्द खालीलप्रमाणेंहि लिहितात. होदुदरिंद (गेल्यानें ), होगदुदरिंद ( न गेल्यानें ), माडिदुदरिंद ( केल्यानें ), माडदुदरिंद ( न केल्यानें ).

टीप :– या प्रकरणांतील वाक्यसंग्रहांत असे वरवर सारखे दिसणारे शब्दप्रयोग आले आहेत; त्यांमधील फरक ध्यानीं घ्यावा.

## वाक्य संग्रह

१ ಹಾಗೆ ಮಾಡುವದು (ಮಾಡುವುದು) ವಿವೇಕಿಗಳಿಗೆ ಯೋಗ್ಯವಲ್ಲ. हागे माडुवदु ( माडुवुदु ) विवेकिगळिगे योग्यवल्ल. तसें करणें विवेकी माणसांना योग्य नव्हे.

२ ಕೃತಜ್ಞತೆಯನ್ನು ತೋರಿಸುವುದು ನಮ್ಮ ಧರ್ಮ. कृतज्ञतेयन्नु तोरिसुवुदु नम्म धर्म. कृतज्ञता दाखविणें (हा) आमचा धर्म.

३ ಆನಂದವನ್ನು ಪಡೆಯುವುದಕ್ಕೆ ನಮಗೆ ದೇವರು ಇಂದ್ರಿಯಗಳನ್ನು ಕೊಟ್ಟಿರುತ್ತಾನೆ. आनंदवन्नु पडेयुवुदक्के नमगे देवरु अिंद्रियगळन्नु कोट्टिरुत्ताने. आनंद मिळविण्यास आम्हास देवानें अिंद्रियें दिलीं आहेत.

४ ಇದನ್ನು ಹೇಳುವುದರಲ್ಲಿ ಒಂದು ಹೊಸ ರೀತಿಯಿದೆ. अिदन्नु हेळुवुदरल्लि ओंदु होस रीतियिदे. हें सांगण्यांत अेक नवीन रीत आहे.

५ ನನ್ನ ಅಕ್ಷರವು ಚೆನ್ನಾಗಿ ಇರುವುದನ್ನು ಅವನು ಒಪ್ಪಿದನು. नन्न अक्षरवु चेन्नागि अिरुवुदन्नु अवनु ओप्पिदनु. माझें अक्षर चांगलें असलेलें त्यानें मान्य केलें.

६ ನಾವು ಇಷ್ಟು ದೂರ ಬಂದದ್ದಕ್ಕೆ ನಮ್ಮ ಕೆಲಸವಾದರೆ ನಮಗೆ ಸಮಾಧಾನವಾಗುವುದು. नावु अिष्टु दूर बंददक्के नम्म केलसवादरे नमगे समाधानवागुवुदु. आम्ही अितके दूर 'आलेल्यास' (आल्यासारखें) आमचें काम झाल्यास आम्हास समाधान होअील.

७ ನೀವು ಊರಿಗೆ ಹೋದುದರಿಂದ (ಹೋದದ್ದರಿಂದ) ನಮ್ಮ ಕೆಲಸವು ಆಗಲಿಲ್ಲ. नीवु ऊरिगे होदुदरिंद (होदद्दरिंद) नम्म केलसवु आगलिल्ल. तुम्ही गांवाला गेल्यामुळें आमचें काम झालें नाही.

८ ತಾನು ಹುಟ್ಟಿದ ಮನೆ ಬೆಳೆದ ಮನೆ ಬಿಟ್ಟು ಕೊಟ್ಟುದಕ್ಕಾಗಿ ಅವನಿಗೆ ಅಭಿಮಾನವೆನಿಸುತ್ತದೆ. तानु हुट्टिद मने बेळेद मने बिट्टु कोट्टुदक्कागि अवनिगे अभिमानवेनिसुत्तदे. आपण जन्मलेलें घर 'वाढलेलें' घर सोडून दिल्याचा ('दिल्यासाठीं') त्याला अभिमान (वाटतो).

९ ಇದು ಮಕ್ಕಳಿಗೆ ಶಿಕ್ಷಣವನ್ನು ಕೊಡದ್ದರ (ಕೊಡದುದರ) ಪರಿಣಾಮ. अिदु मक्कळिगे शिक्षणवन्नु कोडद्दर (कोडदुदर) परिणाम. हा मुलांना शिक्षण न दिलेल्याचा (देण्याचा) परिणाम.

१० ಒಂದು ಟ್ರಾಕ್ಟರು ಹೊರಳಿ ಕಾಲುವೆಯಲ್ಲಿ ಬಿದ್ದದ್ದರಿಂದ (ಬಿದ್ದುದರಿಂದ) ಮೂರು ಜನರು ಸತ್ತರು. ओंदु ट्राक्टरु होरळि कालुवेयल्लि बिद्ददरिंद (बिद्दुदरिंद) मूरु जनरु सत्तरु. अेक ट्राक्टर अुलटून कालव्यामध्यें पडल्यानें तिघेजण मेले.

११ ಯೋಗ್ಯ ಪ್ರತಿಫಲವು ಸಿಗದ್ದರಿಂದ ಅವರು ಸಂಪು ಹೂಡಲು ನಿರ್ಣಯಿಸಿದರು. योग्य प्रतिफलवु सिगद्दरिंद अवरु संपु हूडलु निर्णयिसिदरु. योग्य 'प्रतिफल' (नुकसानभरपाअी) न मिळाल्यानें त्यांनीं संप करण्याचें ठरविलें.

## प्रकरण ३९ वें

# क्रियाविशेषण अव्ययें (Adverbs)

कांहीं महत्त्वाची क्रियाविशेषणअव्ययें आपण मागें पाहिलीं (प्रकरण ६) कानडींतलीं बरीचशीं क्रि. वि. अव्ययें व्युत्पत्तिदृष्ट्या नामें असून विभक्ति-प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय जोडून झालेलीं आहेत. येथें कांहीं क्रि. वि. अव्ययांच्या बरोबरच मूळ शब्दापासून झालेलीं षष्ठ्यंत विशेषणें व नामेंहि दिली आहेत.

अिन्नु = आतां; अिन्नू = अजूनहि; अिन्नू वरेगु = आतां पर्यंत; अल्लि = तेथें; अल्लिय = 'तेथचा-ची-चें'; अल्लिय वरेगु = 'तेथच्यापर्यंत'; अल्लिंद = तेथून; अिल्लि = येथें; अिल्लिय = 'येथचा-ची-चें'; अिल्लिय वरेगे = 'येथच्या पर्यंत', -आतां पर्यंत; अिल्लिंद = येथून; अिल्लिगु = 'येथे — ला' - ह्या ठिकाणास (चतुर्थ्यंत); अल्लिगु = (च. वि.) 'त्या ठिकाणास' 'तेथे-ला' - तेथें; अल्लिंद (पंचमी) = तेथून; अल्लिय (षष्ठि) = तेथला - ली - लें त्या ठिकाणा चा-ची-चें; अल्लियवनु (विशेषणनाम) = तेथला तो, तेथला मनुष्य; ॲल्लि = कुठे; ॲल्लिगु = 'कुठे - ला' (च. वि.) कोणत्या ठिकाणास - कुठे; ॲल्लिंद = कुठून (पं. वि.); ॲल्लिय = कुठला - ली - लें; ॲल्लियवनु - ॲल्लियुदरु (वि. नामें) = कुठला तो, कुठले ते; अीग = आतां; अीगिनिंद = आतांपासून; अीगिनवनु, अीगिनवरु (वि. नामें) = आतांचा तो, आताचा मनुष्य, हल्लीचा मनुष्य — हल्लीचीं माणसें; अीगलू = आतांहीं; आग = तेव्हां; आगलू = तेव्हांहि; आगिन = तेव्हांचा-ची-चें; आगिनिंद = तेव्हां (च्या) पासून; आगिनवनु — आगिनवरु वगैरे (वि. नामें) = 'तेव्हाचा तो', 'तेव्हाचे ते'; यावाग = केव्हां; (वेळ दर्शक) यावागिन = केव्हांचा-ची-चें; यावागिनिंद = केव्हांपासून; ॲंदु = कधीं (दिवस दर्शक); ॲंदिन = कधीचा - ची - चें; ॲंदिनिंद = कधींपासून; ॲंदिगु = 'कधीं-ला' - 'कोणत्या दिवसाला (जसे आजला); अिंदु — आज; अिंदिगे — आजला; अिंदिन — आजचा - ची - चें; अिंदिनिंद — आजपासून, अिंदिनवनु - अिंदिनवरु (क्रि. वि. नाम)

= 'आजचा तो, आजचे ते, आजचा मनुष्य, आजचे लोक'; अंदु = तो दिवस, तेव्हां, त्यादिवशीं; अंदिगे = त्या दिवसाला; अंदिन = त्या दिवसाचा-ची-चें; अंदिनिंद = त्या दिवसापासून; हीगे (हींग) = असें; हागे (हांगे) = तसें; याके = कां; हेगे, ह्यागे (ह्यांगे, ह्यांग) = कसा – कसे – कशीं – कसें; मात्र – मात्र – बरीक. **आग** = 'तेव्हा' हें कृदन्त विशेषणाना जोडल्यास पुढीलप्रमाणें अर्थ होतो, बंद+आग = बंदाग (आल्यावेळी). होद +आग = होदाग (गेल्यावेळी). अी प्रश्नेयु चर्चेगे बंदाग अवरु होरगे होदरु = हा प्रश्न चर्चेस आल्यावेळी ते बाहेर गेले. 'आगि' हें आगु ह्याचें 'होअून' ह्या अर्थी भूतकृदन्ताव्यय आहे. हें शब्दांना लावून क्रियाविशेषण (**Adverb**) करण्याची अेक तऱ्हा आहे. अुदा:– अी गिडगळु नीलगिरियल्लि चेन्नागि बेळेयुत्तवे = हीं झाडें नीलगिरींत 'चांगल्या तऱ्हेनें' वाढतात. चेन्न (चांगलें) आगि (होअून) चेन्न + आगि = चेन्नागि, वाच्यार्थ 'चांगलें होअून' = चांगल्या तऱ्हेनें; विशेषवागि = 'विशेषरीत्या'; स्थिरवागि = स्थिरपणें; समुद्रमार्गवागि = 'समुद्रमार्गानें'; स्पष्टवागि = स्पष्टपणें; कूडले – लगेच, अवरु कूडले होदरु – ते लगेच गेले. (हें शब्दयोगी अव्ययाप्रमाणेंहि वापरतात (प्रकरण २१ पहा).

## वाक्यसंग्रह

१ तो अजूनहि कां आला नाही? ಅವನು ಇನ್ನೂ ಯಾಕೆ ಬರಲಿಲ್ಲ? अवनु अिन्नू याके बरलिल्ल?

२ ते तेथें गेले. ಅವರು ಅಲ್ಲಿ ಹೋದರು. अवरु अल्लि होदरु.

३ ते तेथून आले. ಅವರು ಅಲ್ಲಿಂದ ಬಂದರು. अवरु अल्लिंद बंदरु.

४ आम्ही 'त्या ठिकाणास' (तेथें) गेलों. ನಾವು ಅಲ್ಲಿಗೆ ಹೋದೆವು. नावु अल्लिगे होदेवु. (अल्लि व्हॉदवि).

५ तुमचे बोलणें अेकून आम्ही येथपर्यंत आलों. ನಿಮ್ಮ ಮಾತನ್ನು ಕೇಳಿ ನಾವು ಇಲ್ಲಿಯವರೆಗೆ ಬಂದೆವು. निम्म मातन्नु केळि नावु अिल्लियवरेगे बंदेवु. (निम्म मातु केळि अिल्लीवरेंगु बंदिवि).

६ तुम्ही येथें ('ह्याटिकाणास') कां आला? ನೀವು ಇಲ್ಲಿಗೆ ಯಾಕೆ ಬಂದಿರಿ? नीवु अिल्लिगु याकु बंदिरि? (याक बंद्री)?

७ तुम्ही येथून कधीं जाल? ನೀವು ಇಲ್ಲಿಂದ ಎಂದು ಹೋಗುವಿರಿ? नीवु अिल्लिद अेंदु होगुविरि. (भविष्य काळ). नीवु अिल्लिद यंद होगतीरि. (मुखभाषिक वर्तमानकाळ).

८ तुम्ही कुठें गेला होता? ನೀವು ಎಲ್ಲಿ ಹೋಗಿದ್ದಿರಿ? नीवु अेल्लि होगिद्दिरि? (यल्ले).

९ तुम्ही कुठें जाता? शब्दशः 'कुठें – ला'? ನೀವು ಎಲ್ಲಿಗೆ ಹೋಗುತ್ತೀರಿ. नीवु अेल्लिगे होगुत्तीरि. (नीवु यल्ले होगतीरी)?

१० तुम्ही कुठून आलां? ನೀವು ಎಲ್ಲಿಂದ ಬಂದಿರಿ? नीवु अेल्लिद बंदिरि? (नीवु यल्लिद बंदरी).

११ मुलें आतां येतात (येतील). ಹುಡುಗರು ಈಗ ಬರುವರು. हुडुगरु ईग बरुवरु. (भ. काळ). (हुडुगरु ईग बरतारऽ).

१२ आतांपासून अभ्यास करा. ಈಗನಿಂದ ಅಭ್ಯಾಸ ಮಾಡಿರಿ. ईगिनिंद अभ्यास माडिरि. (ईगिनिंद अभ्यास माडरि).

१३ तेव्हांपासून आम्ही येथें आहेत. ಆಗನಿಂದ ನಾವು ಇಲ್ಲಿ ಇದ್ದೇವೆ. आगिनिंद नावु अिल्लि अिद्देवे. (अिल्ले अिद्देवि).

१४ तुम्ही केव्हां येता – याल. ನೀವು ಯಾವಾಗ ಬರುತ್ತೀರಿ–ಬರುವಿರಿ. नीवु यावाग बरुत्तीरि – बरुविरि. (नीवु यावाग बरतीरी).

१५ ते कधीं येतात – येतील? ಅವರು ಎಂದು ಬರುತ್ತಾರೆ– ಬರುವರು. अवरु अेंदु बरुत्तारे – बरुवरु? (अवरु यंद बरतारऽ)?

१६ आज आम्ही गांवाला जातों. ಇಂದು ನಾವು ಊರಿಗೆ ಹೋಗುತ್ತೇವೆ. अिंदु नावु ऊरिगे होगुत्तेवे. (अिंद नावु ऊरिगे होगतेवी).

१७ त्या दिवशीं ते आले नाहीत. ಅಂದು ಅವರು ಬರಲ್ಲಿಲ್ಲ. अंदु अवरु बरलिल्ल. (अंद अवरु बरलिल्ल८).

१८ त्या दिवसापासून ते बाहेर गेलेले नाहीत. ಅಂದಿನಿಂದ ಅವರು ಹೊರಗೆ ಹೋಗಿಲ್ಲ. अंदिनिंद अवरु हॊरगॆ होगिल्ल.

( अंदिनिंद अवरु होगिल्ल८ ).

१९ तुम्ही असें कां केलेंत? ನೀವು ಹೀಗೆ ಯಾಕೆ ಮಾಡಿದಿರಿ? नीवु हीगे याके माडिदिरि? (नीवु हींग याक माडिदरी?)

२० त्यांनीं आम्हास तसें सांगितलें नाही. ಅವರು ನಮಗೆ ಹಾಗೆ ಹೇಳಲಿಲ್ಲ. अवरु नमगु हागे हेळलिल्ल. (हांग हेळलिल्ल).

२१ त्यांनीं असें कसें केलें? ಅವರು ಹೀಗೆ ಹೇಗೆ ಮಾಡಿದರು? अवरु हीगे हेगु माडिदरु? (अवरु हींग ह्यांग माडिदरु).

## प्रकरण ४० वें

# उभयान्वयी अव्ययें व संयोजक प्रत्यय

दोन शब्द किंवा दोन वाक्यें ह्यांची सांगड घालणाऱ्या 'अविकारी' शब्दांना 'अुभयान्वयी अव्ययें' म्हणतात; हेंच काम कित्येकदां नुसत्या प्रत्ययानेंहि होतें म्हणून त्या प्रत्ययांना 'संयोजक प्रत्यय' म्हटलें आहे.

मत्तु = आणि १ तो आणि त्याचा मुलगा – अवनु मत्तु अवन मगनु.

२ ही गोष्ट स्तुत्य व अभिनंदनीय – अिदु स्तुत्य मत्तु अभिनंदनीयवाद मातु. 'अू':– 'आणि' ह्या अर्थी 'मत्तु' हे शब्दांच्या मध्यें घालावें लागतें; हेंच काम जे दोन शब्द जोडावयाचे असतात त्यांतल्या **प्रत्येक शब्दास** 'अू' जोडल्यानें होतें.

अुदा:– तो व आम्ही आलों – अवनु + अू = अवनू नावु + अू = नावू अवनू नावू बंदेवु. हें स्तुत्य व अभिनंदनीय – अिदु स्तुत्यवू अभिनंदनीयवू. त्यांनीं पुष्कळ लेख व कादंबऱ्या लिहिल्या – अवरु बहळ लेखगळन्नू-कादंबरिगळन्नू बरेदरु.

आदरे = परंतु; नानु अल्लि होगि केळिदे आदरे ननगे माहिति सिगलिल्ल. मी तेथें जाअून विचारिलें परंतु मला माहिती मिळाली नाही. (मुखभाषिक अुच्चार 'आदरऽ').

हा शब्द ‘परंतु’ ह्या अर्थी कोणत्याही शब्दास न जोडतां स्वतंत्र ठेवतात पण, मागील शब्दास जोडून हागु+आदरे = ‘हागादरे’ = ‘तसें झाल्यास’ असा अर्थ होतो.

‘पक्षार्थक’ रूपें मागे ३६ व्या प्रकरणांत आलीं आहेत, तसलें हें आगु (होणें) ह्या धातूचें रूप आहे. (आदरे = झाल्यास).

अंदरे = म्हणजे. (१) नीनु होगु अंदरे नानु बरुत्तेने = तू जा **म्हणजे** मी येतों. (२) स्वराज्य अंदरे नम्म जनर राज्य = स्वराज्य **म्हणजे** आमच्या लोकांचें राज्य.

याकंदरे = याके+अंदरे ‘कां म्हणजे’, कारण कीं; ई सल रेशन तेगेयुवदिल्ल याकंदरे बेळेगळु चलो अिल्ल = ह्या वर्षी रेशन अुठवीत नाहीत ‘कां म्हणजे’ पिकें चांगली नाहींत.

अेंदु = म्हणून, असें; जनरिगे परवानगी कोडबारदु अेंदु मंत्रिगळु हेळिदरु = लोकांना परवानगी देअूं नये असें मंत्र्यांनीं सांगितलें. सरकारवु सहाय माडबेकु+अेंदु निम्म अिच्छे अिद्दरे = सरकाराने सहाय्य करावे अशी तुमची अिच्छा असेल तर. (माडबेकेंदु)

अेंब = म्हणणारा - री - रें, नांवाचा - चीं - चें – मनवेंब मर्कटन चेष्टेयन्नरियलारे = मनरूपी (‘म्हणणाऱ्या’) माकडाची चेष्टा मी समजूं शकत नाही.

आदकारण, आद्दरिंद = ‘झाल्याकारण’ - म्हणून. नीनु अभ्यास माडलिल्ल आदकारण नपास आदि = तू अभ्यास केला नाहीस म्हणून नापास झाला.

अदक्के – अदु = ‘तें’ चें चतुर्थिविभक्ति रूप. ह्याचा अुपयोग खालील प्रमाणें ‘म्हणून’ ह्या अर्थी करतात. नी केळलिल्ल अदक्के नानु हेळलिल्ल = तू विचारलें नाहीस म्हणून मी सांगितलें नाहीं. मुखभाषेंत ‘**अंत ऽ**’ हा शब्द कारण दर्शविण्यास वापरतात. अवरु केळिदरु अंत हेळिदे = त्यांनीं विचारलें म्हणून सांगितलें.

अिल्लवे – अिल्लदिद्दरे = ‘नाहीतर’ – ‘अथवा’ (अथवा हा संस्कृत शब्दहि कानडींत वापरतातच) अवरु अिल्लवे नावु – ते ‘नाही तर’ (किंवा)

आम्ही; गाडियिंद होगु अिल्लदिद्दरे मोटरिनिंद होगु = गाडीनें जा 'नाही तर' मोटारीनें जा.

कूडले – लगेच, बरोबर; खालील अुपयोग लक्षांत घ्या :–

'नीनु होदकूडले नानु बरुत्तेने' = तूं गेलास की मी येतों. 'कूडले' हें अव्यय 'होद' ह्या भू. कृ. विशेषणास जोडलें आहे.

'अल्ला' – 'ते म्हणाले **कीं**' ह्या मधील 'कीं' च्या अर्थी तें वापरतात 'कीं' ह्यास समानार्थी अव्यय कानडींत नाही. परंतु मुखभाषेंत व कोर्ट-कचेऱ्यांतील लेखभाषेंतहि हीं अुणीव नित्य भासल्यामुळें 'अल्ला' हे रूढ झालें आहे. (हें मूळांत अव्यय नसून 'अल्ल' म्हणजे 'नव्हे' ह्या अर्थाच्या अव्यय क्रियापदाचें रुढीतलें अव्ययासारखें वापरणेचें मुखभाषिक रूप आहे. 'प्रतिवादीची कैफियत अशी आहे कीं' = 'प्रतिवादिय कैफियत्तु हीगे अदे अल्ला'– लेखभाषेंत 'कीं' ला समानार्थी अव्यय नसल्यानें 'नेहरू म्हणाले **कीं**, भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व मला मान्य आहे'. हें खालीलप्रमाणें लिहावें लागतें :—

(१) भाषावार प्रांतरचनेय तत्त्ववु ननगे मान्यविदे अेंदु नेहरूरवरु अंदरु. भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व मान्य आहे असें नेहरू म्हणाले किंवा, 'नेहरूरंवरु अी रीति हेळिदरू; भाषावार प्रांतरचनेय .... .... .... .... मान्यविदे'.

'अू' :– मागे पाहिलेल्या पक्षार्थक अव्ययांना हें लावल्यास 'तरीहि' असा अर्थ होतो. 'होदरे + अू' मी गेलों तरी ते आले नाहीत = नानु होदरू अवरु बरलिल्ल. हेळिदरे = सांगितलें तर; हेळिदरू = सांगितलें तरीहि (सांगूनहि); नावु हेळिदरू अवनु केळलिल्ल = मी सांगितलें तरीहि त्यानें अेकलें नाहीं.

'रे' – कानडींत मराठींतील 'जर' अिंग्रजींतील 'if' चें समानार्थी स्वतंत्र अव्यय नाहीं. पक्षार्थक रूपावरून तो अर्थ करावा लागतो. 'रे' लावून होणारी पक्षार्थक रूपें मागें पाहिलींच आहेत. (जर) तुम्ही आलांत तर मी येअीन = नीवु बंदरे नानु बरुवेनु.

'अे', हा प्रत्यय कोणत्याहि शब्दास जोडल्यानें मराठींतील 'च' सारखा अर्थ येतो. अवनु+अे=अवने (तोच) अवने नन्न मग = तोच माझा मुलगा. अदु+अे=अदे (तेंच) अदे नन्न पुस्तक = तेंच माझें पुस्तक. अष्टु - तितकें,

16

अष्टु+अे=अष्टे (तितकेंच) नमगे अष्टे बेकु=आम्हाला तितकेंच हवें.

'अष्टे' ह्याचा आणखी अेका विशिष्ट तऱ्हेनें खालीलप्रमाणें अुपयोग करतात.

अेखाद्या गोष्टीविषयीं लिहितांना वाचकांना ती गोष्ट माहीतच आहे असें प्रारंभीं सुचवितांना 'अष्टे' हा शब्द शेवटीं क्रियापदास जोडतात. अुदा:– आपणास माहीतच आहे कीं, त्यावेळीं जपान देश सर्व देशांना 'कलश प्राय' झाला होता = आग जपान देशवु अेल्ल देशगळिगे कलशप्राय वागित्तष्टे.

अंते – ह्याचे खालीलप्रमाणें अुपयोग आहेत:–

(१) शब्दयोगी अव्ययासारखा अुपयोग:– 'प्रमाणें' ह्या अर्थी शब्दाच्या षष्ठिविभक्तिरूपास जोडून:– बंगारदंते (सोन्याप्रमाणें) बंगारद+अंते. कृदन्तविशेषणास जोडून:– नीवु माडिदन्ते (माडिद+अंते) 'तुम्ही केल्याप्रमाणें'. 'सत्त' – मेलेला-ली-लें, सत्त+अंते=सत्तंते – मेल्यासारखा-खी-खें अवनु सत्तंते बिद्दनु = तो मेल्यासारखा पडला. 'सत्त हागे' हि म्हणतात.

वर्तमान भविष्य कृदन्त विशेषणास जोडून:– 'गीतेयल्लि हेळिरुवंते' (हेळिरुव+अंते) 'गीतेंत सांगितल्याप्रमाणें'.

(२) 'अंते' ह्याचा 'म्हणे' ह्या अर्थी अुपयोग करतात. हीगे अवरु माडिदरंते (माडिदरु+अंते) = 'त्यांनीं असें केलें म्हणे'.

अिदल्लदे – ह्या शिवाय, 'शिवाय असें कीं'; 'अिदर होरतु' अिदर – ह्याच्या, होरतु – शिवाय (प्रकरण २१ पहा) अिदरहोरतु='ह्याच्या शिवाय'.

कडेगे – टोकास, शेवटीं, 'कडेला' (प्रकरण २१ पहा) दक्षिण कर्नाटकांत 'शेवटीं' ह्या अर्थी कोनेगे म्हणतात.

कडेगू – शेवटींही – कधींहि; अदन्नु कडेगू अवनु माडलिल्ल = तें त्यानें कधींहि (शेवटपर्यंतहि) केलें नाहीं.

हागू – 'आणि तसेंच' ह्या अर्थी खालीलप्रमाणें वापरतात. सभेयल्लिय हिंदुमहासभासदस्यरु हागू कम्युनिष्टरु सभात्याग माडिदरु = सभेंतील हिंदुमहासभासदस्य 'आणि तसेंच' कम्युनिष्ट यांनीं सभात्याग केला.

रेडियोवरील कार्यक्रम अगाऊ प्रगट करतांना असें म्हटलेलें आपण ऐकतों = मुंजाने ऐळु गंटेगे हागू रात्री हत्तु गंटेगे श्री .... .... अिवरु हिंदुस्थानी संगीतवन्नु हाडुवरु = सकाळीं सात वाजतां 'व तसेंच' रात्रीं दहा वाजतां श्री .... .... हे हिंदुस्थानी संगीत गातील.

आमेले – त्या नंतर; आमेले अवरु पंचवार्षिक योजनेय बग्गे मातादिदरु = त्या नंतर ते पंचवार्षिक योजने (च्या) विषयीं बोलले.

ईगलू – आतांहि, अजून देखील. ईगलू नावु अदे मातन्नु हेळुत्तेवु = आतांहि आम्ही तीच गोष्ट सांगतों.

अल्लदे – 'शिवाय असें कीं' 'ऐवढेंच नव्हे तर' ह्या अर्थी उभयान्वयी अव्यय; ई वर्ष बेलेगळु अिळिदिरुववल्लदे (अिळिदिरुववु+अल्लदे) शेंगाअेण्णेगे निर्यातविल्ल' = ह्या वर्षी किंमती उतरल्या आहेत, ऐवढेंचनव्हे तर 'शेंगातेला'स (भुअिमुगाच्या तेलाची) निर्यात नाहीं.

## प्रकरण ४१ वें

# कानडींतील 'कर्मणि प्रयोग'

'कर्मणि' प्रयोगासंबंधानें कानडी व मराठी यांमध्यें ऐक महत्त्वाचा फरक आहे. तो नीट माहीत नसल्यानें विद्यार्थ्यांच्या मनांत पुष्कळदां जरासा गोंधळ होत असतो.

परंतु यावरून असें मात्र कोणी समजूं नये कीं, कानडींत 'कर्मणि-प्रयोग' याचा अर्थ मराठींतल्याहून निराळा आहे. **मराठीप्रमाणेंच कानडींतहि, जेव्हां कर्माच्या लिंगवचना प्रमाणें क्रियापदाचें रूप असतें, तेव्हां त्या वाक्य-रचनेस 'कर्मणिप्रयोग' म्हणतात.**

**खालील वाक्य पहा:—**

**रामानें काम केलें.** आपणांस माहीतच आहे कीं या मराठी वाक्यांतील प्रयोग 'कर्मणि' आहे. ('काम' या कर्माच्या लिंगवचना प्रमाणें क्रिया-

पदांचें रूप आहे ). यांतील कर्ता तृतीयान्त आहे. परंतु, याच अर्थाच्या कानडी वाक्यांतील प्रयोग ' कर्मणि " होत नाहीं व कर्ताहि तृतीयान्त असत नाहीं.

अुदा:– रामनु कॆलसवन्नु माडिदनु या वाक्यांतील प्रयोग कानडींत 'कर्तरि' आहे. ('रामनु' या कर्त्याप्रमाणें 'माडिदनु' हें क्रियापद आहे).

आतां खालील वाक्य पहा:—

'शिपायाकडून चोर धरिला गेला' या मराठी वाक्यांत 'शिपायाकडून' हा कर्ता शब्दयोगीअव्ययान्त आहे व 'चोर' या कर्माच्या लिंगवचनाप्रमाणें 'धरिला गेला' हें क्रियापद आहे. म्हणून कर्मणि प्रयोगाचा हा अेक प्रकार आहे पण या प्रयोगास तर्खडकरांनी वगैरे **'कर्मकर्तरि प्रयोग'** म्हटलें आहे. हा अिंग्रजींतील 'Passive Voice' होय.

मराठी कर्मकर्तरि (Passive Voice) प्रयोगाच्या स्वरूपाच्या कानडीवाक्यांतील प्रयोग मात्र कानडींत 'कर्मणि' होतो, व कर्ता तृतीयान्त असतो.

या पुढें कानडींतील कर्मणि प्रयोग याचा अर्थ मराठींतील **'कर्मकर्तरि-(Passive)'** अशा मर्यादित घ्यावा. **'कर्मकर्तरि'** (Passive) **वाक्य-रचनेव्यतिरिक्त** अितर **कोणत्याहि वाक्यरचनेंतील प्रयोग कानडींत 'कर्मणि' होत नाहीं.**

कर्मणि (कर्मकर्तरि) प्रयोगाचा अुपयोग:– कोणत्याहि भाषेंत हा कर्मणिप्रयोग (कर्मकर्तरि Passive) सोअिस्कर असतो. मराठी किंवा कानडी-पेक्षां अिंग्रजींत हा प्रयोग अधिक रूढ आहे. मराठींत ज्या तऱ्हेनें तो रूढ आहे ती तऱ्हाहि महाराष्ट्रांत पुष्कळ विद्वानांना मान्य नाहीं. 'तें काम केलें गेलें', करण्यात आलें, ही रचना त्यांना कृत्रिम वाटते, 'मराठी गद्याच्या अिंग्रजी अवतारा'चाच तो अेक प्रकार आहे असें त्यांना वाटतें. पण हा प्रयोग अुपयुक्त आहे, यांत शंका नाहीं. आपण वाक्यांत 'कर्त्याचा' (अेखादी गोष्ट करणाऱ्याचा) अुल्लेख बहुधा करतों; परंतु पुष्कळदां तो अुल्लेख करणें:–

१ अनावश्यक असतें, २ गैरसोयीचें असतें. अशा वेळीं 'करणाऱ्याचा' अुल्लेख न करतां वाक्य करणें सोयीचें असतें. समजा आपण अेखाद्याच्या घरीं

गेलों व तेथील लोकांनीं आपणांस चांगलें वागविलें नाही. आपणांस हें दुसऱ्यापाशीं सांगतांना 'कोणी' चांगलें वागविलें नाहीं हें मुख्यतः सांगायचें नसून 'चांगलें वागविलें नाहीं' हेंच सांगायचें असल्यास 'मला चांगलें वागविण्यांत आलें नाहीं', असें म्हणणें सोयीचें असतें. ('I was not treated well') दुसरें अेक अुदाहरण घेऊं. रेलवेच्या रुळावरून पलीकडे ओलांडून जाणारांवर 'आम्ही' खटला भरूं असें म्हणण्याची, म्हणजे खटला कोण भरेल ह्याचा अुल्लेख करण्याची जरूरी नसते म्हणून " Tress passers will be prosecuted " ओलांडून जाणारांवर खटला भरला जाअील असा कर्मकर्तरि Passive वाक्ययुक्त सूचना फलक असतो.

कानडींतील हा 'कर्मणि (कर्मकर्तरि) प्रयोग तीन प्रकारांनीं करतात. त्यांपैकीं पहिला अुच्चारण्यास बोजड असल्यानें मागें पडून दुसरा प्रकार, व त्याहून अधिक तिसरा प्रकार अलीकडे दहापंधरा वर्षांत रूढ झाला आहे; आपण तिन्हीहि प्रकार पाहूं :–

**पहिला प्रकारः–** धातूस 'अल्पडु' हा सहाय-धातू जोडून करतात. पडु (पावणें, भोगणें) ह्या धातूप्रमाणेंच 'अल्पडु' चीं आख्यातरूपें आहेत.

**'पडु' ची रूपें:—** वर्तमानकाळः पडुवेनु, पडुवेवु. पडुवि, पडुविरि. पडुवनु, पडुवळु; पडुवदु, पडुवरु.

| **भूतकाळ** | | **भविष्यकाळ** | |
|---|---|---|---|
| पट्टेनु | पट्टेवु | पडुवेनु | पडुवेवु. |
| पट्टि | पट्टिरि | पडुवि | पडुविरि. |
| पट्टनु | पट्टरु | पडुवनु | पडुवरु. |
| पट्टळु | पट्टरु | पडुवळु | पडुवरु. |
| पट्टितु | पट्टरु | पडुवदु | पडुववु. |

माडु + अल्पडु = 'माडल्पडु'. तें केलें जातें = अदु माडल्पडुत्तदे. करेयु + अल्पडु; सभा बोलविली गेली = सभेयु करेयल्पट्टितु.

**दुसरा प्रकारः–** '**संक्षेप कर्मणि**' पहिल्या प्रकाराचें हें संक्षेप रूप आहे. 'माडल्पट्टिदे' च्या अेवजीं 'माडिदे' असें हें रूप होतें. स्वयंपाक

करण्यांत आला आहे – ‘अडिगे माडल्पट्टिदे’ ह्यांचें संक्षेप कर्मणिरूप अडिगे माडिदे (अडिगि माड्यद्ऽ) ह्याचा उच्चार द्वित्तयुक्त ‘ड्य’ नव्हे; (अैकून च लक्षांत घेणें). ‘त्यांना सांगून पाठविण्यांत आलें आहे’ = अवरिगे हेळि-कळिसल्पट्टिदे = अवरिगे हेळि ‘कळिसिदे’ (कळ्शद्ऽ).

**तिसरा प्रकार :–** (भावकर्तृक) अलीकडे बराच रूढ झालेला हा प्रकार आहे. मूळ कानडींत हा प्रयोग नसल्यामुळें त्याला योग्य असें काय नांव द्यावें हें अजून ठरलेलें नाहीं, म्हणून कांहीं विद्वानांच्या सल्ल्यानें त्यास ‘भावकर्तृक’ असें येथें म्हटलें आहे.

कोणत्याहि सकर्मक धातूचें दुसरें भावरूप (‘माडलु’ ‘हेळलु’ वगैरे) घेअून त्यास ‘आगु’ (होणें) या धातूचें (अर्थाप्रमाणें अवश्य त्या काळां-तील) **नपुंसकलिंगी तृ. पु. एकवचनी** क्रियापद जोडून हा प्रयोग करतात.

या प्रयोगांत ‘कर्म’ बहुधा द्वितीयान्त व केव्हां केहां प्रथमान्त असते अुदा:– **सैन्य** पाठविण्यांत आलें = सैन्यवन्नु (द्वि. पु.) कळिसलायितु (कळिसलु + आयितु). पत्र लिहिलें गेलें = पत्र बरेयलायितु (बरेयलु + आयितु). हा प्रयोग करण्यास लागणारी ‘आगु’ (होणें) या धातूचीं **तृतीयपुरुषी नपुंसकलिंगी एकवचनी क्रियापदें** आपणास माहीतच आहेत. आयितु (भूतकाळ), आगुवदु (भविष्यकाळ) आगिदे (पूर्णवर्तमानकाळ).

## वाक्यसंग्रह

**प्रकार पहिला:–**

१ ಅವರು ನೇಮಿಸಲ್ಪಟ್ಟಿದ್ದಾರೆ. अवरु नेमिसलपट्टिद्दारे ते नेमले गेले आहेत.

२ ಅವರಿಂದ ಬರೆಯಲ್ಪಟ್ಟ ಪುಸ್ತಕವು. अवरिंद बरेयल्पट्ट पुस्तकवु त्यांच्याकडून लिहिण्यांत आलेलें पुस्तक.

३ ಕೆಲಸವು ಮಾಡಲ್ಪಟ್ಟಿತು केलसवु माडल्पट्टितु. काम कर-ण्यांत आलें.

**प्रकार दुसरा :–** **(संक्षेप - कर्मणि)**

१ ಅವರನ್ನು ಸರಕಾರೀ ವಕೀಲರೆಂದು ನೇಮಿಸಿದೆ, अवरन्नु सर-कारी वकीलरेंदु नेमिसिदे. त्यांना सरकारी वकील म्हणून नेमिलें आहे.

२ ಅವರಿಗೆ ರಜೆ ಕೊಟ್ಟಿದೆ. अवरिगॆ रजॆ कॊट्टिदॆ. त्यांना रजा दिली आहे.

३ ಎಲ್ಲರಿಗೂ ಹಸ್ತಪತ್ರಿಕೆಗಳನ್ನು ಹಂಚಿದೆ. ऎल्लरिगू हस्तपत्रिकॆगळन्नु हंचिदॆ. सर्वांना हस्तपत्रिकें वाटलीं आहेत.

**तिसरा प्रकारः**– (हा अलीकडे सर्वांत अधिक रूढ होऊं लागला आहे)

१ गिरण्यांना कुलुप लावण्यांत आलें आहे. ಗಿರಣಿಗಳಿಗೆ ಕೀಲಿ ಹಾಕಲಾಗಿದೆ. गिरणिगळिगॆ कीलि हाकलागिदॆ. (हाकलु + आगिदॆ)

२ शंभर लोकांना दवाखान्यांत अुपचार करण्यांत आला. ನೂರು ಜನರನ್ನು ದವಾಖಾನೆಯಲ್ಲಿ ಉಪಚಾರಿಸಲಾಯಿತು. नूरु जनरन्नु दवाखानॆयल्लि अुपचारिसलायितु.

३ त्यांनी प्रयत्न चालविले आहेत असें सांगण्यांत येतें. ಅವರು ಪ್ರಯತ್ನವನ್ನು ನಡೆಸಿದ್ದಾರೆಂದು ಹೇಳಲಾಗುತ್ತದೆ. अवरु प्रयत्नवन्नु नडॆसिद्दारॆंदु हेळलागुत्तदॆ.

४ ब्रिटिशांच्याकडून सैन्य पाठविण्यांत आलें. ಬ್ರಿಟಿಶರಿಂದ ಸೈನ್ಯವನ್ನು ಕಳಿಸಲಾಯಿತು. ब्रिटिशरिंद सैन्यवन्नु कळिसलायितु.

५ त्यांना संमति देण्यांत आली. ಅವರಿಗೆ ಸಮ್ಮತಿಯನ್ನು ಕೊಡಲಾಯಿತು. अवरिगॆ सम्मतियन्नु कॊडलायितु.

१ ಇಂದು ಸಂಜೆ ಆರು ಗಂಟೆಗೆ ಧಾರವಾಡ ಕಲಾಮಂಡಳದಲ್ಲಿ ಶ್ರೀ ದೇಶಪಾಂಡೆ ಗುರುರಾಯರ ಗಾಯನವನ್ನು ಏರ್ಪಡಿಸಲಾಗಿದೆ. अिदु संजॆ आरु गंटॆगॆ धारवाड कलामंडळदल्लि श्री. देशपांडे गुरुरायर गायनवन्नु अेर्पडिसलागिदॆ = आज संध्याकाळीं सहा वाजतां धारवाड कलामंडळांत श्री. देशपांडे गुरुरावांचें गायन ठेवण्यांत आलें आहे. अेर्पडिसु – ठेवणें, व्यवस्था करणें वगैरे (to arrange). आडनांव आधीं व नांव मग अुल्लेखिण्याची कानडींत बरीच रूढी आहे.

२ ಈ ವಿಧೇಯಕವನ್ನು ಲೋಕಸಭೆಯ ಅಧಿವೇಶನದಲ್ಲಿ ಮಂಡಿಸಲಾಗುವುದು. ई विधेयकवन्नु लोकसभॆय अधिवेशनदल्लि मंडिसलागुवुदु. हें विधेयक लोकसभेच्या अधिवेशनांत मांडण्यांत येअील. मंडिसु – मांडणें.

३ ಪರಿಸ್ಥಿತಿಯು ಸುಧಾರಿಸಿದೆ ಎಂದು ಹೇಳಲಾಯಿತು. परिस्थितियु सुधारिसिदे अेंदु हेळलायितु. परिस्थिति सुधारली आहे 'म्हणून' (असें) सांगण्यांत आलें.

४ ಅವರಿಗೆ ಆಮಂತ್ರಣವನ್ನು ಕಳಿಸಲಾಗಿತ್ತು. अवरिगे आमंत्रणवन्नु कळिसलागित्तु. त्यांना आमंत्रण पाठविण्यांत आलें होतें.

५ ಈ ಸ್ಟೇಶನ್‌ಗಳಿಗೆ ವಿಶೇಷ ಗಾಡಿಗಳನ್ನು ಬಿಡುವ ಏರ್ಪಾಡು ಮಾಡಲಾಗಿದೆ. अी स्टेशन्गळिगे विशेष गाडिगळन्नु बिडुव अेर्पाडु माडलागिदे. या स्टेशनांना विशेष गाड्या सोडण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. अेर्पाडु – व्यवस्था.

---

## प्रकरण ४२ वें

# कानडीची संधिप्रचुरता व संधिपरिचय

कानडी ही संधि प्रचुर भाषा आहे. 'कन्नड' संधीचा 'नामविचार' ह्या प्रकरणांत विभक्तिरूपें समजून घेण्यासाठी अवश्य तेवढा खुलासा आलेलाच आहे. येथें त्या विषयी अधिक विचार करूं.

मराठीच्या मानानें कानडींत संधीचें प्रमाण फार आहे. अन्यभाषकांस कानडींतील संधिनियम समजून घेणें जरा अवघड जातें. हे संधिनियम संस्कृत प्रमाणेंच असते तर अडचण वाटली नसती. कारण सर्वसाधारणपणें मराठी सुशिक्षित मनुष्यास संस्कृत संधि नियमा प्रमाणें बनलेल्या रूपांचा परिचय असतोच. पण कानडीचे संधिनियम संस्कृताहून निराळे आहेत. 'कन्नड स्वर संधि' व 'कन्नड व्यंजनसंधि' असा त्यांचा व्याकरणांतून अुल्लेख केलेला असतो. मराठींतहि निव्वळ मराठी शब्दांचा संधि केव्हां केव्हां संस्कृत संधिनियमापेक्षा निराळ्या तऱ्हेनें होतो हें मागें सोदाहरण दाखविलेंच आहे. अशीं संधिरूपें संवयीमुळें आपल्या सहज लक्षांत राहिलेलीं असतात.

कानडींतही संस्कृतशब्दापुढें संस्कृत शब्द आला कीं संस्कृत संधिनियमाप्रमाणेंच संधि होतो. परंतु, कानडी शब्दापुढें कानडी शब्द आला कीं **'कन्नड संधि'** प्रमाणें संधि होतो. त्यांत 'कन्नड स्वरसंधि' व 'कन्नड-व्यंजन संधि' असे दोन प्रकार आहेत:–

## कन्नड स्वरसंधि

नियम पहिला – स्वरापुढें स्वर आला कीं जो संधि होतो त्याला 'स्वरसंधि' म्हणतात.

नियम दुसरा :– स्वरापुढें स्वर आल्यास, अर्थहानि (विपर्यास) होण्यासारखा नसेल तर, पहिल्या शब्दाच्या अंत्य स्वराचा लोप होतो. ह्याला 'स्वरलोप' संधि म्हणतात. नम्म + अल्लि = नम्मल्लि 'आमच्या तेथें' – आमच्या येथें. इदु + अल्लि = इदिल्लि आज + येथें = आज येथें. अिद्दारे + अेंदु = अिद्दारेंदु – आहेत + म्हणून. होगि + अिद्दारे = होगिद्दारे = 'जाऊन आहेत' (गेले आहेत).

संधियुक्त वाक्याचें अेक अुदाहरण :– 'अोंदु नायियु नीरल्लि तन्न नेरळन्नु नोडितु' अेका कुत्र्यानें पाण्यांत आपली सावली पाहिली. ह्यांत नीरु + अल्लि – नीरल्लि = पाण्यांत (सप्तमीविभक्ति) नेरळु + अन्नु (द्वितीया वि.) हे शब्द संस्कृत संधीप्रमाणें 'नीर्वल्लि' 'नेरळ्वन्नु' झाले असते.

आतां खालील वाक्यांत संधि कां होत नाहीं, हें पाहूं :–

'आग अदु बेरे अोंदु नायि अिदे अेंदु तिळियितु' 'तेव्हां तें दुसरें अेक कुत्रें आहे असें समजलें'.

संधिनियमाप्रमाणें ह्या मध्यें :– आग + अदु = 'आगदु' नायि + अिदे = 'नायिदे'. अशीं रूपें व्हावयास हवीं होतीं. परंतु असा संधि होत नाहीं. कारण, 'आगदु' म्हटलें कीं तें 'होणार नाहीं' अशा अर्थाचें प्रत्ययसिद्ध नकाररूप होईल व त्यांत व ह्यांत साम्य असल्यामुळें अर्थाचा गोंधळ होईल. 'नायिदे' असा कांहीं अर्थ न होणारा विचित्र शब्द होतो म्हणून संधि टाळला.

नियम तिसरा :– (आगमसंधि) स्वरलोपसंधीमुळें अर्थविपर्यास होत असेल तर 'आगम' येतो. आगमाचे नियम :–

(१) आ, अि, अ़े, अे, अै, ह्या स्वरांपुढें स्वर आल्यास मध्यें 'य' आगम येतो. 'मने + अिल्ल' = घर नाहीं. या शब्दाचें रूप स्वरलोप संधी-प्रमाणें 'मनिल्ल' झालें असतें. पण ह्या शब्दानें कांहीं अर्थ होत नाहीं म्हणून वरील आगम नियमा प्रमाणें 'मनॆयिल्ल' असें रूप होतें. तसेंच 'मने + अल्लि' मनॆयल्लि ('मनल्लि' नव्हे).

(२) अु, ऋ, ओ, ह्या स्वरापुढें स्वर आल्यास 'व कार' आगम येतो. वासरुं असलेली गाय = करु + अिद्द आकळ = करुविद्द आकळ (करु = वासरुं).

(३) आ, अी, ह्या स्वरांपुढें अु, अू, ओ, अो, हे स्वर आल्यास 'व'कार आगम येतो. आ + अुंगर (ती आंगठी) = आवुंगर. हें जेवण = अी + अूट = अीवूट.

(४) आ, अी, ह्या स्वरांपुढें अि, अी, अॆ, अे, हे स्वर आल्यास 'य' आगम येतो. आ + अॆले = आयॆलॆ = तें पान

**'प्रकृतिभाव'** नियम :–

कांहीं ठिकाणीं संधि न करतां शब्द जसेच्या तसे ठेवायचे असतात त्याला **'प्रकृतिभाव'** म्हणतात. याचे नियम :–

(१) 'आ' = तो - ते - तीं ह्या दर्शकविशेषणापुढें अ, आ, अ़े, ओ, आल्यास 'प्रकृतिभाव' होतो. (म्हणजे संधि होत नाहीं). आ + अरमनॆ – आ अरमनॆ = तो राजवाडा. आ + आळु – आ आळु = तो गडी. आ + अेत्तु – आअेत्तु = तो बैल. आ + ओतण – आ ओतण = तें आमंत्रण. अी = हा - ही - हें ह्या दर्शकविशेषणापुढें अ, आ, अॆ, ओ, आल्यास 'प्रकृतिभाव' होतो. अी अरमनॆ, अी आळु, अी अॆत्तु, अी ओतण.

(२) हॊर (बाहेरील) हॊस (नवीन) ऒळ (आंतील) ह्या शब्दांपुढें स्वर आल्यास 'प्रकृतिभाव' होतो :– हॊस + अंगडि – हॊस अंगडि = नवीन दुकान. हॊर + अंगळ – हॊर अंगळ = बाहेरील सोपा (अंगण).

(३) संबोधना पुढें किंवा भाव बोधक अव्यया पुढें स्वर आल्यास 'प्रकृतिभाव' होतो. मगने ओड = मुला, पळ. अहह, अॆष्टु चलो = अहाहा, किती छान?

### कन्नड व्यंजन संधि

स्वर संधीप्रमाणेंच व्यंजन संधि नांवाचा अेक स्वतंत्र संधि कानडींत आहे. तो असा :–

(१) समासांत 'अुत्तरपद' असलेल्या शब्दाच्या आद्य 'क, 'त', प', काराच्या अेवजीं अनुक्रमें 'ग, द, ब' कार येतो. अुदा:– हळे+कन्नड =हळेगन्नड 'जुनें कानडी'. मर + तुदि=मरदुदि 'झाडाचें टोंक' (मर-झाड). तण + पिट्ट = तंबिट्ट 'थंड पीठ' (तंबिट्ट).

(२) समासांतील अुत्तरपदाच्या आद्य प, ब, म, काराच्या जागीं 'व कार' आदेश होतो. तले+बागि = तलेवागि = डोकें वाकवून. तेरॆ+बायि = तेरॆवायि = अुघडें तोंड किंवा अुघडें तोंड असलेला मनुष्य. नॆल+मनॆ = नॆलवनॆ = 'जमीन घर' = तळघर.

### 'संधि' करणें हें 'आवश्यक' कीं 'वैकल्पिक'?

ह्या संबंधानें सर्व सामान्यपणें असें म्हणतां येअील कीं अेखादा शब्द (पद) तयार होतांना जो संधि होतो तो केलाच पाहिजे. अुदा:– विभक्ति रूपें, आख्यात रूपें वगैरे. अशा संधीस **'पदमध्य संधि'** म्हणतात.

वाक्यांतील दोन शब्दांमध्यें जो संधि होतो त्याला **पदान्तसंधि** म्हणतात. हा मात्र वाटल्यास करावा किंवा करुं नये ('वैकल्पिक' आहे). अुदाहरणें :-

१ ಹಾನಿಯಾಗಿದೆ. हानियागिदॆ. हानियु+आगिदॆ = हानि झाली आहे.

२ ಅವರು ಮಾಡಿದರೆಂದು. अवरु माडिदरॆंदु. अवरु माडिदरु + अॆंदु. त्यानीं केलें म्हणून.

३ ಉದಾಹರಣೆಗಳನ್ನು ಕಲಿತು ಅನುಸರಿಸಬೇಕು. अुदाहरणॆ-गळन्नु कलितु अनुसरिसबेकु. अुदाहरणें शिकून अनुसरायला पाहिजेत.

४ 'ರಾಮ' ಇವನನ್ನು 'राम' अिवनन्नु राम ह्यास (द्वि. वि.).

५ ಗಾಂಧೀಜೀಯವರ ಜೀವನದಿಂದ ಏನು ಕಲಿಯಬೇಕು. गांधीजीयवर जीवनदिंद अेनु कलियबेकु. गांधीजीच्या जीवनापासून काय शिकावें.

६ ಅವರ ಅಧ್ಯಕ್ಷೀಯ ಭಾಷಣ. अवर अध्यक्षीय भाषण यांचें अध्यक्षीय भाषण.

७ ಆ ದಿನವನ್ನು ಆಚರಿಸಿದರು. आ दिनवन्नु आचरिसिदरु. त्यानीं तो दिवस आचरिला.

'**प्रकृतिभावाचीं**' म्हणजे **संधि करूं नये** ह्या नियमानुसार संधि न केल्याचीं अुदाहरणें :–

१ ಆ×ಅರಸನ ಮನೆ. आ×अरसन मने. (त्या राजाचें घर).

२ ಆ×ಅಟ್ಟ. आ×अट्ट. (ती माडी).

३ ಹೊಸ × ಅರಿವಿ. होस × अरिवि. (नवीन कापड).

४ ಈ×ಅಡಿವಿ ಯಾರದು? ई×अडिवि यारदु? (हें रान कुणाचें?).

५ ಮಗನೇ×ಅಲ್ಲಿ ಹೋಗು. मगने×अल्लि होगु. (मुला, तेथें जा).

कन्नड संधि ओळखण्याचा सराव होण्यासाठीं वाक्यें :–

१ ಸಮಾಜದ ಪ್ರತಿಯೊಬ್ಬ ಮನುಷ್ಯನು ಅಹಿಂಸಾ ವೃತ್ತಿಯುಳ್ಳವನಾಗುವನೆಂದು ಯಾರೂ ಭಾವಿಸಿಲ್ಲ. समाजद प्रतियोब्ब मनुष्यनु अहिंसा वृत्तियुळ्ळवनागुवनेंदु यारू भाविसिल्ल. प्रति + ओब्ब, अहिंसावृत्ति + अुळ्ळवनु + आगुवनु + अेंदु अर्थ: समाजांतील प्रत्येक मनुष्य अहिंसावृत्ति असलेला होअील असें कोणीही मानिलेलें नाहीं.

२ ಅವರ ಧರ್ಮವಾವುದೆಂಬದನ್ನು ವಿವರಿಸಿ ಬೆರಳಿಟ್ಟು ಹೇಳುವುದು ಕಠಿಣ. अवर धर्मवावुदेंबदन्नु बेरळिट्टु हेळुवुदु कठिण. धर्मवु + आवुदु + अेंबदन्नु, बेरळु + अिट्टु. त्याचा धर्म कोणता हें 'बोट ठेवून' सांगणें कठिण.

३ ಅದು ಪಾಪವೆಂದೆನಿಸಿದರೆ ಆ ವಸ್ತುವನ್ನು ತ್ಯಜಿಸಬೇಕು. अदु पापवेंदेनिसिदरे आ वस्तुवन्नु त्यजिसबेकु. पापवेंदु + अेनिसिदरे. तें पाप आहे असें वाटल्यास ती वस्तु सोडली पाहिजे.

४ ಹಾವಿನಂತಿದ್ದ ಕರ್ಮವು ಫಲಾಶೆಯುಳ್ಳವರಿಗೆ ತನ್ನ ವಿಷವನ್ನೇರಿಸದೆ ಬಿಡುವದಿಲ್ಲ. हाविनंतिद्द कर्मवु फलाशेयुळ्ळवरिगे तन्न विषवन्नेरिसदे बिडुवदिल्ल. हाविनंतु + अिद्द; फलाशे + अुळ्ळवरिगे; विषवन्नु + अेरिसदे; सापा प्रमाणें असलेलें 'कर्म' फलाशा असणाऱ्यास आपलें विष चढविल्याशिवाय 'सोडीत नाहीं'.

## प्रकरण ४३ वें

# वर्तमानभविष्यकाळ, भूतभविष्यकाळ, व भविष्य भविष्य काळ.

**खालील वाक्यें पहा :–**

१ तो लिहिणार आहे – वर्तमानभविष्यकाळ.

२ तो लिहिणार होता – भूतभविष्यकाळ.

३ तो लिहिणार असेल – भविष्य भविष्यकाळ.

नं. १ चें वाक्य अंशतः वर्तमानकालिक व अंशतः भविष्यकालिक आहे ‘त्याचा करण्याचा विचार आहे’ असा याचा अर्थ होतो. या काळास तर्खडकरांनीं ‘वर्तमानभविष्यकाळ’ म्हटलें आहे.

नं. २ चें वाक्य ‘भूतभविष्य कालिक’ आहे. ‘करण्याचा त्याचा विचार होता’ असा याचा अर्थ आहे.

नं. ३ चें वाक्य ‘भविष्यभविष्य कालिक’ आहे.

या अर्थाचीं वाक्यें कानडींत दोन प्रकारांनीं करतात.

**प्रकार पहिला :–**

अवनु होगुववनिद्दाने – (होगुववनु + अिद्दाने) ‘होगुववनु’ हें होगुव (जाणारा) या व. भ. कृ. विशेषणास ‘अवनु’ हें सर्वनाम लागून झालेलें ‘धातुसाधित नाम’ आहे (प्रकरण २३ पहा). म्हणून हीं रूपें करण्याचा नियम असा कीं :– कर्त्याच्या लिंगवचनाप्रमाणें ‘कृदन्त नाम’ वापरून त्यापुढें ‘अिरु’ (असणें) चें आख्यातरूप जोडावें. अुदा :– (१) अवरु होगुववरिद्दारे (होगुववरु + अिद्दारे) ते जाणार आहेत ते ‘जाणारे - ते’ आहेत. (२) अवळु होगुववळिद्दाळे (होगुववळु + अिद्दाळे) ती जाणार आहे – शब्दशः ती ‘जाणारी - ती’ आहे. (३) अदु आगुवुदिदे आगुवदु + अिदे – तें होणार आहे.

‘अिरु’ चीं भूतकालिक क्रियापदें जोडल्यास ‘भूतभविष्यकालिक’ वाक्यें होतात. अुदा :– होगुववरु + अिद्दरु – होगुववरिद्दरु = ते जाणार होते.

### प्रकार दुसरा

दुसऱ्या भावरूपास 'अिरु' चीं आख्यातरूपें जोडून हीं वाक्यें खालील प्रमाणें करण्याची अलीकडे प्रथा पडूं लागली आहे :– अवरु होगलिद्दारॆ (होगलु+अिद्दारॆ) = ते जाणार आहेत. शब्दशः ते 'जायला' आहेत किंवा ते 'जाण्यास' आहेत. अदु आगलिदॆ = तें होणार आहे ("व्हायला आहे").

परंतु, हा दुसरा प्रकार व्यावहारिक भाषेंत रूढ नाहीं. लेखभाषेंत तो वापरण्याची प्रथा अलीकडे पडूं लागली आहे म्हणून या प्रकारच्या वाक्यांचा मुखभाषिक अुच्चार निराळा संभवत नाहीं.

### वाक्यसंग्रह (प्रकार पहिला)

१ ನಾಳೆ ಅವರು ಮುಂಬಯಿಗೆ ಹೋಗುವವರಿದ್ದಾರೆ. नाळॆ अवरु मुंबयिगॆ होगुववरिद्दारॆ (.... होगवरिद्दारऽ). अुद्यां ते मुंबअीला जाणार आहेत.

२ ನಮ್ಮ ಮನೆಗೆ ಅತಿಥಿಗಳು ಬರುವವರಿದ್ದಾರೆ. नम्म मनॆगॆ अतिथिगळु बरुववरिद्दारॆ. (नम्म मनीगॆ अतिथि बरुववरिद्दारऽ). आमच्या घरीं अतिथी येणार आहेत.

३ ನಾಳೆ ನಮ್ಮ ಸಾಲೆಯಲ್ಲಿ ನೃತ್ಯದ ಕಾರ್ಯಕ್ರಮವು ಆಗುವದಿದೆ. नाळॆ नम्म सालॆयल्लि नृत्यद कार्यक्रमवु आगुवदिदॆ. (नाळॆ नम्म सालीओळग नृत्यद कार्यक्रमऽ आगोददऽ). अुद्यां आमच्या शाळेंत नृत्याचा कार्यक्रम व्हायचा आहे.

४ ಆ ಸಭೆಯಲ್ಲಿ ಮಹತ್ವದ ವಿಷಯಗಳ ಚರ್ಚೆ ಆಗುವದಿದೆ. आ सभॆयल्लि महत्त्वद विषयगळ चर्चॆ आगुवदिदॆ. (.... सभॆयोळग .... ........ आगोददऽ). त्या सभेंत महत्त्वाच्या विषयांची चर्चा होणार आहे.

### प्रकार दुसरा

१ ನಾಳೆ ಕರ್ನಾಟಕ ಕಾಲೇಜಿನಲ್ಲಿ ಮುಖ್ಯಮಂತ್ರಿಗಳ ಭಾಷಣವು ಆಗಲಿದೆ. नाळॆ कर्नाटक कॉलेजिनल्लि मुख्यमंत्रिगळ भाषणवु आगलिदॆ. अुद्यां कर्नाटक कॉलेजमध्यें मुख्य मंत्र्यांचें भाषण होणार आहे.

२ ನಾಳೆ ಹುಬ್ಬಳ್ಳಿಯಲ್ಲಿ ಅಖಿಲ ಭಾರತಿಯ ಖಾದೀ ಪ್ರದರ್ಶನವು ಜರಗಲಿದೆ. नाळॆ हुब्बळ्ळियल्लि अखिल भारतीय खादी प्रदर्शनवु जरगलिदॆ. अुद्यां हुबळी येथें अखिल भारतीय खादी प्रदर्शन भरणार आहे. जरगु = भरणें.

३ ಇದಲ್ಲದೆ ಸಾರ್ವಜನಿಕ ಮಹತ್ವದ ಅನೇಕ ವಿಷಯಗಳು ಆ ಸಭೆಯಲ್ಲಿ ಚರ್ಚೆಗಾಗಿ ಬರಲಿವೆ. अिदल्लदॆ सार्वजनिक महत्त्वद अनेक विषयगळु आ सभॆयल्लि चर्चॆगागि बरलिवॆ. या शिवाय सार्वजनिक महत्त्वाचे अनेक विषय त्या सभेंत चर्चेसाठीं येणार आहेत.

४ ಆಕಾಶವಾಣಿಯ ಮೈಸೂರ ಕೇಂದ್ರದವರು ಕನ್ನಡ ನಾಟ್ಯೋತ್ಸವವನ್ನು ಆಚರಿಸಲಿರುವರು. आकाशवाणिय मैसूर केंद्रदवरु कन्नड नाट्योत्सववन्नु आचरिसलिरुवरु. आकाशवाणीच्या म्हैसूर 'केंद्राचे ते' कन्नड नाट्योत्सव 'आचरणार' आहेत.

---

## प्रकरण ४४ वें

# वृत्तपत्रीय वाक्यसंग्रह

या प्रकरणांत वृत्तपत्रीय लिखाणांतून कांहीं वाक्यें अुधृत केलीं आहेत; त्यांत आलेले नवे शब्द :–

तिवि (यु) = भोसकणें – तिविदु (भू. कृ अव्यय) = भोसकून. कॆलवु = कांहीं – कॆलवोंदु कॆलवु + ओंदु = 'कांहीं अेका'. मन्नणॆ = मान्यता. हॊणॆ = जबाबदारी. तीर्पु = निर्णय. तुंबु = भरणें. काणिसु = दिसणें. ओय्यु = नेणें. अीडेरु = पूर्ण होणें.

१ ಆರು ಜನರನ್ನು ಚಾಕೂದಿಂದ ತಿವಿದು ಪಾರಾಗಿ ಹೋದ ಕಾಳೂ ಎಂಬ ತರುಣನನ್ನು ಹಿಡಿಯಲು ಪೋಲೀಸರು ಪ್ರಯತ್ನಿಸುತ್ತಿರು-ವರು. आरु जनरन्नु चाकूदिंद तिविदु पारागि होद काळू अॆंब तरुणनन्नु हिडियलु पोलीसरु प्रयत्निसुत्तिरुवरु. सहा जणांना चाकूनें भोसकून पार होअून गेलेल्या काळू 'म्हणणाऱ्या' (नांवाच्या) तरुणास धरण्या (साठीं) चा पोलीस प्रयत्न करीत आहेत.

२ ಒಂದು ಟ್ರಾಕ್ಟರು ಕಾಲುವೆಯಲ್ಲಿ ಹೊರಳಿ ಬಿದ್ದದ್ದರಿಂದ ಹತ್ತು ಜನರು ನಿಧನ ಹೊಂದಿದರು. ओंदु ट्राक्टरु कालुवॆयल्लि हॊरळि बिद्ददरिंद

हत्तु जनरु निधन हॊंदिदरु. अेक ट्रॅक्टर कालव्यांत अुलटून पडल्यामुळें दहा जण निधन पावले.

३ ಮೋಲಟೋವರು ಕೂಡಲೇ ಎದ್ದು ಈ ಕರಾರುಗಳನ್ನು ತಾವು ಹಾಕಿಲ್ಲವೆಂದು ಹೇಳಿದರು. मोलटोवरु कूडले अेद्दु ई करारुगळन्नु तावु हाकिल्लवॆंदु हेळिदरु. मोलटोव्हनीं लगेच अुठून आपण हे करार घातले नाहींत असें सांगितलें.

४ ಕೆಲವೊಂದು ಸಂಸ್ಥೆಗಳಿಗೆ ಮನ್ನಣೆಯನ್ನು ಕೊಡದಿರಲು ಸರಕಾರಕ್ಕೆ ಅಧಿಕಾರವಿದೆ. कॆलवॊंदु संस्थॆगळिगॆ मन्नणॆयन्नु कॊडदिरलु (कॊडदॆ+अिरलु) सरकारक्कॆ अधिकारविदॆ. कांहीं संस्थांना मान्यता 'न देतां राहाण्यास' (न देण्यास) सरकारला अधिकार आहे.

५ ಅಲ್ಲಿ ವ್ಯವಸ್ಥೆಯನ್ನು ಇಡುವ ಹೊಣೆಯು ಉತ್ತರಪ್ರದೇಶ ಸರಕಾರದ್ದು, ಕೇಂದ್ರದ್ದಲ್ಲ. अल्लि व्यवस्थॆयन्नु अिडुव हॊणॆयु अुत्तर प्रदेश सरकारद्दु, केंद्रद्दल्ल. तेथें व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी अुत्तर प्रदेश सरकारची, केंद्राची नव्हे. (केंद्रद्दु + अल्ल).

६ ನ್ಯಾಯಾಲಯವು ಪ್ರೇಕ್ಷಕರಿಂದ ತುಂಬಿದ್ದಲ್ಲದೆ ಹೊರಗೂ ಕೆಲವು ಜನರು ತೀರ್ಪನ್ನು ಕೇಳಲು ಉತ್ಸುಕರಾಗಿ ನಿಂತಿದ್ದರು. न्यायालयवु प्रेक्षकरिंद तुंबिद्दल्लदॆ हॊरगू कॆलवु जनरु तीर्पन्नु केळलु अुत्सुकरागि निंतिद्दरु. न्यायालय प्रेक्षकांनीं भरलें होतें अितकेंच नव्हे तर बाहेरहि कांहीं लोक निर्णय अेकण्यास अुत्सुक होअून अुभे होते.

७ ರಾಷ್ಟ್ರಪತಿಗಳ ಭಾಷಣವು ಇಂದು ಸಂಸತ್ತಿನಲ್ಲಿ ನಡೆದಾಗ ಕಮ್ಯೂನಿಸ್ಟರು ಹಾಜರಿರದಿದ್ದರೂ ಅದು ಅಷ್ಟು ಎದ್ದು ಕಾಣಿಸುತ್ತಿದ್ದಿಲ್ಲ. राष्ट्रपतिगळ भाषणवु अिंदु संसत्तिनल्लि नडॆदाग कम्यूनिष्टरु हाजरिरदिद्दरू अदु अष्टु अेद्दु काणिसुत्तिद्दिल्ल. राष्ट्रपतींचें भाषण आज संसदेंत चालल्या वेळीं कम्यूनिष्ट हजर नव्हते तरी तें तितकेंसें अुठून दिसलें नाहीं.

८ ಅದೇ ಜೇಲಿನಲ್ಲಿರುವ ಇತರ ಕೈದಿಗಳೂ ಗುರುವಾರದಿಂದ ಅನ್ನವನ್ನು ಸೇವಿಸಿಲ್ಲ. अदे जेलिनल्लिरुव अितर कैदिगळू गुरुवारदिंद अन्नवन्नु सेविसिल्ल. त्याच जेलमध्यें असलेल्या अितर कैद्यांनींहि गुरुवारपासून अन्न 'सेविलेलें' नाहीं.

९ ಸ್ವಿಝರ್ಲ್ಯಾಂಡದ ಸರಕಾರವು ಕೋರಿಯಾ ಪರಿಷತ್ತು ಜಿನೀವಾದಲ್ಲಿ ಸೇರಲು ಒಪ್ಪಿಗೆ ಕೊಟ್ಟಿದೆ. स्विझर्लॅडद सरकारवु कोरिया परिषत्तु जिनीवादल्लि सेरलु ओप्पिगे कोट्टिदे. स्विझर्लॅड सरकारनें कोरिया परिषद् जिनीव्हामध्यें भरण्यास संमति दिली आहे.

१० ಡಾ. ಗಾಯತೊಂಡೆಯವರೊಡನೆ ಅವರ ಪೋರ್ತುಗೀಜ ಪತ್ನಿಯಾದ ಎಡೀಲಾ ಗಾಯತೊಂಡೆ ಇವರನ್ನು ಕರೆದೊಯ್ಯಲಾಯಿತು. डॉ. गायतोंडेयवरोडने अवर पोर्तुगीज पत्नियाद ऍडीला गायतोंडे इवरन्नु करेदोय्यलायितु. डॉ. गायतोंडे यांच्याबरोबर त्यांच्या पोर्तुगीज पत्नी ऍडीला गायतोंडे यांनाहि 'बोलावून नेण्यांत आलें'.

११ ಭಾಷಾವಾರ ರಾಜ್ಯದ ಬಗ್ಗೆ ಇರುವ ಕನ್ನಡಿಗರ ಆಕಾಂಕ್ಷೆಗಳು ಇಂದಿಲ್ಲ ನಾಳೆ ಈಡೇರದಿರವು. भाषावार राज्यद बग्गे इरुव कन्नडिगर आकांक्षेगळु इंदिल्ल (इंदु + इल्ल) नाळे ईडेरदिरवु (ईडेरदे + इरवु). भाषावार राज्या (च्या) विषयीं असलेल्या कन्नडिगांच्या आकांक्षा आज ना उद्यां सफल झाल्यावांचून राहाणार नाहींत.

---

## प्रकरण ४५ वें

# वाक्प्रचार (Idiom)

याखालीं कांहीं **नमुनेदार विचित्र वाक्यें** दिलीं आहेत. त्यांचा अर्थ कळतो का पहा. कानडीचा मुळींच परिचय नसलेल्या मराठीभाषकांना त्या वाक्यांचा अर्थ कळणार नाहीं इतकेंच नव्हे तर तीं वाक्यें वाचून त्यांना कदाचित् हंसू येईल.

१ त्या गृहस्थाची स्थिति चांगलीच सुधारली आहे, आणि त्यानें नुकतेंच एक घर **घालविलें** आहे.

२ शिक्षकानें मारलें म्हणून तो मुलगा **रडून घेत** घरीं आला.

३ अपघाताच्या वेळीं त्याठिकाणीं गर्दी होती; त्यादिवशीं मोहरम **वेगळा!**

४ भावाच्या मरणानें त्यानें **पोटदुखी** लावून घेतली.

५ आम्हाला त्यांना **होत** नाहीं.

वरील वाक्यांच्या विचित्रपणाची आतां छाननी करूं. हीं वाक्यें काल्पनिक नाहींत, तर कर्नाटकांत प्रत्यक्ष कानावर पडणारीं आहेत.

कर्नाटकांत पिढयान् पिढया राहिल्यानें ज्यांच्या मराठीवर कानडीचा बराच परिणाम झाला आहे, असे पुष्कळ मराठीभाषक आहेत. कानडी ही ज्यांची मातृभाषा आहे अशांचें कानडी अैकणें, हें जितकें अुपयुक्त असतें तितकेंच कानडीचा परिणाम झालेलें मराठी बारकाअीनें अैकणें, हेंहि अभ्यासाच्या दृष्टीनें अुपयुक्त व मनोरंजक ठरतें! तें अैकण्यानें कानडी भाषेचीं वैशिष्ट्यें शोधण्यास मदत होते. कानडीचा परिणाम ज्यांच्या वर फार झाला आहे असे मराठीभाषक आपल्या मनांतील प्रत्येक 'कल्पना' कळत व **पुष्कळदां न कळतच** तिचें शब्दशः 'भाषांतर करून' बोलत असतात, व हें भाषांतरवजा मराठी विचित्र वाटतें, याचें कारण भाषेंतील वाक्प्रचार ( Idiom ) हें होय. कानडीचा परिणाम झालेल्या मराठींत कानडींतील वाक्प्रचारांचें 'प्रतिबिंब' दिसून येतें, व अशा प्रकारचें मराठी अैकणें हें वाक्प्रचारांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीनें अेक महत्त्वाचें साधन आहे, असें म्हणतां येअील. याच प्रमाणें, मराठी भाषेचा मार्मिक अभ्यास करावयाचा झाल्यास खुद्द महाराष्ट्रांतील शुद्ध मराठीप्रमाणेंच महाराष्ट्रांत बरींच वर्षें राहिलेल्या कानडी भाषकांचें कानडी अैकावें. त्यांच्या कानडींत मराठीच्या वाक्प्रचारांचें 'प्रतिबिंब' दिसेल. त्यांच्या बोलण्यांत खालील सारखीं वाक्यें आढळतील. (या वाक्यांतील 'मराठी वळण' कर्नाटकांतील कानडी माणसाच्या नीट लक्षांत येअील).

१ 'अिष्टादरे तली म्यालिंद नीरु होयितु' 'अेवढें झालें तर 'डोक्यावरून पाणी गेलें'. २ अव गिडद मेलिंद **जिगि होडेद**.

३ नावु **दादरक्के** अिरतेवी. 'वाक्प्रचार' हा शब्द विभक्तींचा विशिष्ट अुपयोगहि त्यांत समाविष्ट होण्याअितका व्यापक समजावा. (वरील वाक्यांपैकीं तिसऱ्या वाक्यांतील 'दादरक्के', यांत 'दादरला', या मराठी चतुर्थी विभक्तीचा परिणाम दिसून येतो, हें आपण मागें विभक्तींच्या विशेष अुपयोगांची चर्चा करतांना पाहिलेंच आहे) (प्रकरण १६ पहा).

या प्रकरणांत कांहीं व्यवहारोपयोगी महत्त्वाचे वाक्प्रचार दिले आहेत. ते देतांना पुढीलप्रमाणें क्रम स्वीकारला आहे :–

मराठी कल्पना – कानडी वाक्प्रचार – अवतरण चिन्हांमध्यें शब्दशः भाषांतर व अुदाहरणार्थ अेखादें वाक्य.

अितर वाक्प्रचाराची चर्चा करायच्या आधीं आपण या प्रकरणाच्या प्रारंभीं दिलेल्या वाक्यांतील वाक्प्रचारांचा अर्थ पाहूं :–

१ घालविणें – हें कानडी 'हाकिसु'चें भाषांतर आहे. 'त्यानें **घर बांधविलें आहे**' म्हणायला '**अवनु मने हाकिसिद्दाने**' म्हणतात. 'कट्टिसु' (बांधविणें) हा धातू वापरून 'कट्टिसिद्दाने' हि म्हणतात, पण 'हाकिसिद्दाने' म्हणण्याची रूढी बरीच आहे.

२ कानडींतील 'कोळ्ळु' (घेणें) या धातूचा सहाय – क्रियापद म्हणून अुपयोग बराच रूढ आहे. (प्रकरण १७ पहा) 'रडून घेत' म्हणजे 'रडत'.

३ वेगळा – 'आणि त्यांत मोहरम'. असे म्हणायला 'अवत्त मोहरम **बेरे (ब्यारे)**' म्हणतात. बेरे = वेगळा – निराळा.

४ 'पोट दुखी' हा शब्द मत्सर या अर्थी मराठींत वापरतात. पण मनाला धक्का बसणें या अर्थीं कानडींत 'होट्टेबेने' (होटबॅनी) हच्चिकोळ्ळु 'पोटदुखी लावून घेणें' म्हणतात.

५ आम्हाला त्यांना '**होत नाहीं**' म्हणजे आमचें त्याच्याशीं **पटत नाहीं.**

दागिने घालणें – वस्त अिड्ड्कोळ्ळु = दागिने 'ठेवून घेणें' वस्त – दागिना. श्रीमंतर हेंडदिरु मैमेले वस्तगळन्नु अिड्ड्कोळ्ळुत्तारे = श्रीमंतांच्या बायका अंगावर दागिने 'ठेवून घेतात'. 'वस्त हाकु' असेंहि कधींकधीं म्हणतात.

वेळ घालविणें – होत्तु कळे किंवा वेळे कळे 'कळे' यास अिंग्रजी 'Shed' किंवा 'Drop' सारखा अर्थ आहे. वेळ 'टाकणें' 'वेळे हाकिसु' नव्हे.

भीति घालविणें – अंजिके कळे मक्कळ अंजिकेयन्नु कळेयबेकु = मुलांची भीति घालवावी.

युक्ति योजिणें – हंचिकेु हाकु – युक्ति 'घालणें'. अिन्नु अेनु हंचिकेु हाकबेकु? = आतां काय युक्ति योजावी?

पानांत वाढणें – अेलियोळगे हाकु = पानांत 'घालणें' मराठींतहि 'पानांत घालणें' म्हणतात. भिडे माडबेडरि अेनु बेकादन्नु हाकिसि कोळ्ळिरि = भीड करूं नका काय पाहिजे तें 'घालवून घ्या' – 'वाढवून घ्या'.

कपडे काढणें – अरिवेु कळे – कपडे 'टाकणें' (Shed किंवा Drop) 'अरिवि तेगे' हि कधींकधीं म्हणतात.

जोडे काढून ठेवणें – मच्ची कळेु. मच्चे = जोडा, जोडे, वहाणा वगैरे. 'पायांतून काढणें' यास 'कळेु' म्हणतात.

शेंबूड काढणें – सुंबळ कळेु = शेंबूड 'टाकणें' (Drop).

चित्र काढणें – चित्र बरेु (यु) – चित्र 'लिहिणें' 'चित्र तेगेु' हि कधींकधीं म्हणतात.

दार अुघडणें – बागिल तेगेु – दार 'काढणें'. कर्नाटकी मराठींत 'दार काढा' म्हटलेलें पुष्कळदां आढळतें. अंगडियु अिन्नू तेगेदिल्ल = दुकान अद्याप अुघडलें नाहीं.

वेड लागणें – हुच्चु हिडि – वेड 'धरणें'

वेळ लागणें – वेळे हिडि, 'होत्तु हिडि', वेळ 'धरणें'.

दिवस लागणें – दिवस हिडि – दिवस 'धरणें' काशिगे होगलिक्के अेष्टु दिवस हिडियुत्तवेु? = काशीस जायला किती दिवस लागतात?

येथ पासून तेथ पर्यंत – अिल्लिद हिडिदु अल्लिय वरेगेु – येथून 'धरून' तेथ पर्यंत – नुसतें 'अिल्लिद अल्लिय वरेगे' असेंहि म्हणतात. पण मध्येच 'हिडिदु' (धरून) घालण्याची रुढी आहे. यरडु रूपाअि हिडिदु नालकु रूपायि तनक अिदर बेले अिरुत्तदे = दोन रुपयांपासून चार रुपयां पर्यंत याची किंमत आहे.

मावणें – हिडि (यु) – 'धरणें'. अी कपाटिनल्लि अिष्टु पुस्तकगळु हिडियुवदिल्ल = या कपाटांत अितकीं पुस्तकें मावत नाहींत 'धरत नाहींत'.

'खर्च सोसणें' या अर्थी खालीलप्रमाणें वापरतात :– अी क्विसदाग

ओब्बर अ्ट< हिडियोदु जड< अद्ऽ = या दिवसांत अेखाद्याचें ‘जेवण धरणें’ कठिण आहे. (जेवणाचा खर्च सोसणें वगैरे कठिण आहे).

गाडी पकडणें – गाडि हिडि ‘गाडी धरणें’.

पोट दुखणें – होट्टे कडि – पोट ‘चावणें’.

भीति वाटणें – अंजिके आगु – भीति ‘होणें’ त्याला भीति वाटली = अवनिगे अंजिकेयायितु ‘अंजिके अेनिसितु’ असेंहि म्हणतात.

लाज वाटणें – १ नाचिके आगु = लाज ‘होणें’. २ नाचिके बरु = लाज ‘येणें’. ३ नाचिके अेनिसु = लाज वाटणें. त्याला लाज वाटली = अवनिगे नाचिके आयितु, - बंदितु, (बंतु) - अेनिसितु.

ताप = ज्वर< पण ताप (ज्वर), पाणी (नीरु), दूध (हालु), ताक (मज्जिगे) ह्या द्रव पदार्थांना, बहुवचनी क्रियापदें वापरण्याची रुढी आहे. त्याला ताप आला आहे = अवनिगे ज्वर बंदिदे. (अवग ज्वर∠ बंदावऽ). त्याला ताप ‘आले आहेत’. ताक आहे = मज्जिगे अवऽ – ताक ‘आहेत’. दुध आहे = हालु अवऽ – दूध ‘आहेत’. (अेकवचनी क्रियापदेंहि कधीं-कधीं वापरतात). ताकाचे थेंब = मज्जिगे काळु. ताकाचें ‘दाणे’ (याच प्रमाणें दुधाविषयींहि).

भेटणें = भेट्टियागु किंवा द. कर्नाटकांत भेटियागु ‘भेट होणें’. आम्हाला ते भेटले नाहींत = नमग अवरु भेट्टियागलिल्ल. आम्हाला ते ‘भेट झाले नाहींत’.

‘पडसें होणें’ = नेगडि हायु – पडसें ‘ढुसणें’ – जवळून जाणें’ – ‘अंगावरुन जाणें. मला पडसें झालें = ननगे नेगडि हायितु – मला पडसें ‘ढुसलें’ – ‘अंगावरून गेलें’. सरळ प्रतिशब्द ‘नेगडि आगु’ हाहि रूढ आहे.

धाड होणें – बेने आगु – ‘रोग होणें’ ‘दुखणें होणें’ त्याला काय धाड झाली आहे? = अवनिगेनु बेने आगिदे? (अवगेनु बॅनि आग्यदऽ)? त्याला काय ‘दुखणें झालें’ आहे?

तोंड वर करून = मोरे अेत्ति – तोंड ‘अुचलून’ त्यांनीं तोंड वर करून पाहिलें नाहीं = अवरु मोरे अेत्ति नोडलिल्ल. (अवरु मारि यत्ति नोडलिल्ल). .... ‘तोंड अुचलून’ पाहिलें नाहीं. मोरे = चेहरा (Face).

डोळे उघडून पाहणें = कण्णु अत्ति नोडु – डोळे 'उचलून' पाहणें. आमच्याकडे तो डोळे उघडून पाहात नाहीं. नम्मकडे अवनु कण्णेत्ति नोडु-वदिल्ल. (.... .... अव < कण्णेत्ति नोड्डुल्ल <). .... .... तो डोळे उचलून' पाहात नाहीं.

ओळख लागणें – गुर्तु सिगु – ओळख 'मिळणें' सरळ प्रतिशब्द 'गुर्तु हत्तु' हि म्हणतात हत्तु = लागणें. मला तुमची ओळख लागली नाहीं. ननगे निम्म गुर्तु सिगलिल्ल. (.... .... गुर्तु शिगलिल्ल) .... ओळख 'मिळाली नाहीं'.

कंटाळा येणें – १ बेजार आगु = 'कंटाळा होणें'. २ बेसर बरु. बेसर, बेजार = कंटाळा.

गप्प बसणें – सुम्मने कूडु अगीच बसणें. थण्णगे कूडु 'थंड' बसणें. गप्प बैस = थण्णगे कूडु (थण्णग कूडु) 'थंड बैस' सुम्मन कूडु (सुम्मन कूडु) अगीच बैस.

अगीचच म्हणतात, चेष्टेनें म्हणतात – सुळ्ळे अन्नुत्तारे = 'खोटेंच', 'लटकें' च म्हणतात. (सुळ्ळऽ अंतारऽ).

गाडी हाकणें – गाडी होडे = गाडी 'मारणें'. तो टांगा हाकतो = अवनु टांगा होडियुत्ताने. (अव < टांगा होडीतानऽ). तो टांगा 'मारतो'. होडे = मारणें.

सूर्य मावळणें – सूर्यनु मुळुगु = सूर्य 'बुडणें'. सूर्य मावळला आहे सूर्यनु मुळुगिद्दाने. (सूर्य < मुणग्यानऽ). सूर्य 'बुडाला' आहे.

ध्यानांत येणें, लक्षांत येणें – लक्षक्के बरु = 'लक्षास' येणें. ज्ञाप-कक्के बरु = 'आठवणीस' येणें. तें आमच्या लक्षांत आलें = अदु नम्म लक्षक्के बंतु. तें 'लक्षास' आलें.

अंदाज करणें: – अंदाजु कट्टु = अंदाज 'बांधणें'.

तोंड उघडून बोलणें – (स्पष्ट बोलणें) बायिबिच्चि माताडु = तोंड 'उकलून' बोलणें. बिच्चु = सोडणें, उकलणें. गाठोडें 'सोडणें' ह्या अर्थी गंटु बिच्चु.

सुपारी खाणें – अडिके हाकिकोळ्ळु = सुपारी 'घालून घेणें'. अडिकी हाकिकोळ्ळरि = सुपारी 'घालून घ्या' – सुपारी खा.

गोष्ट रचणें – कथे कट्टु = गोष्ट 'बांधणें'.

फळणें – 'कट्टु' – 'बांधणें'. 'म्हैस फळणें' म्हैस फळली आहे = अेम्मियु कट्टिदे = म्हैस 'बांधली' आहे.

पथ्य करणें – बायि कायु = 'तोंड राखणें'.

कानावर येणें – किविगे बीळु = 'कानाला' पडणें. अी मातु नम्म किविगे बित्तु = ही गोष्ट आमच्या कानावर आली.

कीर्तन करणें – कीर्तन हेळु = कीर्तन 'सांगणें' अवनु कीर्तन हेळु-त्ताने = तो कीर्तन करतो.

पद म्हणणें, गाणें – पद हेळु, = पद 'सांगणें' अवनु पद > हेळुत्ताने = तो पद गातो.

'शिकविणें' या अर्थी 'कलिसु' हा शब्द आहे; पण हेळु (सांगणें) चा खालील प्रमाणें अुपयोग करतात :– निमगे संस्कृतवन्नु यारु हेळुत्तारे? (संस्कृत यार हेळतारऽ) = तुम्हाला संस्कृत कोण 'सांगतात' (शिकवितात)? नीवु यारकडिंद हाडु हेळिसिकोळ्ळुत्तीरि? (हेळिशि कोतीरि) = तुम्ही 'कुणां-कडून' गाणें शिकतां 'सांगून घेतां'?

रागावणें – सिट्टागु = 'राग होणें' सिट्टिगेळु (सिट्टिगे + अेळु) = 'रागाला अुठणें' अवरु नन्नमेले सुव्ळे सिट्टिगेद्दरु. ते माझ्यावर अुगीचच रागावले.

रुसणें – सेट्टेदु कोळ्ळु (शेटकोळ्ळु)= ताठून घेणें. सेट्टु = ताठणें, वाकणें.

गांठ मारणें – गंडु हाकु = गाठ 'घालणें'.

गळ्यांत पडणें – कोरळिगे बीळु = 'गळ्याला' पडणें कोरळु = गळा (कोळ्ळु) प्रपंच कोरळिगे (कोळ्ळिगे) बित्तु. प्रपंच गळ्यांत पडला. 'गळ्यांत माळ घालणें' यांत मात्र 'कोरळल्लि माली हाकु' असेंहि म्हणतात. (कोळ्ळाग माली हाकु).

बोलण्यावरुन बोलणें निघून – मातिगे मातु होरडु = 'बोलण्याला बोलणें' निघून, (गोष्टीवरुन गोष्ट निघून).

दर माणशीं अेक बोलणें – तलॆगॆ ऒंदु मातु (तलीगे ऒंदु मातु) ‘डोक्याला अेक बोलणें’.

भरा भरा चालणें – भडा भडा नडॆ, भडा भडा नडीरि = भरा भरा चला.

पोट धरून हंसणें – बिद्दु नगु – ‘पडून’ हंसणें. अवरु बिद्दु बिद्दु नक्करु = ते पोट धरधरुन हंसले.

दार लावणें – बागिल हाकु = दार ‘घालणें’. दार ‘लावणें’ व दार ‘अुघडणें’ यांस अनुक्रमें ‘बागिल हाकु’ व ‘बागिल तॆगॆ’ म्हणतात. पण शब्दशः अर्थ दार ‘घालणें’ व दार ‘काढणें’ असा होतो. दार ‘काढणें’ हें आपण वर पाहिलेंच आहे.

चटकन् अुठणें – चट्टनॆ अेळु. अवनु चट्टनॆ अॆद्दु होरबिद्दनु. तो चटकन् अुठून बाहेर पडला. होरबीळु = बाहेर पडणें.

स्पष्टपणें सांगणें – बिच्चिहेळु – ‘अुकलून’ सांगणें बिच्चु = (गांठ, गाठोडें, वगैरे) सोडणें.

घरीं बसणें (कांहीं अुद्योग न करतां किंवा नसल्यामुळें वगैरे) – मनॆ हिडिदु कूडु ‘घर धरुन’ बसणें’ – मनॆ हिडिदु कूडदॆ अेनादरु अुद्योग माडु. घरीं स्वस्थ न बसतां कांहीं तरी अुद्योग कर.

## प्रकरण ४६ वें

## वाक्प्रचार. (पुढें चालू)

गेल्या प्रकरणांत आपण कांहीं वाक्प्रचार पाहिले. आतां आणखी कांहीं महत्त्वाचे वाक्प्रचार जरा निराळ्या पद्धतीनें पाहूं. गेल्या प्रकरणांत आपण आधीं मराठी ‘कल्पना’ – कन्नड वाक्प्रचार – त्याचे शब्दशः भाषांतर, असा क्रम अवलंबिला. या प्रकरणांत आधीं **कन्नड वाक्प्रचार – त्याचा अर्थ** – मग त्या पुढें अवश्य तेथें वाक्प्रचार वैशिष्ट्य ध्यानांत येण्यासाठी शब्दशः भाषांतर, अशा क्रमानें तें पाहूं :—

देण्याजोगे वाक्प्रचार कितीतरी आहेत, पण ते सर्व देणें या पुस्तकाच्या कक्षे बाहेरचें आहे. म्हणून दैनंदिन व्यवहारांत लागणारे किंवा व्यवहारांत येणारे नसले तरी अभ्यासदृष्ट्या महत्त्वाचे असलेले वाक्प्रचार मात्र येथें दिले आहेत.

कैगूडु – (कै + कूडु) = पूर्ण होणें, मूर्त स्वरूप येणें, नम्म कॆलस कैगूडलिल्ल = आमचें काम पूर्ण झालें नाहीं.

कैयाडिसु – हात फिरविणें – पाठीवरून, धान्याच्या राशीवरून, वगैरे दनगळ मेले कैयाडिसु = गुराच्या पाठीवरून हात फिरविणें.

कै हिडि – हात धरणें – मराठी प्रमाणें 'त्यानें माझा हात धरिला' = अवनु नन्न कै हिडिदनु; पण खालील अुपयोग निराळा आहे :– अिदु कै हिडियुव कॆलस = हें 'हात धरणारें' काम – फार वेळ लागणारें (किचकट) काम.

कैसागु – मति चालणें – आ विषयदल्लि अवन कै सागलिल्ल = त्या विषयांत त्याची बुद्धि चालली नाहीं.

कैवार – स्तुति, – कैवारिसु – स्तुति करणें; नीनु अवनन्नु अिष्टेकॆ कैवारिसुवि? = तूं त्याची अितकी कां प्रशंसा करतोस? (व्यावहारिक भाषेंत फारसा रूढ नाहीं). कैवार = कैवार. (मराठींत हा शब्द आला आहे).

कै बिडु – हात सोडणें – अवनन्नु नडुनीरिनल्लि कै बिडबेड = 'मध्य' पाण्यांत' त्याचा हात सोडूं नकोस. नडुनीरु – 'मध्यपाणी' (अवनन्नु द्वि. वि.) पाण्या 'मध्यें' त्याचा हात सोडूं नकोस. अेखाद्यास, पाण्यांत मध्या पर्यंत नेअून त्याचा हात सोडणें – याचा अर्थ मदत करावयास लागून मध्येंच ती थांबवून त्यास असहाय स्थितींत सोडणें.

त्याचा 'हात धरणारा' कोणी नाहीं, 'पाणिग्रहण' करणें, हे सर्व अुपयोग मराठींतल्या प्रमाणेंच आहेत.

कैगॊडु – (कै + कॊडु) हात देणें – सहाय्य करणें (अुपयोग मराठी प्रमाणें). देवरे नमगॆ कै गॊट्टरॆ अी कॆलसवागुवदु = देवानेंच आम्हांस हात दिला तर हें काम होअील.

कैतोरिसु – हात दाखविणें – आपला 'प्रभाव' दाखविणें (मराठी

प्रमाणेंच) — अवरु नमगे चळो कै तोरिसिदरु = त्यांनीं आम्हाला चांगलाच हात दाखविला.

कैगेबरु — पूर्ण होणें, पक्व होणें कैगे बंद मावित हण्णु = पक्व झालेला आंबा. पण पुढील प्रमाणेंहि वापरतात. कैगेबंद्दु बायिगे बरलिल्ल = हाताला आलेलें तोंडाला आलें नाहीं. 'Many a slip between the cup and the lip' या प्रमाणें.

कालकस — पायांतला केर — कःपदार्थ. कस = केर. हणवेंदरे अवर मनेयल्लि कालकस = पैसा म्हणजे त्यांच्या घरीं 'पायांतला केर'.

कालु हिडि — पाय धरणें (मराठी प्रमाणेंच) पायां पडणें, रोगानें पाय 'धरणें'.

कालुबीळु — पायां पडणें — मराठी प्रमाणेंच. पण शब्दशः 'पाय पडणें'.

मैगळ्ळ (मै + कळ्ळ) अंगचोर — मराठी प्रमाणेंच.

मै तेगे — (अंग काढणें), मैमेले बरु (अंगावर येणें), मैमुरि (अंग मोडून श्रम करणें) मैगे हत्त — (अन्न) अंगीं लागणें (मैगे च. वि.) वगैरे — सर्व मराठी प्रमाणेंच. मैगे आगु = प्रकृतीस मानवणें.

मै बरु — लठ्ठ होणें — अंग 'येणें' अवनिगे मै बंतु = तो लठ्ठ झाला. शब्दशः 'त्याला' अंग 'आलें'.

मै बिडु — लठ्ठ होणें — अंग 'सोडणें' अित्तीचिगे अवनु मै बिट्टि-द्दाने = अलीकडे तो लठ्ठ झाला आहे. मराठींत 'अंग सोडणें' याचा अर्थ 'खंगत जाणें' असा आहे. पण 'अंग सुटणें' हा वाक्प्रचार 'त्याचें अंग सुटलें आहे' यांतल्या प्रमाणें 'लठ्ठ होणें' या अर्थी वापरतात.

मैगूडु — अंग मिळणें, अंग अेक होणें, अंगमेळ होणें, समागम करणें. मैगूडदिरु परवधुविनलि (वधुविनल्लि) परस्त्री 'मध्यें' अंगमेळ 'न होतां रहा'.

मैमरे — देहभान विसरणें, 'अंग विसरणें' येोवनद मब्बिनल्लि मैमरे-तवनु = तारुण्याच्या मदांत देहभान विसरलेला; मब्बु = मद-नशा-तंद्रि वगैरे. मद्यपानदिंद मै मरेतवनु = मद्यपानानें अंगावर खबर नसलेला.

बायि — तोंड - मराठींत 'तोंड' हा शब्द 'चेहरा' व 'खाण्याचें अिंद्रिय' या दोन्हीहि अर्थी वापरतात. तोंड दाखवूं नकोस. तोंडाला गोडी

नाहीं. पण कानडींत (चेहरा Face) या अर्थी मोरे (मारि) व खाण्या बोलण्याचें अिंद्रिय (Mouth) या अर्थी 'बायि' म्हणतात. बायिंद आडुवदु = तोंडानें बोलणें. कैयिंद माडुवदु = हातानें करणें. बायिंद आडुवदक्किंत कैयिंद माडुवदु लेसु = तोंडानें बोलण्यापेक्षां हातानें करणें (अधिक) बरें. लेसु = (अधिक) बरें (Better). ननगे नीनु मोरे तोरिस बेड = मला तूं तोंड दाखवूं नकोस.

बायि माडु – 'तोंड करणें', वटवटकरणें, ओरडणें, शिव्या देणें असाहि अर्थ आहे.

बायारु -- तहान लागणें (आरु-सुकणें) तोंड सुकणें.

बायिबिडु – तोंड वेंगाडणें, याचना करणें. भ्रष्ट देवक्के बायिबिट्टु, अेनु फला? = भ्रष्ट देवापुढें तोंड वेंगाडून फळ काय? यास मराठींतला 'तोंड सोडणें' हाहि अर्थ आहे.

बायिगे बंदंते -- तोंडास येअील तें - ('आल्यासारखें') अवरु बायिगे बंदंते माताडिदरु = ते तोंडास येअील तें बोलले.

बायि हाकु – (तोंड घालणें) मराठी प्रमाणेंच.

बायि बडि – बडबडणें, दुसऱ्यास बोलूं न देणें, बायि बडिदु अेनु प्रयोजन? = बडबडून काय होणार?. नीनु बल्लिदनेंदु बडवर बायि बडियबेड = तूं समर्थ आहेस म्हणून गरीबांचें 'तोंड बंद करुं' नकोस.

मोरे = Face चेहरा – मोरे मुरि = तिरस्कार दर्शविणें.

मोरे केडिसु -- अपमान करणें - अुगीच बोलून वाअीटपणा घेणें.

होट्टे होरकोळ्ळु – पोट भरणें. होट्टे होरकोळ्ळलिक्के होरगिनिंद बंदवरु = पोट भरायला बाहेरुन आलेले.

मातिगे बारदु – अुपयोगी न पडणारें, निरुपयोगी. मातिगे बारद वस्तु बहळ्ळिद्दरेनु = निरुपयोगी वस्तु पुष्कळ असून काय (करायची). होतिन कोरळोळगे मोले अिद्दरेनु = बोकडाच्या गळ्यास स्तन असून काय (कामाचे). मातु = बोलणें. पण येथें वरील अर्थ.

मातिगे बंदु अन्नु – युक्तिवादासाठीं म्हणणें, बोलणें निघालें म्हणून म्हणणें. मातिगे बंदु नानु हीगे अंदेनु = बोलणें निघालें म्हणून मी

म्हटलें किंवा युक्तिवादासाठीं (Argument) मी म्हणालों.

मनस्सिगे बरु — मनास येणें - आवडणें वगैरे, (मराठी प्रमाणेंच).

मनसु माडु — अिच्छिणें - 'मन करणें'. मनस्सु आगु — अिच्छा होणें होगलिक्के नन्न मनस्सु आगलिल्ल = जाण्याची मला अिच्छा झाली नाहीं.

हट तोडु — हट्ट धरणें, दुराग्रह धरणें. नीनु होगलिक्के बेकेंदु अवरु हट तोट्टरु = तूं गेलेंच पाहिजे असा त्यांनीं हट्ट धरिला.

सण्णागि — हळु हळु - थोडें थोडें - सण्णागि अभ्यासवन्नु नडेसु = हळु हळु अभ्यास चालीव.

अूटक्के हेळु — जेवायला आमंत्रण देणें 'जेवायला सांगणें' निमगेल्ला अूटक्के हेळलिक्के बंदिरुत्तेने (बंदीनी) = तुम्हा सर्वांना जेवायला बोलवायला आलों आहे.

गोजिगे होगु — भानगडींत पडणें. नानु याव गोजिगू होगलिल्ल = मी कोणत्याहि भानगडींत पडलों नाहीं.

कोनेगाणु — शेवटास जाणें, तडीस जाणें - 'शेवट पाहणें'. कोने + काणु कोने = शेवट. नम्म केलसवु कोनेगंडितु = आमचें काम तडीस गेलें.

कोने गाणिसु — तडीस नेणें. वरील 'कोनेगाणु'चें प्रयोजक रूप.

बाल बडि — खुशामत करणें, पुढें पुढेंकरणें, गोंडा घोळणें; शेपूट 'मारणें'बाल = शेपूट. दोड्डवर मुंदे बाल बडियुववरु बहळ = मोठ्यांच्यापुढें गोंडा घोळणारे पुष्कळ.

कल्लेदे — निधडी छाती, 'दगडी' छाती; कल्लेदेयव = निधड्या छातीचा - (कल्लु + अेदे) कल्लु = दगड, अेदे = छाती.

कल्लु हाकु — अेखाद्याच्या कामांत विघ्न आणणें - दगड 'घालणें'.

मण्णुपालागु — मण्णागु — मातीस मिळणें, नाश होणें, मण्णु — माती पालु — वांटा — मातीच्या वांट्यास 'होणें'.

मण्णु कोडु — माती देणें (मराठी प्रमाणेंच) प्रेतास पुरणें, माती देणें.

अेनु मण्णो! — (मराठी प्रमाणें) 'काय माती कीं' 'काय कुणास ठाअुक' (व्यावहारिक भाषेंत) तुच्छता दर्शक — 'त्याला काय कळतें आहे माती'.

नीरु - पाणी; नीरु बिडु — पाणी सोडणें, (झाडांना पिकांना वगैरे).

बायिगे नीरु बिडु – तोंडाला पाणी सुटणें; (मराठी प्रमाणेंच). **नीरु मुट्टु** – शौचानंतर वगैरे प्रक्षालनार्थ पाणी वापरणें – पाणी 'शिवणें', पाणी लावणें.

मनॆ माडु – बिऱ्हाड करणें, घर 'करणें'. मनॆयवरु – घरचे लोक, घराचे यजमान, 'घरचे ते' (बायकांच्या भाषेंत पति -). मनॆ मारु – घरदार.

नॆल – जमीन. नॆलसमान माडु – माडिसु = जमीन समान करणें, जमीनदोस्त करणें - करविणें. नॆलमुट्टि हेळु – जमीनीस स्पर्श करून सांगणें, जमीनीस हात लावून सांगणें – शपथपूर्वक सांगणें – भुमि शपथ – (ग्रामीण भाषेंत वापरतात).

बॆळगु – अुजेड. बॆळगागु – अुजाडणें – 'अुजेड होणें' बॆळगु + आगु. बॆळगु मुंजानॆ – सकाळीं अुजाडतांच (At day break).

जीव – जीव = प्राण. जीवद मेलिन आसॆ = जीवावरची आशा. जीवद मेलॆ अुदारनागु (मराठी प्रमाणेंच) = जिवावर अुदार होणें. जीवद मित्र – जिवलग मित्र 'जिवाचा' मित्र. खालील अुपयोग पहा:– अवरु मगनमेलॆ बहळजीव = मुलावर त्याचें फार प्रेम. मुलावर त्याचा फार जीव.

बेंकि – विस्तव; बेंकि माडु = विस्तव करणें बेंकियागु = भयंकर रागावणें, संतापणें, 'विस्तव होणें' हॊट्टॆयॊळग बेंकि बीळु = पोटांत आग पडणें; (मराठी प्रमाणेंच) (हॊट्टॆयाग .... ....). **नन्नमेलॆ** अवरु सिट्टु बेंकि = माझ्यावर ते 'राग - विस्तव' – माझ्यावर त्यांचा भयंकर राग.

मट्ट – पातळी, प्रमाण, Level, Extent मट्टिगॆ (च. वि.) खालील प्रमाणें बरेच अुपयोग रूढ आहेत:– तिळिदमट्टिगॆ – समजल्या 'प्रमाणास' प्रमाणें – ननगॆ तिळिदमट्टिगॆ = माझ्या कल्पने - समजुती प्रमाणें - 'So far as I understand'. ऎष्टु मट्टिगॆ – कितपत. ओदिद्दु निनगॆ ऎष्टु - मट्टिगॆ तिळियुवदु? = वाचलेलें तुला कितपत कळतें?. मट्ट तिळियदॆ मातााड बारदु = 'पातळी' न समजतां, दर्जा न ओळखतां, बोलूं नये.

मातु – शब्द - बोलणें; मातााडु – शब्द बोलणें – बोलणें. आडु – अुच्चारणें - खेळणें वगैरे. मातु हॊरसु – शब्द 'चढविणें', 'दोष देणें' ऒब्बन मेलॆ मातु हॊरसु = अेखाद्यास दोष देणें. मातााडिसु – 'मातााडु' चें प्रयोजक रूप. 'बोलविणें' – सांत्वन करणें, विचारपूस करून

दुसऱ्यास बोलायला लावणें. मातुगुड्ड् – (मातु + कुड्ड्). बोलणें - 'कुटणें', खूप बोलणें. बडबडणें.

मातु माडु – बोलणें करणें, करार करणें, (मराठीप्रमाणेंच). मातु मुरि – वचन मोडणें.

सुळ्ळु – खोटें; पुढील अुपयोग पहा :– सुळ्ळे अंतार = अुगीचच म्हणतात. (सुळ्ळु + अे) सुळ्ळे बंदिवि = अुगीचच आलों.

अेळु – अुठणें; सरळ अुपयोग अवनु अेद्दनु = तो अुठला. पण खालील व्यावहारिक अुपयोग पहा :– ननगे गोत्तिदे अेळु = मला माहीत आहे सोड ('अूठ'). ननगेल्ला गोत्तिदे अेळरि = मला सगळें माहीत आहे 'अुठा'. याच अर्थीं मराठींत कधींकधीं दक्षिणमहाराष्ट्रांत 'माहीत आहे घ्या' म्हटलेलें आढळतें.

कूडु -- मिळणें. पण भेटणें या अर्थीं अवरु ननगे अिंदु कूडिद्दरु = ते मला आज भेटले होते. हिंदींतील 'मिलना' (भेटणें) च्या अुपयोगासारखें आहे.

हाकु – घालणें. अेत्तु – अुचलणें. अेत्तिहाकु = लाटणें, पैसे वगैरे अुपटणें, खाणें, 'अुचलून घालणें'.

हिडि – धरणें. हादि हिडि = वाट धरणें.

माडु – करणें. खालील अुपयोग पहा :– नीवु बरतीरि अंत ना माडिद्दे = तुम्ही याल असें मी 'केलें होतें' – मला वाटलें होतें.

हाळु माडु – व्यर्थ घालविणें, नासणें, दवडणें. निद्दे माडु = झोप 'करणें' = झोप घेणें, निजणें, झोपणें या अर्थीं 'मलगु' हा धातू आहे. गंटु माडु – गांठोडें 'करणें', पैसा करणें राग माडु – राग 'करणें' राग, गायन करणें, राग गाणें, बाकी सर्व अुपयोग मराठी प्रमाणें.

अुण्णु – जेवणें – 'भोगणें' या अर्थीं पुढील प्रमाणें माडिद्दु अुण्णो महाराया = केलेलें भोग रे 'महाराया' (मोठ्यामाणसा). अुण्डाडि – खाअून हिंडणारा मनुष्य. आडु = फिरणें.

केम्पु – तांबडा; परंतु 'गोरा' या अर्थीं रूढ आहे. केंपु जनरु = गोरे लोक. नम्म अळिय केम्पु अिद्दाने = आमचा जांवअी गोरा आहे. युरोपियनलोक या अर्थीं 'बिळीजनरु' हि म्हणतात.

पाप – 'पाप' - 'पुण्य' - यांतील अर्थाखेरीज खालील प्रमाणें वापरतात. पाप! = बिचारा! पाप! अव अेनु माडियानु! = तो काय करील बिचारा! हें कींव, करुणा, अनुकम्पा दर्शविणारें भाव बोधक अव्यय आहे. अरेरे, गरीब बिचारा! या अर्थी 'पाप बिचारा!' म्हटलेलें कर्नाटकीय मराठी भाषकांत कधीं-कधीं अेकूं येतें.

अय्यय्यो! = अरे बापरे - अग आओग - 'अयय्यो'.

अय्यो! = अरेरे - अय्यो पाप! = अरेरे बिचारा!

'बिडु' – टाकणें, सोडणें हा धातु आपण मागें पाहिलाच आहे. आतां खालील अुपयोग पहा:– अवनु माडलिल्ल बिडलिल्ल = त्यानें केलें नाहीं 'सोडलें नाहीं' याचा अर्थ, केलें नाहीं अन् काहीं नाहीं; क्रियापदास जोर देण्यासाठीं वापरतात. अवरु माडिदवरल्ल बिट्टवरल्ल = ते केलेले नाहींत 'सोडलेले' नाहींत. ते केले सवरलेले नाहींत. अवनु नोडलिल्ल बिडलिल्ल = त्यानें पाहिलें नाहीं अन् 'कांहीं नाहीं'. होगलि बिडु, (जाअूं दे सोड). कोट्टु बिडु (देअून टाक) वगैरे अुपयोग मराठी सारखेच आहेत.

**कांहीं भिन्नार्थक 'तत्सम' शब्द.**

कानडींत संस्कृत शब्द बरेच आहेत. जसेच्या तसे आलेले शब्द 'तत्सम' व त्यांत बदल झालेले तद्भव – ही विभागणी मराठींतल्या प्रमाणेंच आहे. कांहीं तद्भव-शब्द:– रत्न-रन्न, आमंत्रण-ओतन, श्री-सिरि-, अटवि-अडवि, आशा-आसे, निद्रा-निद्दे, आज्ञा-आणे, ग्रंथि-गंट्टु, पुस्तक-होत्तिगे, संध्या-संजे, गाथा-गादे. तत्सम शब्द मूळ अर्थानेंच वापरतात. परंतु खालीं दिलेले **कांहीं** 'तत्सम' शब्द मात्र निराळ्या **अर्थींहि** रूढ आहेत. ते वाक्प्रचार दृष्ट्या महत्त्वाचे आहेत.

न्याय – भांडण; न्यायाडु = भांडणें. नमगु अवरिगु न्याय आयितु = आमचें त्यांचें भांडण झालें. न्यायदान, न्यायालय, वगैरे शब्दांत 'न्याय' याचा मूळ अर्थच आहे.

संकट – अस्वस्थपणा. होट्टेयल्लि संकट आगुत्तदे. होट्टेयाग संकट आगतदऽ = पोटांत 'कसेंसेंच' होतें.

व्यसन – दुःख. मनस्सिगे व्यसनवायितु = मनाला दुःख झालें.

संताप – दुःख. (या अर्थी म्हैसूरकडे विशेष रूढ आहे) अवर निधनद बग्गे संताप व्यक्तगोळिसलायितु = त्यांच्या मरणाबद्दल दुःख व्यक्त केलें गेलें. व्यक्तगोळिसु = व्यक्त करणें.

अवसर – घाअी. ननगे होगुव अवसर अिदे = मला जायची घाअी आहे.

आग्रह – राग, क्रोध, या अर्थी म्हैसूरकडे वापरतात.

निदान – सावकाश, स्वस्थपणा. निदानवागि हाडबेकु = स्वस्थ गडबड न करितां गावें. 'निदान' म्हणजे 'रोगाचें कारण शोधणें' (Diagnosis) हा अर्थहि आहे.

प्राय = वय -- तारुण्य -

वरील शब्दांची चर्चा वाक्प्रचारांमध्यें समाविष्ट करण्याचें कारण असें कीं, त्यांचा कानडींतील अुपयोग माहीत नसल्यानें खालीलसारख्या वाक्याचा अर्थ नीटसा कळणार नाहीं. ननगे होट्टेयल्लि संकटागुत्तदे = मला पोटांत 'संकट' होतें -- मला पोटांत कसेसेंच होतें.

**साद शब्द.** (Echo - word). मराठींतील 'बि' च्या जागीं कानडींत 'गि'.

**'साद शब्द'** म्हणजे अेखाद्या शब्दाची द्विरुक्ति करुन त्याचा अर्थ "वगैरे वगैरे" सुचविण्यासाठीं बनविलेला शब्द. अुदा:– कागदबिगद. अशा शब्दास मराटींत कांहीं व्याकरणकारांनीं समाहारद्वंद्व समासाचा अेक प्रकार म्हटलें आहे. पण डॉ. शं. गो. तुळपुळे यांनीं 'यादवकालीन मराठी' या आपल्या ग्रंथांत 'साद-शब्द' हा 'Echo - Word' यास प्रतिशब्द म्हणून वापरला आहे, तो यथार्थ आहे.

सादशब्दांतील 'साद वर्ण' मराठींत 'बि' येतो, तर कानडींत 'गि' येतो. पाणी **बि**णी – नीरु **गी**रु. कागद **बि**गद – कागदा **गि**गदा. शेत बीत = होला गिल ८

कानडीचा परिणाम झालेल्या कर्नाटकांतील मराठींत पाणी **गि**णी, मराठी **गि**राठी, ओषध **गि**अुषध, असे प्रयोग कधींकधीं अेकूं येतात.

कानडींत 'गि' च्या अेवजीं कधींकधीं 'प' वापरलेलाहि आढळतो:-

बण्ण पण्ण, चकडि पकडि, हुोला पल <. 'साद – शब्द' बनविण्याची प्रवृत्ति किंवा लकब मराठींत द्राविडीपासून आली असावी असें दिसतें.

आधुनिक मराठींत 'बि' हा अेकच साद वर्ण असला तरी प्राचीन मराठींत 'प 'त' ब, म' असे विविध आहेत. या संबंधानें डॉ. तुळपुळे यांनीं अुपरिनिर्दिष्ट ग्रंथांत पृ. ३४२ वर दिलेलीं अुदाहरणें सूचक आहेत.

सादशब्द बनविण्याची प्रवृत्ति द्राविडीपासून मराठींत आल्यावरहि यादवकालीन मराठीपासून आधुनिककाळापर्यंत निरनिराळ्या सादवर्णांचा प्रयोग होत येअून शेवटीं बि' निश्चित होअून अितर वर्ण गळले असें तज्ञांचें मत आहे.

---

## प्रकरण ४७ वें

# कांहीं शब्दविशेष.

### केुड (गेुड), केड्ड (गेड्ड), केडि (गेडि) वगैरे.

'केुड' म्हणजे 'नासणें' 'बिघडणें' हा धातु आपण मागें पाहिलाच आहे. बऱ्याच जोड - शब्दांमध्यें हा धातु येतो, व व्यंजन संधीप्रमाणें 'केुड'चें रूप गेुड होतें. अुदा:– मति + केुड = मतिगेुड = बुद्धि बिघडणें. अशा जोड क्रियापदांना कानडींत 'क्रियासमास' नांवाचा समासाचा अेक प्रकार मानतात. मतिगेुड्ड बायि बिडबेड = बुद्धि बिघडून बडबडूं नकोस. कुल + केुड – कुलगेुड = 'कुल बिघडणें', 'बाटणें'. अवनु कुलगेुट्टनु = तो बाटला.

हद – हद + केुड = हदगेुड = योग्य वेळ, अेखादें काम करण्याची योग्य वेळ, शेतांतील कामाची पेरण्याची वगैरे घात. हद + केुड = 'हद - गेड' = योग्य वेळ टळणें. अी सल जोळद बेळे हदगेट्टितु = या खेपेस जोंधळ्याचें पीक घात टळल्यानें बिघडलें. नम्म केलस हदगेट्टितु = आमचें काम बिघडलें (तें करण्याची योग्य वेळ वगैरे गेल्यामुळें). 'घात - बिघडणें' हें अेकेरी क्रियापद असल्या सारखें वापरतात, हें लक्षांत घेणें. पिकाची

घात टळली, किंवा बिघडली न म्हणतां, शब्दशः पीक 'घात - बिघडलें' म्हटल्यासारखा हा प्रयोग आहे.

अळ्तेगेडु – प्रमाणाबाहेर अेखादी गोष्ट होणें. अळ्तु = माप, प्रमाण. अळ्तेगेड्ड अुणबारदु = प्रमाणाबाहेर जेवूं नये. 'प्रमाण बिघडून' जेवूं नये. निद्देगेडु = जाग्रण होणें. निद्दे - झोंप. अवनु निद्देगेट्टनु = त्यानें जाग्रण केलें.

**केडु** = 'केडु' म्हणजे नाश, हानि, (नाम). पररिगे केडु माडु - ववरु = दुसऱ्याचें नुकसान करणारे. केडु + काल = केडुगाल (व्यंजन-संधि) = वाअीट काळ, आपत्काल; केडु बयसु = वाअीट चिंतिणें. जोड शब्दांमध्यें या शब्दाचा अुपयोग पुढील प्रमाणें :- निद्दे + केडु = निद्देगेडु (व्यंजन-संधि) = निद्रानाश, झोंपमोड. वेळेगेडु = वेळाचा नाश. कूलिगेडु = रोज मजूरीचा 'नाश', मजूरी न मिळणें 'कूलि' = रोजमजूरी. मनेयल्लि कूतु अवनु कूलिगेडादनु = तो घरीं बसल्यानें त्यानें मजूरी गमावली. शब्दशः— घरीं बसून तो 'मजूरी नाश' झाला.

**केडि** – हा शब्द जोडशब्दांत दुसरा येतो व अेखादी गोष्ट 'नसलेला' 'नष्ट झालेला मनुष्य' असा त्याचा अर्थ होतो. अुदा :— मान + केडि = मानगेडि (व्यंजनसंधि) = मान नसलेला - निर्लज्ज मनुष्य. तिळिगेडि = अक्कल नसलेला. तिळि = समजूत - अक्कल.

बुद्धिगेडि — निर्बुद्ध मनुष्य. अभिमानगेडि = अभिमानशून्य मनुष्य.

किडि = नाश करणारा मनुष्य. किडिगेडि (द्विरुक्तियुक्त शब्द) = खोड-साळ मनुष्य. किडिगेडितन = खोडसाळपणा. ('तन' हा प्रत्यय लावून भाववाचक नाम होतें - मूर्खतन = मूर्खपणा. जाणतन = शहाणपण.

**मुन्** – आधीं, पुढें असलेला, या अर्थाचा हा व्यजनान्त शब्द आहे. जोड-शब्दामध्यें पुष्कळदां येतो. मुन् + नोट – मुन्नोट = आधीं केलेली पाहणी. नोट = पाहणी, दृश्य. मुन् + नुडि - मुन्नुडि = प्रस्तावना. Foreword. मुन्दिवस = आधला दिवस, आधल्या दिवशीं. मुम्भाग = पुढील भाग. या वरून 'मुन्दे' हें क्रि. वि. अ. झालें आहे.

**हिन्** – वरील प्रमाणें मागें, पाठीमागें, नंतर असलेला, या अर्थाचा हा शब्द आहे. यावरून जोड शब्द होतात. हिम्भाग = मागील भाग. हिन्ति-

रुगु, हिन्दिरुगु = मागें फिरणें. तिरुगु - फिरणें. हिन्नेलु = पार्श्वभूमि (Back Ground). नेलु = तळ, आधार, जमीन.

**मरु** – (वि.) दुसरा, (Next), उलट. मरुदिवस = दुसरे दिवशीं. 'दिवस' याच्या सप्तमि ऐवजीं प्रथमा विभक्ति वापरतात (पान ५३ पहा).

मरुसल – दुसरा, थोरल्या मुलाच्या मागचा. मरुसल मग = दुसरा मुलगा. 'मरुचल' हि म्हणतात. चोच्चल – पहिला, प्रथम जन्मलेला. चोच्चल मग = पहिला मुलगा. चोच्चल मगळु = पहिली मुलगी. मरु मातु = उलट बोलणें, प्रत्युत्तर.

**अरे** – अर्धा (A Half), थोडा. अरे + कडे – अरेगडे = दोन भाग करणें. कडे - घुसळणें. (कडि - तोडणें, कापणें). अरेगडे मोसरु = अर्धे घुसळलेलें दहीं. अरेनुडि (ना.) = अर्धवट, अस्पष्ट बोलणें. अरे नगु (ना.) = अर्ध हास्य ('स्मित' व 'हास्य' या मधलें). अरेपालु (ना.) = अर्धा हिस्सा. अरेगेलस (ना.) (अरे + केलस) = अर्धवट सोडलेलें काम. अरेहुच्चु (ना.) = अर्धे वेड. अरेमरुळ = अर्धवेडा.

**मीरु** – पलीकडे जाणें, (To go beyond), उल्लंघणें, जास्त होणें. कै मीरु = 'हाता पलीकडे' जाणें, (एखादी गोष्ट) आपल्या शक्ती बाहेर, आवाक्या बाहेर जाणें. कै मीरि = 'हाता पलीकडे जाऊन'. कै मीरि आदद्दु = चुकून झालेलें (तें). मातु मीरु = शब्द उल्लंघिणें, अवज्ञा करणें. तायितंदेगळ मातु मीरबारदु = आईबापांची आज्ञा मोडूं नये.

**मेल्** = वरील, वर असलेला. मेलागु = 'वरचा' होणें, श्रेष्ठ होणें, वरचढ होणें. मेल्नुडि = उच्च, योग्य, श्रेष्ठ असा शब्द. मेल्भाग = वरील भाग. मेल्मुसुकु = डोकीवरील बुरखा. (मुसुकु = बुरखा). मेल्विचारक = वरुन पाहणारा, तपासणारा, समीक्षक (Overseer). मेल्विचारणे = वरून तपासणी (Supervision). मेलु = वरील 'भाग'. मेले = वर.

**केळ** = खालील, खालीं असलेला, केळगे = खालीं. केळगडे (केळ + कडे) = खालील भाग, खालील भागाकडे. केळतनक = खालपर्यंत. मेलिन्द केळतनक = वरपासून खालपर्यंत. केळभाग = खालील भाग. केळ

लोक = खालील लोक, पाताळ. केळहोट्टे = खालील पोट. Abdomen केळगु = खालीलभाग, तळ - केळगे = खाली.

**तानु** – आपण. तावु, आपण (बहुवचन) क्रि. वि. अ. (पान १७ पहा). तन्न = आपला; तम्म (बहुवचन). तन्नोळगे ताने = आपल्यांतच आपण. तम्म तम्मोळगे = आपापसांत. तन्नोब्बन पुर्ति (पूर्ते) = आपल्या अेकट्या पुरतें.

**नुडि** (धातु) – वाजणें, अुच्चारणें, बोलणें, म्हणणें. अी तंबोरि चलो नुडियुत्तदे = हा तंबोरा चांगला वाजतो. सत्यवन्नु नुडि = खरें बोल. अवनु नक्कु नुडिदनु = तो हसून म्हणाला. नुडिसु = वाजविणें (नुडि चें प्रयोजक). वाद्यवन्नु नुडिसु = वाद्य वाजविणें. नुडि (नाम) = बोलणें, वचन, अुक्ति, भाषा. नाण्णुडि = प्रादेशिक बोल, म्हण. जाण्णुडि = शहाणपणाचे बोल, हितोक्ति, सुभाषित; नुडिजाण = वाक्चतुर, बोलण्यांत शाहणा असलेला मनुष्य. नुडिगोडु (नुडि + कोडु) = वचन देणें. नुडिगेडु = बोलणें वाया जाणें

## प्रकरण ४८ वें

## कानडींतील स्वाभाविक यमकानुप्रास प्रचुरता.

कवीनें किंवा लेखकानें कौशल्यपूर्वक योजलेल्या शब्दांमुळें यमक, अनुप्रास, वगैरे अलंकार निर्माण होतातच. परंतु भाषेंत असे कांहीं शब्द असतात कीं दैनंदिन व्यवहारांत अर्थवैशिष्ट्यामुळें ते जोडीनें येतात. या 'जोड्या' अर्थसादृश्यामुळें किंवा अर्थविरोधामुळें संभवतात, आणि अशा शब्दांमध्यें अनुप्रास व यमक हे अलंकार आढळतात. अुदा :– कमावणें - गमावणें, हंसणें - रुसणें, तोडणें - जोडणें,

कानडींतील अशा जोडीनें येणाऱ्या शब्दांमध्यें अनुप्रास व यमक हे विशेषच आढळतात.

**धातु :—** हेळु - केळु = सांगणें - विचारणें, किंवा अकणें. आडु - माडु = बोलणें - करणें. हिग्गु - कुग्गु = पसरणें, - कमी होणें, (आनंदहोणें), - (कमी होणें). बेडु - नीडु = मागणें, - देणें - (भिक्षा घालणें). हॊगळु - तेगळु = स्तुति करणें - निंदणें. तेरळु - हॊरळु - मरळु = जाणें - फिरणें, - परत येणें. अळि (यु) - उळि (यु) = नष्ट होणें - उरणें. कॊरगु - सॊरगु - मरगु = झुरणें - वाळणें - दुःख करणें. गळिसु - बळिसु = मिळविणें - खर्चणें. उडु - तॊडु = नेसणें - लेणें. उण्णु - तिन्नु = जेवणें - खाणें. हिडि - कडि = धरणें - चावणें. बडि - हॊडि - कडि = बडविणें - मारणें - तोडणें. नच्चु - मॆच्चु = विश्वासणें - प्रसन्न होणें. तणि - दणि = संतोषणें - दमणें. अंजिके - नाचिके = भीति - लाज. कै - मै = हात - अंग. मळे - बॆळे = पाऊस - पीक. आळु - बाळु - ताळु = राज्य करणें - नांदणें (जगणें), - टिकणें. तिरुळु - हुरुळु = मर्म (इंगित) - तथ्य. चळि - गाळि = थंडि - वारा. इंपु - कंपु = गोडी - स्वाद. नाडु - नुडि - नडॆ = देश - भाषा - चाल. तप्पु - ऒप्पु = चूक - कबूली. सिहि - कहि = गोड - कडु. इंदु - अंदु = आज - त्यादिवशीं. हिंदिन - इंदिन - मुंदिन = मागील - आजचा - पुढील. हिंदॆ - मुंदॆ = मागें - पुढें. हिरि - किरि = थोर - लहान. गंड - मिंड = नवरा - धगड. नोडु - माडु = पाहणें - करणें. कॆलवु - हलवु = कांहीं - पुष्कळ. इलि - हुलि = उंदीर - वाघ. बॆमरु - उमरु = घाम - उकाडा. हॊन्नु - मण्णु = सोनें - माती. कनसु - ननसु = स्वप्न - सत्य. मनसु - कनसु = मन - स्वप्न. नेट्टगे - सॊट्टगे = सरळ - वांकडें. अड्ड - तिड्ड = अडवा - तिडवा. इत्त - अत्त = इकडे - तिकडे. निन्नॆ - मॊन्नॆ = काल - परवा. अल्लि - इल्लि = तिथें - इथें. आग - ईग = तेव्हां - आतां.

## प्रकरण ४९ वें

# मराठींतील 'नाम' समृद्धि.

## (एकेरी नामांची समृद्धि).

१७ व्या प्रकरणांत आपण कानडींतील 'अेकेरी धातूं'ची समृद्धि पाहिली. मराठी भाषा 'नामांच्या' बाबतींत समृद्ध आहे असें आपण म्हटलें; त्या विषयीं आतां विचार करूं.

येथें कदाचित् अशी अेक शंका येण्याचा संभव आहे कीं, कोणत्याहि भाषेंत धातूहि असतात व शब्दहि असतात, आणि धातूंपासून नामें होतात व नामापासून धातू झालेले असतात. मग अमुक भाषा धातूंच्या बाबतींत समृद्ध आहे, अमुक भाषा नामांच्या बाबतींत समृद्ध आहे असें म्हणण्यांत काय अर्थ आहे?

पण वस्तुस्थिति अशी आहे कीं धातूंपासून नामें **होऊं शकतात** व नामापासून धातू **होऊं शकतात** हें जरी खरें असलें तरी त्याप्रमाणें ते भाषेंत **झालेले असतातच** असें नाहीं व अेक वेळ कोणी मुद्दाम बनविले तर ते सर्वच भाषेंत रूढ होतातच असें नाहीं.

आपण मागें पाहिलें कीं जेथें कानडींत अेकेरी धातु वापरून अर्थ व्यक्त होतो तेथें मराठींत धातूस दुसऱ्या धातूचें सहाय्य घ्यावें लागतें.

कानडींत जशी 'अेकेरी' धातूंची समृद्धि आहे तशी मराठींत **'एकेरी नामां'ची** समृद्धि आहे.

'अेकेरी नाम' म्हणजे काय तें आधीं पाहूं:– भाषेंत नवीन शब्द येअून ती वाढते. मानवी संस्कृतीच्या विकासक्रमांत जसजशा नवीन 'वस्तू' किंवा 'कल्पना' निर्माण होतात तसतसे भाषेंत नवीन शब्द येतात. प्रगतीच्या पहिल्या अवस्थेंत व्यावहारिक गरजेपुरते शब्द भाषेंत असतात. कोणत्याहि समाजाच्या भाषेंत 'घर' 'दगड' 'काठी', 'पाणी' या सारख्या प्राथमिक 'वस्तूं'चीं 'नांवें' प्रथम निर्माण होतात. कदाचित नेहमीच फिरत राहणाऱ्या अेखाद्या समाजाच्या भाषेंत 'घर' हा शब्द आढणार नाहीं, आणि शेकडों वर्षें समुद्रापासून दूर असलेल्या समाजाच्या भाषेंत 'समुद्र' वाचक शब्द असणार

नाहीं! असे आत्यंतिक अपवाद वगळले तरी सामान्यपणें असें म्हणतां येओील कीं, दगड, काठी, पाणी, घर वगैरे प्राथमिक 'वस्तू'वाचक शब्द प्रथमपासून भाषेंत असतात. आपण अशा शब्दांना 'प्राथमिक शब्द' म्हणू.

मराठी भाषेंत 'नवीन' वस्तूंचीं स्वतंत्र 'अेकेरी नांवें' बनविण्याची प्रवृत्ति दिसून येते. पण कानडी भाषेंत 'प्राथमिक शब्दा'वरुनच 'जोडनामें' बनविण्याची प्रवृत्ति असल्याचें आढळतें. अुदाहरणार्थ:- आपण '**कोलु**' (काठी) हा 'प्राथमिक शब्द' घेअूं. या 'प्राथमिक शब्दा' पासून 'नवीन' वस्तूंचीं 'जोड नामें' पहा:-- काठी = कोलु. चाबूक = बारकोलु (वादी बांधलेली काठी). पहार = हारीकोलु. रवि = कडगोलु (घुसळण्याची काठी). विळा = कुडगोलु (वांकडी काठी).

२ दगड = कल्लु. जातें = बीसुव कल्लु (दळण्याचा दगड). वरवंटा = गुंडकल्लु (वाटोळा दगड). पाटा = असिगल्लु. गार = आणेकल्लु

३ केोल = हंचु. तवा = कब्बिण हंचु (लोखंडी केोल).

४ नळी = कोळवि. फुंकणी = अूदगोळवि (फुंकण्याची नळी).

५ तूप = तुप्प (यावरुनच 'तूप' शब्द झाला आहे). मध = जेनुतुप्प.

६ घर = मनु. गुऱ्हाळ = आलीमनु. माहेर = तवरुमनु. माहेर हा 'मातृघर' या जाड शब्दावरुनच आला असला तरी 'माहेर' असें अेकेरी शब्दासारखें त्याला रूप आलें आहे.

७ भोपळा = कुंबळकायि. कोहाळा = संडिगे कुंबळकायि. दुध्या = हालु कुंबळकायि.

प्राथमिक शब्दावरुन 'जोडनाम' बनविण्याच्या प्रवृत्तीचाच परिणाम आप्तवाचक शब्दांच्या बाबतींतहि झालेला आहे.

८ बाप = अप्प. चुलता = दोड्डप्प ('थोरलाबाप'). चिगप्प - 'धाकटाबाप'.

९ आओी = अव्व. चुलती = चिगव्व ('धाकटी आओी'). दोड्डव्व ('थोरली आओी'). मावशी = 'अबचे' (मावशी) हा अेकेरी शब्दहि आहे. पण 'दोड्डव्व' व 'चिगव्व' हेच शब्द अधिक रूढ आहेत.

मराठींतील स्वतंत्र 'अेकेरी नामां'च्या समृद्धीस अपवाद म्हणून खालील सारखे कांहीं शब्द देतां येतील :-

पोळपाट = होळिगेमणे. तळघर = नेलमने (नेल + मने). मत्रमाशी = जेन्नोण. पण हीं कानडी नामेंहि 'जोडनामें' च आहेत.

अेकेरी धातूंच्या बाबतींत मात्र कानडी भाषा समृद्ध आहे यांत शंका नाहीं. हा विषय आपण मागें पाहिलाच आहे.

---

## प्रकरण ५० वें

## म्हणी (Proverbs).

कोणत्याहि भाषेंतील म्हणींमध्यें ती भाषा बोलणाऱ्या लोकांचा अनुभव शहाणपण, व्यवहारज्ञान यांचा सांठा असतो. अेका अर्थीं म्हणी म्हणजे परंपरेनें आलेलें लोकसाहित्यच होय. वाक्प्रचार व म्हणी यांमध्यें भाषेंतील खुब्या, खांचाखोचा व वैशिष्ट्यें दिसून येतात. मागील कांहीं प्रकरणांत आपण वाक्प्रचारांचा अभ्यास केला. आतां कानडींतील कांहीं निवडक म्हणींचा अभ्यास करूं. कानडींत म्हणीला 'गादे' म्हणतात. (ब. व. गादेगळु). पण व्यवहारांत गादे मातु (गादी मातु) म्हणतात.

ಅಗಸನ ಬಡಿವಾರವೆಲ್ಲ ಹೆರರ ಬಟ್ಟೆಯ ಮೇಲೆ. अगसन बडिवारवेल्ला हेरर बट्टेय मेले. परटाचा मोठेपणा सगळा दुसऱ्याच्या कपड्यांवर. बडिवार (वु) = मोठेपणा; हेर = परका, दुसरा, हेरवु, हेरवरू, वगैरे. 'परका तो' – 'परके ते'.

ಅಜ್ಜ ಸತ್ತದ್ದು ಕೇಳಿ ಬಲ್ಲ, ಅಪ್ಪ ಸತ್ತದ್ದು ನೋಡಿ ಬಲ್ಲ, ತಾ ಸಾಯುವದು ಮೊದಲೇ ಬಲ್ಲ. अज्ज सत्तद्दु केळि बल्ल, अप्प सत्तद्दु नोडि बल्ल, ता सायुवदु मोदले बल्ल. आजा मेल्याचें (तो) अेकून जाणतो, बाप मेल्याचें पाहून जाणतो, आपण मरण्याचें आधींच जाणतो. बल्ल = बल्ल (नु). मोदलु = आधीं; मोदलु + अे = मोदले = आधींच.

ಅಕ್ಕ ನನ್ನವಳು ಆದರೆ ಭಾವ ನನ್ನವನೆ? अक्क नन्नवळु आदरे भाव नन्नवने? अक्का माझी झाली तर (झाली म्हणून) मेहुणा माझा का? नन्नवळु = 'माझी ती'. भाव = मेहुणा, किंवा दीर.

ಅಳಿದ ಊರಿಗೆ ಉಳಿದವನೇ ಗವುಡ. अळिद अूरिगॆ अुळिदवने गवुड. नष्ट झालेल्या गांवाला अुरलेला (मनुष्य) च पाटील. अळि = नष्ट होणें; अुळि = अुरणें, शिल्लक राहणें, अुळिसु (प्रयोजक) = शिल्लक टाकणें.

ಅಡಿಗೆ ಮಾಡುವವನ ಮಕ್ಕಳು ಉಪವಾಸ ಬಿದ್ದಾರೋ? अडिगॆ माडुववन मक्कळु अुपवास बिद्दारो? स्वयंपाक करणाऱ्याचीं मुलें अुपाशी पडतील का? 'अुपवास' या नामाचा विशेषणासारखा अुपयोग केला आहे हें लक्षांत घेणें.

ಆಲಸ್ಯಗಾರನಿಗೆ ಎರಡು ಕೆಲಸ ಲೋಭಿಗೆ ಮೂರು ಕೆಲಸ. आलस्यगारनिगॆ अॆरडु कॆलस लोभिगॆ मूरु कॆलस. आळशी माणसास दोन कामें (दुप्पट काम) लोभी मनुष्यास 'तीन खर्च' (तिप्पट खर्च). आलस्यगार = आळशी मनुष्य.

ಆಶೆಯಿದ್ದ ಸನ್ಯಾಸಿ ಮೀಸೆಯಿದ್ದ ಹೆಂಗಸು. आशॆयिद्द सन्यासि मीसॆयिद्द हॆंगसु. आशा असलेला संन्यासी, मिशा असलेली स्त्री.

ಆನೆಯ ಮೇಲೆ ಕೂತು ಬೇಡಬೇಡ, ಕುದುರೆಯ ಮೇಲೆ ಕೂತು ಬೀಳಬೇಡ. आनॆय मेलॆ कूतु बेडबेड, कुदुरॆय मेलॆ कूतु बीळबेड. हत्तीवर बसून मागूं नकोस, घोड्यावर बसून पडूं नकोस.

ಇಕ್ಕಲಾಗದ ಕೈ ಎಂಜಲು. अिक्कलागद कै अॆंजलु. वाढायला न होणारा हात अुष्टा. अिक्कलु + आगद - अिक्कलागद; अॆंजलु = अुष्टा.

ಇದ್ದ ಊರ ಸುದ್ದಿ ಇದ್ದಲ್ಲಿ ತೆಗೆಯಬಾರದು ಬೇರೂರ ಸುದ್ದಿ ಹೋದಲ್ಲಿ ತೆಗೆಯಬಾರದು. अिद्द अूर सुद्दि अिद्दल्लि तॆगॆयबारदु, बेरूर सुद्दि होदल्लि तॆगॆयबारदु. राहिलेल्या गांवची बातमी (गोष्ट) राहिल्या ठिकाणीं काढूं नये परगांवची बातमी गेल्याठिकाणीं काढूंनये. बेरूर=परगांव.

ಇದ್ದ ಮಕ್ಕಳಿಗೆ ಕೂಳಿಲ್ಲ ಇನ್ನೊಂದು ಕೊಡೋ ಸದ್ಗುರು ಎಂದ. अिद्द मक्कळिगॆ कूळिल्ल अिन्नॊंदु कॊडो सद्गुरु अॆंद. असलेल्या मुलांना अन्न नाहीं, आणखी अेक देरे सद्गुरु, म्हणाला. कोडु + ओ = कोडो 'ओ' लावल्यानें – रे असा अर्थ होतो, होगो = जारे.

ಇಬ್ಬರ ನ್ಯಾಯ ಒಬ್ಬನ ಆಯ. अिब्बर न्याय ओब्बन आय. दोघांचें

भांडण (तिसऱ्या) अेकाचा फायदा. 'न्याय' हा संस्कृत शब्द कानडींत भांडण या अर्थीहि वापरतात.

ಉಂಡವನಿಗೆ ಊಟಕ್ಕೆ ನೀಡುವುದು ಗುಂಡಕಲ್ಲಿಗೆ ಎಣ್ಣೆ ಹಚ್ಚಿದಂತೆ. अुंडवनिगॆ अूटक्कॆ नीडुवुदु गुंडकल्लिगॆ अॆण्णॆ हच्चिदंतॆ. जेवलेल्या (माणसा)स जेवायला वाढणें (हें) वरवंट्याला तेल लाविल्या सारखें! अुंडवनु = जेवलेला मनुष्य. नीडु = वाढणें. अॆण्णॆ = तेल. हच्चु = लावणें.

ಉಣ್ಣುವಾಗ ಎರಡು ತುತ್ತು ಕಡಿಮೆ ಉಣಬೇಕು, ಮಾತಾಡುವಾಗ ಎರಡು ಮಾತು ಕಡಿಮೆ ಮಾತಾಡಬೇಕು. अुण्णुवाग अॆरडु तुत्तु कडिमॆ अुणबेकु, मातडुवाग अॆरडु मातु कडिमॆ मातडबेकु. जेवतांना दोन घांस कमी खावेत, बोलतांना दोन शब्द कमी बोलावेत. तुत्तु = घांस. कडिमॆ = कमी. मुखभाषेंत कडिमॆच्या अेवजीं 'कमी' हि म्हणतात.

ಊರು ಉಪಕಾರ ಅರಿಯದು ಹೆಣ ಸಿಂಗಾರ ಅರಿಯದು. अूरु अुपकार अरियदु हॆण सिंगार अरियदु. गांव अुपकार जाणत नाहीं, प्रेत सजवणूक जाणत नाहीं. अरि = जाणणें. अरियदु – लघु नकार रूप. सिंगार – 'शृंगार'चा तद्भव = सजवणूक. हीच म्हण 'अूरिगॆ अुपकार, हॆणक्कॆ सिंगार' अशीहि रूढ आहे.

ಊರಿಗೆಲ್ಲಾ ಹಿರೇತನ ಮನೆಯಾಗಿಲ್ಲ ವಡೆತನ. अूरिगॆल्ला हिरेतन मनॆयागिल्ल वडॆतन. गांवची सगळी वडीलकी घरांत नाहीं मालकी. गांवची सगळी – सगळ्या गांवची.

ಒಡವೆ ಇದ್ದು ಬಡವೆ ಗಂಡ ಇದ್ದು ರಂಡೆ. ओडवॆ अिद्दु बडवॆ गंड अिद्दु रंडॆ. दागिना असून दरिद्री, धवा असून विधवा. ओडवॆ = दागिना. रंडॆ = विधवा.

ಒಪ್ಪತ್ತು ಉಂಡವ ಯೋಗಿ ಎರಡು ಹೊತ್ತು ಉಂಡವ ಭೋಗಿ ಮೂರು ಹೊತ್ತು ಉಂಡವ ರೋಗಿ ನಾಲ್ಕು ಹೊತ್ತು ಉಂಡವನನ್ನು ಹೊತ್ತುಕೊಂಡು ಹೋಗಿ. ओप्पत्तु अुंडव योगि, अॆरडु हॊत्तु अुंडव भोगि, मूरु हॊत्तु अुंडव रोगि, नाल्कु हॊत्तु अुंडवनन्नु हॊत्तुकॊंडु होगि. अेकवेळ जेवलेला योगि, दोनदां जेवलेला भोगी, तीनदां जेवलेला रोगी, चारदां जेवलेल्यास वाहून न्या.

ಒಂದು ದೀಪವಲ್ಲಾ ಒಬ್ಬ ಮಗನಲ್ಲಾ. ओंदु दीपवल्ला ओब्ब

मगनल्ला. अेक दिवा तो दिवा नव्हे, अेक मुलगा तो मुलगा नव्हे. दिवा विझला तर? अेकुलता अेक मुलगा मेला तर?

ಕಚ್ಚೋ ನಾಯಿ ಬೊಗಳದು ಬೊಗಳೋ ನಾಯಿ ಕಚ್ಚದು. कच्चो नायि बोगळदु, बोगळो नायि कच्चदु. चावणारें कुत्रें भुंकत नाहीं, भुंकणारें कुत्रें चावत नाहीं. कच्चो-कच्चुव 'अुव'च्या अेवजीं मुखभाषेंत पुष्कळदां 'ओ' येतो. होगुव मनुष्य-होगो मनुष्य = जाणारा मनुष्य. कच्चु = चावणें बोगळु = भुंकणें. कच्चदु, बोगळदु – लघु नकार रूपें.

ಕದ್ದು ಹೋಳಿಗೆ ಕೊಟ್ಟರೆ, ಬೆಲ್ಲವಿಲ್ಲ ಅಂದನಂತೆ. कद्दु होळिगे कोट्टरे, बेल्लविल्ल अंदनंते. चोरून पोळी दिली तर गूळ नाहीं म्हणाला म्हणे. कदि = चोरणें – कद्दु (भू. कृ. अ.) चोरून. बेल्ल = गूळ.

ಕರುಳಿಗೆ ನಾಚಿಕೆಯಿಲ್ಲ, ಅಂಗಾಲಿಗೆ ಹೇಸಿಗೆ ಇಲ್ಲಾ. करुळिगे नाचिकेयिल्ल, अंगालिगे हेसिगे अिल्ल. आंतड्याला लाज नाहीं, तळपायाला खंत नाहीं. करुळु – आंतडें (मुखभाषेंत 'कळ्ळु') अंगालु = तळपाय. हेसिगे = खंत, 'हेसु' = खंत असणें, वाटणें.

ಕ್ಯಾವಿ ಉಟ್ಟವರೆಲ್ಲಾ ಸನ್ಯಾಸಿಗಳಲ್ಲ, ಬೂದಿ ಬಡಿದವರೆಲ್ಲಾ ಬೈರಾಗಿಗಳಲ್ಲ. क्यावि अुट्टवरेल्ल सन्यासिगळल्ल, बूदि बडिदवरेल्ल बैरागिगळल्ल. भगवे नेसलेले सगळे संन्यासी नव्हेत राख फासलेले सगळे बैरागी नव्हेत.

ಕೇಳಿದ್ದೆಲ್ಲ ನಂಬಬೇಡಾ, ತಿಳಿದದ್ದೆಲ್ಲಾ ಹೇಳಬೇಡ. केळिद्देल्ल नंबबेडा, तिळिदद्देल्ला हेळबेड. अेकलेलें सगळें खरें मानू नको ;समजलेलें सगळें सांगूं नको.

ಕೊಟ್ಟದ್ದು ನನಗೆ, ಬಚ್ಚಿಟ್ಟದ್ದು ಪರರಿಗೆ. कोट्टद्दु ननगे, बच्चीट्टद्दु पररिगे. दिलेलें तें आपल्याला, झाकून ठेवलेलें तें दुसऱ्याला.

ಕೋಳಿಯ ಕಾಲಿಗೆ ಗೆಜ್ಜೆ ಕಟ್ಟಿದರೆ, ತಿಪ್ಪೆ ಕೆರೆಯದೆ ಬಿಟ್ಟೀತೆ. कोळिय कालिगे गेज्जि कट्टिदरे तिप्पे केरेयदे बिट्टीते. कोंबडीच्या पायाला घुंगूर बांधले तरी अुकिरडा अुकरल्याशिवाय सोडील का? तिप्पु (तिप्पि) = अुकिरडा. केरे = अुकरणें, खाजविणें.

ತಾನಾಗಿ ಮಾಡಾ, ಮಾಡಿದ್ದು ನೋಡಾ, ಅವನೊಬ್ಬ ಮೂಢಾ. तानागि माडा, माडिद्दु नोडा, अवनोब्ब मूढा. आपणहून न करी, केलेलें न

पाही तो अेक मूर्ख. माडा = माड(ु); नोडा = नोड(ु). लघु नकार रूपें.

ದೊಡ್ಡವನ ಮನೆ ಸುಡಬಾರದು ಬಡವನ ಹೆಂಡತಿ ಸಾಯಬಾರದು. दोड्डवन मने सुडबारदु बडवन हेंडति सायबारदु. मोठ्या माणसाचें घर जळूं नये अन् गरीबाची बायको मरूं नये. सुडु = जळणें.

ದೊರೆಯನ್ನು ಮುಂದಿನಿಂದ ಹೊಗಳಬೇಕು ಮಗನನ್ನು ಹಿಂದಿನಿಂದ ಹೊಗಳಬೇಕು. दोरेयन्नु मुंदिनिंद होगळबेकु, मगनन्नु हिंदिनिंद होगळबेकु. मालकाची स्तुति त्याच्यापुढें करावी, मुलाची स्तुति त्याच्यामागें करावी. मुंदिनिंद = पुढून. हिंदिनिंद = मागून. होगळु = स्तुति करणें.

ಪೇಟೆಗೆ ಹೋದರೆ ಸಾಲಿಗರ ಕಾಟ, ಮನೆಗೆ ಬಂದರೆ ಹೆಂಡತಿಯ ಕಾಟ. पेटेगे होदरे सालिगर काट मनेगे बंदरे हेंडतिय काट. बाजारांत गेलों तर धनकोंचा त्रास, घरीं गेलों तर बायकोचा त्रास. काट = त्रास, जाच. सासवेचा त्रास या अर्थी 'अत्तेय काट' म्हणतात. काडु (धा.) जाच करणें, त्रास देणें, सतावणें; यापासून काट (नाम).

ಬಂದದ್ದು ಬಿಡಬಾರದು, ಬಾರದ್ದು ಬಯಸಬಾರದು. बंदद्दु बिडबारदु बारद्दु बयसबारदु. आलेलें सोडूं नये, न येणारें अिच्छूं नये. बयसु = अिच्छिणें.

ಬರ ಬಂದ ಕಾಲಕ್ಕೆ ಮಗ ಉಣ್ಣಲಿಕ್ಕೆ ಕಲಿತ. बर बंद कालक्के मग अुण्णलिक्के कलित. दुष्काळ आल्यावेळीं मुलगा जेवायला शिकला.

ಮೇಟಿಗೆ ಬಲವಿದ್ದರೆ ಕೋಟೆ ಗೆಲಬಹುದು. मेटिगे बलविद्दरे कोटे गेलबहुदु. 'मेटी'ला बळ असेल तर किल्ला जिंकतां येअील. मेटी = मळणी करण्यासाठीं खळ्यांत मध्यभागीं रोवलेला खांब. मराठींतहि हा शब्द आहे. 'मेटीला बळ असेल तर' म्हणजे शेतीला बळ असेल तर, म्हणजेच शेतकीची भरभराट असेल तर वाटेल तें करतां येअील.

ಯಾವ ಕಾಲ ತಪ್ಪಿದರೂ ಸಾಯುವಕಾಲ ತಪ್ಪದು. याव काल तप्पिदरू सायुव काल तप्पदु. कोणताहि काळ टळला तरी मरायचा काळ टळत नाहीं. तप्पु = चुकणें, टळणें. तप्पदु – लघु नकार रूप.

ರಾಗ ರಸ, ಪದ ಕಸ. राग रस, पद कस. राग हाच रस, पद म्हणजे केरासारखें. कस = केर, कचरा. शुद्ध संगीतांत 'राग' गायनाच्या

स्वरतालविलासामुळेंच रसनिर्मिति होते. त्यांत पदाचें महत्त्व नाहीं. हें साधें सत्य पुष्कळ सुशिक्षितांच्याहि लौकर लक्षांत येत नाहीं. पण तेंच खेड्यांतांच्या देखील तोंडीं असलेल्या या मार्मिक म्हणींत सामावलेलें आहे.

ಸವತಿಗಂಡ ಸಾಯಲಿ ಅಂದರೆ ಮುಂಡೆ ಆಗುವರಾರು? सवतिगंड सायलि अंदरे मुंडे आगुवराद? सवतीचा नवरा मरूं दे म्हटलं तर विधवा होणारी कोण? मुंडे = विधवा.

ಸಾಲ ಕೇಳದೆ ಹೋಯಿತು, ಹೊಲ ನೋಡದೆ ಹೋಯಿತು. साल केळदे होयितु, होल नोडदे होयितु. कर्ज न विचारल्यामुळें गेलें, शेत न पाहिल्यामुळें गेलें. साल = कर्ज. केळदे = न विचरतां. नोडदे = न पाहतां. गेलें = नष्ट झालें. लोकांकडून यायचे पैसे त्यांना न विचारल्यानें जातात; शेताची देखरेख न केल्यानें नुकसान होतें.

ಹಾದಿ ಮುಪ್ಪಾಗಿ ಹಳ್ಳವಾಯಿತು ಸೂಳೆ ಮುಪ್ಪಾಗಿ ಜೋಗಮ್ಮನಾದಳು. हादि मुप्पागि हळ्ळवायितु सूळे मुप्पागि जोगम्मनादळु. रस्ता जुना होअून ओढा झाला, कसबीण म्हातारी होअून जोगीण झाली. खेड्यांतला रस्ता जुना झाला म्हणजे त्याला पावसाळ्यांत ओढ्याचें स्वरूप येतें, वेश्या म्हातारी झाली कीं जोगीण बनते. हळ्ळ = ओढा. सूळे = वेश्या.

प्रकाशित व अप्रकाशित अशा सर्व मिळून कानडींत तीन हजारावर म्हणी असतील. या प्रकरणांत कांहीं निवडक म्हणी आपण पाहिल्या.

## प्रकरण ५१ वें

# 'गप्पां' चा एक नमुना

गप्पांना कानडींत 'हरटे' म्हणतात.

"नम्मूरल्लि मोन्ने कळ्ळरु बंदु ओंदु मुदुकियन्नु कोंदु होदरंते (होदरु + अंते)" (परवां आमच्या गांवीं चोर येअून अेका म्हातारीला मारून गेले म्हणे).

"मुदकियन्नु कोंदरो ताने सत्तितो?" (म्हातारीला मारलें कीं आपणच मेली?) 'मुदकि' या शब्दास क्रियापद न. लिंगीहि वापरतात. सत्तितु (सत्तितु + ओ–प्रश्नार्थक 'ओ')

नम्म ओणियल्लि ओब्ब मुदक <कुम्मु कुम्मुत्तिरलिक्के सत्त. मुदकर सावे हीगे! (आमच्या गल्लींत अेक म्हातारा खोकतां खोकतांच मेला. म्हाताऱ्यांचं मरणच असलं!)

साविगे मुदकरेनु हरेदवरेनु? नम्मल्लि ओब्ब हुडुग अेडविबिद्दु तीरिये होद. (मरणाला म्हातारे काय (किंवा) तरुण काय? आमच्या येथें अेक मुलगा 'ठेचकळून पडून मेला' 'संपूनच गेला' [मेला]).

अित्तीचे हुडुगर प्रकृतिये चेन्नागि अिरुवदिल्ल (अलीकडे मुलांची प्रकृतीच चांगली नसते).

मनस्सु चंचलवागुवदरिंदले हीगागुवदु. पूर्वदल्लि हीगिरलिल्ल (मन चंचल होण्यानेंच असें होतें. पूर्वीं असें नव्हतें).

साकु बिडप्प. पूर्वदल्लिरलिल्लवंते! तपस्वि विश्वामित्र मेनकेय बेन्नु हत्तलिल्लवे? (पुरे सोड 'बाबा'. म्हणे 'पूर्वीं असें नव्हतें'. तपस्वी विश्वामित्र मेनकेच्या पाठीस लागला ना?)

हत्तिदनो अिल्लो यारिगे गोत्तु! ब्राह्मणरु क्षत्रियरन्नु कडिमे माडलिक्के हागे बरेदिरबेकु. ([पाठीस] लागला कीं नाही कोणजाणे! ब्राह्मणांनीं क्षत्रियांना 'कमीकरण्यासाठीं (कमी लेखण्यासाठीं) असं लिहिलं असले पाहिजें).

आग ब्राह्मण ब्राह्मणेतर वादवित्ते? (तेव्हांहि ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद होता का?)

ओंदु वादवे ओंदु विवादवे अिडी न्यायशास्त्रवन्ने अवरु रचिसिदरल्ल. दिन बेळगादरे न्याय बेळिसुवदु अवर केलसवे आगित्तु. अुण्णलिक्के समृद्धि अिद्दमेले याक बिट्टारु? (अेक वाद का अेक विवाद? सर्व 'न्याय' शास्त्रच त्यांनीं रचून टाकलं ना. रोज अुजाडलं कीं भांडणं वाढवायचीं हें त्यांचं कामच झालं होतं. खायला प्यायला खूप असल्यावर ते कां सोडतील?) 'न्याय' याला कानडींत भांडण असाहि अर्थ असल्याचें आपण मागें पाहिलेंच आहे. दिन = दिवस, बेळगादरे = अुजाडल्यास, अुजाडतांच.

हागेन्न बेड. अीग अुण्णलिक्कु तिन्नलिक्कु अिल्लवेंदु न्याय हच्चुववरु बेव्हिसुववरु अिल्लवे? कालवु हेगे अिरलि न्याय हुट्टिसुववरिद्दरे अदु बेव्ळदे बेळेयुत्तदे. नम्म मने अिदिरिरुव वकीलरिद्दारल्ल. (तसं म्हणूं नकोस. हल्लीं खायला प्यायला नाहीं म्हणून भांडण लावणारे व वाढविणारे न ङींत का. काळं कसा का असेना, भांडण अुत्पन्न करणारे असले कीं तें वाढतंच वाढतं. आमच्या घरासमोर ते वकील आहेत ना?)

अवनदु बिडप्प. नम्म मनेय हत्तर अोब्ब सुव्ळु साक्षीदारने अिद्दाने. अदरिंदले अवन होट्टे तुंबुवदु. मोन्ने अवनिगे चेळु कडिदाग निम्मिद नूरा अेंदु तप्पुगळागिरलिक्कु बेकु अेंदु नानु अंदु बिट्टे. (त्यांचं सोड बाबा. आमच्या घराजवळ अेक साक्षीदारच आहे. त्यामुळं त्याचं पोट भरतं. परवां त्याला विंचू चावला तेव्हां तुमच्याकडून अेकशें आठ पापं झालीं असलीं पाहिजेत असं मी म्हणून सोडलं.

'चेव्ळिगू तप्पीगू संबंधवेनु' बेव्ळवलदल्लि चेळु हेच्चु मलेनाडिनल्लि हावु हेच्चु यावदु अेल्लि हेच्चु अवु अल्लि हेच्चुं कडियबहुदु. (विंचवाचा अन् चुकांचा संबंध काय? देशावर विंचू फार कोंकणांत साप फार. जेथें जे जास्त असतात तेथें ते जास्त चावत असतील).

हागेनू संबंधविल्ल. दैवदल्लि अिद्दंते आगुत्तदे. (तसा कांहीं संबंध नाहीं. नशीबीं असेल तसं होतं).

दैववेंदु हाविन हेडेयमेले कालिट्टरे कडियदे बिडुत्तदेये. (दैव म्हणून सापाच्या फड्यावर पाय टेवला तर चावल्याशिवाय सोडील का?)

प्रल्हादन कथे गोत्तिल्लवे? देवरु कायुववनिद्दरे अेनु हेदरिके? (प्रल्हादाची गोष्ट माहीत नाहींका? देव राखणारा असला म्हणजे काय भीति?)

हागिद्दरे मोन्ने महात्मा गांधियवर कालिगे हावु तगलितल्ल. देवरेके काय लिल्ल. (तसें जर आहे तर परवां महात्मा गांधींच्या पायाला साप चावला देवानें कां राखलं नाहीं).

देवरिल्ल गीवरिल्ल अेल्ल हणेबरह. (देव नाही न बींव नाहीं सगळं नशीब [ ललाट लिखित ] आहे).

हणेबरह वेंदरे हणेयल्लि बरेदिरुत्तदेये? नम्म कर्म नावु अुण्णबेकु.

(ललाट लिखित म्हणजे काय कपाळीं लिहिलेलं असतं का? आमचं कर्म आम्ही भोगलं पाहिजे).

नम्म मनेय हत्तिरिन सावकारनु बडवर गोणु मुरिदु कोब्बिल्लवे? अवन कर्मवेल्लिदे? (आमच्या घराजवळचा तो सावकार गरीबांच्या माना मुरगळून सवकला नाहीं का? त्याचं कर्म कुठं आहे?)

नम्म आ मामलेदाररु हण इट्ट ब्यांकु मुळुगितंतु. कर्मक्के तक्क फल वागलिल्लवे? (आमच्या त्या मामलेदारांनीं पैसे ठेवलेली बँक बुडाली म्हणे. कर्माप्रमाणे फळ झालं नाहींका?)

अगीग ब्यांकुगळ निश्चयवे इल्ल. ब्यांकिन व्यवहार सूळेर व्यवहार ओंदे. (आतांशा बँकांची खात्रीच नाहीं. बँकेचा व्यवहार आणि वेश्यांचा व्यवहार अेकच).

सूळेयरेनु संभावितरेनु? मोन्ने आ अक्कसालिगरवनु मंदिय ओडवे तक्कोंडु ओडि होगलिल्लवे? (वेश्या काय संभावित काय? परवा तो सोनार लोकांचे दागिने घेअून पळून गेला नाहीं का? त्याची झळ आमच्या रामभटां-नाहि लागली आहे. त्याचा अद्वैतवेदान्त कोलमडून पडला आहे.)

अद्वैतवेल्लियदु अद्वैत? द्वैतवे निज; मध्वाचार्यरु अवतारिगळु. (अद्वैत कुठलं आलं आहे अद्वैत! द्वैतच खरं. मध्वाचार्य हे अवतारी पुरुष?)

‘हरट्टेगळु’ नांवाच्या अेका लघुनिबंधसंग्रहाला श्री. द. रा. बेंद्रे यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंतून वरील ‘शुद्ध’ गप्पांचा नमुना घेतला आहे. रोजच्या व्यवहारांत चालणाऱ्या गांवांतल्या गप्पा व ‘लघुनिबंध’ यांमधील साम्य व फरक दर्शविण्यासाठी त्या प्रस्तावनेंत श्री. बेंद्रे यांनीं दिलेला कुठूनहि निघून कुठेंहि वहात जाणाऱ्या ‘शुद्ध’ गप्पांचा हा नमुना आहे.

### शब्दसंग्रह

हरट्टे होडे = गप्पा मारणें, मुदुकि = म्हातारी, केम्मु = खोकला, ओणि = गल्ली, सावु = मरण, सावु + अे = सावे मरणच, हरे = तारुण्य, हरेयदवरु = ‘तारुण्याचे–ते’ तरुणलोक, अित्तीचे = अलीकडे, कळ्ळरु = चोर, अंते = म्हणे, बेन्नु = पाठ, बेन्नुहत्तु = पाठीस लागणें, कोब्बु(धा) = सवकणें.

## प्रकरण ५२ वें

## ' बाजारांत '

या धड्यापासून आपण रोजच्या व्यवहारांतला अेक विषय घेअून त्या संबंधानें अुपयोगी पडणारे शब्द व वाक्प्रयोग शिकूं.

कानडी शिकूं अिच्छिणाऱ्या मराठी भाषकांस 'घराबाहेर' वावरतांना कानीं पडणारी भाषा समजणें व व्यावहारिक मुखभाषा बोलतां येणें हें जास्त महत्त्वाचें आहे म्हणून

'घरीं'-'दारीं' 'रस्त्यांत'-'बाजारांत'— असे विषय घेतले असले तरी त्यांचा क्रम— बाहेरून-आंत - असा घेअून, शेवटीं 'घरीं' हा विषय घेतला आहे. (घरांतली भाषा घ्यायच्या आधीं 'घराबाहेर' ची भाषा घेतली आहे.)

(कंसांत कानडी भाषांतर **फक्त मुखभाषिक** दिलें आहे.)

### बाजारांत

येथून बाजार किती दूर आहे? (अिल्लिंद पेटि यष्टु दूर अदऽ?)

येथून सुमारें दोन मैल होअील. (अिल्लिंद सुमारु यरडु मैलु आगतऽद.)

ह्या गांवचा बाजार कधीं भरतो? (अी अूर संति यंद कूडतदऽ?)

मंगळवारीं भरतो. (मंगळवार कूडतदऽ)

येथें किराणी दुकानें कुणीकडे आहेत? (अिल्लॆ किराणी अंगडी यतलाग अवऽ?)

समोर जाअून चौकांत गेल्यावर अुजवीकडे वळा. (नेट्टग होगि चौकिनॊळगऽ बलक्क होळ्ळरी)

तेथून सर्व किराणी दुकानें लागतात. (अल्लिंद अेल्ला किराणी अंगडि हत्तावऽ)

त्याच्या पुढें कापडाचीं दुकानें आहेत. (अदर मुंद जवळी अंगडि अवऽ)

तुमच्या येथें चांगला गूळ आहे का? (निम्मल्लॆ चलो बेल्ल अद अेनु?)

अेक घडा गूळ द्या. (वंदु घडे बेल्ल < कोड्रि)

आणखी काय हवें (हो) (मत्तेन बेकरी?)

भाजी-मंडअी कुठं आहे? (कायिपल्ले प्याटि यल्लु अदऽ?)

असेंच पुढें चला. (हींगऽ मुंद होगरी)

आज कांहीं भाजी चांगली आलेली नाहीं. (अिवत्तेनु प्याट्याग पल्लु छलो बंदिल्ल<)

प्रत्येक भाजी महाग आहे. (प्रतियोंदु पल्ले तुट्टि अदऽ)

मुळे कसे घेतलेत? (मूलंगि ह्यांग तगोंडरि?)

आण्याला अेक घेतला (अणेक्क वंद तगोंडे)

वांगीं कशीं दिलीस बाअी? (बदनीकायि ह्यांग कोट्टि (बे))

दोन आणे शेर (हो). (यरड आणेक्क शेर (री))

फार महाग आहे. (बहाळ तुट्टि अदऽ)

आज लोणी कसं होतं? (अिवत्त बेण्णि ह्यांग अित्त;?)

चोदा आणे शेर. (हदिनाल्कु आणे शेरु)

ह्या खेपेस दर वाढला आहे. (अी सारेऽ दरा अेरेदऽ)

गेल्या खेपेस कसं होतं? (होद सारे ह्यांग अित्त;?)

बारा आण्याप्रमाणें जोखलं. (हन्नेरडु आणेदहांग तूगिदरु)

तुमच्या दुकानीं कोटाचं चांगलं कापड आहे का (हो)? (निम्म अंगडि ओळगऽ कोटिन छलो अरिवि अद अेनरी?)

हे कापड कसं वार दिलंत. (अी अरिवी ह्यांग वार कोट्टरि)

आणखी चार ठिकाणीं विचारून या. (मत्त नाल्क अंगड्याग केळाडि बरि) केळु + आडु = केळाडु (चारठिकाणीं विचारणें)

तुम्हाला आम्ही खोटं सांगत नाहीं (हो). (निमग नावु सुळ्ळ हेळुदिल्लरी)

आणखी अेकदां तुम्ही यावं कीं नाहीं आमचेकडे. (मत्तोम्मे बरबेकल्लरी नीवु नम्म अंगडिगे)

अिथें ओझेवाला (हमाल) मिळतो का (हो)? (अिल्लि वझ्झेदवां शिगतान अेनरि?)

बोलवा अेकाला. (करीरि वब्बन्न)

स्टेशनाजवळ जायला काय घेतोस रे? (स्टेशनद हतीले होगलिक्के येन तगोतियो?

समजून घ्या रावसाहेब, घाल तें घेतों. (तिळ्दु कोडरि, रायरऽ नीवु कोट्टद्दन्न तगोतेनरि)

आत्रीं सांग म्हणजे मग भांडण नको. (मोदल हेळु अंदर हिंदागडे जगळ ब्याड <)

टांगा करून जाऊंया (टांगा माडि होगोण)

---

## प्रकरण ५३ वें

# चहा घेतांना

अिदे अीग = आतांहेंच, स्नेहितरु = स्नेही (ब. वचन), तरिसु = आणविणें ('तरु' पासून प्रयोजक धातू तरु + अिसु – तरिसु)

थोडा चहा घेअूं या चला (स्वल्पु चहा तगोळ्ळोण नडीरि).

'आतां-हेंच घेतला आहे आतां पुन्हा नको ( अिदे अीग तगोंडेनि अीग ब्याडा ).

चहा घेतां कीं कॉफी? (चहा तगोतीरो काफी ?).

कांहींहि चालेल ( अेन्दू नडीतद ).

चहा कसा झाला आहे ? ( चह< हयांग आग्यदऽ ).

फार चांगला झाला आहे ( बहळ छलो आग्यद ऽ ).

हा घरच्या दुधाचा का? ( अिदु मनी हालिन चहा येनु ?)

नव्हें. आम्हाला अेका स्नेहयाच्याकडून अुत्तम दूध मिळतें ( अल्ल< नमग ओब्ब स्नेहितरकडिंद छलो हालु शिगतद ऽ ).

चहांत साखर हवी का? (चहाक्क सक्करि बेकेनु?) [बेकु+अेनु]

नको पुरेशी आहे (बॅड< साकष्टु अद)

आणखी थोडा चहा आणवूं का ( अिन्नोंदु स्वल्पु चहा तरसलि अेनु ?)

बिस्किटं वगैरे तुम्ही घेतलींच नाहीं. (बिस्कीट अदु तगोळ्ळले अिल्ल< नीवु ? )

चमचा घेअून ये (चमचे तगोंडु बा)

चहा सपक झाला आहे (चह सप्पग आगयदऽ)

या दिवसांत चहा न घेणारीं माणसें फार कमी (अी दिवसदाग चह< तगोळ्ळदवरु बहाळ कडिमि) तगोळ्ळद + अवरु. तगोळ्ळद — न घेणारा.

मी घरी रोज चहा घेत नाहीं (ना मन्याग दिना चहा तगोळ्ळुदुल्ला<)

बाहेर गेलों म्हणजे घेतों (हुोरग होदनेंदर तगोतेनी)

चहाच्या दुकानांत चहा घेत नाही (चहाद अंगड्याग चहा तगोळ्ळुदुल्ला)

---

## प्रकरण ५४ वें

## अंघोळ

बेंकि = विस्तव बंबु = पाण्याचा बंब बंबिन्याग = बंबांत जळक = अंघोळ (झळक<) पाणी = नीरु. नीरु संबंधानें बहुवचनी क्रियापद. गार पाणी = तण् + नीरु — तण्णीरु (थण्णीरु) तण् — थंड बेच्चगु = कोंबट कोमट, (बेच्चगऽ). हुोगे (हुोगी) = धूर

पाणी तापलं आहे का पहा (नीरु काददेनु नोडु)

नसेल तर बंबांत (हंड्याखालीं) विस्तव घाल (अिल्लदिद्दर बंबिन्याग (हंडेद केळग) बेंकी हाकु)

पाणी काढूं का (अुपसू का (हो ?) (नीरु तगीलि अेन (री ?)

थोडेसें बसा अंघोळ करुन येतों (हो) (स्वल्पु कूडरि झळकऽ माडि बरतेनि)

माझा पंचा टुवाल कुठें आहे पहा (नन्न पंजि यल्ले अदऽ नोडु)

पाणी फार गरम आहे काय ? (नीरु बहाळ बिशी अव अेनु)

होय. (होदरि.)

थोडें थंड पाणी घाल (स्वल्प थण्णीरु हाकु)

आतां बरोबर (ठीक) झालं आहे का (हो?) (ओग बराबरी आगेद अेनरि?)

अितकं कोमट पुरे (अिष्टु बेच्चग साकु.)

आंत कोण आहे? (वळग यार अिद्दार?)

मी आहे. (ना अिद्देनि)

मला तांब्या हवा. (ननग तंबिगि बेकु)

साबण कुठं आहे? (साबण यल्लि अदऽ)

मला लहान बादली हवी (ननग सण्ण बकीट बेकु)

अंग 'चोळून घे' (मै तिक्किको)

आज अिथें धूर फार झाला आहे. (अिवत्त अिल्लि होगि बहाळ आग्यदऽ)

---

## प्रकरण ५५ वें

# जेवण

पानें = अेलि (यलि), मांडणें = हाकु – 'घालणें' भीड = भिडे. वाढणें = बडिसु, 'नीडु' (ग्रामीण शब्द) घालणें = हाकु. कुठंतरी = युल्ले आदरु (यल्ल्यारऽ).

जेवायचं झालं आहे – जेवायला अुठा (हो) (अूटक्क आग्यदऽ अुटक्क अेळरी).

पानं मांडलीं (घेतलीं) आहेत (यली हाक्यावऽ 'घातलीं' आहेत).

रांगोळी घातली आहे का? (रंगोलि हाक्यदेनु?)

त्यांना बोलाव जेवायला (अवरन्न अूटक्क करी)

बसा (सुरु करा) (कूडरि)

भीड करुं नका, काय पाहिजे ते घ्या (भिडे माड ब्याडरी येन बेकादद्दु हाकिसीकोळ्ळरी "घालवून घ्या")

त्यांना वाटी दे – ( अवरिगे बट्टल < कोडु )
थोडा भात घेऊन ये ( स्वल्पु अन्ना तगोंडु बा)
सर्वांना विचार ( ऎल्लारिगे केळु)
आमटी वाढायला घे – घ्या ( अमटी बडसलिक्के तगो – तगोळ्ळरि )
ही कसली भाजी? ( इदु यातर पल्ल्या?)
तुम्हाला काय हवें (हो)? ( निमग येन बेकरी?)
मीठ वाढ 'घाल' ( उप्पु हाकु )
स्वयंपाक चांगला झाला आहे ( अडिगि छलो आग्यदऽ)
सार चांगलें झालें आहे ( सार छलो आग्यदऽ)
उशीर झाला आहे सावकाश होऊं द्या (होत्तु आग्यदऽ सावकाश आगलि)
चटणी हवी का? (चटणि बेकेनु? )
जेवण होतांच कुठेंतरी जायचं आहे काय? (ऊट आद कूडले यल्यारऽ होगोददेनु?
सुपारी खा (अडकी हाकि कोळ्ळरी ["घालून घ्या"]

# प्रकरण ५६ वें

## झोप

काय? उठलांत का? ऎनु, ऎद्दिरेनु? ऎद्दिरा? (यद्दया)
झोप चांगली लागली होती का? (निद्दि छलो हत्तित्तेनु? (हत्तित्त+ ऎनु)
बारा वाजेपर्यंत झोप आली नव्हती (हन्नेरडु घंटेतनक < निद्दि हत्तिद्दिल्ल <)
रोज केव्हां झोपतां (हो)? (दिन < यावाग मलकोतीरि?)
तुम्हाला पांघरायला हवं का? (निमग होत्तुकोळ्ळलिक्के बेकेनु) बेकु ऎनु?

अेक कांबळें घा (हो) (वंदु कंबळी कोडरि)

ही त्यांची वळकटी (अिदु अवर हाशिगी सुरळी)

तुमचं अंथरुण ह्या खोलींत घातलें आहे (निम्म हाशिगी अी कॉण्याग हाक्यद्ऽ)

अिथें डांस आहेत का? (अिल्लु गुंगाड अव अेनुं)

केव्हां तरी थोडे होतात. हल्लीं कांहीं नाहींत (यावागरऽ स्वल्पु आगतावऽ अित्तीचिगु अेनू अिल्ला)

मला अेक स्वप्न पडलं (ननग वंदु कनसु बित्तु)

मला सकाळीं पांच वाजतां अुठवा (नन्न मुंजानु अैदु गंटेक्क यब्बिसु)

दिवा मालीव (दीपा कळि)

मला आणखी अेक अुशी दे (ननग अिन्नोंदु तलगिबु कोडु)

ही गादी अिथें घाल (अी गादी अिल्लु हाकु)

त्यावर अेक चादर घाल (अदर म्यालु वंदु चादर हाकु)

तुम्ही रात्रीं अुठलां होतां काय? (नीवु रात्री अेद्दिद्दिरेनु?)

तीन वाजतां अुठून अेक तास वाचीत बसलों होतो (मूरु गंटेक्क अेद्दु ओंदु (वंदु) तासु ओदकोत कूतिद्दे)

त्या नंतर झोप लागली नाहीं (आनंतर< निद्दि हत्तलिल्ल<)

सकाळीं पांचला जागा झालों (मुंजानु अैदक्क अेच्चरादे (अेच्चर + आदे)

---

## प्रकरण ५७ वें

## परीट

अगस – अगसरव + अवनु (अगसरव < 'परटाचा तो')

ओगे (यु) = धुणें, फेंकणें, अरिवि = कपडा, अरिवि(गळु) = कपडे वम्मे = अेकदां, बट्टे = कपडा– हा शब्द म्हैसूरकडे अधिक रूढ आहे बट्टेगळु.

तुमचे घरीं परीट येतो का ? (निम्म मनिगे अगसरव< बरतान अेनु ?) (बरतानेनु)

होय; आठ दिवसांनीं अेकदां येतो (हौदु, यंटु दिनक्कोम्मे बरतानऽ (दिनक्कु + ओम्मे)

कपडे धुवायला काय घेतो ? (कसे धुतो) (अरिवी वगीलिक्कु येन तगोतानऽ ? )

दहा रुपायांस शंभर धुतो (हत्तु रुपायिगे नूरु वगीतानऽ)

कपडे फार मळले आहेत (अरिवि बहाळ माइयावऽ

कपडे घाण झाले आहेत (अरिवि होलस आग्यावऽ)

माझा कोट कुठं आहे ? (नन्न कोटु यल्ले अदऽ?)

घरीं घालण्याचा पायजमा कुठें आहे ? (मन्याग हाकिकोळ्ळुव पायजमा यल्लि अदऽ (यल्यदऽ)

हे कपडे काढून आंत ठेव (अी अरवी तेगेदु – ओळग (वळग) अिडु

हा शर्ट बदलून आला आहे (अी शर्ट बदली आगि बंददऽ)

हे कपडे नेअून धुवायला दे (अी अरवी वय्दु वगीलिक्कु कोडु)

ह्या कपड्यांना साबण लाव (अी अरिविगे साबाण हच्चु)

हें पुष्कळ वेळ भिजवून ठेव . (अिदन्न बहळ होत्तु तोयिशि अिडु) .

हे कपडे कुणी शिवले ? (अी अरवी यारु होलदरु?)

मुंबअीहून शिवून मी आणले आहेत (मुंबयियिंद होलिसि तंदेनि) [होलिशि]

मी कपडे भट्टींत घातले आहेत (ना अरवी भट्टीगे हाकेनी)

तूं कपडे स्वच्छ धुतले नाहींस (नी अरवी छलो वगदिल्ल <)

माझा कोट फाडून आणला आहेस (नन्न कोटु हरदु तंदीदि)

परीट व कपडे यासंबंधानें शब्द असलेल्या कांहीं म्हणी :

यारू अिल्लद अूरिगे अगसर माळ्ळि मुत्तैदे. कोणीहि नसलेल्या गांवा(स) परटाची ‘ माळि ’ सवाष्ण. माळि (माळे) = ‘ परटीण ’ = मराठींतील ‘ गांवढ्या गांवांत गाढवीण सवाष्ण ’ सारखी ही म्हण आहे.

अगसरल्लि बोगसिनीरु सिक्कदो? परटाच्या येथें ओंजळभर पाणी मिळणार नाहीं का?

सिक्कदु – (तें) मिळणार नाहीं (प्रत्ययसिद्ध नकाररूप) सिक्कदु + ओ सिक्कदो? (प्रत्ययसिद्ध प्रश्नार्थक रूप)

बट्टु यिंद आगुवन्तादु बोट्टिनिंदादीते?) कपड्यानें होण्यासारखें जें ते बोटानें होईल का?

आदीतु – तें होईल – संभवार्थ आदीतु + ओ = आदीतो? होईल का? बट्टे सुट्ट, होयितेंदरे सेट्टि बिट्टाने? कापड जळून गेलें म्हटलें तर शेटजी सोडील का? बिट्टानु – सोडील. बिट्टानु + ए = बिट्टाने?

## प्रकरण ५८ वें

## बाग

आजूबाजूमनीयवरु = आजूबाजूच्या घरचे (लोक), सुत्तलु = सभोंवतालीं, मनेयसुत्तलु (मनेसुत्तलु), कायि = फळें (हिरवीं), हण्णु = फळें (पिकलेलीं), हू – फूल. हूविन (ष. वि.) हच्चु = लावणें.

घराभोंवतीं लहानशी बाग आहे. (मनेसुत्तलु सण्ण तोट अदऽ)

त्यांत फुलझाडें आहेत (अदरोळग हूविन गिड < अवऽ)

त्यांना आम्ही सर्व पाणी घालतों. (अवक्क नावेल्लरु नीरु हाकतेवी) अवक्कु (चतुर्थी)

त्यांना पुष्कळ फुलें होतात (अवक्क बहाळ हू (गळु) आगतावऽ)

शेजारपाजारचे लोक देवाला फुलें नेतात. (आजूबाजू मनीयवरु देवरिगे हू वयितारऽ)

आमच्या येथें मोगऱ्याचीं फुलें खूप होतात (नम्मल्ले मलगी हू बहळ आगतावऽ)

ह्या चिक्कूच्या झाडाला फळें होतात काय? (अी चिक्कुगिडक्क काथि आगताव अेनु (येनु?)

आणखी तीन महिन्यांनीं होतात (अिन्नु मूरु तिंगळिगे आगतावऽ)

हें झाड तुम्ही कोठून आणलें? (अी गिड< नीवु यल्लिंद तंदिरि?)

हें बेळगांवहून आणून लावलें (अिदन्नु बेळगाविथिंद तंदु हच्चिदिवि)

---

## प्रकरण ५९ वें

## देवपूजा

पुलें वाहणं = हू अेरिसु ‘चढविणें’, तेयु = अुगाळणें, गंध<= गंध, बेळगुं = ओवाळणें, आरति = आरति, (अुदबत्ति = अूदिनकड्डि- (‘अुदाची काडी’) ‘अूदकाडी’, कापूर = कप्पर, तोरु = दिसणें-तोरिसु = दाखविणें (प्रयोजक).

तुझे वडील काय करताहेत? (निन्न तंदेयवरु येनु माडतारऽ (माडता अिद्दार?)

पुजेला बसले आहेत. (पूजिगे कूतारऽ.)

त्यांना अुठायला किती वेळ लागेल? (अवरिगे अेळलिक्के यष्ट ‘होत्तु हिडिदीतु’? ‘वेळ धरेल’)

देवाला फुलें वाहतों. (देवरिगे हू अेरसतेनि ‘फुलें चढवितों’ ‘देव’ बहुवचनी वापरतात)

गंध अुगाळून देवाला लावतों (गंध < तेय्दु देवरिगे हच्चतेनि)

आरती करतों – ‘ओवाळतों’ (आरती माडतेनि - बेळगतेनी’)

नैवेद्य दाखवितों (नैवेद्य < तोरसतेनी)

नैवेद्य ‘ठेवतों’ (ग्रामीण) यडि अिडतेनी

ते सोवळे 'नेतून घेऊन' पुजा करतात (अवरु मडि उट्टु,कोंडु' पूजी माडतारऽ)

पुजा झाल्याशिवाय कांहीं खात नाहींत (पूजि आगदहोतु अवरु येनू तिन्नुवदिल्ल (तिन्नुदुल्ल)

फुलें, देव, पुजा, पुजारी वगैरे संबंधानें:—

देवरु कोट्टरू पूजारि कोड. देवानें दिलें तरी पूजारी देईना (कोड-प्रत्ययसिद्ध नकार रूप)

गाणिगन मनेयेत्तु (मने + एत्तु) ओय्य बेड, पूजारी मनेय हेण्णु ओय्य बेड. तेल्याच्या घरचा बैल नेऊं नकोस, पूजाऱ्याच्या घरची मुलगी नेऊं नकोस. ओय्यु - नेणें ओय्य (भावरूप)

हू मारिद अंगडियल्लि हुल्लु मारिदनंते. फुलें विकलेल्या दुकानांत गवत विकलें म्हणे. मराठी म्हण– जिथें फुलें वेचलीं तेथें गोवऱ्या वेंचल्या.

चित्तविल्लदे गुडिय सुत्तिदडे फलवेनु?
एत्तु गाणवनु होत्तु ता नित्यदि
सुत्ति बंदंते सर्वज्ञ —सर्वज्ञ

चित्त नसतांना देवळा(च्या) भोंवतीं फिरल्यास फळ काय? बैल घाणा वाहून रोज फिरुन आल्या प्रमाणें. — सर्वज्ञ

बत्ति हेत्तुप्पवनु हत्तिसिद फलवेनु?
नित्य नेलेगोळ्ळदे भजिसुवा पूजेयु
हत्तिगेडेंद सर्वज्ञ —सर्वज्ञ

सर्वज्ञ म्हणे— वात व घट्ट तूप 'जाळलेल्याचें' फळ काय? रोज 'मन न स्थिरावतां भजणारी पूजा' म्हणजे कापसाचा नाश होय.

हत्ति + केडु–हत्तिगेडु (व्यंजनसंधि) हत्ति = कापूस; केडु = नाश नेलेगोळ्ळु–स्थिरपणें बसणें नेलेगाळ्ळदे (.... न स्थिरावतां) हेत्तुप्प घट्ट झालेलें तूप. हेत्त = घट्ट झालेलें

## प्रकरण ६० वें

# पोस्टांत

पोस्टाला जाऊन पत्र टाकून ये (पोस्टिगे होगि पत्र< हाकि बा)

अेक मनीआर्डर कर (वंदु मनीआर्डर माडु)

मनीआर्डरीचे कारकून कुठें गेले आहेत हो? (मनीआर्डर कारकूनरु यल्लु होग्याररी ?)

चहा घ्यायला गेले आहेत, थोडेसे थांबा (चहा तगोळ्ळक्के होग्यार. स्वल्प निदरि) [ तगोळ्ळलिक्के ]

पंचवीस रुपये पाठवायला काय पडते? (अिप्पत्तैदु रूपायि कळ्सलिक्के येन बीळ्तदरी)

तार मनिऑर्डर कुठें करतात (हो)? तार मनिऑर्डर अेल्लि माडताररीऽ)

बारा आण्याचीं कार्ड द्या (हो) (हन्नेरड आणेद कार्डु कोडरी)

आज सुट्टी आहे का (हो)? (अिवत्त सूटी अदऽ अेनरी ?)

पोस्टमन गेले काय? (पोस्टमनरु होदरेनु ?)

फार वेळ झाला जाऊन. काय काम होतं ? (बहाळ होत्त, आत्यु होगि. अेन केलस अित्त ?)

आमच्या 'बीट'च्या पोस्टमनला पत्र विचारायाचं होतं. अेक पत्र यायचं होतं. (नम्म बीटिन पोस्टमन्नग पत्र केळोदित्त; वंद पत्र बरोदित्त.)

आमचं पत्र लौकर पोचलं नाहीं. (नम्म पत्र< लगून मुट्टलिल्ल<)

त्यावर पत्ता पूर्ण दिला होता काय? (अदर म्याले पूरा पत्तै कोट्टिद्दिरेनु)

त्या गांवच्या पोस्टांत मालकांनीं तक्रार करावी 'केली पाहिजे' (आ अूरिन पोस्टिन्याग मालकरु तकरारु माडबेकु')

अमेरिकेस पत्र पाठवायला किती तिकीट लावावं लागतं? (अमेरिकाक्क पत्र< कळिसलिक्के अेष्टु तिकीटु हच्चबेकागतदऽ)

अमेरिकेस पत्र पोचायला किती दिवस लागतात (हो) (अमेरिकाक्क पत्र मुट्टलिक्के अेष्टु दिवस बेकागतावरी ) 'पाहिजे – होतात'

—:—

## प्रकरण ६१ वें

# बँकेंत

हण = पैसा, साल = कर्ज, बड्डि = व्याज, जमा माडु = पैसे भरणें To credit.

पैसे 'जमा' करायचे आहेत का? (हण< जमा माडोद अद अेनु?)

नाहीं; काढायचे आहेत (अिल्ल<, तगियोद अदऽ)

हा चेक वटवायचा आहे (अी चेक्कु मुरसोदद)

पैसे काढण्याचा अेक फॉर्म द्या (हो) (हण< तगियुव वंद फार्म कॊडरि)

तिकडल्या खिडकीला या (आचीकिन खिडकिगे बरिं)

पासबुक आणलं आहे का (पासबुक तंदीरेनु)

तुमची सही बरोबर झाली नाहीं (निम्म सहि बरोबरी आगिल्ल<)

तुम्हाला चेक दिलेल्याच्या नांवें पैसे शिल्लक नाहींत (निमग चेक्क कॊट्टवन हेसर्ले हण< शिल्लक अिल्ल<)

चेक पाठवून रक्कम वसूल झाल्यावर तुमच्या नांवें जमा करूं (चेक्कु कळिसि हण< वसूल आदिद – निम्म हेसर्ले जमा माडतेवि)

या बँकेंत कर्ज देतात का (हो) (अी बँकिन्याग साल< कॊडतार अेनरी)

'सोन्यावर' देतात. शेतावर, घरावर देत नाहींत (बंगारदम्याले कॊडतार. होलदम्याले, मनीम्याले कोडदुल्ल<)

व्याज कसं घेतात? नऊ (च्या) प्रमाणें घेतांत (बड्डी ह्यांग तगोतारऽ? बंबत्तरंते तगोतारऽ) [ओंबत्तर + अंते]

मॅनेजरना तुम्ही स्वत भेटून तसें सांगा (म्यॅनेजररिगे नीवु स्वत: भेट्टियागि हांग हेळरि)

चेकला कमीशन किती 'मोडून घेतात'? (चेक्किगे कमीशन अेनु मुरकोतारऽ)

पैसे कर्ज वगैरे विषयीं :-

पत्र विल्लद पूजे पत्र विल्लद साल—'पत्रि' रहित पुजा लेख रहित कर्ज साल केळ्दे होयितु हुोल नोडदे होयितु—दिलेलें कर्ज 'न विचारतां' गेलें, शेत 'न पाहतां गेलें (न विचारल्यामुळें गेलें, शेत न पाहिल्यामुळें गेलें)

सालवनु तरुवाग हालुबोनुंडंते
सालिगनु बंदु केळिदरे कुंडिगे
चेळ्ळु कडिदंते ! सर्वज्ञ ॥ —सर्वज्ञ

कर्ज आणतांना दूध भात जेवल्यासारखें, धनकोनें येऊन विचारलें कीं ढुंगणास विंचू चावल्या सारखें ! —सर्वज्ञ

हालुबोनु = दूध भात कुंडि = ढुंगण, चेळ्ळु = विंचू, कडि = चावणें

## प्रकरण ६२ वें

# ऑफिसांत

कारकूनरु बंदिल्ल इन्नु.—कारकून आले नाहींत अजून
साहेबरु यावाग बरतार?—साहेब केव्हां येतात (येतील)?
साहेबरु ओंदु गंटेक्क बरतार—साहेब अेक वाजतां येतात (येतील)
दोड्ड साहेबरु रजाद म्याले होग्यारऽ—मोठे साहेब रजेवर गेले आहेत.
नम्म साहेबरिगे वर्ग आग्यदऽ— आमच्या 'साहेबांना' (साहेबांची) बदली झाली आहे

अवर जगाक्क यार बरतार? त्यांच्या जागीं कोण येतात (येणार)?
साहेबर मेजिनम्याले अिडु होगु अिदन्न–साहेबाच्या मेजावर ठेव जा हें.
हेडक्लार्क अवरन्न करि वंदु स्वल्पु—हेडक्लार्कना (हेडक्लार्क त्यांना) बोलाव 'अेक' थोडें.

साहेबरिगे अी चीटि (कार्ड) कोडु—साहेबांना ही चिठ्ठी दे
साहेबरु केलसदाग अिद्दाररी—साहेब कामांत आहेत (हो)

अर्जी कोडलिक्कु बंदिद्दे—अर्ज द्यायला आलों होतों

यदर बग्गे अर्जी अदऽ?—कशाविषयीं अर्ज आहे?

कागद< नोडि हुकुम माडते वि—कागद पाहून हुकूम करतों

नीवु स्वतः भेट्टि आगुव जरुरि अिल्ल< तुम्ही स्वतः भेटण्याची जरूरी नाहीं.

अी आफीसिगे अिदर संबंध अिल्ल< या आफीसाला याचा संबंध नाही

अिदर बग्गे नीवु कलेक्टररिगे अर्जी माडरी—या विषयीं तुम्ही कलेक्टरांना अर्ज करा (हो)

नाळे सूटी अदऽ नाळे आदित्यवार—अुद्यां सुटी आहे. अुद्यां रविवार

नाडद्दु बरि हन्नोंदु गंटेक्क—परवां या (हो) अकरा वाजतां

कोर्ट कचेरि अड्डाडलिक्के नमग वेळेयिल्ल< 'कोर्ट कचेऱ्या' हिंडायला आम्हाला वेळ नाहीं (कोर्ट कचेरीस जाण्यास)

वकीलरिगे रोक्क तुंबिदमेले (म्याले) गोत्तागतदे (गोत्तागतदऽ) वकीलांना पैसे भरल्यावर कळेल

---

## प्रकरण ६३ वें

# दवाखान्यांत

डॉक्टर आहेत का (हो)? (डॉक्टररु अिद्दारेनरी)

होय, आहेत पण ते कामांत आहेत, थोडी वाट पहा. (होदु, अिद्दार आदरऽ अवरु केलसदागिद्दारऽ स्वल्पु हादी नोडरि)

केव्हां येतील? (यावाग बरतार?)

अितक्यांतच येतील (अिदे अीग बरतारऽ)

नमस्कार डॉक्टर. फार वेळ वाट पाहिली (आम्ही) [(नमस्कार डॉक्टर बहाळ होत्त; हादी नोडिदिवि)

काय होतं तुम्हाला? (येन आगतदऽ निमग?)

हशिवि आगुदुल्ल< निद्दि बरुदिल्ल (भूक लागत नाहीं झोप येत नाहीं)

किती दिवस तुम्हाला असं होत आहे? (ऎष्टु दिवस आदवु हींग आगतदऽ निमगऽ?)

शौचाला होतं का? (बैलकडे [शौचिक्कॆ] आगतद ऎनु?)

नीट होत नाहीं (नॆट्टगॆ आगुदुल्ला)

ताप येतो का? (ज्वर< बरताव ऎनु?) ['ताप' शब्द बहुवचनी वापरतात]

अंग थोडं ऊन होतं दुपारीं (मैं स्वल्प बॆच्चग आगतद मध्यान्हक)

जेवण गोड लागत नाहीं. तोंडाला रुचि नाहीं. (ऊट सवी हत्तुदुल्ल; बायिगॆ रुचि इल्ल<)

वजन कमी झालं आहे का? (तूक< कमी आग्यद ऎनु?)

कुठंतरी दुखतं का? (ऎल्यार नोयिसतदेनु) [नोवदऽ ऎनु]

अेक सारखं दुखतं का? (वंद सवनऽ नोयिसतदऽ ऎनु)

सतत दुखत नाहीं (हो) (वंदऽ सवन नोयसुदुल्लरी)

तर मग केव्हां केव्हां दुखतं? (हांगार यावाग यावाग नोयिसतदऽ)

फार दुखतं का? बहाळ नोयिसतदऽ (ऎनु?)

मधून मधून फार दुखतं (नडनडुव बहाळ नोयिसतदऽ)

तुम्हाला (तुला) दिलेलं औषध घ्या (घे) (निमग (निनग) कॊट्ट औषध< तगॊळ्ळरि (तगॊ)

केव्हा घ्यायचं (हो). जेवणाच्या नंतर का हो? (यावाग तगॊबेकरी? ऊटदनंतर ऎनरी)

जेवायच्या आधी घ्यायचें (ऊटदमुंचॆ तगॊबेकु)

पथ्य काय करायचं? (पथ्यॆ ऎन माडबेकरी?)

पथ्य केलं पाहिजे ("तोंड राखलं" पाहिजे) (पथ्यॆ माडबेकु (बायि कायबेकु)

भात–ताक–सार–खा (हो)—अन्न<, मज्जिगॆ, सारु तिन्नरि

तिखट, तळकट, करपट, आंबट, मिरच्या खाऊं नयेत (खार< कमरु, होत्तिदु, हुळि, मॆणशिनकायि तिनबारदु) (कमरु = तळकट)

औषध किती दिवस घ्यावं लागेल (हो). (औषध< अेष्ठ दिवस तगो बेकादीतरी ? )

फार दिवस औषध घ्यावं लागेल (बहळ दिवस औषध< तगोबेकादीतु)

लौकरच बरं होईल (लगून नेट्टग आगतदऽ)

हवा बदलायला गेलं पाहिजे (हवा [हवे] बदलायिसलिक्के होगबेकु)

विश्रांति घेतली पाहिजे कांहीं दिवस. (विश्रांति तगोबेकु केलवु दिवस)

दोन महिन्यांची रजा घ्यावी लागेल (अेरडु [यरडु] तिंगळ रजा तगो बेकादीतु)

अेक आठवड्यानंतर कामावर जातां येईल (वंद वारदम्याले केलसदम्याले होगलिक्के बंदीतु) [होगबहुदु]

तुमचं [तुझं] दुखणं बरें झालं आहे. (निम्म [निन्न] बॅनि नेट्टग आग्यदऽ)

आतां जरा बरं आहे (ईग सुमारु आग्यदऽ)

'सुमारु' या शब्दामुळें जरा गोंधळ होतो. 'सुमारु' याचा वरील वाक्यांत 'बरें' असा अर्थ आहे, पण पुढील वाक्यांत 'वाईट' असाहि अर्थ होतो. 'अवग नाल्कु मंदियोळग सुमारायितु', त्याचें चारचौघांत वाईट झालें; म्हणजे पाणउतारा झाला.

# प्रकरण ६४ वें

## स्टेशनांत

हुबळीची गाडी आली का ? (हुब्बळ्ळि गाडि बंत अेनु ?)

अजून नाही (इन्नू इल्ल<)

यायची वेळ झाली आहे (बरूव वेळ्ळया (वेळे) आग्यदऽ)

आज फार गर्दी आहे (इवत्त बहाळ गद्दल अदऽ)

तुम्ही कुठें जातां (नीवु यल्ले होगतीरी)

पुण्याला जातों (पुणेक्क होगतेनी)

मी तिकीट काढून येतों. तूं आंत जा ( ना तिकीट तगदु बरतेनी. नी वळग होगु )

दोन इंटरचीं पुण्याचीं तिकीटें द्या हो (यरडु इंटर तिकीट कोडरि)

आज गाडी लेट आहे म्हणे ( अिवत्त गाडि लेट अदऽ अंतऽ )

किती लेट आहे ? ( अेष्टु लेट अदऽ ? )

आतांशा गाड्या रोज लेट येतात (अैलीकडे गाडि दिनाऽ लेट बरतावऽ)

गाडी येओपर्यंत वेटिंगरूममध्यें बसूं या चला ( गाडि बरोतनक< वेटिंग रूमिनोळग कूडोण नडीरि )

पुण्याला किती दिवस राहणार? (पुणेक्क यष्टु दिवस अिरतीरि?

(अेक) आठ दिवस राहावं म्हणतों (वंदु यंट दिवस अिरबेकंतीनी ) (बेकु + अंतीनी)

आतां कॉलेजला सुट्टी आहे (अीग कॉलेज सूटी अदऽ )

सुट्टी किती दिवस आहे ( सूटी यष्टु दिवस अदऽ )

आजपासून दहा दिवस सुट्टी आहे ( अिवतिनिंद हत्तु दिवस सूटी अदऽ )

कॉलेजं कधीं सुरुं होतात ( कॉलेज यंद सुरु आगतावऽ )

पुढील महिन्याच्या पंधरा तारखेस. ( मुंदिन तिंगळ हदिनैदु तारीखीगे)

तुम्ही कुठे "जाणारे ते" (जातां?) (नीवु यल्लि (होगवरु) होगुववरु ? )

आम्ही बेळगावपर्यंत जातों ( नावु बेळगावीतनक होगतेवी )

गाडी आली चला ( गाडि बंतु नडीरि ( नडेयिरी )

तुम्ही पुढे जाऊन सीट धरा हो, मी सामान घेऊन येतो ( नीवु मुंद होगि जगा हिडीरिऽ ना सामान तगोंडु बरतेनी )

सगळं सामान आलं कीं नाही "बघून घ्या" ( यल्ल< सामानु बंत अिल्लो नोडिकोळ्ळरि )

गाडी सुटायची वेळ झाली. हमाली द्या ( गाडि बिडो होत्तु आयितु हमाली कोडरि )

ओहो, तुम्ही कुठं ? ( ओहो, नीवु यल्ले ? )

आम्हीहि पुण्यालाच जातों ( नाव्वु पुणेक्क होगतुवी )
चांगली सोबत झाली आम्हाला (छल्ले जोड आत्यु नमग ऽ)
बरें आहे. जाऊन या (ओळ्ळेदु होगि बर्रि)
पोचल्याक्षणीं पत्र घाला (मुट्टिद कूडले पत्र< हाकरि)

## प्रकरण ६५ वें

## घरीं

बागलदाग यारोऽ बंदारऽ—दारांत कुणी तरी आले आहेत

यारु बंदार नोडु? कोण आले आहेत पहा

मन्याग अिद्दार अेनरि—घरांत आहेत का (हो).

होरग होग्यार—बाहेर गेले आहेत

यारु बंदिद्दरु अंत हेळबेकु? निम्म हेसरु अेनु?—कोण आले होते म्हणून सांगूं? तुमचं नांव काय?

नीवु वंद चीटी बरदु अिडरि—तुम्ही अेक चिठी लिहून ठेवा

अवरु बंदिद कूडरि—ते आल्यावर द्या.

ओहो बर्रि कूडरि—ओहो या बसा.

मोन्ने बंदिद्दिरंत—परवां आलां होतां म्हणे

होदु बंदिद्दे. नीवु-(तांवु) अिद्दिल्ल मनी ओळगऽ— होय आलो होतों. तुम्ही-(आपण) नव्हतां घरीं

अंत चीटी अिट्ट होगिद्दे—म्हणून चिठी ठेवून गेलो होतो

मत्तेनु? यल्ला नेट्टगऽ? सहज बंदिद्दिरेनु?—आणखी काय? सर्व ठीक? सहज आला होता का?

अिल्ल< स्वल्पु केलस अित्तु निम्मकडे—नाही. थोडं काम होतं तुमच्याकडे

माडतेनी अंदरऽ हेळतेनी—करतों म्हटलंत तर सांगतों

माड्व्हांग अिद्दर माडोण अंतऽ हेळिग्यल्ल<—करायसारखं असेल तर करूं या म्हणे सांगाना (माडुव हागे = करण्यासारखें मुखभाषिक -माड्व्हांगऽ)

नीवु अंदद्दुल्ल< तिळीतु ननगेनु सध्यक्कंतू शक्य अिल्ल< तुम्ही सांगितलेलं सारं कळलं. मला सध्यां कांहीं शक्य नाहीं

स्वल्प कुडरि. चहा तगोंडु होगरि—थोडेसें बसा चहा घेऊन जा

बयाडरी अिदे अीग चहा आग्यदऽ— नको (हो) आतांहेंच चहा झाला आहे

आदर अेनु आत्यु. स्वल्पु तगोळ्ळरि अंतऽ—झाला म्हणून काय झालं थोडा घ्या ‘म्हणे’

—:—

# परिशिष्ट अ

## कन्नड लिपि परिचय

### स्वर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ऋ | ॠ |
| ಅ | ಆ | ಇ | ಈ | ಉ | ಊ | ಋ | ೠ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऎ | ए | ऐ | ऒ | ओ | औ | अं | अः |
| ಎ | ಏ | ಐ | ಒ | ಓ | ಔ | ಅಂ | ಅಃ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ೧ | ೨ | ೩ | ೪ | ೫ | ೬ | ೭ | ೮ | ೯ | ೧೦ |

### व्यंजनें

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | ख | ग | घ | ङ | च | छ | ज | झ | ञ |
| ಕ | ಖ | ಗ | ಘ | ಙ | ಚ | ಛ | ಜ | ಝ | ಞ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ट | ठ | ड | ढ | ण | त | थ | द | ध | न |
| ಟ | ಠ | ಡ | ಢ | ಣ | ತ | ಥ | ದ | ಧ | ನ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प | फ | ब | भ | म |
| ಪ | ಫ | ಬ | ಭ | ಮ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| य | र | ल | व | श | ष | स | ह | ळ | क्ष | ज्ञ |
| ಯ | ರ | ಲ | ವ | ಶ | ಷ | ಸ | ಹ | ಳ | ಕ್ಷ | ಜ್ಞ |

## स्वरचिन्हें

आ इ ई उ ऊ
ಾ ಿ ೀ ು ೂ

ऎ ए ऐ ऒ ओ औ अं अः
ೆ ೇ ೈ ೊ ೋ ೌ ಂ ಃ

## चौदाखड्या

क का कि की कु कू कॆ के कै कॊ को कौ कं कः
ಕ ಕಾ ಕಿ ಕೀ ಕು ಕೂ ಕೆ ಕೇ ಕೈ ಕೊ ಕೋ ಕೌ ಕಂ ಕಃ

ख ಖ ಖಾ ಖಿ ಖೀ ಖು ಖೂ ಖೆ ಖೇ ಖೈ ಖೊ ಖೋ ಖೌ ಖಂ ಖಃ
ग ಗ ಗಾ ಗಿ ಗೀ ಗು ಗೂ ಗೆ ಗೇ ಗೈ ಗೊ ಗೋ ಗೌ ಗಂ ಗಃ
घ ಘ ಘಾ ಘಿ ಘೀ ಘು ಘೂ ಘೆ ಘೇ ಘೈ ಘೊ ಘೋ ಘೌ ಘಂ ಘಃ
च ಚ ಚಾ ಚಿ ಚೀ ಚು ಚೂ ಚೆ ಚೇ ಚೈ ಚೊ ಚೋ ಚೌ ಚಂ ಚಃ
छ ಛ ಛಾ ಛಿ ಛೀ ಛು ಛೂ ಛೆ ಛೇ ಛೈ ಛೊ ಛೋ ಛೌ ಛಂ ಛಃ
ज ಜ ಜಾ ಜಿ ಜೀ ಜು ಜೂ ಜೆ ಜೇ ಜೈ ಜೊ ಜೋ ಜೌ ಜಂ ಜಃ
झ ಝ ಝಾ ಝಿ ಝೀ ಝು ಝೂ ಝೆ ಝೇ ಝೈ ಝೊ ಝೋ ಝೌ ಝಂ ಝಃ
ट ಟ ಟಾ ಟಿ ಟೀ ಟು ಟೂ ಟೆ ಟೇ ಟೈ ಟೊ ಟೋ ಟೌ ಟಂ ಟಃ
ठ ಠ ಠಾ ಠಿ ಠೀ ಠು ಠೂ ಠೆ ಠೇ ಠೈ ಠೊ ಠೋ ಠೌ ಠಂ ಠಃ
ड ಡ ಡಾ ಡಿ ಡೀ ಡು ಡೂ ಡೆ ಡೇ ಡೈ ಡೊ ಡೋ ಡೌ ಡಂ ಡಃ
ढ ಢ ಢಾ ಢಿ ಢೀ ಢು ಢೂ ಢೆ ಢೇ ಢೈ ಢೊ ಢೋ ಢೌ ಢಂ ಢಃ
ण ಣ ಣಾ ಣಿ ಣೀ ಣು ಣೂ ಣೆ ಣೇ ಣೈ ಣೊ ಣೋ ಣೌ ಣಂ ಣಃ
त ತ ತಾ ತಿ ತೀ ತು ತೂ ತೆ ತೇ ತೈ ತೊ ತೋ ತೌ ತಂ ತಃ
थ ಥ ಥಾ ಥಿ ಥೀ ಥು ಥೂ ಥೆ ಥೇ ಥೈ ಥೊ ಥೋ ಥೌ ಥಂ ಥಃ
द ದ ದಾ ದಿ ದೀ ದು ದೂ ದೆ ದೇ ದೈ ದೊ ದೋ ದೌ ದಂ ದಃ
ध ಧ ಧಾ ಧಿ ಧೀ ಧು ಧೂ ಧೆ ಧೇ ಧೈ ಧೊ ಧೋ ಧೌ ಧಂ ಧಃ

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | न | ना | नि | नी | नु | नू | ने | ने | नै | नो | नो | नौ | नं | नः |
| न | ನ | ನಾ | ನಿ | ನೀ | ನು | ನೂ | ನೆ | ನೇ | ನೈ | ನೊ | ನೋ | ನೌ | ನಂ | ನಃ |
| प | ಪ | ಪಾ | ಪಿ | ಪೀ | ಪು | ಪೂ | ಪೆ | ಪೇ | ಪೈ | ಪೊ | ಪೋ | ಪೌ | ಪಂ | ಪಃ |
| फ | ಫ | ಫಾ | ಫಿ | ಫೀ | ಫು | ಫೂ | ಫೆ | ಫೇ | ಫೈ | ಫೊ | ಫೋ | ಫೌ | ಫಂ | ಫಃ |
| ब | ಬ | ಬಾ | ಬಿ | ಬೀ | ಬು | ಬೂ | ಬೆ | ಬೇ | ಬೈ | ಬೊ | ಬೋ | ಬೌ | ಬಂ | ಬಃ |
| भ | ಭ | ಭಾ | ಭಿ | ಭೀ | ಭು | ಭೂ | ಭೆ | ಭೇ | ಭೈ | ಭೊ | ಭೋ | ಭೌ | ಭಂ | ಭಃ |
| म | ಮ | ಮಾ | ಮಿ | ಮೀ | ಮು | ಮೂ | ಮೆ | ಮೇ | ಮೈ | ಮೊ | ಮೋ | ಮೌ | ಮಂ | ಮಃ |
| य | ಯ | ಯಾ | ಯಿ | ಯೀ | ಯು | ಯೂ | ಯೆ | ಯೇ | ಯೈ | ಯೊ | ಯೋ | ಯೌ | ಯಂ | ಯಃ |
| र | ರ | ರಾ | ರಿ | ರೀ | ರು | ರೂ | ರೆ | ರೇ | ರೈ | ರೊ | ರೋ | ರೌ | ರಂ | ರಃ |
| ल | ಲ | ಲಾ | ಲಿ | ಲೀ | ಲು | ಲೂ | ಲೆ | ಲೇ | ಲೈ | ಲೊ | ಲೋ | ಲೌ | ಲಂ | ಲಃ |
| व | ವ | ವಾ | ವಿ | ವೀ | ವು | ವೂ | ವೆ | ವೇ | ವೈ | ವೊ | ವೋ | ವೌ | ವಂ | ವಃ |
| श | ಶ | ಶಾ | ಶಿ | ಶೀ | ಶು | ಶೂ | ಶೆ | ಶೇ | ಶೈ | ಶೊ | ಶೋ | ಶೌ | ಶಂ | ಶಃ |
| ष | ಷ | ಷಾ | ಷಿ | ಷೀ | ಷು | ಷೂ | ಷೆ | ಷೇ | ಷೈ | ಷೊ | ಷೋ | ಷೌ | ಷಂ | ಷಃ |
| स | ಸ | ಸಾ | ಸಿ | ಸೀ | ಸು | ಸೂ | ಸೆ | ಸೇ | ಸೈ | ಸೊ | ಸೋ | ಸೌ | ಸಂ | ಸಃ |
| ह | ಹ | ಹಾ | ಹಿ | ಹೀ | ಹು | ಹೂ | ಹೆ | ಹೇ | ಹೈ | ಹೊ | ಹೋ | ಹೌ | ಹಂ | ಹಃ |
| ळ | ಳ | ಳಾ | ಳಿ | ಳೀ | ಳು | ಳೂ | ಳೆ | ಳೇ | ಳೈ | ಳೊ | ಳೋ | ಳೌ | ಳಂ | ಳಃ |
| क्ष | ಕ್ಷ | ಕ್ಷಾ | ಕ್ಷಿ | ಕ್ಷೀ | ಕ್ಷು | ಕ್ಷೂ | ಕ್ಷೆ | ಕ್ಷೇ | ಕ್ಷೈ | ಕ್ಷೊ | ಕ್ಷೋ | ಕ್ಷೌ | ಕ್ಷಂ | ಕ್ಷಃ |
| ज्ञ | ಜ್ಞ | ಜ್ಞಾ | ಜ್ಞಿ | ಜ್ಞೀ | ಜ್ಞು | ಜ್ಞೂ | ಜ್ಞೆ | ಜ್ಞೇ | ಜ್ಞೈ | ಜ್ಞೊ | ಜ್ಞೋ | ಜ್ಞೌ | ಜ್ಞಂ | ಜ್ಞಃ |

## जोडाक्षर परिचय

कन्नड जोडाक्षर रचना मराठीहून अगदी निराळी आहे. मराठी जोडाक्षर-रचनेच्या ती अुलट आहे. मराठी जोडाक्षररचना पाहूं. म्हणजे कानडी जोडाक्षरें कशी निराळीं आहेत हें लक्षांत येअील.

त्न = त् + न,     स्त = स् + स्त,     क्त = क् + त

या जोडाक्षरांमध्यें

आधीं त् (व्यंजन) व त्यास पुढें पूर्ण अक्षर न

आधीं स् (व्यंजन) व त्यास पुढें पूर्ण अक्षर त
,, क् (व्यंजन) व त्यास पुढें पूर्ण अक्षर त अशी रचना आहे.
ही रचना जोडाक्षराच्या उच्चारक्रमास धरून आहे.

पण कानडी जोडाक्षराची रचना या उलट आहे. उदा. 'स्त' हें कानडींत आधीं स पूर्ण व त्यास खाली त् चें व्यंजनचिन्ह जोडावें लागतें. आतां व्यंजनचिन्हें पाहूं.

क ಕ ್ಕ  ख ಖ ್ಖ  ग ಗ ್ಗ  घ ಘ ್ಘ  ङ ಙ ್ಙ
च ಚ ್ಚ  छ ಛ ್ಛ  ज ಜ ್ಜ  झ ಝ ್ಝ  ञ ಞ ್ಞ
ट ಟ ್ಟ  ठ ಠ ್ಠ  ड ಡ ್ಡ  ढ ಢ ್ಢ  ण ಣ ್ಣ
त ತ ್ತ  थ ಥ ್ಥ  द ದ ್ದ  ध ಧ ್ಧ  न ನ ್ನ
प ಪ ್ಪ  फ ಫ ್ಫ  ब ಬ ್ಬ  भ ಭ ್ಭ  म ಮ ್ಮ
य ಯ ್ಯ  र ರ ್ರ ರ್ (अक्षरापुढे रेफा प्रमाणे)  ल ಲ ್ಲ  व ವ ್ವ
श ಶ ್ಶ  ष ಷ ್ಷ  स ಸ ್ಸ  ह ಹ ್ಹ  ळ ಳ ್ಳ

क्ष ಕ್ಷ व ज्ञ ಜ್ಞ ही स्वतःच जोडाक्षरें आहेत.

वरील चिन्हांपैकी त, न, म, य, र, ल, व या व्यतिरिक्त सर्व चिन्हें 'आडवी रेघ' न देतां काढलेलीं लहान व्यंजनेंच आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| स्क | ಸ್ಕ | ಭಾಸ್ಕರ भास्कर | ड्ग | ಡ್ಗ | ಖಡ್ಗ खड्ग |
| च्च | ಚ್ಚ | ಅಚ್ಚು 'अच्च' | श्च<br>र्य | ಶ್ಚ<br>ರ್ಯ | } ಅಶ್ಚರ್ಯ आश्चर्य |
| स्त | ಸ್ತ | ಪುಸ್ತಕ पुस्तक | द्म | ದ್ಮ | ಪದ್ಮ पद्म |
| र्म | ರ್ಮ | ಕರ್ಮ कर्म (म्र = ಮ್ರ) | श्य | ಶ್ಯ | ಅವಶ್ಯ अवश्य |
| त्न | ತ್ನ | ರತ್ನ रत्न | त्स | ತ್ಸ | ತತ್ಸಮ तत्सम |
| क्ष | ಕ್ಷ | ಯಕ್ಷ यक्ष | ध्व | ಧ್ವ | ಮಧ್ವ मध्व |

क् ग् वगैरे व्यंजनें (अर्धाक्षरें) ಕ್ ಖ್ ಗ್ अशीं लिहितात
महत् ಮಹತ್ महान् ಮಹಾನ್ वाक् ವಾಕ್
र्य, र्म हीं जोडाक्षरें ರ್ಯ, ರ್ಮ च्या ऐवजीं ರ‍್ಯ, ರ‍್ಮ अशीहि लिहितात.

# परिशिष्ट ब

## शब्द संग्रह

१ हा शब्दसंग्रह मराठी–कन्नड कोश नसून फक्त दैनंदिन व्यवहारांत लागणाऱ्या बहुतेक मराठी शब्दांना कानडी प्रतिशब्द देणारा संग्रह आहे.

२ ज्या मराठी शब्दास कन्नड प्रतिशब्द ठळक टाअिपांत आहे तो कानडींतून मराठींत आला आहे ; या अुलट, जो मराठी शब्द जाड टाअिपांत आहे तो मराठींतून कानडीत गेला आहे असें समजावें.

### चिन्हांचा खुलासा

३ अे. व. अेकवचन. — ब. व. बहुवचन.
अु. क. अुत्तर कर्नाटकी — पु. पुल्लिंगी
द. क. दक्षिण कर्नाटकी — स्त्री. स्त्रीलिंगी
व्य. भा. व्यवहारिक भाषेंत रूढ — धा. धातु
स. धा. सकर्मक धातु — ना. नाम
अ. धा. अकर्मक धातु — वि. विशेष

कांही शब्दांचा कंसांत मुखभाषिक अुच्चार दिला आहे.

४ अेकाहून अधिक प्रतिशब्द असतील तेथें सर्वांत अधिक रूढ प्रथम दिला आहे. अुदा.— पिकणें = हण्णु आगु, मागु.

### अ

अकरा = हन्नोन्दु
अखेर = कोने
अखेरीस = कोनेगे, कडेगे
**अगदीं** = अगदी (व्या. भा.)
अगोदर = मुंचे
अजमास = अंदाजु
अजमास करणें = अंदाजु कट्टु
अजाण = अरियद, तिळियदि
अटणें (कापड) = अुडुगु
अट्टाहास = अट्टहास
अठवडा = आठवडा पहा
अडखळणें = अेडवु
अडकित्ता = **अडकोतु**

अडचण = अडचणि, तोंदरे
अडथळा = केडरु, अड्डि
अडमुठा = अड्डमुठाळ
अड्डमुठेपणा = अड्डमुठाळतन
अडवा = अड्ड
अडीच = एरडूवरे
अड्डा = अड्डे
अतिथि = अतिथि
अथवा = अिल्लवे, अथवा
अनुक्रमें = अनुक्रमवागि
अनुसरणें = अनुसरिसु
अन्न = अन्न, कूळु
अबोल = गुम्मनगुसक
अब्रू = अबुरू
अभिमान = हेम्मे, अभिमान,
अभिमान बाळगणें = हेम्मेपडु
अमल = अधिकार, अमलु
अरण्य = अडवि, काडु
अर्धा = अर्ध, अरे
अर्धवेळा = अरेमरुळ
अर्पिणें = अर्पिसु
अलंकार (दागिना)= आभरण, वस्त, ओडवे
अलंकारणें = अलंकरिसु
अलीकडे = ऐलीकडे, अित्तीचिगे
अवस = अमाशि
अशील = पक्षकार
असें = हीगे
असला, असा = अिथ, अितह
असणें = अिरु
असून = अिद्दु
अहोरात्र = हगलिरुळु
अळणी = सप्पगे

## आ

आकारणें = आकरिसु
आकुंचणें = कुग्गु
आगपेटी = कड्डीपेट्टिगि
आचरण = नडे, नडते, आचरणे
आचरिणें = आचरिसु
आज = अिदु, अिवत्तु
आजवर = अिदिन तनक-वरेगे
आज नां अुद्या = अिदिल्ल नाळे
आजार = बेने, काहिले
आजारी पडणें = बेनेबीळु
आजी = अज्जि, अम्म
आजूबाजू = सुत्तमुत्तलु, आजूबाजू
आटवणें = अट्टिसु
आटोपणें = मुगियु
आठवण = नेनपु
आठवणें = नेनिसु
आडमार्ग = अड्डहादि
आडवार = अड्डवार
आण (शपथ) = आणे
आणणें = तरु
आणून = तंदु
आणलेला = तंद

आणि = मत्तु
आंत = ओळगु
आंतला = ओळगिन
आंतल्याआंत = ओळगिद ओळगु
आदिकरुन – मुंताद
आधीं = मुंचे
आतां = ईग
आपटणें = अप्पळिसु
आपत्ति = आपत्तु, कुत्तु
आपण = तानु (ए. व.)
आपण = तावु (ब. व.)
आपणच = ताने (ए. व.) तावे (ब. व.)
आपोआप = तानु, तन्निंदताने
आंबा = माविन हण्णु (पिकलेला)
मावनकायि (हिरवा)
आमंत्रण = ओतन
आरंभ करणें = आरंभिसु
आरवणें = कूगु
आराम = आरामु
आलिंगिणें = अप्पिकोळ्ळु
आंव = अमांश, आवु
आवड = प्रीति, सेरिके, मेच्चु
आवडणें = सेरु
आवाज = धनि
आशा करणें = आशिसु
आळू = शावीपल्ले,
आळस = आलस्य, सोमारितन
आळशी मनुष्य = आलस्यगार

## अि

अिकडचा = अित्तकडेय
अिकडील = ,,
अिकडे = अित्तकडे, ईकडे
अिकडे, तिकडे = अित्त, अत्त
अिच्छिणें = अिच्छिसु, बयसु, कोरु
अितका = अिष्टु
अितकाच = अिष्टे
अितर = अुळिद, बेरे
अिथपर्यंत = अिल्लियवरेगे
अिथें = अिल्लि
अिथून = अिल्लिंद
अिस्पितळ = आस्पत्रि
ईयत्ता = अियत्ते

## अु

अुकडणें = शकेयासु
अुकिरडा = तिप्पे (प्पि)
अुकलणें = बिच्चु
अुकाडा = अुमरु, शके
अुखळ = ओळकल्लु, ओळ्ळु
अुखाणा = ओगटु
अुगवणें = हुट्टु
अुगीच = सुळ्ळे
अुगारणें = हिरि(यु)
अुघडणें = तेरे
अुघडणें (दार) = तेगे 'काढणें'
अुंच = अेत्तर
अुंची = अेत्तर (ना)

उचकि = बिक्कु
उचलणें = क्षेत्त
उजवा = बल
उजवा हात = बलगै
उजळणें = बेळगु
उजाडणें = बेळगागु
उजेड = बेळकु
उठणें = भेळु
उठून = अेद्दु
उठविणें = अेब्बिसु
उडणें = हारु
उडी मारणें = जिगि(यु)
उतणें = उक्केरु, उक्कु
उताणा = अंगात
उथळ = आळविल्लद
उदबत्ती = अूदिनकड्डि
उदास = उदासीन
उंदिर = इलि
उद्योग = उद्योग
उपजणें = हुट्टु, जनिसु
उपडा = डब्ब
उभयतां = इब्बरू, उभयतरु
उभें राहणें = अेद्दुनिल्लु
उमजणें = मनगाणु
उमजून = मनगंडु
उमटणें = मूडु
उलटणें = तिरुगु
उशी = तलेगिंबु

उष्टा = अेंजलु
उसना = कड
हात उसना = कैगड
उसळ = उसळि
उसाचा रस = कब्बिनहालु (दूध)

## ऊ

ऊन = बिसि (शि)
ऊब = बेच्चगु
ऊबदार = बेच्चगे
ऊर = अेदे
ऊस = कब्बु

## ए

एक = ओंदु (वंदु), ओब्ब
एकजण – ओब्बनु (पु.)
ओब्बळु (स्त्री)
एकत्र = एकत्र, ओत्तट्टिगे
एकदम = ओम्मेले
एकदां = ओम्मे
एकटा = ओब्बने, ओब्बंटिग
एकसारखा = ओंदेसवनु
एकमेकास = ओब्बरिगोब्बरु
एकाएकी = ओम्मिदोम्मे
एकुण = ओट्टु
एकेक = ओंदोंदु
एखादा = यावनो ओब्ब
एरंड = ओडल
एरंडेल = ओडलअेण्णे

ऐवढा = अिष्टु
ऐव्हाणा = अिष्टोत्तिगे
ऐ
ऐकणें = केःळु,
ऐदी = सोमारि
ऐट = ऐड्डु, डोलु
ऐन = ऐन
ऐरण = अडगाणि
**ऐवज** = ऐवजु
ऐश्वर्य = ऐसिरि
ओ
ओकणें = कारु, **ओकरिसु**
ओकारी = **ओकरिके**, वाकरिके
ओगराळे = **ओगराळि**, **ओगरु**=भात
ओघळणें = बसि
ओचा = अुडिगच्चि
ओंजळ = बोगसे
**ओझें** = ओज्जे (वज्जे)
ओटा = कट्टे, का. धातु **ओट्टु**,
ओढणें = जन्गु, अेळे
ओढा = होळे
ओतणें = सुरुवु
ओरडणें = ओदरु
ओरबाडणें = चिवुरु
ओवा = अजवान
ओवाळणें = बेळगु
ओषध = ओषध
ओसरणें = कुग्गु
ओसरी = पडसाले, **पडवी**
ओळ = सालु
ओळख = गुर्तु
ओळख लागणें = गुर्तु सिगु (मिळणें)
गुर्तु हत्तु (लागणें)
ओळखणें (जाणणें) = अरि
अंक (आकडा) = अंकि
अंक (नाटकाचा वगैरे) = अंकु
अंग = मै
अंगचोर = मैगळ्ळ
अंग मोडून = मैमुरिदु
अंगठा = हेब्बट्टु
अंगठी = अुंगर
अंगण = अंगळ
अंगीकारणें = कैकोळ्ळु, अंगीकरिसु
अंघोळ = स्नान, जळक
अंडें = तत्ति
अंतरणें = अगलु
अंथरणें = हासु
अंथरुण = हासिगे
अन्दाज = अंदाजु, कायास
अंदाज करणें = अंदाजुकट्टु (बांधणें)
अंधार = कत्तले
अंबणें = हळिसु
अंबाडा = तुरुबु
अंबोळी = दोसे
क
कचरा = कस<

कचेरी = कचेरि
कच्चा = कच्चा
कट = संचु–ओळसंचु
कटकट = कटकटि, तोंदरे
कंटाळा = बेजार–बेसर
कंटाळणें = बेसरागु–बेजारागु
कठिण = गडचु, बिगि
कडकी = कावु
कडु = कहि
कंडी = सुद्दि, वदंति
कडे = **कडे**
कढणें = कुदि
कढी = पळदु
कणगा = कणज
कपडा = बट्टे
कपाळ = हणे
कंबर = टोंक, नड<
कमी = कडिमे (कमी)
करंगळी = किरिबोट्टु
करट = वुर
करणें = माडु
कशास = एतक्कु (यातक्कु)
कसर = **कसरु**
कसलें = एतरदु, यातरदु
कसा–कशी–कसें = हेगे (ह्यागे–ह्यांग)
कसाअी, खाटीक = **कटक**
कळकळ = कळकळि
कळणें = तिळि (यु)

कां = एके–याके (याकऽ)
काका = कक्क, दोड्डप्प (थोरला)
चिगप्प (धाकटा)
काकू = कक्कि
कांकीं = याकंदरे
कांख = बगलु
कांच = काजु
काचा = कच्चे
काजळ = काडिगे
काजू = गोडंबे
काटा = मुळ्ळु
कांट = अंचु
काठी = बडिगे, कोलु
कांडणें = तळिसु (थळिसु)
काढणें = तेगे
कात = काचु
कातरणें = कत्तरिसु
कान = किवि
कापड = अरिवे
कापडाचें, वि. = जवळि
कापडाचें दुकान = जवळी अंगडि
कापणें = कोय्यु
कांबळें = कंबळि
काम = केलस
**कामगिरि** = कामगिरि
काय = एनु
काल = निन्ने
कालविणें = कलसु

काव्ळा = कागु (कागि)
कांहीं = कुेल–कुेलवु
कांहींअेक = कुेलवोंदु
कांहींतरी = अेनादरू
काव्ळा = करि, करे
काव्ळोख = कत्तले
किंकाव्ळणें = चीरु
किडणें = हुळुकायु, हुळुकु
किती = अेष्टु
किरकोव्ळ = किरुकळ
किराणी = किराणि
किसणें = हुेरे
कुजणें = कोळे
कुटणें = कुट्ट
कुठला = अेल्लिय–यल्लिय
कुठें = अेल्लु, यल्लु
कुंडी = कुंडे
कुणाचा = यार
कुत्रा = नायि
कुत्र्याचें पोर = कुन्नि
कुंथणें = तिणुकु
कुदव्ळ = गुद्दलि
कुंपण = बेलि
कुबट = कुमुड
कुंभार = कुंबार
कुरण = हुल्लुबन्नि
केर = कस
केव्हां = यावाग
केव्हांपासून = यावागिनिंद
केव्ळ = बाळे
केव्ळें = बाळेहण्णु (पिकलेलें)
बाळेकायि (हिरवें)
कैवार = कैवार–पक्ष
कोण = यारु
कोणता = याव
कोणचा = याव
कोणचें = यावुदु
कोण जाणें = यारिगे गोत्तु
कोणी अेक = यावनो ओब्ब
कोणीकडे = अेत्तकडे, यत्तकडे
यतलाग (व्या, भा.)
कोपर = मोणकै –(मणकै)
कोंब = मोळके
कोंबडा = हुंज
कोंबडी = कोळि
कोंबणें = तुरुकु
कोय = गोरट
कोयता = ओळिगे, कोय्त
कोरणें = कोरे
कोल्हा = नरि
कोंवळा = अेळे, अेळक
कोर = कळे, चंद्रकळे
कोळसा = अिद्दलि

**ख**

खंगणे = सोरगु
खच्चीकरणें = बीजहोडे

खटपट = खटपटि
खडा = हरळु, हव्ळु
खड्डा = तेग्गु
खण = खण
खपणें (विक्रीहोणें) = खप्पिसु
खपणें (राबणें) = दुडिं, श्रमिसु
खरडणें = गीचु
**खरे** = खरे (अु. क. व्या. भा.)
खरीदणें = कोळ्ळु
**खलबत्ता** = कलबत्तु
खलणें = अरि
खवा = खोवे-खोवा
खळबळ = खळबळि
खाज = तिंडि, तुरि
खाजणें = तिंडिबिड्, तुरि
खाजविणें = तुरिसु
खाणें = तिन्नु
खाअून = तिंदु
खांदा = हेगलु
खादाड = तिन्नुबडक
खारट = अुप्पु
खालावणें = कुग्गु
खालीं = तेळगे, केळगे
खिजविणें = रेगिसु, केणकु
खिडकि = खिडकि-किटकि
खुंटा = गूट (घूट)
खुपणें = चुच्चु, नडु
खुरपें = कुचिंगि
खेचणें = जग्गु, अेळे
खेप = सरति, खेपु
खेपा घालणें = अेडताकु
खेळ = आट
खेळणें = आडु
खोकणें = केम्मु
खोकला = केम्मु
खोचणें = चुच्चु
**खोटें** = सुळ्ळु, खोट्टि (अु.क.व्य.भा.)
**खोड** = चाळि
खोदणें = अगि (यु)
खोबरें = **कोब्बरि**
खोबरेल = कोब्बरी अेण्णि (यण्णि)

## ग

गंज = जंगु
गंजणें = जंगुतिन्नु
गंजी (गवताची) = बणवि
गटार = गटारु
गड्डा = **गड्डे**
गप्पा = हरटे
गप्पा मारणें = हरटे होडे
**गरज** = गरजु
गरोदर = बसरु बसुरु (होट्टीले)
गव्हाण = गोदण (गोदनि)
गहूं = गोदि
गळणें = सोरु
गांठ = गंटु
गाठोडें = गंटु

गाडगें = गडिगे
गाडी = गाडि
गाढव = कत्तु
गादी = गादि
गाय = आकळु
गार = तण्णगु, तंपु
गार पाणी = तण्णीरु
गाल = गल्ल, कपाळ
गांव = ऊरु
गाभारा = गर्भगुडि
गांवचा = ऊरिन–ऊरव
गाळ = गाळु
गाळणें = सोसु
गिड्डा = गिड्ड
गिधाड = हद्दु
गिळणें = नुंगु
गुंडाळणें = सुत्तु
गुडी = गुडि
गुंतणें = तोडगु
गुंतागुंत = तोडकु
गुदगुल्या करणें = कद्वाडिसु
गुंफणें = पोणिसु
गुरगुरणं = गुरुकायिसु
गुरुं = दन
गूळ = बेल्ल
गेलेला = होद
गोचीड = उण्णि
गोजिरवाणा = चंद, चेंद

गोठा = हक्कि, दनदमने
गोड = सिहि (सीं)
गोडवे गाणें = कोंडाडु
गोंद = अंडु
गोंदणें = हच्चे (हच्ची) चुच्चु
गोंधळ = गोंदल
गोंधळ करणें = गोंदल हाकु
गोष्ट (thing) = मातु
गोष्ट (incident) = संगति
गोष्ट (story) = कथे
गोळा करणें = ओट्ट गूडिसु–सुद्दिमाडु
गोळी = गुंडु

घ

घटणें = कुग्गु
घंटा = गंटे
घट्ट = गट्टि
घट्ट होणें = गट्टियागु
घटना = संगति
घर = मने (मनी)
घरटें = गूडु
घसा = गंटलु
घाअी = अवसर
घागर = कोड
घात–(शेतांत काम करण्याची योग्य वेळ) = हद
घात बिघडणें = हदगेडु
घात बिघाड = हदगेडु
घाबरणें = अंजु, गाबरियागु, हेदरु

घाम = बेवरु, बेमरु
घालविणें = हाकु
घालविणें = हाकिसु
घालविणें (वेळ) = वेळे कळे
बांधविणें (घर) = मनॆ हाकिसु
घुसणें = होगु, नुग्गु
घुसून = होक्कु
घुसलेला = होक्क
घुसळणें = कडॆ
घूंस = हेग्गण
घेणें = तॆगॆदुकॊळ्ळु, तक्कॊळ्ळु
घोगरा = गोग्गर
घोडा = कुदुरॆ
घोस = गोंचल
चकली = चक्कुलि, चक्कुलि
चटकन् = चट्टनॆ, चटक्कनॆ
चढणें = हत्तु
चढविणें = हत्तिसु
चंद्र = चंद्र
चपटा = चप्पटॆ, चपटॆ
चरणें = मेयु
चरविणें = मेयिसु
चळवळि = चळवळि, चडपटिकॆ
चऱ्हाट = रगळॆ
चवळी = अलसंदि
चाखणें = नॆक्कु
चांगला = चलो (छलो)
चांदणें = बॆळदिंगळु
चापटी = तपराकि
चारणें = तिन्निसु, मेयिसु
चारा = मेवु
चालणें = नडॆ
चाल रीत = रीति–नडावळि
चालविणें = नडॆसु
चावणें = कडि
चिकट = जिगट्टु, जिबट
चिक्कू = जीन, जिपुण, जिबट
चिडविणें = रेगिसु, कॆणकु
चिंतणें = चिंतिसु, बगॆ
चुकणें = तप्पु (धा)
चुगली = चाडि
चुंबणें = चुंबिसु
चूक = तप्पु (नाम)
चूर = चूरु
चूल = ऒलॆ
चोंच = चुंचु
चोर = कळ्ळ
चोरणें = कदि

## छ

छपणें = अडगु
छप्पर = छप्पर<
छापणें = छापिसु, मुद्रिसु
छापखाना = छापखानॆ
छाया = नॆरळु (तॊळ्ळु)
छिद्र = छिद्र–तूतु
छत्री = कॊडॆ, छत्तरिगॆ

छत्त = छत्तु, चत्तु
जकात = सुंक, जकाति
जखम = गाय (घाय)
**जपणें** = जप्पिसु
जमणें = कूडु
**जर (If)** = जर (अु. क. व्य. भा)
जळणें = सुडु
जवळ = हत्तर–समीप
जागा = जागु, ' जगा '
जाड = दप्प
जाणणें = अरि, तिळि
जाणें = होगु
जाअून = होगि
जातें = बीसुव कल्लु
जामीन = जामीनु,
जार = मिंड
जास्त = हेच्चु
जिथे = अेल्लि (यल्लु)
जिरणें = अिंगु
जिरविणें = अिंगिसु (मस्ती जिरविणें या अर्थी नाही)
जिवंत = जीविद्द, जीवंत
जीभ = नालगु, नालिगे
जीव = जीव
जीवित = बाळ्ळु
जुंपणें = हूडु
जुळें = अवळिजवळि
जेमणें = अुण्णु
जेवलेला = अुंड
जेअून = अुंडु
जेव्हां = यावाग
जोखणें = तूगु
जोर = जोरु
जोरानें = जोरिनिंद, (जोरले)
जोडणें = जोडिसु
जोडा (पादत्राण) = मच्चे
ज्वर = जड्ड, कायिलु

### झ

झक मारिणें = झक्किसु, जक्किसु
झपझप = भराभरा
झरझर = झट्टनु
झळ = झळ
झाकणें = मुच्चु
झाड = गिड, मर
झिजणें = सवियु
झिजविणें = सविसु
झुडुप = कंटि
झुरळ = जोंडिग
झेंडा = निशाणि, बावुट, ध्वज
झोप = निद्दे (निद्दि)
झोपमोड = निद्देगेडु
झोंबणें = अुरि
झोळी = जोळिगे

### ट

टक लावणें = दिट्टिसि नोडु
टपाल = टपालु, अंचे

टपालहशील = अंचेवेच्च
टरफल = सोप्पे–गोळलि
टळणें = तप्पु
टाळणें = तप्पिसु
टाळी = चप्पाळे
टिकणें = ताळु
टिपणें = टिप्पणे माडु
टिपण = टिप्पणि
टेकडि = दिन्नि
टेकणें = आतुकोळ्ळु
टेकून बसणें = आतुकोंडु कूडु
टोंक = तुदि
टोपी = टोप्पिगे

ठ

ठकविणें = मोसगोळिसु, ठक्किसु

ड

डकणें = अंटिकोळ्ळु
डकविणें = अंटिसु, डकायिसु
डफ = डप्पु
डबा = डब्बि
डरणें = अंजु, हेदरु
डाग = कलॆ (कलि)
डागणें = बरॆ कोडु
डावा = ऎड (यड)
डावा हात = ऎडगै
डांस = गुंगाड
डाळ = बेळॆ (ब्याळि)
डिंक = अंटु
डुलणें = तूगाडु
डोकें = तलॆ
डोंगर = गुड्ड
डोहाळे = बयकॆ
डोहाळे लागणें = बयकॆ हत्तु
डोळा = कण्णु
डोल = डोलु

ढ

ढकलणें = नुगिसु, दूडु
ढग = मोड
ढवळणें = दुंडरिसु
ढळणें = कदलु
ढुंगण = कुंडि
ढेकर = डरकि, तेगु
ढेकर देणें = डरकीकोडु, ओक्कळिसु
ढेकूण = तगणि
ढेप = कुळ्ळु
ढोंग = ढोंगु, नेव
ढोंग करणें = नेव हेळु

त

तट्टी = तट्टि
तडफडणें = चडपडिसु
तडीस नेणें = कोनेगाणिसु
तथ्य = हुरुळु
तपेलें = तप्पेलि
तरंगणें = तेलु
तरट = तट्टु
तरुण = हरॆयद

तसा = हागे
तहान = नीरडिके, बायारिके
तळ = तळ, बुड
तळणें = करि (यु)
तळें = केरे (केरि)
ताक = मज्जिगे
ताग = सणबु
ताड = **ताडु**
ताटवा = मडि
ताठ = शेट्टेद, नीटाद
ताडणें = अप्पळिसु
तान्हें मूल = मोले कूसु
ताप = ज्वर
तांब्या = **तंबिगे**
तार = तंति
तार = (telegram) = तारु
तारा = चिक्के
तिकडे = अत्त
तिखट = खार (ना. वि.)
तिघेजण = मूवरु
तितका = अष्टु
तिरडी = शिदिगे
तिरवा = सोट्ट
तिरळा = मेळ्ळ
तिसरा = मूरने
तीन = मूरु
तीळ = अेळ्ळु (यळ्ळु)
तिळगूळ = अेळ्ळु बेल्ला
तुकडा = तुणुकु, तुंडु
तुडविणें = तुळि
तूप = **तुप्प**
तुंबणें = **तुंबु**
तुरट = **वगरु**
तुलना = होलिके
तुलना करणें = होलिसु
तुसडा = सिडुक
तृतीया = तदिगि
तोच = अवने
तोटा = तोटे, हानि
तोटी = तोटि
तोडनिघणें = बगेहरि (यु)
तोंड (mouth) = बायि
तोंड (face) = मोरे
तोपर्यंत = अल्लियतनक, आवरेगे

**थ**

थकणें = दणि
थकवा = दणिवु
थट्टा = चेष्टे
थंड = तण्णगे
थंडी = चळि (छळि) थंडि
थर = थर, तर
थाप = बुरडे
थुंकणें = उगुळु (धा.)
थुंकी = उगुळु (ना)
**थेट** = थेट
थेंब = हनि

थेरडा = मुदुवड (मुदुकविद्या)
थोडा = स्वल्पु, तुसु
थोर = हिरि, दोड्ड

## द

दंड = दंड
दंड करणें = दंडिसु
दडपणें = हत्तिक्कु
ददात = कोरते
दम = दम्मु
दमा = दम्मु
दमणें = दणि(यु)
दमविणें = दणिसु
दर = धारणे, दर
दरवाजा = बागिल, कद
दल = पक्कळि
दंव = अिब्बन्नि
दंश = दंश
दवडणें = कळे
दळणें = बीसु
दही = मोसरु, मसरु
दाखविणें = तोरिसु,
दागिना = वस्त, ओडवे, दागीने
दाट = दट्ट
दाटी = दट्टणे, दट्टणि
दाढी = गड्ड
दाणा = काळु
दांत = हल्लु
दाद = दादु
दादा = अण्ण
दाभण = दब्बण
दार = कद
दारु = सरायि, शरे
दावा = दावे
दावें = कण्णि, दावणि
दिपणें = कुक्कु
दिवस = दिवस, दिन
दिवसा = हगलु
दिवा = दीप, दीविगे
दिवा लावणें = दीपहच्चु
दिवा मालविणें = दीप नंदिसु
दिशा = दिक्कु
दीर = भाव
दुकान = अंगडि
दुःख = दुःख
दुरुस्त करणें = सरिपडिसु, दुरस्त माडु, तिद्दु
द्रव्य = हालु
दृश्य = नोट
देणें = कोडु
देऊन = कोट्टु
देव = देवरु
दैव = हणेबरह (ललाट लेख)
देणगी = कोडुगे, देणगी
दोघेजण = अिब्बरु
दोन = अेरडु
दोर = हग्ग

दोरा = दार
दोरी = हग्ग
द्वितीया = बिदिगे, बिदिगि

धं

धक्का = पेट्ट, अेड्ड, धक्के
धगड = भिंड
धगधगणें = धगधगिसु
धंदा = धंदे
धनें = हवीज
धनुष्य = बिल्लु
धरण = ओड्ड
धरणें = हिडि (यु)
धाड = धाडि, बेने
धातु = धातु
धार = हदन
धावणें = ओडु
धीर = समाधान
धीर धरणें = समाधान हिडि
धूळ = धूळि
धोंडा = कल्लु
ध्यान = ध्यान
ध्यान करणें = ध्यानिसु

न

नकटा = मूगिनव
नकाशा = नकाशे
नको = बेड
नकोसें होणें = बेडागु
नक्कल = नकलु
नक्की = निक्की
नख = उगुरु
नजर = दृष्टि, नजरु
नमस्कार = नमस्कार
नमस्कार करणें = नमस्करिसु
नवस = हरिके
नवीन, नवा = होस
नव्हे = अल्ल
नसता = अल्लद, इल्लद
नहाण = नेरे
नहाण येणें = मैनेरे
नाक = मूगु
नाक मुरडणें = मूगु मुरि
नाचणें = कुणि(यु)
नाटक = नाटक
नाणें = नाण्य
नात = मोम्मगळु
नारळ = टेंगिन कायि
नाल = नालु
नांव = हेसरु
नावाडी = अंबिग
नासणें = केडु
नाहीसें होणें = अळि
निकाल = तीर्पु (judgment)
निखारा = केंड
निजणें = मलगु
निदान = निदान
निंदणें (जमीन) = कळे तेगे

निंब = बेवु
निमित्त = नेव
नियम = नेम
निऱ्या = नीरिगे
न्हावी = नावलिग

## प

पकडणें = हिडि (यु)
पंचा = पंजे, पंजि
पचणें = पचनवागु, दक्कु
पचविणें = दक्किसु
पडदा = पडदे
पडवळ = पडवलकायि
पति = गंड
पतकरणें = कैकोळ्ळु
पत्र = पत्र, ओले
पथ्य = पथ्ये
पथ्य करणें = बायि कायु, पथ्येमाडु
पदर = सेरगु
परकर = परकार
परत = तिरुगि, होरळि
परात = परातु
परंतु = आदरे
परवां = मोन्ने (भूतकालिक)
परवां = नाडदु (भविष्यकालिक)
परसु = हित्तल
पश्चिम = पडुवण, पश्चिम
पसरणें = हब्बु
पसरविणें = हब्बिसु, हरवु
पस्तावणें = पश्चात्तापपडु
पळणें = ओडु
पळविणें = ओडिसु
प्रतिपदा = पाड्य
पाऊस = मळे
पाकळि = पक्कळे
पाक = पाकु
पाखडणें = केरु, तवडु
पांघरुण = होदिके
पांघरणें = होत्तुकोळ्ळु
पाजणें = कुडिसु
पाजळणें = हणिसु
पाडणें = केडवु
पांढरा = बिळि, बिळिय, बिळे
पाट = मणे
पाटा = असीकल्लु
पाटी = बुट्टि
पाठ = बेन्नु
पाडी = करु
पाढे = मग्गि
पाणी = नीरु
पातें = अलगु
पान = अेले (यलि)
पादणें = हूसु बिडु, हूसु
पाय = कालु
पायांत घालणें = मेट्टु
पायरी = पावुटणिगे
पाया = पाया, तळहदि

पार = आचे (beyond)
पारंबी = टोंगि
पारध = बेटेगार
पालटणें = बदलागु
पावणें = पडे
पाहणें = नोडुं
पाहिजे = बेकु
पाळणा = तोट्टल
पाळी = सरति, पाळि, बारि
पाळणें = साकु
पाळीव = साकिद
पिकविणें = हण्णुमाडु, मागिसु
पिकणें = हण्णागु, मागु
पिचणें = सीळु
पिचकारी = जीकळि
पिंपळ = अरळेमर, अरळीमर
पिल्लू = मरि
पिशवी = चील
पीक = बेळे
पुढील, पुढला = मुंदिन
पुरणें (पुरेहोणें) = साकागु–सालु
पुरणें (जमीनींत) = हुगि
पुरता = पूर्ति
पुष्कळ = बहळ, हलवु, पुष्कळ (व्य. भा.)
पूर्णिमा = हुण्णिवि (बारा पूर्णिमांचीं लौकिक नांवें शेवटी पहा)
पेटी = पेट्टिगे
पेढ़ = पेढ़
पेंडी = सिवुडु
पेरणें = बित्तु
पेरु = पेरल कायि (कच्चा) पेरल हण्णु (पिकलेला)
पैज = जिद्दु
पैज लाविणें = जिद्दुकट्टु
पैसा = रोक्क, हण, दुड्डु
पोकळ = **पोळ्ळु**
पोंचणें = मुट्टु
पोचविणें = मुट्टिसु
पोचा = नेग्गु (नाम)
पोचा येणें = नेग्गु
पोट = होट्टे
पोटरी = मीनगंड, काणिगालु
पोट भरणे = होट्टु तुंबिकोळ्ळु होट्टे होरकोळ्ळु
पोपट = गिळि
पोर = हुडुग
पोलाद = उक्कु
पोशाख = उडिगे
पोळी = होळिगे
पोर्णिमा = हुण्णिवे, हुण्णिवि
प्रीति = प्रीति, अक्करे
प्रीति करणे = प्रीतिसु

## फ

फडके = अरवि तुंडु
फडा = हेडे

फणी = हणिगे
फार = बहळ
फायदा = फायदे, लाभ
फास = उरुलु
फिरणे = तिरुगु, तिरुगाडु
फिरुन = तिरुगि, मत्तु
फुकट = पुक्कट्टे
फुंकणें = ऊदु
फुंकणी = ऊदुगोळवि
फुटका = ओडक
फुटणें = ओडे
फुलणें = अरळु
फेडणें (कर्ज) = तीरिसु
फोडणी = वग्गरणे
फोडणें = ओडे

ब

बगळा = ककोंचु, कोरकंचे
बचावणें = उळि, उळकोळ्ळु
बडविणें = बडि, होडे
बडबडणें = बडबडिसु, वटगुड्
बडिशेप = बडीशेपु
बडेजाव = बडिवार, जंभ
बंद = बंदु
बरणी = बरणि
बसणें = कूतुकोळ्ळु, कूडु
बळकाविणें = कसिदुकोळ्ळु.
बाग = तोट
बाजार = संते
बाजू = बदुवु
बाण = बाण
बादली = बकीटु
बाधणें = बाधिसु
बांधणें = कट्टु
बांधविणें = कट्टिसु, हाकिसु
बाप = तंदे
बारीकसारीक = सण्णपुट्ट
बाहु = भुज, तोळु
बाहेर = होरगे
बाळंत होणें = हडे-हेरु (हेत्तु, हेत्त)
बाळंतीण = बाणंति
बुजणें = बेदरु
बुजविणें = बेदरिसु
बिडी = चुट्ट, बीडि
बुडणें = मुळुगु
बुडविणें = मुळुगिसु
बैल = ऎत्तु, यत्तु
बैलगाडी = चक्कडि
घोचणें = चुच्चु, नट्टु
बोट = बोट्टु, बेरळु
बोडका = बोक्क
बिघडणें = केडु
बिचकणें = हिंजरियु
बिथरणें = बेदरु
बिऱ्हाड = बिडार, मने

भ

भजणें = भजिसु

भजन = भजनि
भटजि = भट्ट
भय = अंजिके
भरवसा = भरवसे, नंबिगे
भरणें = तुंबु
भरविणें (धान्य, पाणी वगैरे) = तुंबिसु
भागणें (संख्या) = भागिसु
भागणें = सागु
भागविणें = सागिसु, नडेयिसु
भाचा = सोदर ळिय
भाजी = पल्ले
भाजणें (फुटाणे वगैरे) = हुरि
भाजणें (हात वगैरे) = सुडु
भांडणें = जगळ, न्याय
भांडणें = जगळाडु, न्यायाडु
भाडें = बाडिगे
भांडें = भांडि
भासणें = भासवागु
भिकारी = तिरुक, भिक्षुक
भिजणें = तोय्यु
भिजविणें = तोय्यिसु
भिणें = अंजु, हेदरु
भिंत = गोडे
भित्रा = अंजुबुरक, हेडि
भिवविणें = अंजिसु—हेदरिसु
भीक = भिक्षे
भीड = भिडे
भुंकणें = बोगळु
भुसा = हौट्टु
भूक = हसिवे
भूत = देव्व
भोक = तूतु
भोगणें = भोगिसु, अण्णु
भोवती = सुत्तलु
भोवरा = बगरि
भोळा = भोळे
भोसकणें = तिवि (चु)

म.

मऊ = मेत्तगे
मग = आमेले
मगर = मसळि, मोसळि
मघाशी = आगळे (व्य. भा.)
मच्छर = नोण
मटको = मडिकि
मठ्ठ = घड्डु
मठ्ठा = मज्जिगे
मडके = गडिगि
मढें = हेण
मण = मण
मणगट = मणिकट्टु
मत = मत, अभिप्राय
मध = जेनुतुप्प
मधला = नडुविन
मध्ये = नडुवे, मध्यदल्लि
मन = मनस्सु
मनाजोगा = मनसिनतक्क

मरण = सावु
मरणें = सायु
मलीन = होलसु
मसण = सुडुगाडु, सुडुगाडगट्टि
मसलत = मसलत्तु
महत्त्व = महत्त्व
महाग = तुट्टि
महागणें = तुट्टियागु
महागाओ = तुटाग्रतु
मळणें = मासु, होलसागु
मळविणें = मासिसु
माकड = मंग, कोति
माग = मग्ग
मागसलेला = हिंदुळिद
मागें = हिंदे, हिंदक्के
मागून = हिंदिनिंद
मागणी = बेडिकु
मागणें = बेडु
मांजर = बेक्कु
माठ (भाजी) = हरविपल्ले
माती = मण्णु
माप = मापु, अळतु
माफ करणें = क्षमिसु
माफी = माफि
मामा = सोदरमाव
मामी = सोदरत्ति
मार = होडत, पेट्टु
मारणें = होडे (यु)

मार्ग = हादि
मालक = ओडेय
मालविणें = आरिसु
मालविणें (दिवा) = दीप कळे
मावळणें (सूर्य) = मुळुगु (बुडणें)
मावशी = अबचि, दोड्डव्व (थोरली)
चिगव्व (धाकटी)
माळ = हक्कल
माळी = तोटिग, माली
मासा = मीन
माहीत असणें = गोत्तिरु
माहीत होणें = गोत्तागु
माहिती = माहिति
माहेर = तवरुमने
मिटणें = मुच्चु
मिठाओ = मिठायि
मिळणें = सिगु
मोठ = अुप्पु
मुकणें = अेरवागु
मुका = मूक
मुंगी = अिरुवि
मुद्दल = मुद्दलु, **मोदलु**
मुरडणें = **मुरि**
मुसळ = वणिकु
मूठ = मुष्टि, हिडि
मूत = अुच्चि
मुतणें = अुच्चिहोय्यु
मेलेला = सत्त

मैदान = बैलु
मोकळा = मोक
मोगरा = मल्लिगे (गि)
मोजणें = ऎणिसु
मोट = मट्टे
मोठा = दोड्ड
मोंड = चिल्लरु
मोडणें = मुरि
मोर = नविलु
**मोरी** = मोरि
मोल = बेले
म्हणजे = अंदरे
म्हणणें = अंबोण
म्हणून = अंतु-अंत
म्हातारा = मुदुक (ना. व वि)
म्हातारी = मुदुकि
म्हैस = ऎम्मु

### य

यश = यशस्सु
यंदा = ओसल
येणें = बरु
ये, जा = बा, होगु
येथपर्यंत = अल्लियवरॆगे–तनक
येथून = अल्लिंद

### र

रंग = बण्ण
रंगविणें = बण्णकोडु
रचणें = रचिसु
रचणें (कथा वगैरे) = कट्टु ('बांधणें')
रजा = रजे
रडवा = अळुबुरुक
रडणें = अळु
रवा = रवे
रंडा (विधवा) = रंडे, मुंडे
रंडा (वेश्या) = सूळे
रमणें = गमिसु
राखण = कावलु
राखणें = रक्षिसु, कायु
राग, क्रोध = सिट्टु
रागावणें = सिट्टिगेळु, सिट्टागु
रांगणें = अंबेगालिक्कु
राजा = अरसु
रात्र = रात्रि, अरुळु
रास = राशि
रांधणें = अडिगेमाडु,
राहणें = अरु
राहून = अिद्दु
**रिकामा** = रिकामि, बरे, खाली
रिझविणें = रंजिसु
रुचणें = सेरु
रुजणें = हुट्टु
रुतणें = नट्टु, सिगबीळु
रेघ = गेरे
रेडा = कोण (कॉण)
रोख = रोख

रोग = बेने
रोज = दिनालु, दिना (व्या. भा.)
रोप = अगि
रोवणें = नडिसु

## ल

लंगडणें = कुंडु
लंगडा = कुंट
लपविणें = अडगिसु, मुच्चिडु, बच्चिडु
लाकूड = कट्टिगे
लाकडी = कट्टिगेय
लाच = लंच
लागणें = हत्तु
लाज = नाचिके
लाट = तेरे
लाटणें = लट्टणि (नाम)
लाटणें (अपहारकरणें) = ओत्तिहाकु
लाटणें (पोळी) = लट्टिसु
लाड = अच्छे (व्या, भा.)
लाड करणें = अच्छे माडु (व्या. भा.)
लाथ = ओदिके
लाथ मारणें = ओदे
लांब = उद्द
लाल = केंपु
लावणें = हच्चु
लावणी = लावणि
लिहिणें = बरे (यु)
लाळ = जोल्लु
लोक = जनरु, मंदि
लोखंड = कब्बिण
लोटणें (ढकलणें) = दूडु
**लोड** = लोडु
लोपणें = लोपवागु–अळियु

## व

वय = वयस्सु, प्राय
वयांत येणें = वयस्सिगे बरु
वरवंटा = गुंडकल्लु
वागणें = नडे, नडकोळ्ळु
वागविणें = नडेसिकोळ्ळु
वाचणें (पुस्तक) = ओदु
वांचणें (जीव) = उळि
वाजणें = नुडि
वाट = हादि
**वाडा** = वाडे
वाढणें = बडिसु, नीडु (अन्न वगैरे)
वाद = वाद
वाद घालणें = वादिसु
वास = वासने, नात
वारंवार = मेलिंदमेले, आगागगे, बारिबारिगे
वाव = अनुवु, अवकाश
वावरणें = अड्डाडु
वाफ = उगि, वापु
वाहणें = हरियु (flow)
वाहणें (ओझें) = होरु
वाळू = उसुकु
विकणें = मारु

विकत घेणें = कोळ्ळु
विचार करणें = विचारमाडु, बगु
विचारणें = केळ्ळु
विझविणें = आरिसु, नोंदिसु
विटाळ = मुट्टु
विटाळशी होणें = मुट्टागु, कडिगागु (व्या.)
विणें = ईयु
विणणें = हेणे (यु)
वितळणें = करगु
विवळणें = तोळलु
विसळणें = गलबरिसु
विरजण = हेप्पु
विरजणें = हेप्पु हाकु (स. धा.)
हेप्पुगट्टु (अ. धा.)
विळखा = सुत्तु
विळा = कुडगोलु
विळी = ईळिगे
वेगळा = बेरे
वेचणें = आरिसु
वेड = हुच्चु
वेस = अगसे
वेळ = वेळे, होत्तु

**श**

शपथ = आणे
शपथ घेणें = आणे माडु
शहाणा = जाण
शाई = मशि
शाळा = साले (लि)
शिकरण = सीकरणे
शिंकें = नेलवु
शिंग = कोडु
शिजणें = बेयु
शिजविणें = बेयिसु
शिंपडणें = सिंपडिसु
शिंपी = शिंपिग
शिवणें (कापड) = होले (यु)
शिवणें (स्पर्शिणें) = मुट्टु, तगलु
शेजारी = नेरेयव
शेट = सेट्टि—शेट्टि
शेत = होल
शेण = सेगणि, शेगणि
शेपूट = बाल
शेंबूड = सुंबळ
शेंबूड काढणें = सुंबळ कळे
शोभणें = ओप्पु

**स**

सगळा = ऎल्ल
सगळीकडे = ऎल्लकडे
सजविणें = सिंगरिसु, शृंगरिसु
सदा = यावागलू
संध्याकाळ = संजे
सपक = सप्पगे
समजूत = तिळुवळिके, अरिवु
सवड = सवडु, पुरसत्तु, तेरवु
समाचार = समाचार

समोरासमोर = अदिरुबदिरु
संवय = चाळि, चट, ' रूढि ' (व्या.) अभ्यास
सहन करणें = सहिसु, तडकोळ्ळु, तडॆ
साखर = सक्करॆ
सांठविणें = कूडिहाकु, कूडि इडु, संग्रहिसु
सापळ्या = बलि
सांपडणें = सिगु
सारखें असणें = होलु
सारवणें = **सारिसु**
सासरा = माव
सुआी = सूजि
सुकणें = ओणगु
सुकविणें = ओणगिसु
सुचणें = हॊळॆ
सुचविणें = सूचिसु
सूड = सेडु
सूड घेणें = सेडु तीरिसु, सेडु तॆगॆदु कॊळ्ळु (तक्कोळ्ळु)
सोकावणें, सवकणें = **सोक्कु**
सोडून देणें = बिट्ट, बिडु, बिट्ट कॊडु
सोनें = बंगार–हॊन्नु
**सोय** = अनुवु–अनुकूल (नाम), सोयि
सोलणें = **सुलि** (यु)
सोवळें = मडि
सोवळे ओवळें = मडि–मैलिगि
सोसणें = सहिसु, सोसु

स्थापणें = स्थापिसु
स्वस्त = अग्ग
स्वीकारणें = स्वीकरिसु
हकालणें = अट्ट,
हगणें = हेलु
हंगविणें = **हंगिसु**
हजार = साविर
हटणें = हिंजरि
हरवणें = कळॆ, कळॆदुकोळ्ळु, कळकोळ्ळु
हलका = हगुर
हलका, क्षुद्र = हलकी
हलणें = अगळाडु, कदलु
हालविणें = अगळाडिसु,
हसणें = नगु
हवा = हवॆ (air)
**हव्यास** = हव्यास
हळु = मॆल्लनॆ
हाकणें (गाडी) = हॊडॆ
हाक = करॆ
हाड = ऎलबु
हात = कै
**हातोटी** = हतोटि
हाल = गोळु
हुडकणें = **हुडुकु**
**हुंब** = हुंब
**हौस** = हवुसु
हेवा = मत्सर, हॊट्टॆकिच्चु

## महिने, सण, पूर्णिमा वगैरे

चैत्र, वैशाख, वगैरे महिने मराठीप्रमाणेंच आहेत.

अमावास्या = अमावास्यु (अमाशि)

पोर्णिमा = हुण्णिवे–(हुणिवि)

प्रतिपदा = पाड्य

द्वितीया (बीज) = बिदिगि

तृतीया (तीज) = तदगि–अक्कन तदगि–बहीण तीज

बाराहि पूर्णिमांना कानडींत निराळीं लौकिक नांवें असून ग्रामीण व्यवहारांत व शेतकी जीवनांत त्या नांवांनींच त्यांचा अुल्लेख करतात.

| | |
|---|---|
| चैत्री पूर्णिमा | = दवनद हुणिवि |
| वैशाखी पूर्णिमा | = आगि हुणिवि |
| ज्येष्टी पूर्णिमा (वट पूर्णिमा) | = कारहुणिवि |
| आषाढी पूर्णिमा (गुरुपोर्णिमा) | = कडलिगडबिन हुणिवि |
| श्रावणी पूर्णिमा (नारळी पूर्णिमा) | = नूलहुणिवि |
| भाद्रपदी पूर्णिमा | = अनंतन हुणिवि |
| आश्विनी पूर्णिमा (कोजागरी पूर्णिमा) | = शीगीहुणिवि |
| कार्तिकी पूर्णिमा (त्रिपुरी पूर्णिमा) | = गौरी हुणिवि |
| मार्गशीर्ष पूर्णिमा (दत्तजयंति) | = होस्तिल हुणिवि |
| पौष्यी पूर्णिमा (शाकंबरी) | = बनद हुणिवि |
| माघी पूर्णिमा | = भारत हूणिवि |
| फाल्गुनी पूर्णिमा (शिमगी पूर्णिमा) | = होळी हुणिवि |

गुढीपाडवा = युगादि (अुगादि)

नागपंचमी = नागपंचमि

गणेशचतुर्थी = गणेश चोति

दसरा = दसरे, मानम्मि, नाडहब्ब

दिवाळी = दीवळिगे (गि)

शिमगा = होळीहुणिवि

—×—

# अभिप्राय

माझे तरुण मित्र श्री. शंकर विनायक जोशी यांचा 'कन्नड प्रबोध' महाराष्ट्रीयांच्याकरितां लिहिला असला तरी मराठी जाणणाऱ्या बुद्धिमान् कानडी लोकांनीं त्याचें अवलोकन अवश्य करावें अशीं कांहीं प्रकरणें त्यांत आहेत. क्रिश्चन लोकांनीं असा मुद्देसूद अभ्यास केल्याचीं अुदाहरणें आहेत. मराठींत हा असा पहिलाच ग्रंथ म्हटलें तरी चालेल. त्यांतल्या त्यांत ४४ ते ५२ या प्रकरणांतून बुद्धीला चालना देणारें असें कांहीं आहे. असा थोडा तौलनिक अभ्यास नवीनच असल्यामुळें भिन्न अभिप्रायाला व दृष्टीला अवकाश खास असणारच.

ग्रंथकर्त्याचे वडील कर्नाटकांत व कानडींत आपल्या काळीं थोर अधिकारी पुरुष गणले जात होते. त्यांच्या चिरंजीवांनीं कानडी व मराठी भाषिकांना आपल्या 'प्रबोधा'नें जवळ आणलें आहे. आंतरभारतीच्या वर्गांतून व पुना युनिव्हर्सिटीच्या कांहीं अभ्यासांतहि याचा अुपयोग होअील असें मला वाटतें.

भाषिक, व्यावहारिक, सांस्कृतिक व औपयोगिक अशा सर्व दृष्टींनीं हें पुस्तक सरस ठरेल असें मला वाटतें.

द. रा. बेन्द्रे
कन्नडचे प्रोफेसर
द. अ. वि. कॉलेज. सोलापूर

कोणत्याहि भाषेच्या समग्र स्वरूपाचें सौंदर्य समजायला ती भाषा मातृभाषा असली पाहिजे किंवा त्या भाषेचा सहानुभूतिपूर्वक अभ्यास तरी केला पाहिजे. अपरिचित भाषा ही केव्हांहि तिच्यांतील वैशिष्ट्यें व वैलक्षण्यें यांमुळें अन्यभाषकांच्या कानांना विचित्र वाटणें स्वाभाविकच असतें. परंतु तिचा परिचय होतांक्षणीं तिचें सौंदर्य व स्वारस्य हीं कशांत आहेत हें माहित होतें आणि तिच्या विषयीं आपुलकी व प्रेम वाटूं लागतें.

कानडी ही फार प्राचीन भाषा आहे. हजारो वर्षांपासून ती राजगृहीं व गुरुगृही वाढलेली असल्यामुळें शब्दसंपत्ति व भावसंपत्ति यांनी ती भरली आहे. मानवाचें लौकिक जीवन ती चित्रवूं शकते. आंतरंगिक जीवनहि ती चांगल्या तऱ्हेने वर्णूं शकते. द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत, जैन, वीरशैव तत्त्वज्ञानें यांचा कानडीभाषेच्या द्वारांच दीर्घकाळपर्यंत प्रचार झालेला आहे. त्यामुळेंच कानडी भाषेस अेक प्रकारचें सौंदर्य आलें आहे. तिला अेक तऱ्हेचें सत्त्व प्राप्त झालें आहे.

शेजारच्या प्रांतांतील लोकांनीं कानडी भाषेचा कूलंकषपणें परिचय करून घेणें अत्यवश्य आहे. महाराष्ट्रांच्या प्रौढ लोकांना कानडी भाषेचा परिचय करून घेणें सोयीचें होण्याकरितां श्री. शं. वि. जोशी यांनीं 'कन्नडप्रबोध' हें पुस्तक लिहिलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. श्री. जोशी हे दोन्ही भाषांचे चांगले जाणकार आहेत. मराठी ही त्यांची मातृभाषा आहे तर कानडी ही त्यांची देशभाषा आहे. दोन्ही भाषांचें मर्म जाणण्यास त्यांना अनुकूलता आहे. त्यांनीं हें महत्त्वाचें कार्य अंगीकारून यशस्वीरीत्या तें पार पाडलें आहे या बद्दल मला पूर्ण समाधान वाटत आहे.

कानडी शिकूं अिच्छिणाऱ्या महाराष्ट्रीयांना कन्नडप्रबोध अुपयोगी होअील असा मला विश्वास वाटतो. द्विभाषा तज्ञ श्री. जोशी यांचे हातून या पुढेंहि अशा प्रकारची अुभय भाषांची सांगड घालून देणारीं कार्यें होत जावोत अशी माझी प्रार्थना आहे.

बेटगेरी कृष्णशर्मा
संपादक 'जयंति' धारवाड

ता. १५-१२-५४

श्री. शं वि. जोशी यांनीं 'कन्नडप्रबोध' लिहून तुलनात्मक अभ्यास. दृष्ट्या जिज्ञासु विचारवंतांवर अुपकार केले आहेत. मराठींत कानडी सारखा तोंडावळा असलेल्या बऱ्याच गोष्टी आहेत, ही गोष्ट नाकबूल करणें अशक्य आहे. हीच अवस्था कानडींतील संस्कृत–प्राकृताची! या गोष्टी परक्या समजणें भ्रामक आहे. या गोष्टी मुदलांतल्याच आहेत. अुदा. कोरणें, सोलणें, तुंबणें सारखे कानडी तोंडवळ्याचे धातु किंवा कानडींतील अुटाअिसु, लगायिसु, कंटव्हिसु वगैरे धातु. भाषेंतील धातूंना परके समजल्यानें मुदलांतील गोष्टींना अुसनवारीचा प्रकार मानून आपण त्यांना पारखे होत आहोंत. प्रांतीय अभिमान आड येत असल्यामुळें अुभयभाषाविषयक वस्तुस्थितीचें आकलन होणें दुरापास्त झालें आहे.

मऱ्हाटीचें मूळस्वरूप कळण्यास कानडीचा अभ्यास अनिवार्य आहे व या दिशेंतील प्राथमिक अभ्यासाच्या दृष्टीनें श्री. शं. वि. जोशी यांचा 'कन्नडप्रबोध' हा ग्रंथ फार मोलाचा ठरणार आहे. श्री. जोशी हे अुभय भाषा विशारद आहेत. मराठींतील चांगले वक्ते व लेखक म्हणून त्यांनीं या पूर्वींच नांव मिळविलें आहे. या ग्रंथांत दोन्ही भाषेंतील आजवर कोणाच्याहि लक्षांत न आलेल्या बऱ्याच लकबा त्यांनीं नमूद केल्या आहेत. हें त्यांच्या सखोल अभ्यासाचें निदर्शक आहे.

मराठी जिज्ञासु वाचक श्री. जोशी यांच्या ग्रंथाचा पुरेपूर फायदा करून घेतील, अशी बळकट आशा आहे.

धारवाड
ता. १२–१२–५४

शं. बा. जोशी

मुद्रक :
रा. गो. हुक्केरी
अक्षय प्रेस, धारवाड

प्रकाशक :
रा. ग. जोशी
दि स्टूडंट्स ओन् बुक डिपो, धारवाड